IRBK-0100073

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे

विषय किरकोळ

दा क्र ७३

IRBK-0100073

IRBK-0100073

2

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीची पुस्तकमाला,
पुस्तक ४८ वें.

Finance 6 969

# भद्रंभद्र.

या महापुरुषाच्या जीवनचारित्राचा कांहीं इतिहास.

लिहिणार

त्याचा शिष्य आणि भक्त

वेदशास्त्रसंपन्न अंबाराम केवळराम अवटंके.

जात—शुद्ध ( वेदोक्त ) ब्राह्मण.

वय ३७ वर्षें, ५ महिने, २ दिवस, ५। घटका ११ पळें, ७ विपळें, [ चैत्री पंचाग ].

उंची—( सुतारी ) गज २, तसु २३॥।=।.

गुजराथींत प्रसिद्ध करणार

श्रीयुत रमणभाई महिपतराम, बी. ए., एल् एल्. बी.

मराठींत भाषांतर करणार

श्रीयुत बापूराव करंदीकर.

IRBK-0100073

प्रकाशक

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी,

गिरगांव, मुंबई.

[ किंमत ०—१०—०. ]

[ मार्च १९१०

सर्व हक्क स्वाधीन.

Printed at the Karnatak & the Bombay Vaibhao
Steam Press, Girgaon; and published by K.R.Mitra,foı
the Manoranjak Granth Prasarak Mandali, Bombay

# अर्पणोद्गार !

आपण सकलगुणसंपन्न आहा !
आपण सर्व उपमांनां योग्य आहां !
आपण राजमान्य राजेश्री आहां !
श्रूयताम् ! श्रूयताम् ! !

आपली दृढता अनुपम आहे !
दहा वेळ तुरुंगांत गेलेत तरी धैर्य खचलें नाहीं !
डोळ्यांतून एक टीपहि निघालें नाहीं !
ओंठावाटे एक सुस्काराहि निघाला नाहीं !
तोंडावर दुःखाची छायासुद्धां दिसली नाहीं !
आपला निश्चय ढळला नाहीं !

दृश्यताम् ! दृश्यताम् !

आपल्या अचल आर्यत्वांत सुधारणेचा प्रवेश नाहीं !
पांच हजार वर्षांपूर्वीच्या पूर्वजांत व आपल्यांत भेद नाहीं !

धन्यताम् ! धन्यताम् !

या रीतीनें धर्माची सनातनता आपण सिद्ध केली आहां!
फेरफार आणि इतिहासक्रम हीं खोटीं पाडलीं आहां !

ही निश्चलता इतर प्रजाजनांत नाहीं !
निश्चलता हें आपलें सर्वस्व आहे !
निश्चलता हें आर्यत्वाचें रहस्य आहे !

गृह्यताम् ! गृह्यताम् !!

हें पुस्तक मी आपल्याला अर्पण करित आहें !
हें पुस्तक मी आपल्या हातांत देत आहें !
हें पुस्तक मी आपल्या नांवाला जोडित आहें !

ग्रंथकर्ता.

# संयुक्त प्रस्तावना.

श्रीयुत अंबाराम यांच्याबद्दल मुखपृष्ठावर जी माहिती दिली आहे, त्याहून कांहीं जास्त माहिती व्हावी अशी वाचकांनां इच्छा होणें अगदीं साहाजिक आहे. तो राहणारा कोठला, त्याचें शिक्षण किती व कोठें झालें, तो उद्योग काय करित होता, इतकी तरी माहिती पाहिजेच होती; परंतु खुद्द अंबारामाच्याच अत्याग्रहावरून ती हकीगत प्रसिद्ध करतां येत नाहीं.

स्वतः अंबारामानें सांगितल्याप्रमाणें लिहून काढून हा इतिहास श्रीयुत रमणभाई महीपतराम नीलकंठ, बी. ए., एल् एल्. बी., यांनीं गुजराथी भाषेंत प्रसिद्ध केला व त्याचें हें मराठी भाषांतर 'बापूराव' यांनीं केलें. हा पहिला भाग लोकांनां पसंत पडला तर पुढच्या भागाबद्दल पाहतां येईल.

मूळ इतिहासांत कांहीं चुका असल्या तर त्या अंबारामाच्या आहेत. गुजराथी प्रतींतील कांहीं चुका रमणभाईच्याहि असतील; परंतु मराठी प्रतींत चूक मुळींच नाहीं ! कारण, भाषांतरकाराच्या एका दूरच्या नातलगाचा एक लांबचा स्नेही सुमारें तेहतीस वर्षांपूर्वी एका आठवड्याहून कांहीं थोडे दिवस खुद्द गुजराथेंत राहत होता. अर्थात्, भाषांतर बिनचूक असलेंच पाहिजे !

एकराष्ट्रीयत्वाची कल्पना हल्लीं सर्वत्र प्रबल झालेली दिसते. एकराष्ट्रीयत्वाला एकभाषा, एकविचार, एकधर्म व एकदेश, यांची जरूरी असते. एकराष्ट्र बनविण्याचे जे निरनिराळ्या दिशांनीं प्रयत्न चालू आहेत त्यांतलाच एकमेकांचे विचार एकमेकांस कळविणें हा एक प्रयत्न आहे. गुजराथ महाराष्ट्राला चिकटलेली आहे अर्थात्, गुजराथी लोकांचे विचार महाराष्ट्रांतील लोकांच्या विचारांशीं कितपत जुळतात तें ताडून पाहतां यावें ह्मणून हा प्रयत्न आहे. शिवाय, गुजराथी भाषेचेंहि ज्ञान व्हावें ह्मणून भाषांतरांत मूळचीं नांवें तशींच ठेवण्यांत आलीं आहेत, व कांहीं गुजराथी शब्दहि तसेच ठेविलेले आहेत. '**समानशीले व्यसनेषु सख्यं**' यांतील '**व्यसन**' शब्दाचा जसा '**दुर्व्यसन**' असाच अर्थ करण्याचा '**आर्यां**'चा संप्रदाय आहे, तसाच वरील '**विचार**' व '**धर्म**' या शब्दांचा '**अविचार**' व '**अधर्म**' असा भावार्थ मानिला तर '**धर्मवीरांस**' तो मान्यच होईल. गुजराथी बंधूपेक्षां आपण किती मागें आहों, तें तपासून पाहून अंतर भरून काढण्यास या भाषांतरानें बरीच मदत होईल.

सर्व त्रैलोक्यांत आपलें आर्यावर्त श्रेष्ठ, आर्यधर्म श्रेष्ठ, आर्यभाषा श्रेष्ठ, अर्थात् आर्यभाषा बोलणारा, आर्यधर्म जाणणारा, व मानवदेह धारण करून आर्यावर्तांत

भ्रमण करणारा आर्य, धर्मवीर, प्रतापी, महापुरुष भद्रंभद्रहि श्रेष्ठ, आणि त्याचा हा इतिहास, ह्मणून तो फारच श्रेष्ठ!

हा पराक्रमी पुरुष आज हयात आहे. याचें नांव सर्वविश्रुत आहे. वेळीं अवेळीं, कोनाकोपऱ्यांतून फिरून, मिळेल तितक्या वेळा जेवून, यानें आर्यधर्म सिद्ध केला आहे; सुधारणांचा नाश केला आहे. जंगलांतून, बागांतून, शहरांतून, पर्वतांवर, समुद्रावर याच्या अलौकिक भाषणांचा बाजा बाजत आहे. याचें शास्त्रीय ज्ञान, रूढिरहस्य, व गहन विषयांतील प्राविण्य, यांचें वर्णन करण्यास कोणतीहि भाषा असमर्थ आहे! त्या भरतभानु—धर्मवीर, पूज्यपाद, श्रीभद्रंभद्र याच्या अलौकिक अनुभवाचें थोडेंबहुत वर्णन त्याचा अनुयायी अंबाराम यानें गुरुभाक्ति सफल करण्याकरितां स्वतः लिहिलें, व त्याच्या मननानें व अभ्यासानें जगताचें कल्याण व्हावें अशा पूर्ण विश्वासानें तें रमणभाई यांच्या हस्ते गुजराथींत प्रसिद्ध करविलें. त्याचें मराठींत भाषांतर करण्याचें काम 'बापूराव' यांनीं केलें, व त्याला प्रसिद्धि देऊन महाराष्ट्रावर उपकार करण्याचें काम मनोरंजक ग्रंथ प्रसारक मंडळीनें केलें!

महात्म्यांचें जीवनचरित्र लिहिणारांनां कोणाचीहि माफी मागण्याचें कारण नाहीं. त्या चरित्रांत सकल गुण समाविष्ट असतात, व लेखकहि त्यामुळें सकलगुणसंपन्न बनतो. वाचकवर्ग अज्ञ असतो, त्यानें पुस्तक वाचण्यापूर्वींच लिहिणाराचे आभार मानावे, हें उचित आहे!

फक्त एका चुकीबद्दल अंबाराम जबाबदार आहे. भद्रंभद्राच्या भाषणांत म्लेंच्छ अथवा यावनी शब्द आलेले आहेत, ते त्याचे नसून अंबारामाला मूळ शुद्ध संस्कृत शब्द—आर्यशब्द न आठवल्यामुळें त्याच्या हातून चुकून ते शब्द पडलेले आहेत.

या ग्रंथलेखनांत इतर ग्रंथकारांचें अनुकरण अगर अपहरण केलेलें नाहीं!

शेवटीं इतकेंच सांगावयाचें आहे, कीं, ज्यांनां या पुस्तकाचें रहस्य समजणार नाहीं, किंवा ज्यांनां या पुस्तकाविरुद्ध टीका करावीशी वाटेल, त्यांनीं हें पुस्तक वाचूं नये! त्यांच्याकरितां दुसरीं पुष्कळ पुस्तकें आहेत!

| | | |
|---|---|---|
| दिक्—कालाला सीमा नाहीं,<br>मग स्थल—काल यांचा<br>निर्देश कसा करावा? | } | प्रस्तावना संयुक्त असल्यामुळें<br>नांवाची जरूर नाहीं! |

# भद्रंभद्र.

## प्रकरण पहिलें.

### नामधारण.

इ. स. १८८६ सालीं माझा मित्र दौलतशंकर याच्याबरोबर मी मुंबईस गेलों होतों. आपल्या देशांतील फार प्राचीन काळापासून चालत आलेल्या धर्मावर प्रहार करणाऱ्या सुधारकांविरुद्ध दौलतशंकर फार जोरदार व्याख्यानें देत फिरत होता. त्याच्याबरोबर मींहि निरनिराळ्या देशांतून व निरनिराळ्या मुलखांतून फार प्रवास केला होता. अमदावादेहून निघून नरोडा, कोचरव, सरखेज, असारवा, वटवा, वगैरे निरनिराळ्या प्रदेशांतून आह्मीं प्रवास केला होता. या वर्षी आह्मी दक्षिणेंत नवापुरापर्यंत गेलों होतों. त्या शहरांत आमचा एक महिना मुक्काम होता. तेवढ्या अवधींत दौलतशंकरनें सुधारकांविरुद्ध १०८ व्याख्यानें दिलीं. नंतर पुढें साबरमती ओलांडून थेट धोलक्यापर्यंत जाण्याचा आमचा विचार होता. इतक्यांत अशी वातमी लागली, कीं, मुंबई शहरांत माधवबागेंत सुधारकांविरुद्ध एक मोठी जंगी सभा भरणार आहे. ही वातमी कळतांच दौलतशंकरनें आपल्या नेहमींच्या चापल्यास अनुसरून एका क्षणांत—अर्ध्या क्षणांत—पहिला विचार एकदम बदलला आणि निश्चय केला, कीं, वाटेल तीं विघ्नें येवोत, वाटतील तेवढे हाल होवोत, वाटेल ती विपत्ती भोगावी लागो, त्या सर्वांशीं सामना करून, त्या सर्वांना अगदीं चीत करून, मुंबईस जावयाचेंच ! मलाहि बरोबर नेण्याचा विचार ठरला.

रातोरात आह्मी तेथून निघून सकाळाला अमदावादेस येऊन पोहोंचलों. मुंबईच्या सभेचा दिवस रविवार ठरलेला होता. तेव्हां मध्यें काय ते दोनच दिवस होते. इतक्या थोड्या अवधींत इतक्या लांबीच्या मुशाफरीची तयारी करणें अशक्यच होतें; परंतु दौलतशंकरची दृढता आणि उत्साह हीं माघार

घेणारीं नव्हतीं. एक सबंध दिवस आणि एक सबंध रात्र अलोचन जागरण करून त्यानें सर्व बांधाबांध केली. दौलतशंकरनें आपल्या प्रत्येक व्याख्यानांत असें स्पष्ट सिद्ध करून दाखविलेलें होतें, कीं, आगगाडींतील महार-मुसलमानांच्या स्पर्शानें भ्रष्ट झालेल्या फळ्यांवर बसून खाणें अगर पाणी पिणें यासारखें दुसरें भयंकर पातक क्वचितच असेल! याचें उत्कृष्ट उदाहरण ह्मणून, प्रत्यक्ष मूर्तिमंत प्रमाण ह्मणून, दृष्टांत देण्यासाठीं हा विचार या वेळीं पुरापुरा अमलांत आणण्याचा त्यानें निश्चय केला--नव्हे असाहि विचार ठरला, कीं, गाडी स्टेशनावर येऊन उभी राहील तेव्हां मात्र स्टेशनावर उतरून तेथें श्वासोच्छ्वास करावयाचा; बाकी गाडी चालत असतां प्राणायाम करून स्वस्थ बसून राहावयाचें; परंतु मीं सुचविलें, कीं, या भूमींत यवन आल्यापासून त्यांनीं प्रत्येक ठिकाणची हवा भ्रष्ट करून टाकिली आहे, आणि स्टेशनावरसुद्धां भ्रष्ट लोक फिरत असतात. तथापि गाडी भरधाव चालत असतांनाच हवेचा वारंवार बदल होत असतो व एकसारखी बाहेरची हवा आंत येत असते, तेव्हां त्या हवेंत श्वासोच्छ्वास करण्यास बिलकुल हरकत नाहीं.

हा खुलासा ऐकून दौलतशंकर साशंकित मुद्रेनें माझ्याकडे टक लावून पहात राहिला. शरीर अगदीं स्तब्ध झालें, नाक वर वर चढूं लागलें, ते चक्राकार वाटोळे डोळे चमकूं लागले. गोशाळेंतील शेणाच्या पोपड्यांसारखे त्याच्या विशाळ अंतःकरणांत बुजबुजलेल्या किड्यांप्रमाणें हजारों तर्क नाचूं लागले. शेवटीं समाधि पूर्ण होतांच शंकर जसे मौनव्रत सोडून देतात, रात्र खलास होतांच कोंबडा जसा निद्राभंग करण्याकरितां उच्चरवानें ध्वनी करतो, पानें वाढून होतांच ब्राह्मण ज्याप्रमाणें आपोषणी घेऊन 'ओम्' असा उच्चार करून क्षुधेचा विध्वंस करण्याकरितां नेटानें आरंभ करतात, त्याप्रमाणें प्रफुल्लित मुद्रा करून दौलतशंकर ह्मणाला "अंबाराम, तुझी धन्य आहे! माझ्या सहवासानें तुला खरोखरच फार लाभ झालेला दिसतो. तूं काढलेला शास्त्रार्थ अगदीं तंतोतंत खरा आहे. आगगाडींत श्वासोच्छ्वास करण्यास बिलकुल हरकत नाहीं."

प्रवासांत बरोबर घेण्याचें सामान ह्मटलें ह्मणजे धोत्रेंपात्रें, हांतरूणपांघरूण येवढेंच होतें. कोट, पाटलोण, बूट या विलायती थाटाची दौलतशंकरला मनापासून चीड होती. त्याचें हेंच ह्मणणें होतें, कीं, आपल्या बापदाद्यांचा पोषाक आपण कां टाकून द्यावा? कोणी एखादा वडवड्या एखादे वेळीं असें विचारतो, कीं, आपल्या बापदाद्यांचा पोषाक तर मुसलमानी धरतीवर बदललेला आहे! त्यांनीं

आपल्या बापदाद्यांचा पोषाक कां बदलून टाकला? आणि त्या बापदाद्यांचे बापदाद्यांनीं वल्कलें नेसण्याचें व चामडी पांघरण्याचें कां सोडून दिलें? याला एकच उत्तर "वेद वाचा!" असो. तेव्हां आज येऊन ठेपलेल्या अशा महाभारत प्रसंगास अनुसरून एक धोतर नेसावयाचें, एक अंगावर घ्यावयाचें, आणि डोकीस पागोटें घालावयाचें व अशा पुराणप्रसिद्ध साध्या पोषाकानें मुंबईस जावयाचें, असें दौलतशंकरनें ठाम ठरवून टाकलें. मुंबईस गेल्यावर उन्हावाऱ्याची नड वाटलीच तर आपोआपच हठयोगाचें फल प्राप्त होईल, असें दोनतीन वेळां बोलल्यामुळें मीं तो प्रश्नच काढला नाहीं.

शनिवारीं दोनप्रहरचे गाडीनें निघण्याचा बेत ठरला होता, ह्मणून मी शुक्रवारीं रात्रींच दौलतशंकरचे घरीं येऊन निजून राहिलों. कारण, सकाळच्या जेवणाची व्यवस्था त्याच्यांच घरीं नीट जमण्यासारखी होती. दुसरे दिवशीं रात्रीं जागरण होणार होतें, ह्मणून मी लौकरच झोंपीं गेलों. सरासरी चार घटका नीज लागली असेल नसेल तों एकाएकीं "अरे बापरे! अरे बापरे!" अशी ओरड ऐकून मी जागा झालों. पहातों, तों दौलतशंकर आंथरुणावर बसलेला असून घाबऱ्याघाबऱ्या इकडे तिकडे पाहातो आहे, असें दिसलें. मीं घाबरून विचारलें "काय आहे? काय झालें?"

दौलतशंकर ह्मणाला "अंबाराम! तूं जातांना पाहिलेंस—"

"कुणाला?"

"महादेवाला–शंभूला–त्या दीनानाथाला–पार्वतीपतीला–शंकराला–शिवाला–त्या जटाधारीला–"

"अरे तें स्वप्न असेल!"

"शंकर जाणे! पण मीं तर त्याला साक्षात् पाहिला. आपणाला स्वप्न पडतें, ह्मणून काय देव स्वप्नमय झाले आहेत काय? शिव, शिव, हे शंभो! हे भोलानाथ! दया करा, क्षमा करा. अरेरे! मीं हा महान अपराध केला त्याचें मला आजपर्यंत भानच नाहीं! अंबाराम, अरे तुला पण बुद्धि झाली नाहीं?"

"अरे, पण झालें काय, तें तर मला सांग? तूं स्वप्नामुळें इतका कां घाबरून गेलास? दौलतशंकर तूं स्वस्थ—"

"शान्तं पापं! शान्तं पापं! अंबाराम, आतां मला तूं या अपवित्र नांवानें कधींहि हांक मारूं नकोस. मला साक्षात् शंकरानें सांगितलें, कीं, 'भक्ता,

तूं आपल्या नांवांत 'दौलत' हा यावनी शब्द माझ्या दिव्य नांवामागें लावला आहेस, याचें तुला भानसुद्धां नाहीं ना ? तूं धार्मिक असून असें आचरण करतोस ? हें तूं माझ्या नांवाला लांछन लाविल्यामुळें मी जळून जळून अर्धा झालों आहें.' शेवटीं मला विष्णूनें उपाय सांगितला, कीं, 'या पाप्याला—' तेव्हां मीं भयाभीत होऊन उठून बोललों कीं, 'महाराज ! हें पातक तर माझ्या आतेनें केलेलें आहे. तिनें माझें हें नांव ठेविलें. तिला आपण शिक्षा करा. मी निखालस निरपराधी आहें. महाराज ! मी आपल्या पायां पडतों.' पायां पडतां पडतां शंकर हातानें त्रिशूल फिरवित आहेत असें माझ्या नजरेस पडलें. तेव्हां माझ्या तोंडांतून 'अरे बापरे' असे शब्द मोठ्यानें निघाले व मी जागा होऊन उठून बसलों. वाटेल तें होवो, पण हें नांव बदललेंच पाहिजे ! प्रायश्चित्त घेतलेंच पाहिजे आणि नंतर दुसरें नांव धारण केलें पाहिजे. हें मी न करीन तर माझ्या कपाळीं बालहत्त्येचें, गोहत्त्येचें, ब्रह्महत्त्येचेंच पातक–शंकर ! शंकर ! शिव, शिव, शिव—"

ही धार्मिक बुद्धि पाहून मी आनंदाश्चर्यानें अगदीं चकित झालों. मींसुद्धां या नांवाचा उच्चार हजारों वेळां केला असल्यामुळें शंकराचा अपराधी झालों आहें, हा विचार मनांत येतांच अगदीं खिन्न झालों. माझा मित्र ह्मणाला "आपण उद्यां काशीस जाऊन तेथें सक्षौर प्रायश्चित्त घेतलें पाहिजे !"

पण मीं आठवण केली, कीं, "उद्यां तर मुंबईस जावयाचें ठरलें आहे. त्या ठिकाणींहि आपल्याला वेदधर्माचा लाभ होणार आहे. त्या ठिकाणीं जाऊन आपल्या विजयाचा डंका वाजविण्याकरतां आपण धडपडत आहों, आणि वाटतील तीं विघ्नें आलीं तरी स्वतः जाण्याचा निश्चय केला आहे."

या सर्व घोटाळ्याचा निकाल करण्याकरतां उपाध्याला बोलावून आणलें. बरोबर आणलेल्या पोथीचीं पानें उलटून उपाध्येबुवांनीं सांगितलें, कीं, "प्रायश्चित्त येथेंच केलें तरी चालेल. पण एक महिनापर्यंत नदीतीरीं हवनपूर्वक तर्पण करावें लागेल व एक सहस्त्र गाई दान कराव्या लागतील. हें पाप घोरतर आहे !"

मीं उपाध्याचे हातावर हळूच एक रुपया ठेविला आणि सांगितलें "आह्मांला तर उद्यां दोनप्रहरीं येथून निघाल्याशिवाय सुटकाच नाहीं. आणि आपण एखादा लांबलचक विधि सांगितला तर गाडी मात्र चुकेल !"

उपाध्येबुवांनीं पोथीचीं आणखी दोनचार पानें उलटून सांगितलें, कीं, "आपल्या कुलगुरूला शंकराची सवर्णप्रतिमा अर्पण करून एक कपिला दान दिली ह्मणजे

सहस्र दानांचें फल मिळतें. आणि याप्रमाणें करण्याचा विचार ठरल्यास सकाळीं आँठ वाजण्यापूर्वीच प्रायश्चित्तविधि यथासांग पुरा होईल !"

उपाध्येबुवांनां दक्षणा देऊन त्यांच्या सांगण्याप्रमाणें प्रायश्चित्त घेण्याचें कायम करून, शंकर, शंकर, ह्मणत मी पुन्हा झोंपीं गेलों. माझ्या मित्राला मात्र बऱ्याच वेळानें नीज लागली असावी. कारण, अर्धा निजला अर्धा जागा अशा स्थितींत मी असतां शंकराबरोबर तांडव नृत्य करतांना त्याला पाहिल्याचें मला चांगलें आठवतें.

सकाळीं साडेसातालाच प्रायश्चित्त विधि पुरा झाला. जानवें बदललें आणि माझ्या मित्रानें '**भद्रंभद्र**' हें नवीन नांव धारण केलें. विस्मरणानें पूर्वीच्या नांवानें हांक मारून कोणीं पापांत पडूं नये, ह्मणून तापवून लाल केलेल्या लोखंडी खिळ्यानें 'भद्रंभद्र' या अक्षरांची भव्य तप्त मुद्रा कपाळीं धारण करावी असाहि त्याचा विचार ठरला; पण मीं शंका घेतली, कीं, "हें नांव शंकराला पसंत पडेल, पण दुसऱ्या एखाद्या देवाला नापसंत पडलें तर मात्र पिडा होईल! तप्त मुद्रा निघण्याचा संभव नाहीं.शिवाय,तेहतीस कोटी देवांपैकीं कोणाची लहर कशी लागेल! तेव्हां सर्व देवांचा विचार स्पष्टपणें समजेपर्यंत या कामांत कायम पाऊल टाकणें बरें नव्हे! प्रत्येक देवाच्या नांवानें एक एक दिवस वाट पहावी, ह्मणजे शेवटीं सर्वांनां हें नांव पसंत पडलें असें मानतां येईल."

भद्रंभद्राला हा विचार पसंत पडला.मात्र त्यानें एवढेंच सांगितलें,कीं, "पसंत हा शब्द यावनी आहे; करितां देवांच्या संबंधानें 'प्रसन्न' असा शब्द वापरित जा."

उपाध्येबुवा ह्मणाले "एकेकानें एकेक दिवस वांटून घेण्याची देवांनां कांहींएक पंचाईत पडली नाहीं. करितां ब्राह्मण भोजन घालावें ह्मणजे ब्राह्मण तृप्त होऊन स्वर्गस्थ देवतांनां आज्ञा करतील."

याबद्दल मुंबईहून परत आल्यावर विचार करण्याचें वचन देऊन भद्रंभद्रानें संकल्प केला, कीं, "मी आपल्या कुलगुरुसमक्ष, श्री गंगामातेसमक्ष, सूर्यदेवतेसमक्ष, वायुदेवतेसमक्ष, अग्निदेवतेसमक्ष, वरुणदेवतेसमक्ष, प्रतिज्ञा करतों, कीं, आजपासून मी यावनी भाषेचा एकहि शब्द वापरणार नाहीं !"

उदक सोडून उपाध्येबुवांचे हातावर एक रुपया ठेवला तेव्हां 'शुभंभवतु" असें ह्मणून त्यानीं यजमानांची मोकळीक केली.

## प्रकरण दुसरें.

### प्रयाण.

जेवण झाल्यावर आह्मी स्टेशनावर गेलों. घरांतून निघतांना भद्रंभद्राला अपरंपार आनंद झाला. कपाळाला गंध लावतांना तो मला ह्मणाला "अंबाराम, आजचा दिवस फार मोठा आहे. आपण आपल्या वैदिक धर्माचें रक्षण करण्याकरितां, आर्यधर्माचा विजय करण्याकरितां, व सनातन आर्यधर्माचा प्रसार करण्याकरितां प्रयाण करित आहों! रावणाचा पराभव करण्याकरितां जेव्हां रामचंद्र निघाले, तेव्हां त्यांची वृत्ती कशी झाली असेल! कंसवधाचें काम हातीं घेतलें तेव्हां श्रीकृष्णांला किती उत्साह वाटला असेल! कीचकाचा वध करण्याची युक्ति रचित असतां भीमसेनाच्या मनाला किती आनंद झाला असेल!"

थक्क होऊन मी ह्मणालों "अवर्णनीय! महाराज, केवळ अवर्णनीय!"

भद्रंभद्र उभा राहून बोलूं लागला "तर माझीसुद्धां आजची वृत्ती अवर्णनीय आहे! माझ्या मनाचा आनंदसुद्धां आज अगदीं अवर्णनीय आहे! आणि अंबाराम, असें समजूं नको, कीं, मी आज आगगाडींतून जाणार ह्मणूनच माझी मति इतकी त्वरेनें चालत आहे. माझा वेग–माझ्या स्वतःचा वेग–तुला माहीत आहे काय?"

मीं ह्मटलें " महाराज, त्या दिवशीं जमालपुर दरवाज्याबाहेर दिसलेल्या कोल्ह्याला तो रानडुकर आहे असें समजून जेव्हां आपण मागें फिरलों तेव्हां तुह्मी धावतां धावतां माझ्या फारच पुढें निघून गेलां–तसलाच वेग ह्मणतां ना?"

भद्रंभद्रानें गंभीरपणानें उत्तर दिलें "कांहीं तसा–पण त्याहूनहि जोराचा खरा!"

अशीं उत्साहयुक्त भाषणें करतां करतां आह्मी स्टेशनावर येऊन पोहोंचलों. आमच्या दोघांच्या तिकिटा काढून आणण्याकरितां भद्रंभद्र पुढें झाला व मी बाजूला उभा राहिलों. खिडकींतून जाईल तितकें डोकें आंत घालून भद्रंभद्र मोठ्यानें ह्मणाला "श्री मोहमयीच्या दोन मूल्य पत्रिका द्या!"

तिकीट मास्तर पारशी होता. तो ह्मणाला "काय भकतोस? हें तिकीट हपीस आहे."

भद्रंभद्र ह्मणाला " अरे यवना! मी तुझ्यापेक्षां अज्ञ नाहीं. मला मोहमयीच्या दोन मूल्य पत्रिकांची जरूर आहे. त्याबद्दल विचक्षणा करित बसणें तुझें काम नाहीं!"

तिकीट हपीसांत एक हिंदू होता तो ह्मणाला "सोराबजी, त्याला ग्रांटरोडच्या दोन तिकिटा दे."

तिकिटें देतां देतां सोराबजी ह्मणाला "वेड्याचा मेद किती वाढला आहे पहा! हा काय बोलतो का भकतो तें मला समजतच नाहीं!"

भद्रंभद्राला आलेला राग आतां सहन होईनासा झाला. तो नाक फुरफुरावून ह्मणाला "हे दुष्ट यवना! तुझ्या दुष्ट वासनेमुळेंच तूं अज्ञान राहिला आहेस. मूर्खा--"

पुढें बोलण्याच्या ऐवजीं भद्रंभद्रानें एकदम आपलें डोकें बाहेर काढलें. धबकन् कांहीं वाजल्यासारखें मीं बाहेरूनच ऐकिलें आणि त्यावरूनच मला वाटलें, कीं, त्या पारशानें एखादा ठोंसा लगावला असावा; परंतु भद्रंभद्र माझ्याजवळ एवढेंच बोलला "दुष्ट यवनाचा स्पर्श झाला आहे करितां मला स्नान करावें लागेल."

स्नान केल्यानंतर आह्मी आगगाडींत जाऊन बसलों. गाडी निघण्याला १५ मिनिटांचा अवकाश होता. तेव्हां तेवढ्या वेळांत खालीं उतरून थोड्या जाग्यावर जलसिंचन करून त्यावर उभा राहून पाणी पिऊन घेतलें. गाडी निघण्याची अगदीं तयारी झाली, इतक्यांत दोन गृहस्थ घाबऱ्या घाबऱ्या धावत आले आणि डब्याचा दरवाजा ओढून मोठ्यानें ओरडूं लागले "अहो मास्तर, दार बंद आहे, दार उघडा, अहो मास्तर, अहो दार उघडा."

एका पोर्टरानें येऊन दार उघडलें व धक्के मारून दोघांनां आंत कोंबलें. ते भद्रंभद्राजवळ येऊन बसले. भद्रंभद्रानें जरा कांचळतच विचारिलें "आपली जात?"

"ब्राह्मण आहों," असा जबाब मिळाला. तेव्हां भद्रंभद्राला आनंद होऊन त्यानें विचारिलें "कोठें जाणार?"

"मुंबईस"

भद्रंभद्राची जिज्ञासा आतां प्रबळ होऊन त्यानें आणखी विचारलें "आपलें नांव?"

दोघांपैकीं एकानें कांचळत जबाब दिला "माझें नांव रामशंकर आणि या आमच्या बंधूचें नांव शिवशंकर. पण आमचीं पाळण्यांतलीं नांवें नखोदा आणि घोरखोदा अशीं आहेत. मुलें जगत नव्हतीं ह्मणून आईबापांनीं अशीं नांवें ठेवलीं."

एक उतारू ह्मणाला "झूट आहे! अशानें कोठें पोरें जगतात?"

दुसऱ्या एकानें उठून सांगितलें "आमच्या गांवांतला शंभू पुराणिकाचा भाचा मुंबईस जाऊन इंग्रजी शिकून आलेला आहे. तो सांगत होता, कीं, सुधारक लोकांनीं साहेब लोकांचे आचार पाहून आणि शास्त्राकडे पाठ फिरवून 'सब झूट' ह्मणण्यास सुरुवात केली आहे. शास्त्रांत तर स्पष्ट लिहिलेलें आहे, कीं, आपल्या शरीरांत नाकामध्यें एक पापुदरा आहे त्या जातीच्या पापुद्र्याची एक पिशवी आहे त्या पिशवीच्या मध्य भागीं करमऱ्यासारखी एक डबी आहे, तिच्यांत प्राणवायू भरललेला असतो. असल्या हलकट शब्दांचा उच्चार होतो तेव्हां त्या करमऱ्याच्या बाजूच्या पिशवींतून पित्त बाहेर पडतें व त्याच्या जोरानें त्या करमऱ्यांतील प्राणवायूचा प्रवाह सुरू होतो व तो जिभेला लपेटून जेव्हां बाहेर पडूं लागतो तेव्हां पित्त मोकळें होऊन त्याचा जोर मोडतो व त्यामुळेंच आयुष्य वाढतें. यावरून सहज दिसून येईल, कीं, हें कांहीं झूट नाहीं, खरी गोष्ट आहे, आणि पुष्कळ लोकांनीं याचा अनुभवहि घेतलेला आहे.

## प्रकरण तिसरें.

## आगगाडीचा अनुभव.

अशा प्रकारच्या गोष्टी चालल्या होत्या इतक्यांत गाडी चालू झाली. गाडी चालू होतांच भद्रंभद्र तसाच मीहि उभा राहून 'श्रीमाधवबागकी जय!' ह्मणून मोठ्यानें ओरडूं लागलों. आह्मांला वाटत होतें, कीं, गाडींतली सर्व मंडळी आमच्याबरोबरच उभी राहून 'जय जय' ह्मणून ओरडूं लागतील, व तें ऐकून दुसऱ्या डब्यांतील लोक व स्टेशनावरचे लोक मोठ्यानें ओरडूं लागले ह्मणजे सर्वत्र 'माधवबागकी जय' गाजून राहील, आणि या जयघोषानेंच शत्रूचें दळ अगदीं दणाणून जाईल; पण तसा कांहीं प्रकार न होतां सर्वांनां आमचेंच नवल वाटून ते आमच्या तोंडाकडे पाहूं लागले. आह्मी खालीं बसलों तेव्हां 'सब झूट' ह्मणणाऱ्या गृहस्थांनीं मला विचारिलें "आपण कोठें माधवबागेचे यात्रेला चाललां आहां काय? हें तीर्थ कधीं बनलें? हें तीर्थ कोठेंसें आहे?"

हें निव्वळ शरम वाटण्यासारखें अज्ञान पाहून मी थक्क झालों व भद्रंभद्राकडे पाहूं लागलों. भद्रंभद्रालाहि त्याचें आश्चर्य वाटून तो ह्मणाला "हा केवढा मूर्खपणा! माधवबागेबद्दल कांहींच हकीगत माहीत नाहीं? ज्या सभेची हकीगत दशादिशा व्यापून राहिली आहे, पृथ्वीच्या चारी टोंकांपर्यंत जाऊन थडकली आहे, दिगंतीं अगदीं दुमदुमून राहिली आहे; जिच्या हकीगतीनें अचल मेरूपर्वत ढांसळून पडण्याच्या बेतांत आलेला आहे, व दिग्गज धडपडून गोलांट्या खात पडले आहेत; ज्या सभेची हकीगत ऐकून सुधारक, यवन व इतर शत्रुगण भयत्रस्त होऊन पळत सुटले आहेत, व पळतां पळतां जमिनीवर आदळत आहेत व त्यांच्या पडण्याच्या आघातानें शेषाच्या मस्तकाला धक्के बसून तो विव्हळ झाला आहे, व हे पळपुटे आश्रयस्थान शोधण्याकरितां गिरिकंदरांत शिरल्यामुळें तेथील तपस्वीजनांच्या शांततेचा भंग करित आहेत; आर्तस्वरानें ओरडत असल्यामुळें देवादिकांच्या निद्रेचा भंग करित आहेत; व ज्या सभेच्या दर्शनाच्या लाभाकरितां येणाऱ्या कोट्यवधी लोकांच्या टोळ्यांनीं मार्गांतील व्याघ्रादि हिंस्र पशूंनांसुद्धां भयाभीत करून सोडलें आहे, व ते घाबरून जाऊन सभास्थानाकडे सर्व लोकसमूह गेल्यामुळें त्यांच्या उजाड पडलेल्या घरांतून शिरून लपून बसले आहेत; ज्या सभेच्या दर्शनास येण्याकरितां देवादि स्वर्गांतून खालीं येत असून त्यांच्या विमानांनीं सूर्य आच्छादित होऊन सर्व ब्रह्मांड अगदीं तमोमय झालें आहे; ज्या सभेच्या दर्शनाकरितां समुद्र घटके घटके उंच होत आहे [illegible]

पुन्हा खालीं पडत आहे, त्या माधवबागेच्या सभेवद्दल आपलें एवढें अज्ञान आहे? अपशोच ! अपशोच !!"

नाक वर करून उंच स्वरानें सांगितलेली ही हकीगत ऐकण्याकरतां कित्येक उतारू उभे राहिले होते, कित्येक अगदीं जवळ येऊन भिडले होते, कित्येक नुस्ते तोंडाकडे पाहात होते; तेव्हां भद्रंभद्र बसण्याचे फळीवर उभा राहून शंकराचा सुत जो गणपती त्याचें स्मरण करून ह्मणाला "भारतवासी आर्यजन हो! श्रवण करा. आपल्या आर्यभूमींत केवढा अधर्म माजून राहिला आहे. आपली आर्यनीति–रीति–गीति–धीति–पीति–प्रीति–भीति–अहाहा! किती उत्तम आहे! किती उत्कृष्ट आहे! अहाहा! जय जय श्रीरंग–रंग–उमंग–भंग! अशा या देशाचें केवढें हें दुर्भाग्य! शिव,शिव,शिव! आपला देश पृथ्वीपेक्षांहि श्रेष्ठ होता. देवादिकांची संपूर्ण कृपा आपल्याच देशावर होती. दुसऱ्या देशांतील लोकांनां इंद्रादि देवतांची वातमीसुद्धां नव्हती. इंद्रादि देवतांनांहि त्या देशांची माहिती नव्हती. मागें नव्हती–आज नाहीं–व पुढें होणार नाहीं! अशी सर्व कला आणि प्रवीणता या आपल्या आर्यभूमींत होती. आपले ऋषी त्रिकालज्ञ होते. त्यामुळें त्यांनां कोणत्याहि प्रकारचे शोध करण्याची जरूरच नव्हती. आपले वाडवडील आमच्याप्रमाणेंच सर्व कामांत अगदीं परिपूर्ण होते. अरेरे! आज काय हा भ्रष्टाकार माजला आहे! लोक धर्महीन होऊन गेले आहेत. वेदधर्म तर कोणीच पाळित नाहीं! परंतु निराश होण्याचें कांहींच कारण नाहीं. आपला आर्यधर्म तर सनातन आहे. आपण अजून असेच्यातसेच श्रेष्ठ आहों. विपरीत प्रकार दृष्टीस पडत आहे ही केवळ माया आहे. हा संसारच मायामय आहे. करितां उठा, यत्न करा, जयजयकार बोला. अधर्म्यांचा संहार करा. अहाहा! आपल्या धर्माची केवढी हानि झाली आहे! शास्त्राच्या अज्ञानामुळें 'सब झूट' ह्मणणाऱ्या त्या महामूर्खाला आपल्या धर्माचें रक्षण करण्याकरतां जमणाऱ्या माधवबागेंतील सभेबद्दल कांहीं एक माहीत नाहीं! अरे मूर्खा, अरे दुष्टा, अरे पाप्या! जळो तुझें जिणें! तुझ्याहून पशूसुद्धां—"

मी भद्रंभद्राच्या प्रफुल्लित चेहऱ्याकडे पहात होतों त्यामुळें तो एकाएकीं कसा खालीं पडला तें मला समजलें नाहीं; परंतु 'सब झूट' ह्मणणारा तो रजपूत कपाळभर पसरलेला मळवट पाहून बुजावल्यामुळें ह्मणा, किंवा अधर्मांशीं युद्ध करण्याचे आवेशांत भांबावून भद्रंभद्रावरोबरच युद्ध करावयास लागला असावा ह्मणा,पण हा खालीं पडतांच तो एकदम त्याच्या छातीवर बसून ठोंशांवर ठोंशे लगावूं लागला.

भद्रंभद्र मोठमोठयानें ओरडूं लागला. मी दरवाजा उघडा आहे कीं बंद आहे तें पाहूं लागलों. दोघेतिघेजण आमचें सामान चांचपूं लागले; परंतु युद्धाच्या निस्वार्थ आवेशानें मला कांपरें भरलें. कोणी "मारा, ठोका," कोणी " सोडा जाऊंद्या," ह्मणून ओरडूं लागले.

कांहीं उतारू मध्यें पडल्यामुळें तो रजपूत जाग्यावर बसला. "ए बामणा, शिव्या कोणाला दिल्यास ? तूं लांबलांब बडबड करित होतास ती सर्व मला समजली नाहीं; पण माझ्याकडे बोट दाखवून शेंकडों माणसांदेखत तूं मला मूर्ख पशू ह्मणालास–तुझा प्राण घेतों आतां !"

असें बोलत असतां तो मधून मधून आमच्याकडे वळून पाहात होता; परंतु दुसऱ्या लोकांनीं त्याची कशीबशी समजूत करून त्याला दुसऱ्या बाजूस नेला. भद्रंभद्रानें, जसा काय–तो वायुदेवतेला युद्धाला पाचारण करित आहे, त्याप्रमाणें तोंडांतून व नाकांतून एखाद्या भात्याप्रमाणें प्राणवायू फुंकण्याचा सपाट सुरू केला. मी ह्मणालों " चालूंद्या आपलें भाषण. "

तेव्हां भद्रंभद्र ह्मणाला "पुढच्या अग्निरथ स्थीयमान होण्याच्या ठायीं गेल्यानंतर दुसऱ्या डब्यांत जाऊन त्या ठिकाणीं उपदेश करूं.त्याच त्याच माणसांनां आपल्या वक्तृत्वाचा लाभ दिल्यानें इतर लोकांशीं आपण अन्यायानें वागतों असें होईल."

भद्रंभद्राचा हा निःपक्षपाती स्वभाव पाहून मला सानंदाश्चर्य पूर्णप्रेम उत्पन्न झालें. जसें कांहीं एक झालें नाहीं, अशा रीतीनें भद्रंभद्र आणि शिवशंकर यांच्यांत गोष्टी सुरू झाल्या.काय थोर पुरुषांची उदात्त वृत्ति ही ! तो रजपूत पुन्हा रागानें पहाण्याचें सोडून देऊन नजरानजरच न होई अशा रीतीनें एका गृहस्थाच्या बाजूला जाऊन बसला. मीसुद्धां त्या रजपूताकडे पाठ करूनच बसलों.

मीं रामशंकरला विचारिलें " मोहमयीला जाऊन कोठें उतरणार ?"

रामशंकर ह्मणाला "आमचें मुंबईस कांहीं घर वगैरे नाहीं. परंतु या घोरखोदियाचे भाईबंद कुशलवपुरांकरचे काका प्रसन्नमनशंकर ह्मणून आहेत त्यांच्या घरीं उतरणार. आपण कोठें उतरणार ?"

भद्रंभद्र ह्मणाला "आमच्या शेजारच्या एका मुलाच्या मामाचा सासरा भडोचला पंतोजी आहे. त्याच्या आतेच्या नवऱ्याच्या सावत्र भावाचा मेहुणा श्री भुलेश्वराजवळ मोती छगनचे पोटमाळ्यावर राहातो, तेथें उतरण्याचा विचार आहे."

आमच्या ह्या गोष्टी चालल्या असतां माझी नजर आमच्या बोचक्याकडे गेली; तें सगळें विसकळलेलें होतें ह्मणून मी तपासून पाहूं लागलों तों आंतला एक पंचा आणि पलंगपोस नाहीं !

भद्रंभद्र ह्मणाला "लाभ आणि हानि या दोहोंकडे धीर पुरुषांनीं समाधान दृष्टीनें पाहिलें पाहिजे. आपण वेदधर्माच्या संरक्षणाकरितां तन गमावित आहों, मन गमावित आहों, आणि धनहि गमावण्यास तयार आहों. अद्याप महाभारत प्रसंग तर यावयाचाच आहे. करितां अंबाराम ! शोक करण्याचें कारण नाहीं. परंतु आपल्या मित्राच्या शोकाला भागीदार होऊन त्याचा शोक कमी करणें हें कर्तव्य आहे. करितां तुझ्या पलंगपोसाकरितां मी शोक करण्याचें सोडून देतों, आणि माझ्या पंचाकरितां तूं शोक करण्याचें सोडून दे !"

या वरील विवेचनाचा मला अर्थच समजला नाहीं; परंतु भद्रंभद्राचें मुखगांभीर्य पाहून मी पुढें कांहींच बोललों नाहीं.

पलीकडच्या बाजूला बसलेले गृहस्थ शास्त्रासंबंधीं कांहीं बोलत होते ते आतां आमच्याजवळ येऊन बसले. त्यांनीं भद्रंभद्राला विचारिलें "महाराज, आपण शास्त्राचें अध्ययन केलेलें आहे, त्याकरितां एक शास्त्रार्थ विचारितों. ब्राह्मणांनीं शिंगाडे खावे किंवा नाहीं?"

भद्रंभद्र ह्मणाला "काय बरें हरकत ? फराळाला शिंगाड्यांचें पीठ चालतेंना?"

उतारू ह्मणाला "तें खरें आहे; परंतु आमच्या गांवांत एक शास्त्रीबुवा आले होते, ते ह्मणत होते, कीं, शास्त्रांत शिंगाडे खाण्याची मनाई केलेली आहे. कारण, त्याचा आकार शंकूसारखा आहे आणि त्यामुळेंच ब्रह्मदेवानें त्याला धारण केलें आहे. कारण, अस्सल ब्रह्मांडरूपी अंड्याचा आकार शंकूप्रमाणेंच होता."

शास्त्राचें हें फार गहन आणि उपयुक्त तत्व ऐकून भद्रंभद्राची चर्या गंभीर दिसूं लागली. मनावर ज्ञानाचा एक नवीनच प्रकाश पडल्यासारखें त्याला वाटूं लागलें असावें, असें त्याच्या डोळ्यांवरून दिसत होतें. त्यानें मोठ्या उत्सुकतेनें विचारिलें "मग त्या शास्त्रीबुवांनीं काय सांगितलें?"

उतारू ह्मणाला "शास्त्रीबुवांनीं सर्व गांवाला देहशुद्ध प्रायश्चित्त दिलें, गोप्रदानाचें उदक सोडविलें, व त्याप्रीत्यर्थ प्रत्येकाकडून एक एक रुपया दक्षिणा घेऊन सर्वांना शुद्ध केलें!"

भद्रंभद्राच्या तोंडावर एखाद्या देशहितेच्छूप्रमाणें आनंद दिसूं लागला. त्याची परोपकारबुद्धि जागृत झाली. कपाळाला एक बोट टेंकून क्षणभर विचार करून त्यानें खिशांतून एक नोटबूक काढलें, व त्यांतील 'श' अक्षर असलेलें पान

उलटून त्यावर लिहून घेतलें कीं:-'शिंगाडा-अभक्ष्य-सर्व हिंदुस्थानवासियांनां व शिंगाडे खाणाऱ्या मयत पूर्वजांनां.प्रायश्चित्ताची आवश्यकता-शंका-प्रश्न-सिद्धांत-शास्त्रार्थ.' लिहून झाल्यावर त्या उतारूकडे तोंड करून सांगितलें, कीं, याबद्दल जास्त विचार करून, इतर पंडितांचें मत विचारून,आणि जमल्यास विद्वानांची मोठी सभा भरवून निर्णय प्रसिद्ध करवीन, त्यावरून तुमच्या गांवांत त्याबद्दल खबर कळेलच."

स्टेशन येतांच पूर्वी ठरल्याप्रमाणें दुसऱ्या डब्यांत जाऊन बसल्यावर भद्रंभद्र मला ह्मणाला "हा शिंगाड्यांचा प्रश्न फारच अगत्याचा आहे ! सर्व देशाचें कल्याण या प्रश्नाच्या निकालावर अवलंबून आहे. ज्या मनुष्याच्या अंगांत यत्किंचित तरी स्वदेशभक्ति असेल, त्याला या प्रश्नाकडे कानाडोळा करतां येणें शक्यच नाहीं ! ही गोष्ट जर खरी ठरली तर गांवोंगांव 'शिंगाडानिषेधक सभा' स्थापाव्या लागतील, श्रीकाशीक्षेत्रापर्यंत या प्रश्नाची मजल पोंचवावी लागेल. बरें अंबाराम, शिंगाडा शब्दाची व्युत्पत्ति काय आहे ?"

"मला माहीत नाहीं."

"त्याचा पण तपास लावावा लागेल. कदाचित् उद्यांच्या सभेंतच हा प्रश्न मांडावा लागेल. मला याबद्दल विचार केला पाहिजे. आतां माझ्यानें या लोकांपुढें व्याख्यान देतां येणार नाहीं."

याप्रमाणें भद्रंभद्र मोठ्या गंभीर विचारांत पडलेला पाहून मी खिडकींतून बाहेर पाहूं लागलों. तारेचे खांब मी मोठ्या उत्सुकतेनें मोजित होतों; इतक्यांत एकाएकीं भद्रंभद्राचें पागोटें माझ्या पायांवर पडलें. मागें वळून पहातों, तों त्याचे डोळे मिटलेले होते, नाकांतून आवाज निघत होता, आणि तागडींत ठेवलेलें तुपाचें मडकें जसें हालत असतें त्याप्रमाणें त्याचें डोकें हालत होतें. मला त्यानें एक वेळ सांगितलें होतें, कीं, ज्या वेळेस आपण नेत्र बंद करून हालत असतों त्यावेळेस आपण निजलेले असतों असें समजूं नको. ती एक प्रकारची समाधि आहे, व ती आपण एका बुवापाशीं शिकलों आहों. तेव्हां त्या समाधीचा भंग करणें मला बरें वाटलें नाहीं. कदाचित् शिंगाड्याचे निर्णयाला तिची जरूरी असेल, असा विचार करून मीं त्याचें पागोटें नीट उचलून ठेविलें.

## प्रकरण चवथें.

### आगगाडीचा अनुभव ( पुढें चालू ).

माझ्या समोर बसलेले एक गृहस्थ माझ्याजवळ बोलण्याकरतां फार उत्सुक जाहलेले दिसत होते; परंतु बोलण्याला सुरुवात कशी करावी या विचारांत ते घोटाळत होते. तेव्हां त्यांनां त्या प्रसंगांतून सोडविण्याकरितां मींच त्यांनां विचारिलें " आतां कोणतें स्टेशन येणार ?"

ते गृहस्थ ह्मणाले "मला बरोबर माहीत नाहीं. बडोद्याला अजून अवकाश आहे. आपल्याला कोठें डाकूरजीस जावयाचें आहे ?"

मी ह्मणालों "आह्मांला मुंबईस जावयाचें आहे. तेथें माधवबागेंत सभा आहे."

" आपण कोठले राहणार ?"

" अमदाबादचे."

" ब्राह्मण असाल ?"

मीं " हो " ह्मटलें, व भद्रंभद्राकडे नजर केली. कारण, जर त्याच्यावद्दल कांहीं विचारिलें तर आयतेंच गुणांचें वर्णन करण्यास सांपडेल; परंतु पुन्हा दृष्टादृष्ट होतांच तो ह्मणाला " कांहीं मुलेंबाळें आहेत का ?"

मीं " नाहीं" ह्मटलें आणि पुढें बोलणें बंद व्हावें ह्मणून तोंड फिरवलें.

पण त्यानें पुन्हा विचारलें "कुटुंब तर असेलच."

मीं नकारार्थी डोकें हालविलें आणि पडशी काढली.

पण त्यानें तर प्रश्न विचारण्याचा सपाटाच सुरू केला. त्यानें विचारिलें "लग्न झालेलें नाहीं, कीं, कुटुंब वारलें."

मीं मोठ्या नाखुषीनें जबाब दिला, कीं, " वारलें."

त्याच्याजवळ मीं बोलावयास सुरुवात केली त्याबद्दल मला आतां पस्तावा वाटूं लागला. आतां भद्रंभद्र उठेल तर बरें, असेंहि वाटूं लागलें. दुसरा कोणीतरी त्याच्याबरोबर बोलण्यांत गुंतेल तर बरें ह्मणून मी युक्ति शोधूं लागलों; परंतु तो गृहस्थ मेख होता.

" बाळंतपणांत मेली काय ?" ह्मणून त्यानें पुढें प्रश्न करतांच " त्याच्याशीं तुझें कांहीं अडलें आहे काय ?" ह्मणून त्याला खडसून विचारावें असे माझ्या अगदीं ओंठाशीं शब्द आले, पण धीर होईना. तेव्हां भद्रंभद्राचे पागोट्याकडे पाहून मीं ह्मटलें " ताप येत होता."

मीं ठराव केला, कीं, आतां कांहीं विचारिलें तरी उत्तरच द्यावयाचें नाहीं! पुन्हा मनांत आलें, कीं, आतां विचारणार तरी काय ? विचारण्यासारखें आतां राहिलें

आहे तरी काय ? माधवबागेच्या सभेच्या हकीगतींत त्याला गुंतविण्याचा माझा विचार होत होता. इतक्यांत त्यानें विचारिलें "कोणी चांगला वैद्य मिळाला नसेल. का कोणा डाक्टराचें औषध सुरू होतें ?"

मीं थोडक्यांतच उत्तर दिलें "वैद्याचें."

" कोणत्या वैद्याचें ?"

आतां तर मी अगदीं घाबरून गेलों आणि या संकटांतून कधीं बाहेर पडेन असें झालें. पण जरा नेट करून जवाब दिला " आपल्या माहितीचे नाहींत. "

"पण नांव तर कळूं द्या. "

हें संपण्याचा संभवच दिसेना! पण इतक्यांत स्टेशन आलें. गाडी उभी राहिली तेव्हां जो धक्का बसला त्याबरोबर भद्रंभद्राचे डोळे उघडले. तेव्हां त्याला त्याचें पागोटें देऊन त्यानें बोलूं लागावें ह्मणून मीं ह्मटलें "ऊन्ह फार लागतें."

भद्रंभद्र ह्मणाला "ऋतूंचे धर्म ऋतु करित आहेत, आपले आपण केले पाहिजेत."

गाडी चालू होण्याची तयारी होतांच स्टेशनावर उतरलेला उतारू पुन्हा गाडींत येऊन बसला व विडी पेटवून झुरके मारूं लागला. धुराबद्दल नापसंती दाखवून मला विडीचा तिटकारा असल्याबद्दल मीं त्याला दर्शविलें. तो मला व भद्रंभद्राला एक एक विडी देऊं लागला. त्याचा स्पर्श होऊं नये ह्मणून अंग चोरून घेऊन भद्रंभद्र ह्मणाला "आह्मी ब्राह्मण असल्यामुळें आह्मांला घेतां येत नाहीं."

तो ह्मणाला "घेतां नसेल येत,पण ओढायला तर हरकत नाहीं ? पुष्कळ ब्राह्मण लोक विडी ओढनात."

भद्रंभद्र ह्मणाला "ते तर भ्रष्ट–पतित–पापी–सुधारक गणले जातात !"

"असें कसें ह्मणतां येईल ? शास्त्रांत तर विडी ओढण्याचें फार फार पुण्य सांगितलेलें आहे !"

भद्रंभद्र ह्मणाला "कधीं होणार नाहीं! खोटी गोष्ट !"

"नाहीं कसें ? पहा—

**धूम्रपानं महद्दिव्यं । विडीदानं विशेषतः ।**
**अग्निसेवा मुखे कृत्वा । पुनर्जन्मो न विद्यते ॥ १ ॥**

याप्रमाणें खुद्द धूम्रपुराणाचा आधार आहे. तोंडावर अग्नि ठेविल्यानें फारच पुण्य लागतें. त्यानें शवाला अधोगति मिळत नाहीं."

भद्रंभद्र जरा विचारांत पडला. मनांत शंका येऊन विचारूं लागला "आपण हें पुराण वाचलें आहे काय ?"

"स्वत: वाचलें नाहीं तर श्लोक कसा पाठ येणार ?"

भद्रंभद्रानें खिशांतील नोटबूक काढून विचारिलें "मला जरा तो श्लोक सांगाल काय ? मी आधीं उतरून घेतों, आणि मग विचार करूं त्याचा."

"मोठया खुशीनें. सांगाल तर लिहूनच देतों."

"नको, नुसता सांगा म्हणजे झालें."

त्यानें हळुहळू श्लोक सांगितला व भद्रंभद्रानें तो लिहून घेतला. लिहिल्यानंतर भद्रंभद्र म्हणाला "मला वाटतें, हा श्लोक कोणींतरी मागाहून बनविलेला असावा. शास्त्रांत अशा प्रकारची आज्ञा असणें शक्यच नाहीं–पण श्लोक आहे, करितां विचार केला पाहिजे."

भद्रंभद्राच्या तोंडाकडे एक क्षणभर पाहून तो पुन्हा बोलूं लागला "महाराज, चंदन फार स्वस्त झालेला दिसतो."

भद्रंभद्र म्हणाला "फारच स्वस्त आहे. देशांत धर्माचें पुनरुज्जीवन होण्याचें हें सुचिन्हच आहे. गंधाशिवाय धर्माचें पालन कसें होणार ?"

"असेंच म्हणाना, कीं, धर्मच नसेल तर गंध कसें लावतां येणार ? गंध लावावयाचें म्हणजे कांहीं साधें काम नाहीं. दोन कलाक रोज खर्च होतात, तेव्हां गंध लागतें. वर डोकें करून उभें रहावें, स्वयंपाकाकडे टक लावून पहात असावें तेव्हां मन स्थिर होतें, आणि लावलेलें गंधहि स्थिर होतें. असेंच्या असेंच लावलें तर सगळें निघून जातें. आपण पूर्व जन्मीं फार पुण्याई केलेली असली पाहिजे, त्यामुळें हें गंध अगदीं जशाचें तसेंच राहातें."

भद्रंभद्र खूष होऊन मोठया माणसाला शोभण्यासारखें अगदीं साधेपणानें म्हणाला "आहे शंकराची कृपा !"

तो म्हणाला "आपण शंकरउपासक आहां काय ? मी तर गणपतीची पूजा करतों."

भद्रंभद्र म्हणाला "तो तरी शंकराचाच पुत्र आहे !"

"पण त्याच्यांत आणि त्याच्यांत फार अंतर ! मी एकदा शिवमंदिरांत गेलों आणि ओट्यावरील नंदीवर जाऊन बसलों तेव्हां शंकर मला मारायला धावले, आणि मी पळूं लागलों. तो मला ठार मारता, पण गणपतीनें माझा बचाव केला. गणपतीचें तसें कांहीं नाहीं. त्याचा उंदीर मी रात्रीं निजलों म्हणजे येऊन माझ्या कपाळाचें गंध चाटी. तेव्हां मीं एक भाटी बाळगली. तेव्हांपासून उंदीर म्हणून माझ्या घरांत फिरकायचा बंद झाला, आणि त्यामुळेंच बिचाऱ्या गणपतीला माझ्या

पूजेच्यावेळीं पायांनीं चालत यावें लागतें. पण भाटीवद्दलकधींहि एक अक्षरसुद्धां बोललो नाहीं. जय गजानन महाराज! बरें करा!"

भद्रंभद्राला या माणसाची श्रद्धा पाहून फार आश्चर्य वाटलें. "आपण कोणत्या मंदिरांत नंदीवर बसले होतेत?" ह्मणून तो विचारणार होता; परंतु तो उतारूच पुन्हा बोलूं लागला. तो ह्मणाला "आपण मुंबईस जाणार, खरें का?"

भद्रंभद्र ह्मणाला "होय."

"मुंबई पूर्वी कधीं पाहिलेली आहे, का पहिल्यानेंच जातां आहां?"

"नाहीं, प्रथमच. तेथें उद्यां माधवबागेंत सभा—"

उतारू ह्मणाला "मी तर कितिक वेळां मुंबईस जाऊन आलों आहें. मुंबई-सारखें शहर दुनियेंत नाहीं. बाटोळा समुद्र आहे, आणि उंटाच्या डोक्याप्रमाणें एक लांबच्यालांबच बेट आहे. गांव इतका मोठा आहे, कीं, जर कोठें चुकलांत तर पत्ताच लागणार नाहीं. तेवढ्याकरितां जिकडेतिकडे टपालाचे लोखंडी खांब पुरलेले आहेत. कोणी चुकला तर कपाळाला तिकीट चिकटवून व वर पत्ता लिहून त्या खांबाजवळ उभें रहावें. इतक्यांत टपालची गाडी येते आणि त्याला आंत बसवून त्याच्या घरीं पोंचती करते. या कामांत माझी एकदा टपालवाल्याबरोबर बरीच तक्रार झाली. तो ह्मणे 'तुझ्या वजनापेक्षां तिकिटें कमी लावलेलीं आहेत.' मी ह्मणें 'मीं आज लाडू खाल्ले आहेत त्यांचें वजन कमी केलेंच पाहिजे. कारण, लाडू टपालांतून फुकट जातात.' नंतर मला तो नाटपेड खात्यांत घेऊन गेला. मीं केली अर्जी! तेव्हां दोन महिन्यांनीं पैसे परत मिळाले. रोख दिले नाहींतच; पण पोस्टमास्तरनें टपाल हपीसच्या पडवींत चार दिवस विन भाड्यानें मला पडून राहूं दिलें. पांचव्या दिवशीं पोलिसाबरोबर तक्रार झाली आणि मग मी तेथून निघून गेलों. तेव्हां महाराज, अर्ज करतां आला पाहिजे!"

भद्रंभद्र ह्मणाला "खरें आहे. माधवबागेचे सभेंतसुद्धां अर्जीच करावयाची–"

तो उतारू मध्येंच बोलूं लागला "मला माधवबागेवरून ह्मारखावडीकडे वारंवार जावें लागे. त्या ठिकाणीं एक मोठा महाल आहे, त्याला सात तर गच्च्या आहेत. तेथले सगळे लोक डगले काळेच वापरतात. बेटे फार हुशार! मी सांपडेनासा झालों तर ते मारवाड्याचा, फिरंग्याचा, मोंगलाचा, चिनी माणसाचा, वाटेल तसला पोषाख करून ते मला हुडकून काढीत. मी प्रत्येक वेळीं हेंच सांगें, कीं, मी मोठा अब्रूदार 'जंटलमन' आहें. गाडीशिवाय पाऊल टाकणार नाहीं. जें पडेल तें भाडें देईन. दोन शिपायांपैकीं एक गाडी आणावयाला गेला, कीं, आपण पसार! एकाची

काय मजाल ? पण नेहमींच ही युक्ति चालत नाहीं. माझी तेथें ओळखदेख फार. आपल्याला तेथें कोणाची ओळख पाहिजे आहे ?"

भद्रंभद्र ह्मणाला "धर्मकार्याकरितां आह्मी जात आहों तेथें ओळखीची काय जरूर ? आह्मांला धनाची आशा नाहीं, राज्याचा लोभ नाहीं, वैभवाची तृष्णा नाहीं. ज्या सभेंत भाग घेण्याकरितां आह्मी जात आहों त्या सभेचें प्रयोजन आपणास विदीत असेलच. माधवबागेच्या सभेचें प्रयोजन असें आहे, हें प्रयोजन ध्यानांत ठेवण्याची सर्वतोपरी अशी आवश्यकता आहे, कीं, जे धनवान लोक मोठमोठ्या हवेल्यांतून वास करतात ते मात्र आपल्या विरहदुःखानें श्यामवस्त्र धारण करतात; परंतु त्यांची मायालिप्तदृष्टी आपण कोठेंहि गुप्त जाहलां असलां तरी शोधून काढते. त्यांची जर या प्रयोजनाबद्दल नीट समजूत पडली तर हें प्रयोजन—"

भद्रंभद्राला थांबवून मध्येंच तो उतारू ह्मणाला "प्रयोजन ह्मणजे प्र आणि योजन. योजन ह्मणजे आठ कोस. आठ कोसांच्या प्रकर्षामुळें चिंता उत्पन्न होते तिचें नांव प्रयोजन. मुंबई अजून आठ कोसांहून लांब आहे तेव्हां प्रयोजनाचा आतां कांहींच संभव नाहीं; शिवाय न्यायाच्या अगदींच विरुद्ध. मीं न्याय ह्मटला आहे. आमचे शास्त्री फार विद्वान होते. मी तीन वर्षें त्यांच्याजवळ अध्ययन केलें. शेवटीं यत्किंचित कारणावरून त्यांचा आमचा संबंध सुटला. शास्त्रीबुवांच्या घरांतून पागोट्याचे पांचसात पदर नाहींसे झाले. मीं ह्मटलें, कीं, 'पदर अनित्य आहेत; जें वास्तविक नाहींच त्याचाच नाश होणें शक्य आहे. शास्त्रीमहाराज ह्मणाले 'जें खरोखर असेल तेंच नाश पावेल. जें नाहींच त्याचा नाश तो काय?' मीं ह्मटलें 'त्या न्यायानेंसुद्धां नाशकारक कारणाशिवाय नाश कसला ?' शास्त्री ह्मणाले 'तूंच कारणीभूत आहेस.' जड मनुष्य भावनारूप नाशाचा कारण असेल असें माझ्या मनाला पटेना. त्यावरून मीं शास्त्रीबुवांचा संबंध सोडला. उलटा मी गेल्या नंतर शास्त्रीबुवांचें उपरणें नाहींसें जाहल्याचें उमगलें. कारणाचे अभावींच विनाश !"

भद्रंभद्र ह्मणाला "आपण न्यायशास्त्राचें अध्यन केलेलें दिसतें. आपल्यासारख्या विद्वानांची सहज गांठ पडेल असा मुळींच संभव नव्हता."

उतारू ह्मणाला "मलाहि हा अलभ्य लाभच ! आपणांसारखे पुरुष फारच विरळा. धार्मिक, विद्वान, पुण्यवान, ज्ञानी असे मनुष्य दुनियेंत कोठें पैदा होत आहेत ? आपल्यासारख्यांच्या दर्शनाचा लाभ ह्मणजे महाभाग्यच !"

इतक्यांत बोलतां बोलतांच हातांत तिकीट होतें तें ठेवून देण्याकरितां खिशांतून त्यानें पिशवी बाहेर काढली. ती रिकामी–आंत कांहीं नाहीं–असें पाहून दचकून तो ह्मणाला "अरे, यांत पन्नास रुपयांच्या नोटा होत्या त्या कोठें पडल्या? मला बडोद्यास गेल्यावर खर्चाकरितां पाहिजे होत्या. आतां निव्वळ फजितीच ! देवीच्या देवळांत ब्राह्मणभोजनाची व्यवस्था सांगितलेली आहे. बिचारे ब्राह्मण आतां उपाशीं मरणार ! शाप देतील तेवढा फायदा ! हें तर अक्शे पोटीं ठेंकरा येऊन मग उचकी लागते तसें झालें ! केवढा मी मूर्ख !"

भद्रंभद्र ह्मणाला "आपणाला कितीसे पैसे लागतील ?"

"मला तर आतां थोडेंच काम करावें लागेल. पांच पुरे होतील. पण परत घ्याल असें वचन देत असाल तर घेतों. प्रसिद्धपणें घेतलेलें धन मला शिव-निर्माल्य आहे.माझ्या हातांत बांधलेला हा दोरा पाहिलात?.मीं व्रत घेतलेलें आहे."

भद्रंभद्र ह्मणाला "आपल्यासारख्या विद्वानाला मदत करणें हा प्रत्येकाचा धर्मच आहे. पण धन असेंच घेतल्यामुळें आपल्या धर्माचरणांत जर व्यत्यय येत असेल तर आपणास सवड होईल तेंव्हां रुपये परत करा. तूर्त हे पांच रुपये घेऊन ठेवा."

उतारू रुपये घेतांना कांचकत होता असें दिसलें. तो ह्मणाला "चांगल्या माणसांवरसुद्धां असले शरमेचे प्रसंग वारंवार येतात."

भद्रंभद्र ह्मणाला "यांत शरम वाटण्यासारखें कांहीं एक नाहीं. आपल्यासारख्या सद्गृहस्थांनां पुष्कळ लोक ओळखित असतात. शंका मनांत आणण्याचें बिलकूल कारण नाहीं."

तो थोडा विचार करून ह्मणाला "तर मग–तर–सात द्या;कारण,सात हा आंकडा शुभसूचक आहे. आणि माझ्या हिशोबालाहि पटतो आहे. आतांतर–मोठी कृपाच ह्मणावयाची. माफ करा. माझें नांव हरजीवन आहे.आतां बडोद्याचें स्टेशन येईल. मला न्यायला येईल त्याला मी कोठें उतरणार वगैरे विचारून घेईन आणि नंतर मी आपला पत्ता आपल्याला सांगेन आणि आपला पत्ता लिहून घेईन. भाईसाहेब, अमूकच ठिकाणीं उतरेन असें कांहीं नक्की ठरलेलें नाहीं. एकाचे घरीं उतरलें तर दुसऱ्याला वाईट वाटणार ! काय करावें ! बडोद्यांत आमची ओळख पडली जिकडे तिकडे !"

भद्रंभद्र ह्मणाला "अवश्य असलीच पाहिजे ! कां नाहीं असणार ?"

हरजीवन ह्मणाला "परत घेण्याचा करार आहे खरा पण तुह्मी रुपये परत घ्याल त्या वेळेससुद्धां मला वाईट वाटणारच. कारण, परत करीपर्यंत तरी आपल्या धनाचा मी उपभोग घेतला असें होणारच. करितां हे घ्या–परत घ्याच!"

भद्रंभद्र ही नेकी पाहून चकीत झाला. तो ह्मणाला "एकाच मनुष्यांत विद्वत्ता, सुजनता, प्रामाणिकपणा, इत्यादि सर्व थोर गुण एकवटलेले असूं शकतील असें आजपर्यंत मला शक्यच वाटत नव्हतें. माझा निश्चय ठरलाच. नाहीं, महाराज, रुपये आपण ठेवाच. येवढी माझ्यावर मेहेरबानी कराच."

हरजीवननें होय नाहीं करतां करतां रुपये ठेवून घेतले. तो ह्मणाला "रुपयांचे बदली आपल्याला एक लाभ करून द्यावा अशी माझी इच्छा आहे. तेवढी माझी इच्छा आपण पूर्ण कराच, ह्मणजे माझ्या मनाला समाधान वाटेल. मुंबईत माझा एक मित्र आहे.त्याच्या वाळकेश्वरच्या बंगल्यांत शिवाचें एक गुप्त मंदिर आहे. लोकांनां त्याची माहिती नाहीं. तो मालक कोणाला दर्शनाला जाऊं देत नाहीं. रोजच्या पूजेअर्चेला रोकड एक हजार रुपयांचा खर्च आहे. साक्षात् शिव त्या ठिकाणीं प्रगट होतात. माझी तर नंदीबद्दल रोज लठ्ठालठ्ठी! नाहीं तर मला रोज दर्शनाचा लाभ झाला असता. तरी पण तो माझा जिवश्चकंठश्च स्नेही आहे. मला नेहमीं जामीन तोच राहतो. फक्त नांव मात्र बदलावें लागतें."

भद्रंभद्र ह्मणाला "जामीन कसला?"

हरजीवन हंसून ह्मणाला "हें माझ्या तोंडून चुकून बाहेर पडलें. हरकत नाहीं. आपणासारख्याला सांगायला कांहीं अडचण नाहीं. शिवाची आणि गणपतीची नेहमीं तक्रार! आपल्या घरांतून जसे तंटेबखेडे तसे देवाच्या घरींसुद्धां असणारच! कार्तिकस्वामीची जेव्हां समजी होते तेव्हां गणपतीला जामिन मी राहतों आणि मला जामीन माझा मित्र राहातो. त्या गृहस्थाच्या नांवावर मी आपल्याला एक चिठी देतों. तो तुह्माला दर्शन करवील. आपण आस्तिक आहां."

अशा गोष्टी चालल्या होत्या तों बडोद्याचें स्टेशन आलें व गाडी उभी राहिली. हरजीवन एक बोचकें भद्रंभद्राजवळ ठेवून खालीं उतरला आणि ह्मणाला "ह्यावर जरा नजर ठेवा, मी येतोंच इतक्यांत."

थोड्या वेळानें तो परत येऊन बोचकें घेऊन ह्मणाला "काय करावें महाराज! उतरण्याचें अजून कोठें तें नक्की ठरलें नाहीं. कोणाचें मन दखवणार? ह्या कागद

पेनसील घ्या आणि ह्यावर आपला पत्ता लिहून ठेवा. माझें उतरण्याचें नक्की ठरूनें ज्याच्या घरीं जावयाचें असेल त्याच्या नोकराला मी आपला पत्ता लिहून देऊन आपल्याकडे पाठवीन. त्याच्याबरोबरच ती पलीकडची काळी पेटी पाठवून द्या. स्वतःच हातानें किती उचलून नेणार? घ्या महाराज. नमस्कार! दया लोभ ठेवा. बरी आठवण झाली. आणखी एक रुपया असला तर देऊन ठेवा पाहूं!"

रुपया घेऊन भद्रंभद्राला नमस्कार करून व मजकडे डोळे मिचकावून तो निघून गेला आणि स्टेशनावर उतरलेल्या इतर उतारूंत मिसळल्यामुळें दिसेनासा झाला. गाडी निघण्याची घंटा झाली पण पेटी नेण्याला कोणीच आला नाहीं. भद्रंभद्रानें स्वतःचें नांव व पत्ता लिहून कागद तयार करून ठेवला होता. त्याला हरजीवनची पेटी राहिल्याबद्दल फिकीर पडली. तो मला ह्मणाला "ही पेटी वर काढून ठेव. मागायला आला कीं लागलीच देतां येईल!"

मी पेटी उचलायला लागलों, तों दुसरा एक उतारू गाडींत येऊन मग जरा खालीं उतरला होता तो परत आला आणि मला ह्मणाला "कां, पेटीलासा हात घालतां आहां?"

भद्रंभद्र ह्मणाला "तुला कां पंचाईत? पेटीचा मालक आह्मांला सांगून गेला आहे."

तो उतारू ह्मणाला "मालकबिलक कोण? पेटी माझी आहे!"

भद्रंभद्र ह्मणाला "असत्य कां बोलतोस? ती हरजीवनची."

"हरजीवनफरजीवन कोण आहे? पेटी माझी स्वतःची आहे!"

मीं भद्रंभद्राच्या सांगण्यावरून पेटी उचलायला जात होतों पण तो उतारू उभा राहून ओरडून ह्मणाला "खबरदार, पेटीला हात तर लाव, ह्मणजे चोपून काढतों! शिपाय, हा पहा—"

तक्रार चालतां चालतां गाडी सुरू झाली. हरजीवनचा कोणी माणूस दिसला नाहीं तेव्हां जास्त तक्रार करणें बरें वाटलें नाहीं.

पेटीवाल्या उतारूनें आह्मांला लुच्चे समजूं नये ह्मणून आह्मी दोघे त्याला ऐकूं जाई अशा रीतीनें हरजीवनची विद्वत्ता, धार्मिकता, अचलता, वाचालता, ब्राह्मणभोजन, नेकी वगैरेबद्दल मोठमोठ्यानें बोलूं लागलों. त्याचा माणूस कां आला नसावा, तो आतां रुपये कसे परत पाठवील, बिचाऱ्याची अब्रू कशी बचावेल, त्याचा व्रत भंग होईल कीं काय, वगैरेबद्दल भद्रंभद्र आपल्या बोलण्यांत वारंवार शंका प्रदर्शित करित होता.

शेवटीं असें ठरलें, कीं, मुंबईस जाऊन हरजीवनच्या मित्राला चिठी देतांच प्रथम त्याला त्याचा पत्ता विचारावयाचा व त्या पत्यावर हरजीवनला पत्र पाठवावयाचें, ह्मणजे त्याला आपले पैसे पाठवतां येतील.

या गोष्टी ऐकून त्या उतारूच्या मनांतला संशय नाहींसा झाल्यासारखें दिसलें. नंतर आह्मी दुसऱ्या कांहीं गोष्टी बोलून काळोख पडला तेंव्हां झोंपीं गेलों. रात्रीं कोणाचा कोणाला पाय लागे, कोणी नवीन आलेला उतारू सामान धडपडावी त्याचा आवाज होई तेंव्हां मात्र आह्मी जागे होत असूं, बाकी स्वस्थ निजलेलेच होतों; पण बहुतेक रात्र आंखडल्यासारखें होऊनच काढावी लागली. पाहतां पाहतां उजाडलें आणि मुंबईची धामधूम आणि गिरण्यांचा धूर दिसूं लागला. थोडक्याच वेळांत गाडी ग्रांटरोडवर येऊन थडकली.

## प्रकरण पांचवें.

## मोहमयी-मुंबई.

स्टेशनावर आह्मांला न्यावयाला कोणी आलेलें नव्हतेंच. आह्मी निमूटपणें खालीं उतरलों. हेलकरी "सामान न्यायचें आहे काय? हेलकरी पाहिजे आहे काय ?" ह्मणून विचारीत; परंतु जबाबाची वाट न पाहतां एका मागून एक सारखें पुढें चालले होते. पाठ करून उभ्या असलेल्या माणसांच्या समोर जाऊन त्यांच्याकडे पाहण्याचीसुद्धां ते तसदी घेत नव्हते. भराभर चालतांना वाटेंत कोण उभें आहे त्याची पर्वा न करितां त्याला धक्का मारून ते पुढें जात होते. उतारूंनां घरीं नेण्याकरितां आलेलीं ओळखीचीं माणसेंसुद्धां गार्डीत डोकावून पहात आणि पुढें चालूं लागत; पण नुसती हांक मारण्याचीसुद्धां कोणी तसदी घेईना.

ही बेपर्वाई पाहून भद्रंभद्र ह्मणाला "काय हा मोहमयीचा मोह? हा मोह काढून टाकण्याकरितांच मी हजारों लाखों कोस ओलांडून येथें आलों आहें."

मीं ह्मटलें "हरजीवनच्या सांगण्यावरून इतकें अंतर नसावेंसें वाटतें."

भद्रंभद्र ह्मणाला "इतके कोस नसले तर गज असतील--तसू तरी खास असतील. यांत तुला भिन्नभाव दिसत आहे ती निवळ माया आहे. पारमार्थिक दृष्टीनें अवलोकन करितां सर्व एकच आहे. या मोहमयीचा मोह दूर करून तिचा गर्व हरण करण्याचें काम मीं आपल्या शिरावर घेतलें आहे. प्रसंग फार भयंकर ओढवणार आहे."

इतक्यांत डोंपराच्या उंचीवर खांबांनां बांधलेल्या दोरी खालून आंत येऊन, डोकीला तांबडी टोपी, वरती घोंगडीचें फटकूर, अंगांत खादीची फाटकी बंडी असलेल्या एका पोरानें माझ्या हातांतलें बोचकें हिसकावून घेऊन विचारिलें "शेट घेऊं काय ?"

बोचकें जाईल ह्मणून घाबरून भद्रंभद्रानें मला ओढलें आणि तो सुमार पन्नास कदम मागें हटला; परंतु हेलकरी शांतपणानें उभा राहिलेला पाहून त्याला जरा उमेद आली; थोडा जवळ जाऊं देऊन तो त्याला ह्मणाला "पिशाच्च कुठला! श्रोत्रीय ब्राह्मणाला वैश्य व्यापाऱ्याच्या आडनांवानें हांक मारून पातकांत पाडित आहेस त्याबद्दल तुला कांहींच भीति वाटत नाहीं काय ? आणि शिवाय ह्यावरोबर आणखी परद्रव्य हरणाची इच्छा? सत्पुरुषाला चौर्य निषिद्ध आहे. स्तेय हें व्यसन सप्तकांत गणलें जातें. त्याची अशी अवहेलना तूं कशी करतोस? आर्यधर्मांच्या आज्ञा श्रवण करण्याकरतां माधवबागेच्या सभेंत ये."

मजुरानें मान वांकडी करून आमच्याकडे पाहिलें आणि आपल्याशींच बडबडत तो चालता झाला. माधवबागेच्या सभेच्या नांवानें केलेल्या बोधाचा त्याच्या मनावर कांहीं तरी परिणाम खास झाला असावा, असें भद्रंभद्राला वाटत होतें. कारण, जातां जातां पुन्हा पुन्हा मागें वळून तो आमच्याकडे पाहत होता व तोंड वेडें वांकडें करित होता.

उतारूंची अगदीं गर्दी होती त्यांतूनच घुसून तिकिटें देऊन आह्मी दरवाजांतून बाहेर पडलों. तों तेथें उतारूंची व गाडीवाल्यांची बोलाचाली चालली होती. एका घोड्याच्या गाडीवाल्यानें विचारलें " शेट आणूं का? कोठें जाणार? ' दुसऱ्यानें भद्रंभद्राच्या अगदीं अंगा सरसा घोडा आणून सांगितलें "शेट, ही गाडी आहे." तिसरा एकजण माझ्या जवळ आला आणि माझा हात धरून मला एका बाजूस खेंचून ह्मणाला "तो पहा पलीकडे मोठा शिग्राम आहे. सर्व सामान आंत राहील. कोठें जायचें ?"

हाताला हिसडा मारल्यामुळें माझा हात बराच दुखावला व मीं घाबरून जाऊन भद्रंभद्राचे तोंडाकडे पाहूं लागलों. भद्रंभद्र माझ्या तोंडाकडे पाहूं लागला आणि आह्मी दोघे गाड्यांकडे पाहूं लागलों. शेवटीं भद्रंभद्रानें उत्तर दिलें " आपण सर्वांनीं आह्मांला उदार आश्रय दिला, याबद्दल आह्मी आपणां सर्वांचे फार फार आभारी आहों. आपल्यापैकीं कोणती गाडी माधवबागेंतील सभेच्या दर्शनाकरितां आलेल्या गृहस्थांस नेण्याकरितां आलेली आहे ?"

कोणीच उत्तर देण्याचे भानगडींत न पडतां ते दुसरें गिऱ्हाईक शोधूं लागले. आह्मी घोंटाळ्यांत पडलेले पाहून एकानें आह्मांला सांगितलें "तो रेकला ठरवा, नाहीं तर शेवटीं तो पण जाईल." त्यावरून आह्मीं रेकल्याकडे गेलों आणि जेमतेम करून आंत बसलों. तेव्हां आह्मांला घेऊन तोंडानें कांहीं बडबडत रेकलेवाल्यानें भुलेश्वराकडे रेकला चालविला.

रस्त्यांतून गाड्या भरधाव चालल्या होत्या. पायांनीं चालणारीं माणसें गर्दींतूनच रस्ता काढित चाललीं होतीं. कोणी कोणाची वाट पहात राहिलेला दिसत नंव्हता. हें सर्व पाहून भद्रंभद्र ह्मणाला "हे सगळे लोक बहुधा माधवबागेंत जात असावे."

रेकलेवाल्याला विचारिलें " माधवबागेंत सभा किती वाजतां आहे ?"

रेकलेवाला ह्मणाला " कुठें ? माधवबागेंत ? "

भद्रंभद्र ह्मणाला "हो. आज आपल्या सनातन वेदधर्मांचें रक्षण करण्याकरितां माधवबागेंत मोठी सभा भरणार आहे. या शहरांतील सर्वत्र लोकांस तिची माहिती असेलच."

रेकलेवाला ह्मणाला "कोणाला खबर, मला तर रेकल्याचें लेसन आणण्याकरितां पोलिसांत जायचें आहे "

भद्रंभद्र ह्मणाला "तर मग तुह्मी लोक माधवबागेंत नाहीं येणार ?"

"गिऱ्हाईक मिळालें तर माधवबागेंत काय आणि सोनापुरांत काय !"

भद्रंभद्राला आश्चर्य वाटून तो ह्मणाला "सोनापुर ! सुवर्णपुरींतसुद्धां जें होऊं शकणार नाहीं तें आज या अलौकिक सभेंत होणार आहे. सुवर्णपुरीचा मोह हीच या मोहमयीची माया आहे. सुवर्ण हें पार्थिव सुख आहे, माया आहे. त्याहून हजारों पट सुखाचें साधन आजच्या माधवबागेच्या सभेंत प्राप्त होणार आहे."

माझ्याकडे पाहून भद्रंभद्र ह्मणाला "अंबाराम, पाहिलेंस या मोहमयीनिवासी जनांचें भ्रमण ! सुवर्णपुरी–लंका–लुप्त जाहली असून ही कल्पित भूगोलांत, तसेंच भूमिरेखा चित्रांतून अजून लंका आहेच असें असत्य वर्णन करून आपल्या धर्माच्या विरुद्ध शिक्षण देऊन एक वस्ती बनविली आहे ! कोण ही आपल्या आर्यधर्मांची विटंबना ?"

मीं रेकलेवाल्याला विचारिलें "सोनापुर नांवाचें एखादें निराळें गांव आहे, का तें याच शहरांत आहे ?"

रेकलेवाला थोडा वेळ आमच्या तोंडाकडे पहात राहिला. पायांपासून डोक्यापर्यंत त्यानें एकदा नजर फिरविली आणि "शिंगें नाहींत एवढेंच !" असें वांकडें तोंड करून बोलला व समोर तोंड फिरवून त्यानें गाडी जलद हांकण्यास सुरुवात केली. माझ्या प्रश्नाला जबाब देण्याची त्याची इच्छा दिसली नाहीं ह्मणून आह्मी त्याच्याजवळ जास्त बोललों नाहीं.

बराच रस्ता ओलांडल्यावर आह्मी भुलेश्वराजवळ आलों. विचारतां विचारतां मोठ्या मुष्किलीनें मोती छगनच्या घराची दाद लागली. रेकलेवाल्याचे पैसे चुकते करून खालीं उतरलों. घरांत जाऊन "शंकरभाई गोकळ कोठें राहातात. ह्मणून तपास करूं लागलों. पण कोणी जबाबच देतना. कोणी ह्मणे "माहीत नाहीं." कोणी सांगत "वर विचारा." वरच्या माळ्यावर गेलों, पण तेथें तोच प्रकार. त्याच्या वरच्या माळ्यावर गेलों. त्याच्याहि वरच्यावर गेलों पण रिकामा [illegible]

शेवटीं पांचसहा जिने चढून गेल्यावर तेथें एकानें खोली दाखविली तेथें गेलों ओळख पटवून आह्मी शंकरभाईकडे मुक्काम केला.

जेवण झाल्यावर शंकरभाई समोरच्या माडीवर पत्ते खेळायला गेला

भद्रंभद्र सभेस जाण्याकरितां सज्ज झाला. डोकीला पागोटें घातलें व कमरेला धोतर बांधून त्यावरून मृगचर्म गुंडाळलें.अंगावरच्या धोतराच्या कांठाला एक भगवी पट्टी जोडली व त्याची घडी घालून ती अशा रीतीनें खांद्यावर टाकली, कीं, जणुं काय तो शिपायाचा पट्टाच आहे ! गळ्यांत रुद्राक्षांच्या माळा घातल्या. दडांवर शंख चक्र, गदा, पद्म, वगैरेंच्या मुद्रा ठोकल्या. गालांवर पिंजरेचे आडवे उभे पट्टे ओढले. एका कानशिलावर 'शिव शिव' आणि दुसऱ्या कानशिलावर 'राम राम' अशीं अक्षरें गंधानें लिहिलीं. कपाळावर चंदनाची उटी भरली आणि एके बाजूस गणपतीचें व दुसऱ्या बाजूस सूर्याचें चित्र काढिलें. हातांत गोमुखी धारण केली. आंतील माळ गळ्यांत घातली होती ह्मणून गोमुखींत पैसा सुपारी घातली. दुसऱ्या हातांत परशु ऐवजीं शंकरभाईच्याच घरांतील एक कुऱ्हाड खांद्यावर धारण केली. पागोट्याला तुळशीच्या मंजिऱ्या खोंवल्या. शंकरभाईच्या घरच्या नोकराला कोठून तरी एक ढोल आणावयास सांगितला. त्यानें ढोल तर आणलाच, आणि कोणाच्या सांगीवरून कोणाला ठाऊक–दहा वीस दुसरे इसमहि बरोबर आणिले. घरांतील बायकापोरेंहि वाटोळीं जमलीं. जमलेल्या मंडळीनें ढोल मोठ्या जोरानें वाजविण्यास सुरुवात केली. भद्रंभद्राच्या अंगांत शौर्याचें वारें खेळूं लागलें, व तो प्रत्यक्ष जमदग्नीसारखा दिसूं लागला. तो मजकडे वळून ह्मणाला "मीं आमरणांत कोणापुढें भाषण असें केलेलें नाहीं. करितां जमलेल्या समुदायापुढेंच जर आतां भाषण केलें तर या अभ्यासानें भाषण करण्याची कला खास साध्य होईल. करितां तूं या सभेचा अध्यक्ष हो."

मीं स्वतःच मला अध्यक्ष नेमण्याची सूचना सभेपुढें मांडली व लगेच एका पालथ्या उखळावर सूप टाकून त्या उच्च आसनावर अध्यक्ष या नात्यानें विराजमान झालों व स्वतःच टाळ्यांचा मोठा गजर करून भाषणास सुरुवात केली. मी ह्मणालों "श्रोतृजन हो ! शांत चित्तानें या महापुरुषाचें भाषण श्रवण करा."

वरील सूचना करितांच भद्रंभद्राचें भाषण सुरू झालें. तो ह्मणाला " जिज्ञासु सभ्य गृहस्थहो ! या ठिकाणीं अस्मादिकांचें आगमन किंनिमित्त झालें आहे हें आपणां सर्वांस विदित

कांच्या कृतींनीं आर्यांस अगदीं भयभीत करून सोडलें आहे. शत्रूंच्या अल्प संख्येनें आर्यांनां शूरवीर बनविलें आहे. स्वदेशांतील दोषांच्या गणनेनेंच आर्यावर्त दोषमुक्त झालें आहे. तसेंच परराष्ट्रांच्या भरभराटीनें आपले आर्य परदेशांतील गुणसमुच्चयांनां आंचवले आहेत. धर्मनिष्ठ आर्य धार्मिक सुधारणेच्या विरुद्ध आहेत. तसेंच देशहितावर दृष्टी ठेवणारे आर्य देशहिताच्या सुधारणेच्या विरुद्ध आहेत. निकृष्टावस्थेस येऊन पोंचलेल्या या भारतवर्षाचें-सुधारकांच्या सुधारणांचा गंधहि लागूं न देतां—स्वदेशाभिमानी आर्य संरक्षण करित आहेत. आपल्या या आर्यभूमींत एकाहि सुधारणेची, अगर रूढींत यत्किंचित बदल करण्याची, तसेंच कांहीं एक नवीन पाहिजे असें ह्मणण्याची जरूर वाटणें ह्मणजे भयंकर पातक आहे. अहाहा! पूर्णावस्थेस पोंचलेल्या आपल्या या आर्यभूची काय दुर्दशा उडाली आहे ही! आपली आर्यभूमी किती श्रेष्ठ! किती स्थिर! आर्यजनहो! अशीं मोठमोठीं कार्यें करण्याकरितां माधवबागेंत आज मोठी सभा भरणार आहे व तीस आपण सर्वांनीं हातभार लावणें हें आपलें सर्वांचें कर्तव्य आहे."

इतक्यांत श्रोतृसमूहांत मागच्या बाजूला गडबड सुरू झाली. कांहींजण जिना उतरून पळूं लागले. कोणी कोनाकोपऱ्यांत जाऊन उभे राहिले. कांहीं दारामागें लपले. त्यावरून शंकरभाई आला असावा असें वाटलें. त्यानें कित्येकांनां धक्के मारले, आणि जिकडेतिकडे धांदलच धांदल उडून राहिली. तो वरती येतांच भद्रंभद्राला ह्मणाला "तूं परक्या ठिकाणीं येऊन अशी धांदल माजविली आहेस, होय? या भामट्यांनां येथें कशाला जमविले आहेस?" चाकराकडे वळून त्यानें विचारिलें "ही कुऱ्हाड माळ्यावरून कोणीं आणिली?"

तो ह्मणाला "यांनीं मागितली मग मीं काय करूं?"

या स्वामीसेवकांचा विरोध शांत करण्याकरितां भद्रंभद्रानें कुऱ्हाड हळूच खालीं ठेवून दिली व त्या दोघांनां स्वस्थपणें बोलावयास मिळावें ह्मणून मी व भद्रंभद्र दोघे जिन्यावरून हळूच खालीं आलों. आह्मीं नजरेस पडतांच खालीं येऊन उभ्या राहिलेल्या मंडळीनें टाळ्यांचा गजर केला व आनंदाच्या आरोळ्या ठोकण्यास सुरवात केली. त्यांनीं "हुर्यो" "चोर, चोर," "पकडो" इत्यादि जयध्वनि केले. ते ऐकत ऐकत आह्मी प्रफुल्लित मुद्रेनें माधवबागेंत येऊन पोहोंचलों.

त्या ठिकाणीं कांहीं मंडळी येत होती व कांहीं परत जात होती, सर्वत्र गडबड उडून गेलेली होती. कोणाचें बोलणें कोणाला ऐकूं येत नव्हतें. सभेचा उद्देश लोकांच्या मनावर ठसविण्याकरितां निरनिराळ्या भाषेंत छापलेलीं लहान लहान-

चोपडीं विकलीं जात होतीं व हस्तपत्रकें वांटण्यांत येत होतीं. कित्येकांत गोरक्षणाविषयीं उपदेश होता; कित्येकांनीं सुतारपाडा गांवच्या केदारेश्वराचे देवळांतील बुवाच्या निर्वाहाकरितां वर्गणी गोळा करण्याचीं विनंतीपत्रकें काढलीं असून लोकांनीं दिलेल्या रक्मा त्या कागदांवर त्यांच्या समक्ष लिहिण्याचें काम चालविलें होतें; कित्येक पत्रकांत साडेतीन मित्रांच्या गोष्टींची जाहिरात असून खालीं गोष्टी उत्तम असल्याबद्दल शिफारसपत्रें छापलेलीं होतीं; कित्येकांत शक्तिवर्धक चूर्णाच्या रामबाण सफलतेचें सविस्तर वर्णन असून गूण आलेल्या लोकांचीं शिफारस पत्रकेंहि जोडलेलीं होतीं. अशा मोठ्या पायावर उभारलेल्या व सर्वतोपरि परिपूर्ण अशा या अवाढव्य सभेची भद्रंभद्राला पूर्वी कल्पनाहि करितां आली नव्हती.

## प्रकरण सहावें.

## माधवबागेंतील सभा.

सभास्थानीं जमलेले लोक खुर्च्या मागें पुढें सरकावित होते, व बाजूच्या फळ्यांवर बसलेले लोक मधूनमधून काठ्या खडखडावून मोठा आवाज करीत होते. जणूं काय संग्रामाकरितां तयार झालेल्या आर्य भटांनां स्फुरण यावें ह्मणून दुंदुभींचा नादच चालला होता. मागाहून आलेल्या लोकांच्या गर्दीमुळें व गर्दीला त्रासून परत चाललेल्या लोकांच्या ढकलाढकलीमुळें पुढच्या रांगेंत उभे राहिलेले लोक शेजारच्या खुर्च्यांवर बसलेल्या लोकांच्या अंगावर पडत व त्यांनां स्थानभ्रष्ट करीत. त्या वेळची ती व्यूहरचना आर्य सैनिकांच्या संग्रामाच्या उत्सुकतेची निदर्शक होती. गर्दींत चुरडून तर जाऊं नये, पण सभेचा सर्व भाग स्पष्ट दिसावा या हेतूनें कांहीं लोक खांबांवरून चढून एका हातानें खांबाला वेंगाटून व दुसऱ्या हातानें पागोटें सांवरित लोंबकळत राहिले होते. ते जणूं काय या युद्धांत अद्भुत शौर्य दाखवून प्राणांची आहुती देणाऱ्या वीरांस नेण्याकरितां आलेल्या विमानाच्या झुलत्या पऱ्याच आहेत, असें भासत होतें.

या गर्दींत व गोंगाटांत सभेच्या अध्यक्षांचें दर्शन अगर वक्त्यांच्या तोंडचा एक शब्दहि ऐकूं येण्याचा संभव नव्हता. ह्मणून आह्मी एका पडवीच्या खालच्या बाजूस उभे राहिलों होतों. इतक्यांत रामशंकर आणि शिवशंकर येऊन पोहोंचले. त्यांनीं आह्मांला विचारिलें "तेथें कां उभे? चला रस्ता करून देतों." तेव्हां त्यांच्या मागोमाग आह्मी गर्दींत घुसलों. कित्येकांनीं धक्के मारले, कित्येकांनां खावे लागले. कित्येक पुढें सरकले, कित्येक मागें सरले. कांहीं वेळां आह्मी मध्यें घुसलों, कित्येक वेळां आमच्यांत लोक घुसले. मी या लट्ठालट्ठीला कंटाळून मागें फिरण्याच्या विचारांत होतों; पण मागें जाणेंसुद्धां अशक्यच होतें. भद्रंभद्र मजकडे पाहून ह्मणाला "आपण धैर्य धरलें पाहिजे. पहा चोहोंकडून लोक कसे तुटून पडले आहेत, व किती नेटानें काम करित आहेत ते! यावरूनच सिद्ध होतें, कीं, संसारयात्रा कांहीं सरळ नाहीं."

रामशंकर ह्मणाला " अशा गप्पा मारण्यांत गुंतलेत, कीं, चिरडूनच जाल– थोडेथोडे पुढें सरका!" सरकत सरकत आह्मी एका बांकापर्यंत येऊन थडकलों. बांक अगदीं खचून भरलेलें होतें. बांकाच्या मागच्या खांबांनां बांधलेल्या वांशांवरहि लोक उभे राहिले होते. रामशंकरनें धक्की मारून त्यांतल्या कांहींनां

ढकलून खालीं पाडलें. त्यांच्याबरोबर संग्राम करून सहज रीतीनें आह्मी त्या वांशांवर चढून उभे ठाकलों, व सभामंडपाची सर्व रचना आमच्या नजरेस पडली. अध्यक्षाच्या बैठकीच्या आजूबाजूची थोडथोडी जागा शिवाय करून बाकीची जागा व्यापून काढण्यांत मंडळीची सारखी रेंटारेंटी चालली होती. सदावर्तांत खिचडीकरितां जमलेल्या गोसांव्यांतसुद्धां इतकी गडबड अगर धामधूम होत नाहीं सर्व सभासद पुढेंपुढें सरकण्यांत अगदीं गुंग झाले होते; एकालाहि भाषण ऐकण्याची इच्छा अगर आशा होती असें दिसत नव्हतें. अगदीं शेवटल्या रांगेतलें लोकसुद्धां संध्याकाळपर्यंत तरी पुढें जाऊन पोंचलों ह्मणजे मिळविली, अशा हेतूनें मोठ्या नेटानें रेंटारेंट करित होते. कांहीं ह्मणत "सभेचें काम सुरू होऊन बराच वेळ झाला." कांहीं ह्मणत "अजून सुरुवात झाली नाहीं."

जेमतेम पुढें येऊन पोंचल्यावर त्या जाग्यावरून न हालतां उभें राहण्याचा नेटानें प्रयत्न करणें एवढेंच काय तें काम होतें. मागच्या मंडळीचा नेट जरा नरम पडला ह्मणजे जरा विश्रांति घेऊन थकवा जावा ह्मणून कांहीं गोष्टी सुरू होत. एकजण ह्मणाला "आजच्या सभेंत असा ठराव होणार आहे, कीं, ब्राह्मण-दक्षणा रुपयाहून कमती असूंच नये." दुसरा एकजण ह्मणाला, कीं, "सरकारानें असा कायदा केला आहे, कीं, कोणत्याहि विधवेनें अविवाहित राहतां कामा नये. तेव्हां या बाबतींत असा अर्ज करावयाचा आहे, कीं, सर्वांनीं आपपल्या जातींतच विवाह करावे." तिसरा एकजण ह्मणाला "गोवध करणारास मनुष्यवध करणाराइतकीच सजा केली पाहिजे. कारण, आपल्या हिंदुधर्माप्रमाणें गोमाता ही मनुष्याहूनहि जास्त पवित्र आहे. जवळच उभा असलेला चौथा एकजण ह्मणाला "जातीजातींत पंच होण्याला कोणकोण लायक आहेत त्यांची चौकशी करण्याकरितां एक कमिशन नेमलें जाणार आहे."

खुर्च्यांवर बसलेल्यांतून दोघांनीं रामशंकरकडे पाहून नमस्कार केला. तेव्हां भद्रंभद्रानें विचारिलें "ते कोण आहेत ?"

रामशंकर ह्मणाला "तो जो ठेंगणा आणि जाडासारखा आहे आणि इकडे तिकडे पहात आहे तो घरफोड्यांचाच जवळचा नातेवाईक असून त्याचें नांव कुशलवपुशंकर असें आहे आणि पलीकडे बसला आहे तो त्याचा काका प्रसन्नमनशंकर."

जवळच उभा असलेला एकजण ह्मणाला "या कुशलवपुलाच लोक घरफोड्या ह्मणतात आणि काकाला निफोड्या ह्मणतात. हीं पडलेलीं नांवें लोकांनीं

विसरून जावीं ह्मणून त्यांनीं या दोन ब्राह्मणांनां पैसे देऊन स्वतःला लोकांनीं ओळखण्याचीं दुसरीं नांवें प्रचारांत आणण्याकरितां सांगितलेलें आहे. पैशाचा व्यवहार करणारे लोक असलीं कामेंसुद्धां पैशाच्याच जोरावर करून घेतात."

शिवशंकरला हा झालेला खुलासा आवडला नाहीं.त्यानें मागें वळून सांगितलें "ए, जरा संभाळून तोंड उघड."

तो वरील खुलासा करणारा ह्मणाला "जा जा ! साला–हजाम–धोबी ! तूं काय करणार माझें ?"

शिवशंकरनें एक ठोंसा चढवला. तेव्हां सामनेवाल्यानें प्रत्युत्तर ह्मणून उलट ठेवून दिला. याप्रमाणें सभ्यपणानें एकमेकांचा समाचार घेत असतां दोघेहि खालीं आले. इतक्यांत दोघांच्या बाजूला दुसरी थोडीथोडी मंडळी सामील झाली. कांहींनीं ते खालीं आल्यामुळें त्यांच्या रिकाम्या झालेल्या जागा पटकावल्या.

हो ना चाललें आहे इतक्यांत सभेच्या मध्यभागीं टाळ्यांचा गजर ऐकूं आला. आह्मी त्यांच्या बरोबर टाळ्या वाजवून उंच मान करून त्यांच्याकडे पाहूं लागलों. तों कोणी चक्री पागोटें घातलेला एक गृहस्थ उंच व लांब हात करून मराठींत बोलूं लागला. काय बोलत होता तें चांगलेंसें ऐकूं येत नव्हतें, व जें ऐकूं येत होतें तें समजत नव्हतें. भाषण आटपून तो खालीं बसल्यावर एक गुजराथी बोलावयास उठला. आपलें भाषण सर्वांस ऐकूं जावें ह्मणून तो खुर्चीवर उभा राहिला. त्याचें पागोटें जरा झुकतें असून मिशांचे आंकडे वळवलेले होते. कदाचित कलप लावावयास विसरला असेल–पण मिशांचे केंस पांढुरके दिसत होते. पटी खाऊन तोंड रंगविलेलें होतें. अशा थाटानें जरा चोहोंकडने फेंकून त्यानें आपल्या भाषणास सुरवात केली. तो ह्मणालाः—

" सद्गृहस्थहो ! आजची सभा कशाकरितां जमली आहे तें आपल्या भाषेंत समजून सांगण्याचा मान मला मिळाला आहे.या मानामुळें मी आपल्याला मोठा भाग्यवान समजत आहें. अशा प्रकारचा मान ह्मणजे कांहीं सामान्य मान नाहीं. आजकाला युरोपियन भाषा बोलणें ह्मणजे मोठा मान समजला जातो. पण मी ह्मणतों, मी केवढा गाढव, ( टाळ्यांचा गजर ) कीं, मला यूरोप शब्दाची माहिती झाली ! मी समजतों, कीं, पाश्चात्य पुस्तकें वाचून मला अभ्यास करावा लागला हें निव्वळ माझें दुर्दैव होय. (टाळ्या) मी ह्मणतों, मी केवढा मूर्ख, कीं, मला युरोपियन लोकांची रीतभात समजूं लागली ( हंशा ). येवढ्याकरितां, अध्यक्षसाहेब, आपण मला माझ्या भाषेंतच भाषण करण्याचा फार

थोर मान दिला, याबद्दल मी आपले फार फार उपकार मानितों. सभ्यगृहस्थहो ! मी आपल्याला बजावून सांगतों, कीं, माझ्यासारख्या साध्या माणसाला न मागतां जर हा मान मिळाला नसता, तर मीं या मानाचा कधींहि अंगिकार केला नसता. आतां आजच्या सभेंत काय काय कामें करावयाचीं आहेत, तें मी आपल्यापुढें मांडतों. आपणां सर्वांस माहीतच आहे कीं, सुधारक हे जरी लोकांच्या शिव्याशाप खात आहेत तरी पण त्यांच्या सुधारणेच्या खटपटी चालूच आहेत. माझ्यासारख्या अब्रूदार गृहस्थाला सुधारकांच्या विरुद्धपक्षास सामील झाल्यामुळेंच जर हा मोठा मान मिळतो, तर यावरून हेंच सिद्ध होतें, कीं, सुधारक बनण्यांत बिलकूल फायदा नाहीं ! सुधारकांचा पुढारी मलबारी आहे. लोक काय ह्मणतात याचा विचार केला ह्मणजेच खात्री होईल, कीं, यांत लोकप्रीति संपादन होण्याचा बिलकूल संभव नाहीं. इतकेंहि असून हे सुधारक सरकाराकडे अर्ज करणार आहेत, कीं, लहानपणीं लग्न करूं नये असा कायदा करावा. आपल्या धर्मशास्त्रांत लहानपणीं लग्न करावें असें लिहिलेलें आहेच. यासाठीं मला त्यासंबंधानें जास्त बोलण्याची बिलकूल जरूरी नाहीं. आपण काय धर्मबाह्य आचरण करावें ? आपण काय आपल्या धर्माचा त्याग करावा ? छे छे कधींहि करूं नये ! (टाळ्या) शिवाय, सरकारला मदतीला बोलावण्याची काय जरूर आहे ? लहानपणीं लग्न करणें काय अनुचित आहे ? आणि ह्मणून त्यांत सुधारणा करण्याची जरूर आहे ? आणि जरूर असलीच तर ती आपल्यालाच नाहीं का करितां येणार ? इतकी विद्या प्राप्त झाल्यावरसुद्धां आपल्याला सरकारच्या मदतीची जरूर आहेच काय ? आपले सर्वच रीतिरिवाज फार लाभदायक आहेत, आणि त्यावरूनच असें दिसून येतें, कीं, आपल्यासारखे विद्वान, आपल्यासारखे हुषार, आपल्यासारखे शहाणे लोक इतरत्र असणें शक्यच नाहीं. तर मग आपल्यासारख्यांच्या रीतिरिवाजांत दोष कसे असूं शकतील ? आणि त्यांत दुरुस्ती करण्याची जरूरी ती काय असणार ? आपले अध्यक्षसाहेब आहेत, मी आहें, अशीं मोठमोठीं माणसें जर आपल्यांत पुढारी ह्मणून आहेत, तर सरकारच्या मदतीची काय जरूर ? पहा, आपण जेवण झाल्यावर खळखळावून चूळ भरून तोंड साफ करितों, साहेबलोक तसें करित नाहींत. यावरूनहि असेंच सिद्ध होतें कीं, इंग्रज लोकांपेक्षां आपले सर्व रिवाज फारच उत्तम आहेत. याकरितां सरकारला असा अर्ज केला पाहिजे, कीं, या कामांत कायद्याची जरूर नाहीं. इतर वक्त्यांनां बोलावयाचें आहे तेव्हां मी आपला आतां जास्त वेळ घेत नाहीं."
(पांच मिनिटें टाळ्यांचा गजर.)

अनुमोदन देण्याकरितां ह्मणून दुसरे एक गृहस्थ उभे राहिले. ते ह्मणाले "सरकाराकडे अर्ज करण्याची काय जरूरी आहे, याबद्दल फार सूक्ष्म रीतीनें निरूपण करण्यांत आलेलें आहे, आणि तें फारच मुद्देसूद रीतीनें शावीत करण्यांत आलेलें आहे. करितां त्यासंबंधानें जास्त चर्चा करण्याचें कारणच राहिलेलें नाहीं. कित्येक इंग्रज लोक तर आपल्या रीतिरिवाजांची वाखाणणी करितात, त्यावरूनहि सिद्ध होतेंच, कीं, आपले रीतिरिवाज फारच उत्तम आहेत व त्यांच्या तोडीचे दुनियेंतील कोणत्याहि राष्ट्रांत सांपडणें शक्य नाहीं! तर मग सुधारणेची काय जरूर? आपल्या रीतिरिवाजांची सरकारला काय माहिती असणार? परकीय लोकांनां आपले रीतिरिवाज समजणेंच शक्य नाहीं. करितां इंग्लिश लोकांनां आपल्या चालीरीतींत हात घालूं देणें वाजवी नाहीं. त्यांचा हेतु उत्तम असेल परंतु आमच्या चालीरीति किती उत्तम आहेत हें त्यांनां माहीत नाहीं खास. करितां मी या सूचनेस अनुमोदन देतों."

हे गृहस्थ खालीं बसतांच कुशलवपुशंकर बोलावयास उठले. त्याला उभा राहिलेला पाहून लोकांनीं टाळ्या पिटण्यास सुरवात केली 'घरखोये' 'शास्त्रीबुवा' याप्रमाणें निरनिराळ्या नांवांनीं लोक त्यांनां हांका मारून ओरडूं लागले. अध्यक्षांनीं टाळ्या वाजवून लोकांनां शांत बसण्यास सांगितलें. टेबलावर मोठ्यानें काठी ठोकली. उभें राहून हातांनीं इशारा केला. तेव्हां जवळच्या मंडळीची गडबड कमी झाली, पण मागच्या मंडळीनें आपली पाळी सुरू केली. पुढें काय चाललें आहे याची त्यांनां बातमीच नव्हती. टाळ्या वाजवून मोठ्यानें ओरडावयाचें एवढेंच त्यांनां माहीत होतें. थोड्या वेळानें साधारण शांतता होतांच अध्यक्षांनीं कुशलवपुशंकरला भाषण सुरू करण्यास विनंति केली. अशा प्रकारची संभावना झालेली पाहून तो थोडासा घाबरून गेला; परंतु जसें काय काय झालें तें माहीतच नाहीं, अशी ऐट करून तो उभा राहिला. चारी बाजूंस दृष्टि फेंकून, गडबडीची आपण पर्वाच करित नाहीं असें दाखवून, त्यानें भाषणास सुरवात केली. तो ह्मणाला "श्री वेत्रासनाधिकारिन्, तथा श्री सभामिश्रित श्रोतृजन हो! आपला वैदिक धर्म फार श्रेष्ठ आहे. कारण कीं, वेद हे ईश्वरप्रणित आहेत. कदाचित् ईश्वरप्रणित कशावरून असा आपण प्रश्न कराल? परंतु असा प्रश्न करण्याला आपण काय लहान मुलें आहां? असले प्रश्न फक्त मुलांनींच करावे! ब्रह्म ह्मणून जें आहे त्यानें स्वतःचे परिणाम वेदमय करून टाकलेले आहेत ह्मणून. कारण, वेद हे अनादि आहेत. शब्द नित्य आहे. ईश्वर-

प्रणित प्रमाणजन्य–नित्यत्व–इतर देश शास्त्रकलाऽसिध्यत्वं इति ! ह्मणून सुधारणा ही अनिष्ट आहे. वेदविरुद्धत्व ज्या ज्या ठिकाणीं वास करितें त्या त्या ठिकाणीं, अनिष्टत्व वास करितें. अतएव चार्वाकादीनाम इति सिद्धम्."

या प्रमाणें अपूर्व शास्त्रप्रमाणांनीं आर्यपक्ष सिद्ध करून विजयी होत्साते सानंद मुद्रेनें सर्वांकडे अवलोकन करून, श्रोतृजनांनां चकित करून व विरुद्ध पक्षाला आपल्या मतें अगदीं निरुत्तर करून, कुशलवपुशंकर स्वस्थानीं वसले. हा पराक्रम पाहून त्यांच्या काकांच्या चेहेऱ्यावर गंभीरपणा व आनंद यांची छटा दिसूं लागली. सभेंत आनंदीआनंद होऊन गेला. सुधारकांचीं तोंडें फिकीं पडलीं. सर्वानुमतें ठराव पास झाला. नंतर सरकारला पाठविण्याच्या अर्जाचा मसुदा वाचण्यांत आला. त्या मसुद्याला अनुमोदन देण्याकरितां शंभू पुराणिकाचा मेहुणा वल्लभराम उभा राहिला. तो ह्मणाला " आजकाल सुधारणेच्या नांवानें सर्वत्र पाखंड माजलें आहे. आर्यशास्त्रांत सांपडत नाहीं असें काय आहे ? आणि ह्मणूनच मी विचारितों, कीं, पाश्चात्य सुधारणांचीं प्रमाणें पुढें करण्याचें काय प्रयोजन ? आपल्या शास्त्रांत काय आहे हें समजून न घेतां उगाच हे सुधारक बडबड करित आहेत. त्यांनां मीं विचारितों, कीं, आगगाडी, तारायंत्र, यांत्रिकसामुग्री, हीं आपल्या शास्त्रकारांनां माहीतच नव्हतीं काय ? केवढें हें अज्ञान ! पाश्चात्य भाषाविज्ञान व पाश्चात्य कोशकार यांच्या प्रमाणांवरून हें सिद्ध करितां येणार नाहीं हें खरें, परंतु शास्त्रांचें रहस्य त्यांनां कोठून कळणार ? योग्य अर्थ करतां आला तर शास्त्रांत सांपडत नाहीं असें काय आढळणार आहे ? आपले शास्त्रकार त्रिकालज्ञ होते. करितां त्यांच्या आकलनांत आलें नाहीं असें कांहीं एक असणें मुळीं शक्यच नाहीं. शास्त्रांचा खरा अर्थ न समजल्यामुळेंच हे सुधारक त्यांनां ‘ झूट ’ ह्मणतात ! विचार करा, गळ्यांत जानवें नसलें तर ब्राह्मणानें वर्णोच्चार करितां कामा नये असें शास्त्र आहे. यालासुद्धां ते ‘ झूट ’च ह्मणतात ! पण शास्त्र असें सांगतें, कीं, गायत्रीमंत्राच्या उच्चारानें जानव्यांतील तंतु प्रफुल्लित होतात, व त्या तंतूंचीं निरनिराळीं जाळीं वनतात, व त्या जाळ्यांचें वेष्टण वनवून प्राणवायु त्यांत सुरक्षितपणें राहूं शकतो. हा प्राणवायु शरिरांतून उत्पन्न होणाऱ्या स्वेदादि अशुद्धांनां शुष्क करून व आपण त्यांचें आविष्करण करून आकाशांत भ्रमण करणाऱ्या पिशाचादिकांनां शरीराला स्पर्श करूं देत नाहीं. जानवीं नसतांना शब्दोच्चार झाल्यास तो ध्वनि प्राणवायूचें आवरण फेंकून देऊन पिशाचादिकांच्या स्पर्शाला शरीराला पात्र करितो

व त्यामुळेंच मनुष्य भ्रमिष्ट बनतो. तर मग ही शास्त्राज्ञा काय 'झूट' आहे! माऊंट गूफर, सीकार वगैरे जगन्मान्य विद्वानांनां हा सिद्धांत मान्य आहे. मीं तर स्वतः हजारों वेळां याचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन सिद्धता केलेली आहे. सुधारकांनां आपल्या आर्यशास्त्राचें रहस्य समजत नाहीं आणि त्यामुळेंच ते पाश्चात्य यांत्रिक विद्येंत अगदीं गुंग होऊन जातात. पाश्चात्य पदार्थविज्ञान, यंत्रज्ञान, विद्युतज्ञान हीं सर्व मायेची वृद्धि करणारीं आहेत, भ्रांतीला पुष्टी देणारीं आहेत, ब्रह्मज्ञानापासून पराङ्मुख करणारीं आहेत. आपल्या शास्त्रकारांनीं पदार्थविज्ञान शास्त्राचें ज्ञान करून घेणें अनुचित ठरविलें आहे. यावरून असेंच सिद्ध होतें, कीं, त्यांनीं मायेची अवगणना केली असून चैतन्याला श्रेष्ठत्व दिलें आहे. पाश्चात्यांच्या मायावादानेंच मोह उत्पन्न होऊन सुधारणेची इच्छा उत्पन्न झालेली दिसते. पाश्चात्यांच्या स्पर्शापासून आजपर्यंत आपली आर्यभूमि अस्पृष्ट राहिलेली आहे, तर मग आतांच स्पर्शदोषाची कां इच्छा व्हावी? पाश्चात्य सुधारणा अंशमात्र तरी आपल्या देशांत सुरू करण्याची काय आवश्यकता? मी हें राजकीय सुधारणांविषयीं बोलत नाहीं. पाश्चात्य सुधारणा आपल्या शास्त्रांस संमत नाहींत. त्या केवळ अनिष्ट आहेत. त्या सुधारणा आपल्या देशाला अधम बनवितील. आपल्या देशांतील सर्व कांहीं श्रेष्ठ आहे. त्याहून जें भिन्न तें त्याहून कनिष्ठच असणार, अधम असणार, हें स्पष्ट आहे. यावरून सिद्ध होतें, कीं, आपणांस सुधारणेची बिलकूल जरूर नाहीं. पाश्चात्य राज्यकर्त्यांनीं आमच्या गृहकृत्यांत संचार करून त्यांनीं आपली थोडीसुद्धां सुधारणा आमच्याकडे अमलांत आणणें अगदींच अयोग्य आहे. यावरून आजचा अर्ज पाठविण्याची आवश्यकता सिद्ध होत आहे."

हे वक्ते खालीं बसतांच एक शास्त्रीबुवा बोलावयास उभे राहिले आणि ह्मणाले "या सभेची सर्वच व्यवस्था अनियमित आहे. प्रथम व्याकरणावर वादविवाद पाहिजे. मी एक प्रयोग सभेपुढें सादर करितों, आणि ज्याच्यांत ताकद असेल त्यानें तो सिद्ध करावा."

यावर दुसरे एक शास्त्री उभे राहून बोलले "असा गर्व कधींहि करूं नये! या सभेंत पुष्कळ विद्वान् शास्त्री आहेत."

यावर पहिले शास्त्री ह्मणाले "असल्या मूर्खांनां शास्त्री ह्मणणें मूर्खपणाचें आहे!"

अध्यक्षांनीं दोघांहि शास्त्रीबुवांस खालीं बसविलें. इतक्यांत पांचसहा वक्ते एकदम उठले व सर्वांनीं एकदम आपलें भाषण सुरू केलें. प्रत्येक वक्त्याच्या साथी-

दारांनीं दुसऱ्या सर्व वक्त्यांस खालीं बसविण्याकरितां टाळ्या वाजवून ओरडण्यास सुरुवात केली. 'बसा' 'खालीं बसा' 'चालूंद्या' 'एकाचें झाल्यावर दुसऱ्याचें' 'एकामागून एक' अशी सर्वत्र ओरड सुरू झाली. सभेंत एकच गडबड उडून गेली. थोडी शांतता झाल्यावर एकाला बोलूं दिलें. त्यानें हात उंच व लांब करून सांगितलें "गृहस्थ हो ! अशा उत्तम व नांवाजण्यालायक कामांत मदत करण्यास जमलेल्या आपल्या या प्रचंड समूहांत आपणां शेंकडों लोकांसमोर मी उभा राहिलेला पाहून माझें मलाच मोठें कौतुक वाटत असून माझ्या नशिबाच्या थोरवी-बद्दल माझें मींच अभिनंदन केल्याशिवाय सभेच्या कामास हातभार लावण्याचें काम माझ्या हातून होणें शक्यच नाहीं ! मी एका वर्तमान पत्राचा एडिटर आहें. एडिटर या नात्यानें इतर एडिटरांच्या हुद्द्यास शोभेल अशाच प्रकारची टीका मीं वारंवार सुधारकांच्या वेळोवेळीं पुढें येणाऱ्या विचारांवर केलेली आहे. त्यावरून मी आपणांस असें खास सांगूं शकेन, कीं, सुधारकांनीं सुधारणेच्या कामांत जरी एकूनएक दगड पालथा केलेला आहे तरी पण अजूनहि त्यांचे पाय कोठेंहि जमिनीला लागलेले नाहींत. यावरूनच असें स्पष्ट दिसून येईल, कीं, सुधारणांची बिलकुल आवश्यकता नाहीं. सुधारणांची इच्छा करणें हें योग्य आहे कीं काय, हासुद्धां एक प्रश्नच आहे ! आपणांत लढाईच्या कामांत ऐक्यता आहे, आपणांत सर्वत्र चांगल्यावाईट कामांत पुढाकार घेण्याचा जोम आहे, पूर्ण अज्ञान असूनसुद्धां आपणांस मोठमोठ्या लोकांवर तोंड सोडतां येत आहे, लोकप्रियता संपादन करण्याचें आपल्या अंगांत पूर्ण सामर्थ्य आहे, तर मग मोठमोठ्या गंभीर विषयांवर विचार करण्यास कितीसा वेळ लागेल, आणि मग विद्वत्तेची काय पर्वा, आणि सुधारणा सुधारणा ह्मणून पाठीस लागण्याचें काय कारण ? बिलकुल नाहीं ! मी जोरानें पाय आपटून सांगतों, कीं, बिलकूल नाहीं ! शिवाय आह्मां हिंदु लोकांच्या चालीरीतींनां वळण लावण्याच्या कामीं पारशांनां अगर साहेबलोकांनां नाक खुपसूं देण्याची काय जरूर आहे ?"

इतक्यांत एक चक्री पागोटें घातलेले गृहस्थ उभे राहिले आणि ह्मणाले "लो-कांनीं ओटीभरणविधीची थट्टा मांडली आहे. यांच्यावर ग्रामण्य करण्यांत येत नाहीं त्याचा काय विचार ?"

अध्यक्षांनीं त्यांनां खालीं बसाविलें व पूर्वीच्या वक्त्यांला भाषण पुढें सुरू करण्यास सांगितलें.

"आतांच आपल्या स्वदेशाभिमानी बंधूंनीं सुचविलें आहे त्याप्रमाणें आपल्या देशाच्या [illegible]

लोक पूर्ण विचार करून पैल तीराला कसे जाऊं शकतील! आमचें स्वतःचें काम आह्मांला स्वतःलाच समजण्यास फार कठीण जाऊं लागलें आहे, मग परकी देशचे परकी लोक आपलें ह्मणणें पुढें मांडून आपल्या रीतिरिवाजांच्या भक्कम पायांवर आमची दुरुस्ती करण्यांत यश मिळवितील, ही एक काल्पनिक कादंबरीच समजली पाहिजे! आजकालच्या सुधारकांनीं आर्यधर्माची व रीतिरिवाजांची टवाळी सुरू करून वाटतील त्या गप्पा ठोकण्यास सुरुवात केली आहे. ते ह्मणतात, कीं, पाश्चात्य रीतिरिवाज चालू करण्यास जर हरकत असेल तर आह्मी विचारितों, कीं, शास्त्रांत पार्लमेंटची संमती कोठेंशी नोंदलेली आहे? ह्या मोठ्या गोंधळांत गुरफटून जाणें अगदींच साहजिक आहे. लोकांच्या रीतिरिवाजांत आणि राज्यपद्धतींत एकमेकांचा एकमेकांशीं काय संबंध आहे याबद्दल मनाचा घोंटाळा होण्यास परकीयांचे रीतिरिवाज आपल्या अंगवळणीं पडूं लागले आहेत हेंच होय.

"देशाचें पाऊल पुढें पडावें ह्मणून चालू पद्धतींत फेरफार करण्याचें मुळींच कारण नाहीं. माझें स्वतःचेंच उदाहरण मी आपल्यापुढें मांडतों. दोन वर्षें मीं कंपाझिटरचें काम केलें. त्याच्या पूर्वी सहा महिने मी इंग्रजी तिसऱ्या यत्तेंत मॉनीटर होतों. इतकें असून आज मी जाड्यांतला एडिटर बनलों आहें! ग्राज्युएट तर माझ्या दाराशीं घिरट्या घालित असतात. शेटसावकारांचें तर माझ्या शिवाय चालतच नाहीं. मला ज्ञानसंपन्न होण्याची जरूरच पडली नाहीं. मला समजत नाहींत अशा विषयांचा अभ्यास करण्याचीहि मला जरूर पडली नाहीं. इतकें असूनहि अर्थशास्त्र, राज्यनीति, साहित्य, संसारशास्त्र, यांवर मी बेधडक लेख लिहितों. वाटेल त्या विषयावर कांहींएक माहिती नसतां भर सभांतून स्पष्ट मत देण्यास मी बिलकुल कचरत नाहीं. अकलेची मुळींच जरूर नाहीं, जोरदारपणा पाहिजे! खालीं वर पाहण्याची मुळींच आवश्यकता नाहीं, खरेंखोटें तपासण्याचें कारण नाहीं, पण त्यावर हल्ला मात्र नेटानें करतां येण्याची अवश्य जरूर आहे. एडिटर लोकांचें कसब ज्यांनां माहीत नाहीं ते याला दांडगाई ह्मणतात. मी याला धीटपणा ह्मणतों. इतकी जोरदार हिंमत अंगांत असल्यावर मग राजकीय हक्क मिळविण्याच्या कामांत शहाणपणाचे विचार पुढें मांडण्याची काय जरूर? अर्थात्, सुधारणांच्या कामीं तर त्यांची जरूर नाहींच नाहीं, व पुढें आणण्याचें प्रयोजनहि नाहीं."

प्रत्येक वक्त्याचें भाषण संपतांच भद्रंभद्र बोलण्याला सुरुवात करण्याचे तयारींत असे; परंतु दुसऱ्या कोणीं बोलण्यास सुरुवात केली ह्मणजे याचा बेत तितकाच पडून राही. एकामागून एक अशीं भाषणें चालूच होतीं. मधून मधून मतें घेत पण त्यावेळीं इतका गोंगाट होऊन राही, कीं, कोणत्या मुद्यावर मतें घेत आहेत तें ऐकूंच येत नसे. भद्रंभद्रानें निश्चय केला, कीं, वाटेल तें होवो पण आपण भाषण करणार खास! एकदा मतें घेऊन होतांच "हर हर महादेव!" ह्मणून खूप मोठ्यानें आरोळी ठोकून सर्वांचें लक्ष्य आपल्याकडे ओढून घेऊन त्यानें भाषणाला एकदम सुरुवात केली. तो ह्मणाला " श्री मुख्य दैवत, आणि श्रीयुत आर्यजन हो! या मंगल समयीं सर्वजण हात जोडून श्री गणपती गजाननाला एकवार प्रणाम करा. श्री शंकराच्या पादयुग्मांचें स्मरण करा. श्री विष्णूची कृपा मिळवा. श्री सरस्वतीचें आवाहन करा. श्री अंबिकेचें ध्यान करा. श्री लक्ष्मी प्रसन्न करून घ्या. श्री सूर्यनारायण आपल्या सन्निध आहे त्याची आठवण करा. श्री वायुदेवतेचा प्रभाव दृष्टीस पडो अशी इच्छा करा. श्री अग्नि-नारायणाचें साहाय्य मागा. श्री वरुण देवतेला आमंत्रण करा. श्री रामकृष्णादि अवतारांचें, श्री वेदमूर्तीचें, श्री इंद्रादि देवतांचें, श्री गंधर्वादिकांचें, श्री किन्नरांचें, श्री ग्रहांचें, श्री नक्षत्रांचें, श्री तारकांचें, श्री पृथ्वी मातेचें, श्री आर्यभूमीचें, श्री सनातन आर्यधर्माचें, श्री काशीविश्वेश्वराचें, श्री प्रयागाचें, श्री मथुरेचें, श्री जगन्नाथाचें, श्री द्वारकेचें, श्री रामेश्वराचें, श्री सर्व तीर्थसमूहाचें, श्री गंगेचें, श्री समुद्राचें, श्री सर्व देवतांचें प्रीतीनें पूजन करा. जय, जय, जय, जय, जय! अहाहा!! आपण धन्य आहों! मीहि धन्य आहें! धन्य धन्य त्या आकाशाची! धन्य आहे त्या पाताळाची! आज या आर्यसेनेचा विजय असो. शत्रूच्या निशाणाचा दांडा रणांत मोडून पडला आहे. शत्रूच्या सर्व सैन्याचा आज संहार उडाला आहे. सनातनधर्म सिद्ध झाला आहे. तो अचल ठरला आहे. वैदिकधर्माचा सर्व पृथ्वीवर प्रसार झाला आहे. आपली रूढी हीच सर्व जगतांत उत्तमोत्तम ठरली आहे. आपल्या सर्वोत्तमपणाचा अभिमान कोठें सांठवावयाचा हाच मोठा कठीण प्रश्न येऊन पडला आहे. ब्रह्मांड त्याला ठेंगणें आहे. आत्म हें त्याचें साधन नव्हे. काल हा त्याच्यापुढें अनंत नाहीं. अहो! ज्या देशांत जन्मास आलेले यच्चावत मनुष्य हे देववंशी आहेत त्या ठिकाणीं 'सुधारणा' या शब्दाला थाराच कोठें आहे? उणीव कोठें आहे तर ती अंशमात्र तरी भरून काढली पाहिजे? या देशांतील ज्ञानांत

भविष्य, वर्तमान या तीनहि काळांचें जें ह्मणून ज्ञान शक्य आहे, तें सर्व ज्ञान वेदकाळापासून आपल्या त्रिकालज्ञानी पूर्वजांनीं आपलेंसें करून घेतलेलेंच आहे. इतर देशांतून कालावरोवर ज्ञान वाढत आहे, पण आपल्या आर्यावर्तांत तसा प्रकार नाहीं. कारण, योगसाधनांमुळें आपल्याला अज्ञात असें कांहींच नाहीं. तर मग पाश्चात्य रीतिरिवाजांची आपल्याला काय गरज आहे ? आतां एवढें खरें, कीं, राजकीय पद्धत स्वीकारतांना मात्र हें तत्व साफ विसरून गेलें पाहिजे. परंतु इतर कामांत आपल्याला त्या रीतिरिवाजांची विलकुल जरूर नाहीं. सुधारक बालविवाहाला प्रतिबंध करित आहेत; परंतु पाश्चात्त्यांच्या विचारसरणीला अनुसरून प्रौढविवाह अमलांत आणणें ह्मणजे तें अनिष्ट आहे, दुष्ट आहे, आपणांला तें वर्ज्य आहे ! पाश्चात्त्यांच्या विचारसरणीप्रमाणें तें तसें नसेल तर मग आपल्या शास्त्रांत त्याला आधार असलेच पाहिजेत, व त्यावरून प्रौढविवाह इष्टच ठरणार. आणि यामुळेंच तर आपल्या शास्त्रांची उत्तमता सिद्ध होत आहे. कोणत्याहि दृष्टीनें शास्त्राची मर्यादा उल्लंघन करण्याची जरूरी नाहीं. याकरितां 'सुधारणा' अनिष्ट आहे हें सिद्ध आहे. 'सुधारणा' हा शब्द ऐकूनच माझें डोकें फिरतें: सर्व देशाला त्रास होतो. सर्व जगाला त्रास होतो. मनुष्यमात्राला त्रास होतो. देवादिकांनां त्रास होतो. दानवांनां त्रास होतो. पशूंनां त्रास होतो. पक्ष्यांनां त्रास होतो. वनस्पतींनां त्रास होतो. या त्रासाचा संहार करण्याकरितां आज आर्यसेना सज्ज झाली आहे. मोठा अद्भुत पराक्रम दृष्टीस पडत आहे. प्रत्येक वीर आपल्या कर्तबगारीनें अगदीं तल्लीन होऊन गेला आहे. आपला मोठेपणा कसा मिरवावा याबद्दल युक्ति शोधून काढण्यांत प्रत्येक मनुष्य अगदीं गुंग झालेला आहे, व हें त्याचें करणें प्रशंसेस पात्रच आहे ! आपल्या आर्य लोकांची स्तुती गाइल्यानें लाभ होणार नाहीं असा कोण आहे ? कोणाला लोकप्रिय होतां येणार नाहीं ? लोक वोलूनचालून अज्ञान आहेत, करितां स्तुति करून त्यांचीं मनें प्रसन्न करून घेतलीं पाहिजेत, आणि त्यांतच आपलें हित आहे. लोकांनां खरा धर्म ह्मणजे काय त्याची ओळखसुद्धां नाहीं. करितां हल्लीं ते जो धर्म पाळित आहेत त्याचीच प्रशंसा केली पाहिजे. तरच त्यांचें खऱ्या धर्मावर प्रेम जडेल. खरा धर्म ह्मणजे आपला वैदिक धर्मच होय. या सभेंत हजर असलेला अगर हजर नसलेला प्रत्येक आर्य, एक अखंडित धर्म, भेदरहित एकच वैदिक धर्म, अक्षरशः चार वेदांचा धर्म, पाळित आहे. यावरूनच सिद्ध होतें,

सर्व अनुपम रूढि उत्पन्न झाल्या आहेत. अहाहा ! हा रूढिमार्ग किती उदार आहे! उदात्त आहे ! या रूढींनींच तर ब्राह्मणांनां श्रेष्ठ ठरवून बाकीच्या सर्व वर्गांनां पतित, अधम, अज्ञान, अधिकारशून्य, ताबेदार, अक्षरशत्रु बनवून ठेविलें आहे. ब्राह्मणांला रूढिमार्गाचा लाभ विहित आहे एवढेंच नव्हे, पण रूढिमार्गालाहि ब्राह्मणांचा लाभ विहित आहे. केवळ या रूढिमार्गानेंच क्षत्रियांनीं मात्र युद्धाला जावें असें ठरवून पूर्वकाळच्या मुसलमानांचा विग्रह करून व उत्पात करून देशरक्षणाच्या कामीं क्षत्रियांची योजना करून घेऊन बाकीच्या सर्व जातींस प्रतिबंध केला व त्यामुळेंच सर्वांच्या प्राणांचें संरक्षण झालें. रूढीमुळें क्षत्रियांचें झालेलें हित विहितच आहे. आणि पक्षपात न करितां यवनांचेंहि अनहित होऊं दिलें नाहीं. याच रूढीनें वैश्यांनां व्यापाररत केलें; परंतु व्यापाराच्या निमित्तानें परदेशांत जाण्यास अटकाव केल्यामुळेंच तर आपल्या देशांतील द्रव्य परदेशांत जाण्याचें बंद झालें व त्यामुळेंच देशी उद्योगधंद्यांसहि उत्तेजन मिळालें. रूढीनें याप्रमाणें वैश्यांचें हित केलें. रूढीनें समुद्रगमन निषिद्ध ठरविलें व देशाचेंहि अनंतकालपर्यंत टिकणारें हित साधलें. याच रूढीनें शूद्र वर्गाला वंशपरंपरा एकच धंदा करण्याची आज्ञा करून नफा नुकसानाच्या मोहांतून मुक्त केलें. रूढीनें शूद्रांनां धनसंचय वर्ज्य करून एक अर्थशास्त्राचा नियम सिद्ध केला. रूढीचें गुणवर्णन करण्यास वाणी समर्थ नाहीं! जगतांतील सर्व भाषांत तिची थोरवी गाण्यास शब्दच नाहींत! मनुष्याच्या बुद्धीच्या आवांक्याबाहेरचें तें काम आहे.तर मग आपल्या आर्यांची रीति किती उत्तम! भीति किती उत्तम! प्रीति किती उत्तम! नीति किती उत्तम! गीति किती उत्तम! या रीतीच्या, भीतीच्या, प्रीतीच्या, नीतीच्या व गीतीच्या जोरावर ज्यानें रूढी स्थापन केली त्यानें केवढा विचार करून या रूढींची स्थापना केली असली पाहिजे! अहाहा! त्या मंगलकालीं सर्व भरतखंडांतील समग्र प्रजाजन एकवटून काशीक्षेत्रीं रूढीबंधन करण्याकरितां केवढी मोठी सभा भरली असेल! काय त्या सभेचें वर्णन करावें? देवांनीं समुद्रमंथनानें काढलेलीं रत्नें धारण करून त्या सभेला अनुपम शोभा आणिली असेल! अप्सरांनीं गायन करून सभाजनांचीं मनें रंजन केलीं असतील. ब्राह्मणांनीं मंत्रघोषानें सर्व ब्रह्मांड भरून काढल्यामुळें वस्तुमात्राला स्थानरहित करून सभेंत येण्याला भाग पाडलें असेल ! आर्यभूमींतील प्रजाजनांचा हर्ष पाहून समुद्र उचंबळून आकाशाला लागला असेल ! विचार करून व ब्राह्मणांचें गांभीर्य पाहून हिमाचल लज्जायमान होऊन

असेल ! सभाजनांचा तर्करंग कल्पनेच्या बाहेर गेल्यामुळें काल निराश होऊन त्यानें आपली गति बंद केली असेल व तो मार्गे वळला असेल ! त्यांच्या बुद्धि-बलाचा प्रभाव पाहून वायु ईर्षेनें कोपायमान जाहला असेल, व आपलें सामर्थ्य तपासून पाहण्यास तयार झाला असेल—"

इतक्यांत श्रोतृसमूहांत एके ठिकाणीं मारामारी सुरू झाल्यामुळें सर्व लोक उठून तिकडे पाहूं लागले. आमच्या मागचीं माणसें खालीं उतरून पुढें सरकलीं. कठड्यावर उभे राहिलेल्या लोकांच्या भारानें फळी मोडली. वर उभे राहिलेले सर्व खाली कोसळले. भद्रंभद्राचें पागोटें उडी मारून प्रथम वर जाऊन सूर्य-दर्शन करून नंतर पुन्हा एक गोलांट उडी मारून मातृभूमीच्या दर्शनाकरितां खालीं आलें. भद्रंभद्रसुद्धां पागोट्याप्रमाणेंच प्रथम उडी मारून नंतर गोलांटी खाऊन जमिनीवर आडवा झाला. त्याच्यावर दुसरे एक गृहस्थ पडले. आजूबाजूला उभे होते तेहि पडूं लागले. पडलेले उठूं लागले. माझीसुद्धां तशीच गाळण उडाली. कांहीं घाबरून ओरडूं लागले. सावध होते ते टाळ्या वाजवूं लागले. बाजूचे लोक हंसूं लागले. पुढची मंडळी मागें लोटूं लागली. अशी एकच गर्दी होऊन खालीं पडले त्यांनां उठून उभें राहणें मुष्किलीचें झालें. भद्रंभद्र तर अगदींच निराश झाला, व त्याची जिवंत राहण्याचीहि आशा सुटली. इतक्यांत शिवशंकर पुढें येऊन त्यानें कित्येकांनां लाथाबुक्क्या मारून बाजूला सारलें. रामशंकरनेंसुद्धां पडल्या पडल्या कित्येकांनां चिमटे काढून व ओरडाआरड करून मोठ्या कष्टानें डोकें वर काढलें.

मला थोडेंसें व भद्रंभद्राला बरेंचसें लागल्यामुळें तेथून कांहीं मंडळी आह्मांला घरीं घेऊन आली. उघड्या हवेवर येऊन भीति समूळ नाहींशी झाल्यावर भद्रं-भद्राला जरा अवसान आलें. कांहीं उपचार करून व कांहीं धीर देऊन ताजा-तवाना झाल्यावर तो ह्मणाला "मी कांहीं इतका घाबरलों नाहीं ! रणांत घुसलेला योद्धा वार लागला ह्मणून शोक करित नाहीं. पराक्रमाचें द्योतक ह्मणून उलटा अभिमानच बाळगतो. आर्यसेनेचा अग्रणी होऊन समरभूमीवर अद्भुत शौर्य गाजवित असतां दुष्ट शत्रूंच्या छळानें मी जरी घोड्यावरून खालीं आलों, तरी पण कांहीं पराभव पावलों नाहीं. आपल्या सेनेचा विजयच झाला आहे. आर्य-धर्माचा जयजयकार झाला आहे व रूढिदेवीनी कीर्ति पसरली आहे."

## प्रकरण सातवें.

### जय-यात्रा.

दोनतीन दिवस विश्रांति घेतल्यावर पुन्हा आह्मी बाहेर फिरूं लागलों. माधववागेंतील दारुण संग्रामांत शत्रूच्या सेनेचा संहार केल्यानंतर कित्येक ठिकाणच्या लहान लहान छावण्यांवर हल्ला करण्याची जरूर होती. अतुल पराक्रम करून विजय मिळविल्यानंतरहि लढाईचें काम जारी चालू ठेविल्यानें अरीचें निर्मूलन होईल, अशी भद्रंभद्रांची खात्री होती. जिकडे पहावें तिकडे माधववागेंतील सभेची कीर्ति दुमदुमून राहिली होती. वर्तमानपत्रांतून सभेचीं अद्भुत वर्णनें छापून प्रसिद्ध होत होतीं. स्वतःचे उद्योगधंदे वाजूला ठेवून केवळ सभेकरितां दहा हजार लोकांचा समूह गोळा झाला होता. सर्व सभाजन उत्सुकतेनें एकाग्रचित्तानें श्रवण करित होते. मोठमोठे विद्वान् वक्ते मुद्देसूद प्रमाणांनीं व रसभरित जोरदार वाणीनें आर्य मत सिद्ध करित होते. सर्व ठराव एवढ्या प्रचंड सभेंत एकमतानें, एकजुटीनें, एकविचारानें मंजूर होत होते. सभाजनांत गांभीर्य, शांति, उत्साह, व उत्सुकता पूर्णपणें दिसून येत होतीं वगैरे मजकुराचीं नवीन नवीन वर्णनें निरनिराळ्या वर्तमानपत्रांतून त्यांच्या खास वातमीदारांकडून ह्मणून प्रसिद्ध होत होतीं. सर्वांच्या वर्णनांत अनुपम बुद्धिमत्तेच्या, अद्भुत प्रभावाच्या, भव्य व तेजस्वी दिसणाऱ्या एका नवीन वक्त्याची अतिशय स्तुति फडकत होती.त्याच्या भाषणांतील प्रत्येक शब्दाची वाखाणणी केलेली होती; परंतु त्या वक्त्याचें नांव गांव कोणालाहि समजलेलें नव्हतें. प्रत्येकजण विचारी, कीं, हे वक्ते कोण ? त्यांचें नांव काय ? कारण भद्रंभद्राचें अलौकिक नांव मुंबईत ऐकूनसुद्धां कोणाला माहीत नव्हतें असें वाटतें. त्याच्या पराक्रमानें सर्व लोक अगदीं चकीत होऊन गेलेले दिसत होते. भाषण करतां करतांच सभेंतून तो एकाएकीं अदृश्य कसा झाला, याचेंच सर्वांनां मोठें नवल वाटत होतें. त्यावद्दल हजारों तर्क चालले होते. कांहीं वर्तमानपत्रकर्त्यांनीं असें प्रसिद्ध केलें, कीं, त्यांनां जरूरीची कांहीं तार आल्यामुळें ते एकदम निघून गेले. कोणीं लिहिलें, कीं, त्यांची प्रकृति एकाएकीं विघडल्यामुळें ते निघून गेले. कोणीं प्रसिद्ध केलें, कीं आमच्या वातमीदाराला खरी खरी हकीगत कळली आहे, कीं, हे थोर पुरुष फारच साधे व निरभिमानी असल्यामुळें सभा विसर्जन होतांच आपली भेट घेण्यास कोणी येऊं नये ह्मणून जाणूनवुजून तेथून निघून गेले. कोणी ह्मणत कीं, त्यानें अनेक देवतांनां आव्हान केल्यामुळें त्या सर्वांनीं त्याच्या आमंत्रणाला

मान देऊन स्वर्गांतून उतरून सभामंडपाकडे येण्यास सुरुवात केली. अग्निनारायण सर्वांच्या अग्रभागीं होता त्याला पाहून तो सामोरा गेला व अदृश्य झाला. हीं सर्व वर्णनें वाचून भद्रंभद्र ह्मणाला "जगतांतील मायेचें स्वरूप असें आहे कीं, ज्ञान, अज्ञान, हीं तर्कांच्या खोल आवारांत एके ठायीं आणि एकदम लीन होतात. तर्क करणें हा निव्वळ मूर्खपणा आहे. सत्याचा शोध शास्त्रमार्गानेंच लागणार."

आह्मी घरांतून बाहेर पडून थोडे दूर जातों तोंच गल्लींतून कोणी माणूस बाहेर पडल्यासारखें वाटलें. त्याचें तोंड नीटसें नजरेस पडलें नाहीं; पण तो हरजीवन असावा असें वाटलें. त्यानें आमच्याकडे पाहिलें पण त्याचें लक्ष्य आमच्याकडे गेलें नसावेंसें वाटतें. कारण, तो एकदम गल्लीच्या नाक्यावर जाऊन दुसऱ्या गल्लींत शिरला. आह्मी त्याला मोठ्यानें हांका मारित त्याच्या मागोमाग धावत सुटलों; पण त्यालाहि कांहीं जरूरीचें काम असल्यामुळें तोहि जलदीनें जात होता. गल्लीच्या तोंडाशीं जाऊन तो कोणत्या बाजूला वळला तें आमच्या नजरेस पडलें नाहीं. आह्मी ओरडत धावत जात होतों, इतक्यांत एका पोलीसच्या शिपायानें आह्मांला अडविलें आणि विचारिलें "तुह्मीं धावत ओरडत कोणाच्या मागें लागलां आहां?" आह्मीं सर्व हकीगत सांगितल्यावर त्यानें आह्मांला जाऊं दिलें. परंतु ताकीद केली, कीं, रस्त्यांतून अशी धांदल करूं नका. थोडेसे पुढें गेलों तों एका ओट्यावर एक गृहस्थ बसला होता त्यानें हात वर करून आह्मांला आपल्याजवळ बोलाविलें व विचारिलें "कोणाला पाहतां आहां?"

भद्रंभद्रानें हरजीवनचें नांव सांगितलें. तो गृहस्थ ह्मणाला "ओहो! ते प्रख्यात नैय्याथिक व गणपतिभक्त—ते तर—ऐकण्यांत असें आहे, कीं, ते बडोद्यास गेलेले आहेत. त्या ठिकाणीं कांहीं मोठा पूजनसमारंभ व्हावयाचा आहे. तो आटपून ते अद्याप परत आलेले नाहींत असें वाटतें. एवढ्या मोठ्या गृहस्थांशीं आपला कोठून योगायोग जूळून आला?"

भद्रंभद्रानें सर्व हकीगत सांगितली आणि ह्मटलें "रुपये परत कसे करावे या फिकिरींत तो पडला असावा."

त्या गृहस्थानें विचारिलें "आपण परत कधीं जाणार?"

भद्रंभद्र ह्मणाला "माधवबागेंत आर्यसेनेचा पूर्ण विजय जाहलेला आहे. या सभेंत आपला आर्यधर्म सिद्ध झाला आहे. पण माझी अशी समजूत आहे, कीं, या शहरांत बरेच धर्मभ्रष्ट लोक आहेत. ते सर्व आपले शत्रु आहेत. त्यांचा पाडाव केल्याशिवाय मी परत जाणार नाहीं. पराभूत झालेलें शत्रूचें सैन्य

कोठें कोठें दडी मारून वसलेलें आहे तें अवश्य शोधून काढिलें पाहिजे. आह्मी त्यांच्या शोधावर आहों हें त्यांनां न समजूं देतां त्यांचा माग काढला पाहिजे. त्यांच्या छावण्या कोठें कोठें आहेत त्यावद्दल आपल्याला कांहीं माहिती आहे काय?"

त्यानें उत्तर दिलें "तुमचा पहिला शत्रु ह्मणजे मुंबईचे भिकारी. हे लोक बिलकूल धर्म पाळित नाहींत, आणि वाटेल त्याच्या हातचें खातात. याच बाजूला एका सदावर्तीजवळ त्यांचा मोठा तळ आहे. हे लोक कोणालाच जुमानित नाहींत. त्यांच्यावर हल्ला करा. पण पहा हो! हे लोक तुमच्या जवळ जवळ येतील. ते प्रथम कांहींतरी मागण्याच्या मिषानें येतील; पण मग ते अशा रीतीनें वाटोळे येऊन बिलगतील, कीं, ते तुह्माला बिलकुल भिणार नाहींत. प्रथम यांच्यावर स्वारी करा आणि जय मिळवा. माधवबागेंत कांहीं वळलें नाहीं ह्मणून हे लोक फारच चिडून गेले आहेत, ह्मणून जरा संभाळूनच असा. जरा वर नजर फेंका. तो त्यांचा बावटा आहेसा वाटतो."

भद्रंभद्र ह्मणाला "तो पलीकडच्या छपरावर दिसतो आहे तो?"

"नाहीं नाहीं, त्याच्या पलीकडे. तो त्या झाडावर दिसतो आहे तो! त्या बाजूला जा."

या लोकांनां वाग्युद्धांत चीत करण्याचा निश्चय करून भद्रंभद्र त्याच बाजूला जाऊं लागला. आमच्या या सर्व तजविजींवद्दल त्यांनां पूर्वींच बातमी लागलेली असावी, असें दिसलें. कारण, वाटेंत जातांना आह्मांला बरेच भिकारी भेटले. भद्रंभद्र त्यांनां उद्देशून ह्मणाला "चला आमच्याबरोबर चला. रस्त्यावर उभे कशाला? रणांगणांत चला!" असें बोलून जे जे भिकारी वाटेंत भेटले त्यांनां हातानें इशारा करून त्यानें पुढें येण्यास सांगितलें. त्यांतले कित्येक आमच्या बरोबर आले आणि मग मागें फिरले. कित्येक तर अगदीं लगट करून ओरडा-आरड करित आमच्याबरोबर चालले. कित्येक तर आपले जखमा झालेले हातपाय मोठ्या कळकळीनें व काकुळतीनें दाखवूं लागले. कित्येकांनीं तर शरीराच्या निरनिराळ्या भागांनां बांधलेल्या पट्या सोडण्यास सुरुवात केली. त्यावरून असें वाटूं लागलें, कीं, वाग्युद्धांतसुद्धां अशाच कांहींतरी जखमा होणार; परंतु आह्मी अशा जखमांनां मुळींच भीक घालणार नाहीं असें दाखविण्याचा त्यांचा हेतु असावा. त्याच्यापूर्वीं आपण जाग्यावर जाऊन पोंचावें ह्मणून आह्मीं जरा जलदीनें पाय उचलले. मागें वळून त्यांच्याकडे पाहिलें तों त्यांच्यांत जास्तच उचल झाली. ते आमच्यामागून धावूं लागले. कित्येक तर आमच्या पुढें जाऊन आह्मांला घेरून अडवण्याचा प्रयत्न करूं लागले. कोणी ह्मणूं लागले हाच भिकारी आहे— हा आपल्याला काय देणार?".

भद्रंभद्र उभा राहिला आणि चारी बाजूंस नजर फेंकून ह्मणाला "अरे दुष्टांनों! समजूं नका, कीं, मी घाबरेन ह्मणून! तुमच्या या छल करण्याच्या सर्व युक्त्या मला माहीत आहेत. पैसेच द्यावयाचे असते तर माझ्याजवळ नाहींत असें समजूं नका. हे पहा किती आहेत ते!"

असें ह्मणून अंगावरच्या धोतराचा शेव पुढें करून दाखविणार तों धोतराचे शेवटास काय? कांहींच नाहीं! तेव्हां मजकडे वळून तो ह्मणाला "घराहून घ्यायलाच विसरलों वाटतें?"

मी ह्मणालों "छे, तसें नाहीं. आपल्याला वाटेंत एका गृहस्थानें रस्ता दाखविल त्याच्या पूर्वी तुमच्या धोतराला गांठ मारलेली होती ती मीं पाहिलेली होती. आणि धोतराचें शेवट तर कापलेलें दिसत आहे!"

भद्रंभद्र ह्मणाला "वाटेंत येतांना कोठें तरी धोतर अडकलें असेल आणि गेलें असेल पैसे बांधलेलें धोतराचें शेवट तुटून!"

भिकारी ह्मणाले "तर मग आह्मांला बोलावतो आहेस कशाला?"

भद्रंभद्र ह्मणाला "दुष्टांनों! मीं तुह्मांला चांगलाच ओळखतों आहें. तुह्मीं तुमच्या सैन्याचे गुप्त हेर आहां. आमच्याकडील बातम्या काढण्याकरितां तुह्मीं गुपचुप आमच्याबरोबर येतां आहां. पण माझा पत्तासुद्धां तुह्मांला लागणार नाहीं. अंगांत शौर्य असेल तर उघड लढाईला तयार व्हा! तुमची जेथें छावणी असेल तेथें चला. प्रथमतः आरंभ मीच करितों. तुह्मी आर्यधर्माचे असे द्वेष्टे कसे बनलेत? सनातन धर्माची अशी अवहेलना कां चालविली आहे? वेदधर्म, आर्यांची नीति, आर्यांची वागणूक, पुरातन आचारविचार, या सर्वांकडे पाठ कां फिरविलीत? तुमच्याजवळ कांहीं आधार असतील तर पुढें मांडा. मी सर्वांचें खंडण करण्यास तयार आहें."

शत्रूंची छावणी नजीक नजीक येऊं लागली, तों तों त्यांचा जमाव जास्तच वाढत चालला. ते युद्धाची तयारी करित आहेत असें वाटलें. कित्येकांनीं आंधळे होऊन चालतां कसें काय येतें त्याचे प्रयोग चालविले होते. कित्येक आपल्या मुलांनां दुसऱ्याला दया येईल अशा रीतीनें रडण्यास शिकवित होते. कित्येक थोडीशी इजा होईल इतक्या बेतानें जमिनीवर कपाळ हापटून घेत होते. कित्येक तर कमरेला सर्व कपडे वेंटाळून बांधण्याच्या खटपटींत होते. कित्येकजण शरीराच्या चांगल्या भागांवर पट्या बांधित होते. कित्येक दुसऱ्या भिकाऱ्यांनां पैसे देऊन त्यांच्यापासून बरफी, भजीं वगैरे विकत घेत होते. कित्येक-

जणांनीं एकमेकांबरोबर जाऊन मिळविलेलीं चिरगुटें एके ठिकाणीं जमवून विकण्याचें काम चालविलें होतें. कित्येक निरानिराळ्या मोहोल्यांत होणाऱ्या प्राप्तीबद्दल चर्चा करित होते. त्यांच्या ह्या निरानिराळ्या युक्त्या पाहून भद्रंभद्राला संशय आला, कीं, हे लोक आपलें खरें स्वरूप दुसऱ्याला कळूं नये ह्मणून निरनिराळ्या बतावण्या करित आहेत. हातांत डाळ आणि एका फडक्यांत निर-निराळ्या प्रकारचें अन्न मांडून एक भिकारी कुटुंब खात बसलें होतें आणि त्यांतला सर्वांत वडील होता तो लहान मुलांनां सांगत होता कीं, 'नऊ वाजतां रोज पलीकडच्या त्या पारशीणीच्या घराशीं जावें. एखाद्यानें लंगड्यासारखें चालत जावें आणि कोणी कांहीं देईल त्यांतलें थोडेंसें झपाझप खाऊं लागावें, ह्मणजे दया येऊन आणखी जास्त खायला देतील. गाड्यांवर नजर ठेवून रस्त्यांत गाडी नसेल तेव्हां एका मुलानें भर रस्त्यावर व्याकूळ झाल्यासारखें पडावें. तेथला ववरजी फार चांगला माणूस आहे!'

भद्रंभद्र एकदम उभा राहून ह्मणाला "पापीलोक हो! तुह्मीं यवनांच्या हातचें अन्न सेवन करितां? तुह्मी धर्मभ्रष्ट आहां! आर्यांच्या रूढीचें तुह्मी उल्लंघन करितां, भ्रष्टाचारांत नेहमीं निमग्न असतां, जातगोत विचारिल्याशिवाय भिक्षा ग्रहण करतां, इतर जातींबरोबर व्यवहार करितां, वर्णाश्रम धर्म पाळित नाहीं—तुमच्या-जवळ कांहीं शास्त्राधार आहे काय? वेदवचनें कांहीं दाखवूं शकाल काय? स्मृति पुराणादिकांतून कांहीं दृष्टांत दाखवितां येतील काय? स्मृतीचा आधार असेल तर कोणत्या स्मृतीचा आहे तें प्रथम सांगा? वेदबाह्य कांहीं अर्थ करण्याचे भान-गडींत पडाल तर आधुनिक कोशकारांनीं केलेले अर्थ मला मुळींच मान्य नाहींत! शब्दप्रमाणावरून इतर प्रमाणें निघतात; करितां तीं पुढें मांडतांना चांगला विचार करा, तर्काला महत्त्व द्याल तर तुह्मी मूर्ख ठराल. तुह्मांला कोणता वाद पसंत आहे? विवर्त, परिणाम, किंवा प्रधान? तुह्मांला जो मार्ग पसंत वाटेल तो मार्ग आह्मांला कळविणें हें तुमचें कर्तव्य आहे. वादविवाद करणें कांहीं सोपें नाहीं. मीं वाग्युद्धांत दिग्विजय मिळविलेला आहे. इष्ट मत सर्वत्र सिद्ध करून दाखविल्यामुळें मला फारच आनंद होत आहे. सांगा तर मग दुष्टांनों! तुमचा निग्रह केला पाहिजे कीं तुह्मीं शरण येतां?"

या क्रोधयुक्त भाषणामुळें भिकाऱ्यांस जास्त लेष आल्याचें दिसलें नाहीं. मुंबईतील इतर श्रोते बाजूला उभे होते त्यांतहि यांच्या टोळींतले लोक मिसळले

नाहींत. रस्त्यांतून जाणारायेणारांपैकीं पै पैसा फेंकणारांकडे त्यांचें लक्ष्य जास्त लागलेलें होतें. भद्रंभद्राच्या भाषणानें ते अगदीं चकीत होऊन गेलेले असावे, असें बिलकुल दिसत नव्हतें. भद्रंभद्र बोलतांना ज्याच्याकडे तोंड करून मोठयानें ओरडला होता तो कांहीं बोलण्याच्या बेतांत होता; परंतु शेजारच्या दुसऱ्या भिकाऱ्यानें त्याला सांगितलें, कीं, "हा सदावर्तांतला नवीन भय्या आहे." तें ऐकून तो कांहीं एक न बोलतां आमच्याकडे पाठ करून बसला. या बेपर्वाईमुळें भद्रंभद्र अतिशय संतापला. त्याला वाटलें होतें, कीं, हा उपालम्भांतून निसटून वाग्युद्धांत प्रवेश करील, कीं, मग लागलाच त्याला एक व्याकरणाचा प्रश्न विचारीन आणि मात करून सोडीन.

निराशेनें खिन्न न होतां आह्मी शत्रूंच्या समूहांत पुढें चाल केली. तेव्हां कित्येकांची नजर आमच्याकडे गेली. त्यांनीं 'शेट, शेट' ह्मणत आमचा हात धरला. कित्येकांनीं तर पडल्या पडल्या पैसे जमा करण्याकरितां पुढें पसरून ठेवलेल्या फडक्याकडे बोट दाखविलें. आपलें दैन्य दाखवून हे लोक आह्मांला ठकविण्याचा प्रयत्न करित आहेत, हें आह्मांला तेव्हांच समजून आलें. सदावर्तांचें दार उघडतांच सर्व भिकार एकदम तिकडे धावत सुटले. कित्येक गोसावी तर दार उघडण्याच्या आधींपासूनच दाराशीं जाऊन बसलेले होते. मागाहून भिकाऱ्यांची गर्दी होऊन ढकलाढकल सुरू झाल्यामुळें भद्रंभद्र आणि मीसुद्धां ढकलत ढकलत तिकडच्या बाजूस गेलों. चारी बाजूंनीं घेरून याप्रमाणें धक्काबुक्की करून छळ करण्याची शत्रूची कल्पना पाहून भद्रंभद्र मोठयानें ओरडून ह्मणाला "अरे दुष्टांनों! असा छळ करून मला अडवाल, परंतु वाग्युद्धांत तुह्मांला यश कसें येणार? माझी बुद्धि कशानेंहि डगमगणारी नाहीं."

याचें बोलणें ऐकण्याला कोणी उभेंच राहीना. सदावर्ताच्या दरवाजाजवळ पडापड चालली होती. आह्मी ढकलतढकलत पुढें चाललों होतों ह्मणून आह्मांला मागें खेंचण्याकरितां कांहींनीं आमचीं धोत्रें धरून मागें ओढण्यास सुरुवात केली. कित्येक आमच्या खांद्यावरून हात पुढें पुढें करूं लागले. कित्येकांनां शिधा मिळाल्यावर ते परत जातांना आह्मांला धक्के मारूं लागले. वाग्युद्धाकरितां प्रमाणांची सामुग्री नसल्यामुळें शत्रूंनीं जरी हा देहछल सुरू केला तरी भद्रंभद्र घाबरला नाहीं. पण धक्के खात खात एकदाचा दरवाजापाशीं येऊन पोंचतांच तो पायऱ्यांवर चढला व सदावर्तावरील मुख्य अधिकारी तेथें नाहीं असें पाहून शिध्याचीं भाडीं ओढण्याकरितांच हा पुढें सरसावला आहे असें समजून, दारावर उभा

असलेल्या माणसानें भद्रंभद्राला एक धक्का मारून खालीं पाडलें; परंतु खालीं उभ्या असलेल्या मंडळीच्या अत्याग्रहावरून भद्रंभद्र पुन्हा पायऱ्यांवर गेला. त्यामुळें प्रकरण बरेंच विकोपास गेलें असतें. पण मीं मोठ्यानें ओरडून सांगितलें, कीं, "हे सत्पुरुष गृहस्थ आहेत, भिकारी नव्हत !" तेव्हां भद्रंभद्राला पायठण्यांवर थारा मिळाला. धापा टाकित टाकित, सौम्य शब्दांनीं व लोभरहित अशा अंगविक्षेपांनीं भद्रंभद्रानें आपला निस्पृहपणा मंडळीच्या नजरेस आणिला, व त्या शिधा वांटणाराचेंहि समाधान केलें. मोठ्या समाजाला बोध करण्यास ही फार उत्तम संधि आहे असें पाहून भद्रंभद्रानें भाषणास सुरुवात केली. माझ्या सांगण्यावरून त्या लट्टालठ्ठींतून हा निभावला होता. त्याबद्दल एखाद्या महापुरुषाप्रमाणें, लाभरहित स्मरण करून माझ्याकडे अप्रसन्न मुद्रेनें नजर फेंकून तो ह्मणाला "अंबाराम ! मी सत्पुरुष आहें, भिकारी नसून गृहस्थ आहें, असें सांगून भिकाऱ्यांच्या वर्गापासून मला अलग केलेंस, हें योग्य नाहीं. एखादा भिकारी असून तो जर श्रेष्ठ वर्णांतला असेल तर तो सत्पुरुष असून गृहस्थापेक्षां श्रेष्ठ असूं शकेल. ब्राह्मणानें भिकारी असणें यांतच त्याचा थोरपणा आहे. भिक्षावलंबन हाच ब्राह्मणाचा धर्म. या लक्षणावरूनच या कलियुगांत ब्राह्मणाची ओळख पटणार आहे, आणि त्याकरितांच या जमलेल्या मंडळीलासुद्धां मला हेंच सांगावयाचें आहे, कीं, भिक्षा मागण्याचा अधिकार केवळ ब्राह्मणांनांच आहे. इतर वर्णांचीं माणसें भीक मागून ब्राह्मण बनण्याचा प्रयत्न करित आहेत, ह्मणजे जन्मापासून चालत आलेला जातिभेद मोडून टाकण्याचें महापातक करित आहेत. हे दुष्टांनों! तुह्मांला भीक मागण्याला कोणीं परवानगी दिली? वर्णाश्रम पद्धतीचा अतिक्रम करण्यास तुह्मांला कोणीं शिकविलें? तुमची अशी कल्पना आहे काय, कीं, भीक मागणें फार हलकें काम आहे तेव्हां आपल्याकडे कोण लक्ष्य देणार? आणि आपल्याला कोण विचारणार? पाश्चात्य विद्वानांची, मोहांत गुरफटलेल्या जडवादी अर्थशास्त्रज्ञांची कदाचित अशी समजूत असेल, कीं, भीक मागणें हें फार नीच कृत्य आहे, परंतु आपल्या आर्यधर्मांची व धर्मशास्त्रांची रचना अगदीं निराळ्याच दृष्टीनें बनविलेली आहे. आपल्या शास्त्रानें भिकाऱ्यांनांच फार श्रेष्ठ मानले आहेत. भिकाऱ्यांनांच भूदेव मानले आहेत. सकल मनुष्य जातींत श्रेष्ठ वर्णावरच भीक मागण्याचें काम सोंपविलेलें आहे. यावरूनच सिद्ध होतें, कीं, आपलीं शास्त्रें अनुपम आहेत. तर मग हे मूर्खांनों! पाश्चात्य शिक्षणाच्या मोहानें लोभाला गुंतून तुह्मी अशी भ्रमयंती कशाकरितां धरून बसलांत ? भीक मागण्यापासून आलस्य वाढतें, आणि व्यापार

धंदा केल्यामुळें शिथिलता येते. धंदेवाल्यांच्या श्रमांचें फळ निरुद्योगी आळशी लोक मटकावून बसतात, आणि विद्याभ्यास करण्याची त्यांची इच्छा शिथिल होत जाते, वगैरे पाश्चात्य लोकांच्या दुष्ट कल्पना तुह्मी खऱ्या मानून बसतां. हल्लीं हें वर्तन चालू आहे तें सर्व अयोग्य आहे. ब्राह्मणांचें हल्लींचें वर्तन हें का शास्त्रविरुद्ध आहे ? का अयोग्य आहे ? पाश्चात्यलेखकांतसुद्धां ज्यांनां आर्यदेशांतून थोडेंबहुत सत्य कळूं लागलें आहे, ते तर जडशास्त्रांचे नियमांवरून भिकाऱ्यांच्या धंद्याचा उत्तमपणा सिद्ध करित आहेत. पहा, जगविख्यात पंडित शिरोमणी केडिज फीडर यांचें नांव आबालवृद्ध मनुष्यमात्रास माहीत असून त्यांनीं अज्ञान सुधारकांनां आश्चर्यचकित करून सोडिलें आहे. ते लिहितात, कीं, 'मनुष्यप्राण्याच्या इंद्रियद्वारा जो प्राणवायु बाहेर पडतो त्याला मोठा वेग प्राप्त होऊन तो सर्व वातावरणांत उष्णता उत्पन्न करितो, आणि भिकाऱ्यांच्या दीनवाणीनें तो वेग मंद होऊन थोडी शीतलता उत्पन्न होते. असें नसतें, तर पृथ्वीवर वस्तीच झाली नसती. शिवाय, ब्राह्मणांशिवाय इतर जातीच्या भिकाऱ्यांच्या दीनवाणीनें वायूची गति वक्र होऊन भूमध्य रेषेवर काटकोन होत नाहीं आणि त्यामुळेंच प्राणवायूचा वेग मंद पडून तो एकदम थबकून राहतो. आणि याच-मुळें हिंदुधर्मशास्त्रकारांनीं ब्राह्मणांनांच भिक्षा मागण्याचा अधिकार दिलेला आहे.' त्यानें आणखी असेंहि सिद्ध केलें आहे, कीं, आमच्या शास्त्रकारांनीं तत्कालीन अज्ञात गतीचे नियम पुढें मांडून धर्माज्ञा केलेल्या आहेत. यावरून ते त्रिकालज्ञ होते, याबद्दल संशयच रहात नाहीं. अज्ञान सुधारकांनां या शास्त्राज्ञांबद्दल वहीम येतो ! वहीम येत असेल, पण जर भीक मागण्या-पासून फायदा होतो तर तो धंदा सोडून कां द्यावा ? सांगा तर मग, तुह्मी काय त्या पातकी सुधारकांच्या मोहांत सांपडून भीक मागूं लागलांत ? ब्राह्मणांला मिळणाऱ्या भिक्षेचा भाग तुह्मी कमी कमी करित आहां ! ह्या पातकाची तुह्मांला आठवणसुद्धां होत नाहीं काय? भीक मागून या सृष्टीच्या वातावरणाची धुळधाण उडवित आहां हें दृष्टी असूनहि तुह्मांला दिसेनासें झालें आहे काय ? तुमच्या हातांत हें काम गेल्यापासून त्याला इतका नीचपणा आला आहे. कीं, त्याचा दाखला मीं आतांच पाहिला आहे. तुमच्यांतलाच एक भिकारी–शास्त्रोक्त भिकारी नव्हे–केवळ वेषधारी भिकारी–यवनांकडील अन्नग्रहण करित असतो ! जोंपर्यंत भीक मागण्याचा धंदा केवळ ब्राह्मणवर्गाचे ताब्यांत होता तोंपर्यंत

हा भ्रष्टाचार कधीं नजरेसहि पडत नव्हता. भिकाऱ्यांमध्यें गुणकर्मविभागानुरूप जाती जाहल्या आहेत हें पाहून तुह्मांला आश्चर्य वाटेल; पण त्यांतच आर्य धर्माचें शहाणपण आहे. आर्यधर्माचे संस्कार मानणारे ब्राह्मण मदिरादिकांच्या सेवनासंबंधीं पाश्चात्यांच्या चालीरीतींची नव्हे तर आर्यभूत उत्पन्न झालेल्य शाक्तमार्गाची साक्ष देतील, हल्लीं जें वाईट मानलें जातें त्याची अवगणन करतील, आणि अस्सल रूढीप्रमाणें न्यायासनावर आरूढ होऊन द्रव्यदान घेणें हेंहि त्यांतील बड्याबड्या मंडळीला अन्यायाचें वाटणार नाहीं. मूढ द्वैतवाद्यांच्या खोट्या भेदभावनांत श्रीकृष्णांहून आपण जास्त शहाणे आहों असें ते धीटपणानें पुढें येऊन कधींहि ह्मणणार नाहींत. आत्मा अमर आहे, त्याला मृत्यु नाहीं–, हें ब्रह्मज्ञान केवळ भ्रामक आहे असें ठरवून खून करणारावर लोक जरी कितीहि रागावलेले असले तरी व्यवहारावर दृष्टी देऊन खुनी मनुष्याचे बरोबर ज्ञातीचे व पंक्तीचे व्यवहार ते राजरोस सुरू करतील; परंतु परजातीचें–आणि त्यांतूनहि यवनांचें अन्न ते कधींहि सेवन करणार नाहींत, आणि सेवन करणाऱ्यांशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेवणार नाहींत. आर्यांच्या संसारयात्रेचें हेंच महत्त्व आहे. केवळ तर्कशास्त्रावर मजल मारणाऱ्या पाश्चात्य बुद्धिमत्तेला याचें रहस्य समजणें शक्यच नाहीं. परंतु हे भ्रष्ट हो! तुह्मांला आर्य संस्कारांचा स्पर्शच नसल्यामुळें त्यांच्या साहचर्यानें उत्पन्न होणाऱ्या रूढीचें रहस्य तुह्मांला कसें समजणार? भोजनादि व्यवहारासंबंधीं शास्त्राचीं प्रमाणें शोधित बसणें हें निव्वळ अनार्यत्वाचें लक्षण आहे. विद्याठक नांवाचा एक आर्य ह्मणतो, कीं, 'ज्या अर्थीं लांच न घेण्यासंबंधीं शास्त्रांत प्रमाणें नाहींत त्याअर्थीं लांच घेण्याला कोणतीच हरकत नाहीं.' त्याचप्रमाणें परजातीकडील अन्न खाऊं नये अशाबद्दलहि शास्त्रांत प्रमाणें दिलेलीं नाहींत, करितां तें अन्न खाण्यालाहि हरकत नाहीं, अशा प्रकारचें शास्त्ररहस्य तुह्मां भिकाऱ्यांनां माहीत असणें शक्यच नाहीं. कर्तव्याकर्तव्याचा भेदहि तुह्मांला समजणें शक्य नाहीं. परमार्थ दृष्टीनेंहि कर्तव्याकर्तव्यांत भेदभाव बिलकूल नाहीं हेंहि तुह्मांला समजणार नाहीं. करितां शास्त्रांनीं हें भीक मागण्याचें अवघड काम कुशाग्र बुद्धीच्या ब्राह्मणांकडेच सोंपविलें आहे. कित्येक अर्धवोवडे सुधारक ह्मणतात, कीं, 'इतर कामें बाजूला ठेवून केवळ ज्ञानप्राप्ती करून घेऊन लोकांनां सद्बोध करणाऱ्या या वर्गाची जीवनयात्रा इतर व्यवहारी लोक पार पाडित आले हें ठीकच आहे; परंतु आजकालचे ब्राह्मण जर मूर्ख आणि निरक्षर आहेत तर त्यांचें पोषण इतर लोकांनीं कां ह्मणून करावें?'

आर्य व्यवस्थेचें रहस्य न समजल्यामुळें अशा दुष्ट शंका मनांत येतात. ब्राह्मणांच्या भिक्षावृत्तीपासून होणारा एक लाभ तर जडशास्त्र बुद्धीच्या आधारानें वर निर्दिष्ट केलाच आहे. आतां आध्यात्मिक दृष्टीनें हा लाभ आहे, कीं, लोक स्वतःचें द्रव्य भिक्षेच्या रूपानें ब्राह्मणांनां देण्यास शिकतात. हें शिक्षण ह्मणजे 'हें माझें, हें माझें स्वतःचें' हा जो मायापाश आहे त्याच्या नाशाचा पहिला धडाच ह्मटला तरी चालेल. याप्रमाणें ब्राह्मणांचा भिक्षेचा धंदा ह्मणजे लोकांनां ब्रह्मज्ञान शिकविण्याचाच मार्ग असला पाहिजे. असाच शास्त्रांचा हेतु असला पाहिजे. साक्षरता वा अनक्षरता ही निव्वळ निरर्थक वडबड आहे. सुधारक ह्मणतात, कीं, 'भिकारी ब्राह्मण हे मृतान्न भक्षण करून पिशाच्चवत् बनतात.' परंतु त्या सुधारकांनां हें कळत नाहीं, कीं, शास्त्रवचनांचा अर्थ असा आहे, कीं, ब्राह्मण हे आपण होऊनच स्वकृतींनीं पिशाच्चवर्गांत जातात. कारण, पिशाच्चवर्गांतील इतर लोक आपापलीं कामें करीनासे होतात. विलायतेंत भंगीसुद्धां साहेबच ! तसेंच हे ब्राह्मण पिशाच्चयोनींत गेले ह्मणजे पिशाच्चच बनतात; परंतु तेथेंहि ते भक्ष्याभक्ष्यभेद पाळतात. करितां अशा सर्व कार्यकुशल भिकारी वर्गाला आर्य जीवनयात्रेंत श्रेष्ठपणा मिळालेला आहे व त्यांचेंच साम्राज्य असल्यामुळें प्रजेंत औदार्य, विद्वत्ता, उद्योग, शौर्य इत्यादि थोर थोर गुणांचा प्रसार होत आहे. नॅशनल कांग्रेस जर भीक मागण्याचें काम ब्राह्मणांशिवाय इतरांनीं करूंच नये एवढा कायदा साध्य करून घेईल, तर सर्व अनर्थ टळतील, व सर्वतोपरी शास्त्रा प्रमाणें तयार झालेला भिकारी वर्ग जर जिकडे तिकडे नजरेस पडूं लागला तर मग पार्लमेंन्ट वगैरे संस्थांचीहि हिंदुस्थानास जरूर नाहीं. करितां हे दुष्ट हो ! शास्त्राज्ञा पाळा. वर्णाश्रमपद्धतीचा अतिक्रम करूं नका आणि देशाचें मोठें हीतच आहे असें समजून ब्राह्मणांच्या भीक मागण्याच्या मार्गांत आडवे येऊं नका."

हें लांबलचक भाषण सर्व श्रोते अगदीं तटस्थ वृत्तीनें ऐकून घेत होते. स्वस्थपणानें ऐकून घेण्यांतच मजा आहे असें जाणून कित्येकजण बाजूला सरून आपापल्या जागेवर जाऊन पडून राहिले. कित्येकांनां तर इतकी गोडी लागली, कीं, ते आपल्या आजूबाजूस भटकत असलेल्या बंधुवर्गास निमंत्रण करण्यास निघून गेले. एकजण तर तोंडाकडे पहात उभा होता तो तसाच उभा राहिला. आणि हातांत तांदूळ होते त्याचीहि आठवण विसरला ! सदावर्तीतील माणसाला-तें भाषण फारच पसंत वाटलें असावें, असें दिसलें. कारण, त्यानें फार आग्रह करून भद्रंभद्राला एक शिधा दिला. "सुधारकांप्रमाणें, बोलणें एक आणि करणें निराळेंच;

हें मला पसंत नाहीं, मीं आपल्या बोलण्याला अनुसरूनच चालणारा ब्राह्मण आहें, ह्मणून मला भिक्षा घेतलीच पाहिजे.'' असें ह्मणून भद्रंभद्रानें शिधा बांधून घेण्यास मला सांगितलें. या युद्धांत आलेलें यश सर्वत्र पसरलें. आह्मी सदावर्त सोडून बाहेर आलों; परंतु एकहि भिकारी आमच्या मागोमाग आला नाहीं. ''शेट शेट''करून ओरडण्याचेंहि त्यांनीं सर्वांनीं सोडून दिलें, आणि भीक मागण्याचा आपला अधिकार नव्हे, हें त्या सर्वांनां पटलें असें वाटलें.

याप्रमाणें जयप्राप्ती चालू ठेवण्याकरितां आह्मी दुसरें शत्रुदळ हुडकून काढण्यास निघालों. थोडे दूर गेलों नाहीं तोंच एका मारवाड्यानें आपल्या दुकानासमोरून एका गाईला हांकून लावल्याचें दृष्टीस पडलें. हें आचरण पाहून भद्रंभद्राला अतिशय राग आला. मारवाड्यावर तो एकदम चालून गेला आणि दुकानांत दुसरा एक मारवाडी बसलेला जर त्याच्या नजरेस पडला नसता तर तो त्या मारवाड्याला कदाचित् मारतासुद्धां! तरी पण हिंमत खचूं न देतां भद्रंभद्रानें मोठ्या रागानें विचारिलें ''वंद्य आणि पूजनीय अशा गोमातेला त्रास देण्यास तूं कसा तयार झालास? पवित्र गोमातेचें रक्षण करण्याचें सोडून तूं तिचा धिःकार कोणत्या शास्त्राधारें केलास? कोणत्या शास्त्रवचनांच्या जोरावर तूं तिचा अपमान केलास?''

मारवाड्याची चांगलीशी समजूत पडली नाहीं; परंतु गाईचें नांव ऐकून आणि भद्रंभद्रानें तिच्याकडे पाहिलें हें पाहून तो ह्मणाला ''जा, जा, दुकानांतले चणे खाऊन जाते, आणि मुलांनां शिंगे मारते, तिला हांकलून लाविली त्यांत तुझें काय गेलें?''

भद्रंभद्र ह्मणाला ''दुष्टा! आपली एवढी सबल पुण्याई कोठें आहे, कीं, न बोलावितां गाईनें आपल्या दाराशीं यावें आणि आपलें धान्य खावें? किंवा आपली इच्छा होण्याचे पूर्वींच आपल्याला शीर्षस्पर्श करावा? गोमातेची शास्त्रोक्त पवित्रता दुसऱ्यानें तुला सांगावी लागते काय? मनुष्याची हिंसा करणारापेक्षां गाईची हिंसा करणारास फार जबरदस्त दंड केला पाहिजे असें आर्यांचें मत असल्याबद्दल तुला माहीत नाहीं काय? गाईला पीडा होत आहे हें पाहून ज्यांचें शरीर शिल्लक राहतें त्या अधम शरीराची गाईच्या विष्टेइतकीहि किंमत नसते, हें तुझ्या ह्या दुष्ट कानांनीं कधीं ऐकिलेंसुद्धां नाहीं काय? गोमातेच्या शिंगांनीं मृत्यु येणें हा काशीयात्रेहून फार मोठा पुरुषार्थ आहे! गाय जर तुझ्या दुकानांतलें धान्य वगैरे खाऊन पुष्ट झाली तर भरतखंडाची अमर्याद समृद्धी होईल याचें तुला

भानसुद्धां नाहीं काय ? एका गाईच्या एका दिवसाच्या दुधानें दोन माणसांचें पोट भरतें. अर्थात्, एक वर्षभर ७२० माणसांचें पोषण होतें; आणि याच हिशोबानें सर्व भरत खंडांतील तीसकोट प्रजेचें पोषण चारपांचशें गाईंनीं होऊं शकेल. इतक्या गाईंचें रक्षण होईल, तर मनुष्यजातीला दुसऱ्या कशाचीच जरूर पडणार नाहीं. कारण, सर्वांची मेहनत एका पोटासाठींच ! मग शेतकीची पिडाच नको ! शेतें, रानें, वगैरे सर्व जमीन घरेंदारें बांधण्याच्या कामास मोकळी राहील. पाऊस न पडल्यामुळें कधीं दुष्काळाची भीति नाहीं. देशांतील सर्व संपत्ती ब्राह्मणभोजनादि सत्कार्यांस उपयोगी पडेल. सरकारचाहि त्यापासून फायदाच आहे. कारण, लोक मग सरकाराला वाटेल तितका कर देऊं शकतील. याकरितांच लोकांनीं पार्लमेंट, कांग्रेस वगैरेबद्दलचा नाद सोडून देऊन गोरक्षणांतच सर्व हित संघटण झालेलें आहे हें सर्वांनां समजून सांगितलें पाहिजे. कांहींचें ह्मणणें आहे, कीं, आह्मी ह्मशीचें दूध पिऊनच धष्टपुष्ट होऊं; परंतु ही गोष्ट अनुभवाचे अगदीं विरुद्ध आहे.कारण,घोडेसुद्धां गाईचें दूध पिऊन धष्टपुष्ट झाल्याचें पाहण्यांत आहे.”

हें चटकदार भाषण ऐकण्याच्या इच्छेनें बरींच माणसें जमा होऊं लागलीं आणि सर्वांची एकाग्रता पाहून भद्रंभद्राला अधिकच स्फुरण चढलें. दुकानासमोर गर्दी झाल्यामुळें गिऱ्हाईक परतून जाईल या भीतीनें जमलेल्या लोकांनां मारवाडी शिव्या देऊं लागला. भद्रंभद्र आणि मारवाडी ओरडून बोलत असल्यामुळें जसें काय शास्त्रीमंडळाचा हा वादविवाद अगदीं भरांत आला आहे, असें वाटत होतें ! गाय तर भद्रंभद्राचें भाषण चालू असतांच निघून गेली होती. प्रत्यक्ष दर्शनानें दया उत्पन्न होऊन आपल्या भाषणाचीहि छाप चांगली पडावी, ह्मणून भद्रंभद्रानें रस्त्यानें जाणाऱ्या एका खटारेवाल्यास आपला खटारा उभा करण्यास सांगितलें आणि त्याच्या बैलाकडे बोट दाखवून मारवाड्यास तो ह्मणाला “नराधमा ! प्रमाणबळ तुझ्याजवळ बिलकूल नसल्यामुळें तूं तर विव्हळ झालासच आहेस; परंतु तुझ्यांत अद्याप दया उत्पन्न झालेली दिसत नाहीं. करितां, पवित्र गोमातेचे हे चिरंजीव—पवित्र पुत्र बलिवर्दन तुझें समाधान करण्यास योग्य आहेत ! दिलीप राजानें कामधेनूचा शाप शमविण्याकरितां तिच्या कन्येची सेवा केली होती, त्याप्रमाणेंच तूं जो गोमातेचा फार भयंकर अवमान केला आहेस त्याचा उपशम करण्याकरितां या गोमातेच्या चिरंजीवांची तुला सेवा केली पाहिजे. तूं असें नको समजूं, कीं,हा बैल भारवाहकाचें काम करित आहे ह्मणून तो तुच्छ

आहे. या गाडींत जी माती भरलेली आहे ती कोठें तरी भूमीवर पसरली जाईल, त्या जमिनीवरून चालणाराच्या पायांनां ती नरम लागेल, आणि त्याचें मन प्रसन्न होऊन तो विचारांत निमग्न होईल. अशा रीतीनें एकवार विचार करून व तसाच पुन्हा विचार करून त्याला मग वारंवार विचार करण्याची संवय लागेल. त्याला विचार करितांना पाहून पाहणाऱ्या इतर लोकांनांहि विचार करण्याची संवय होईल. आणि याप्रमाणें थोड्याच वेळांत सर्व भरतखंडाची शक्ति वाढीस लागेल.शिवाय,या गाडींतील माती ज्या ठिकाणीं पसरून टाकलेली असेल तिच्यावरून जाणारे घोडे, बैल आदि करून सर्व जनावरांचे पायांत दगड बोंचण्याचे कमी होऊन त्यांच्या पायांनां जखमाहि कमी होतील व त्यामुळें त्यांच्या धन्यावरचा या जनावरांसंबंधीं खर्चाचा बोजा कमी होईल. त्यामुळें पशूंचें पालन करणारांची संख्या वृद्धिंगत होईल आणि छकडे, गाड्या जास्त उपयोगांत येतील.तसेंच त्यामुळें गोवऱ्यांची वाढ होऊन जळाऊ लांकडांचा खर्च कमी होईल. झाडांची लागवड जास्त होईल, व लागवड जास्त झाली ह्मणजे सर्व देशाची हवा सुधारेल. अशा प्रकारचे अनेक लाभ या बैलाच्या परिश्रमानें निष्पन्न होतील, आणि त्या सर्व लाभांबद्दल या बैलोबांची जननी जी गोमाता तिचे सर्व भरत भूमीवर उपकार होतील. हें प्रमाण सिद्धच आहे. अरे! ज्ञानीजनांच्या दृष्टीनें अनादिकालापासूनच सिद्ध जाहलेलें आहे, कीं, बैल हा पूज्य आहे, सेव्य आहे, उपास्य आहे; करितां ये पुढें आणि एकदम त्याची पूजा करण्यास आरंभ कर."

क्रोध आणि आश्चर्य यांनीं चकीत होऊन गेलेल्या मारवाड्याला ओढित ओढित बैलाकडे घेऊन जाण्याचा भद्रंभद्राचा विचार होता; पण अंगाला हात न लावूं देण्याचा मारवाड्याचा बराच दुराग्रह दिसला आणि तो दुराग्रह तडीस नेण्या-करितां आपल्या अंगच्या शक्तीचाहि उपयोग करण्याची त्याची तयारी दिसली. तेव्हां निव्वळ वाग्बाणांनींच त्याची ताकद तपासण्याची भद्रंभद्राची इच्छा दिसली नाहीं. गाडीवालाहि उभा राहण्यास तयार नव्हता, आणि मारवाडी तर आतां पोलीसला बोलावून आणतों ह्मणून दम भरूं लागला. तेव्हां आह्मींहि तेथें उभें राहण्याचा आमचा विचार रहित केला. लोक तर आणखी भाषण ऐकण्यास तयार होते, ह्मणून खटाऱ्यावर चढून खटारा चालत असतांच मागून येणाऱ्या श्रोतृसमुदायास व्याख्यान देत देत प्रयाण करावें, असें भद्रंभद्राचे मनांत होतें, आणि त्याकरितां गाडीवाल्यालाहि त्यानें थोडे पैसे देऊं केले, पण त्यानें तिकडे लक्ष्य न देतां खटारा हांकला मारवाडी तर एक शब्दहि बोलूं शकला नाहीं.

आणि जो गाईला मारित होता त्यालाच बैलाकडे ओढित नेण्याची तयारी आह्मीं केली होती तरीसुद्धां बैलाला नुसता स्पर्श करण्यालासुद्धां तो आला नाहीं. त्यावरून या ठिकाणींसुद्धां आपला पूर्ण विजय झाला असें समजून आह्मी जरा विश्रांति घेण्यासाठीं बिऱ्हाडाच्या रस्त्याकडे वळलों.

## प्रकरण आठवें.

## हरजीवन आणि शिवभक्त.

रस्यावर एक रेकलेवाला स्वतःच्या बसण्याचे फळीवर उभा राहून "दोन दोन पैसे–भुलेश्वर!" ह्मणून मोठमोठ्यानें पुकारित होता. तपास करितां समजलें, कीं, दोन दोन पैसे घेऊन उतारूंनां भुलेश्वराजवळ घेऊन जाण्यास रेकलेवाला तयार होता. आणि असे चार असामी मिळत तोंपर्यंत तो ओरडत राहणार. भाडें फारच थोडें आहे असें पाहून आह्मीं पण आंत बसून जाण्याचा विचार ठरविला. एका बाजूच्या बैलाच्या बाजूला असलेल्या बांबूच्या काठीवर पाय ठेवून वर चढण्याचे विचारांत भद्रंभद्र होता; परंतु त्याच्या पवित्र शरीरास स्पर्श करण्याची इच्छा एकाएकींच मनांत उद्भवल्यामुळें बैलानें मागचा पाय वर करून भद्रंभद्राचे ढुंगणाला चांगला जोरानें स्पर्श केला. भद्रंभद्रानेंहि तात्काल बैलाचे पायां जवळच लोटांगण घालून चांगला साष्टांग प्रणिपात केला. रेकलेवाला ह्मणाला "बैल मारकुटा आहे हें माहीत नाहीं काय? प्रत्येक वेळेस कितीकांचे पुढें घसा फोड करणार!"

रेकल्यांत बसलेला गृहस्थ रेकलेवाल्यास ह्मणाला "अरे, त्याला बरेंच लागलेंसें वाटतें. दुसरें गिऱ्हाईक मिळालें तर पहा. खोटी केवढा वेळ करणार?"

मीं भद्रंभद्राला हात देऊन वर उठवित होतों तों तो रेकल्यांत बसलेला गृहस्थ मला ह्मणाला "बरीच इजा झाली असली तर परभाराच घेऊन जा ना! इस्पितळांत नेऊन तरी काय होणार?"

आवाज ओळखीचा वाटला. मीं त्याच्याकडे पाहिलें, तों, त्यानें मला ओळखिलें व मींहि त्याला ओळखिलें. मीं त्याला हांक मारून विचारिलें "कोण हरजीवन?"

भद्रंभद्र हें ऐकून ताडकन् उभा राहिला आणि ह्मणाला "कोण हरजीवन?"

हरजीवन आतां खालीं उतरला आणि त्यानें भद्रंभद्राला रेकल्यांत बसविण्यास मदत केली. नंतर रेकलेवाल्याला तो धमकावून ह्मणाला "आणखी किती वेळ खोटी करणार? चल, हांक रेकला. पुढें पहा वाटेंत आणखी कोणी मिळाला तर."

रेकला चालू झाला तेव्हां हरजीवन ह्मणाला "आपल्याला अपघातानें बरीच इजा झाली, त्याबद्दल मला फार वाईट वाटतें."

भद्रंभद्र ह्मणाला "असें कसें ह्मणतां? एवढ्यावरच निभावलें, ही मोठी संतोषाची गोष्ट आहे."

हरजीवन ह्मणाला " ही मोठी चूक आहे. हा अपघात होणारच असल्यामुळें नशीबानें आपल्याला खेंचून ओढित येथवर आणिलें ! आपल्यापासून मला पैसे मिळावयाचा योगायोग, ह्मणून तर आपणां दोघांनां नशीबानें ओढित ओढित त्या दिवशीं आगगाडींत आणिलें. आणि मजकडून वेळेवर पैसे परत न होण्याचा योगायोग असल्यामुळें मला माझ्या नशीबानें खेंचून वडोद्यास नेलें. माणसानें करून कांहीं होत नाहीं. सर्व कांहीं नशिबीं असेल तसेंच होतें. परवांच माझ्या एका स्नेह्याला त्याच्या नशिबानें खेंचून कैदेंत नेलें. त्याच्या आधीं त्याला जुगारखान्यांत खेंचून नेलें होतें ! नशिबापुढें सर्व दुनिया पंगू आहे. पाश्चात्यलोकांनां नशिबाचा जोर माहीत नाहीं, ह्मणून अज्ञानामुळें त्यांनां फौजदारी कायदा तयार करावा लागला. नशिबीं लिहिलें असल्यामुळेंच आपल्यालाहि अपघात घडला. याबद्दल मला खरोखर फार वाईट वाटतें. बरें— माझी ती पेटी आपल्यापाशीं आहे ना ? तींत माझे बरेच मौल्यवान कपडे ठेविलेले आहेत. ते कदाचित्त बिघडतील, तेव्हां त्यांवर जरा नजर असूं द्या. "

भद्रंभद्र ह्मणाला "अरे ! आगगाडींतच बसलेला एकजण ह्मणाला, कीं, 'ती पेटी आपली आहे. हरजीवन कोण? जास्त बडबड करशील तर शिपायाला हांक मारतों.' तेव्हां आह्मीं ती पेटी त्याच्याचजवळ राहूं दिली. आमचें कांहीं चाललें नाहीं."

हरजीवन अगदीं खिन्न होऊन ह्मणाला "अरे ! तुमच्या त्या आठ रुपयांकरितां माझा दीडशें रुपयांचा ऐवज गेला ! फिकीर नाहीं. झालें तें झालें ! तुमचे आठ रुपये मीं तुह्मांला इतक्यांतच पोंचते करीन. मला जरा थांबावें लागलें त्यामुळें गाडी सुटण्यापूर्वी पेटी घेऊन जाण्याला वेळच मिळाला नाहीं. नशीब थोर ह्मणावयाचें, दुसरें काय ? "

भद्रंभद्र अचंब्यांत पडला. तो ह्मणाला "रुपये परत देण्याचें कांहीं कारण नाहीं. मींच आपल्या दीडशें रुपयांच्या नुकसानीला कारण झालों आहें. मींच वास्तवीक आपले रुपये भरून दिले पाहिजेत ! आणि तसें मला केलेंच पाहिजे."

"नाहीं—नाहीं, असें कधींच होणार नाहीं ! त्यांत आपला काय दोष ? बरें, आपण जातां आहां कोठें ?"

"आह्मांला आतां उतरलेंच पाहिजे. कारण, जेवणाची वेळ झाली."

"चला तर मग, आमचे येथेंच चला ना ? मला तरी हा अलभ्य लाभच ह्मणावयाचा."

इतक्यांत रेकलेवाल्याला चौथा उतारू मिळाला. ज्यानें आह्मांला भिकाऱ्यांची छावणी दाखविली, तोच तो गृहस्थ होता. हरजीवन ह्मणाला "हे सद्‌गृहस्थ आमचे स्नेही आहेत. आपल्याला मीं जी चिट्ठी दिली होती ती यांनांच. अनायासेंच यांची गांठ पडली. हे फार श्रीमंत आहेत. परंतु आपल्याकरितां ते या रेकल्यांतून येत आहेत."

भद्रंभद्र ह्मणाला "अनौध्यत्व हेंच तर समृद्धीचें विभूषण आहे! यांचें नांव?"

हरजीवन जरा काचरला व आपल्या मित्राकडे पाहूं लागला. तेव्हां त्यानेंच उत्तर दिलें "ज्ञानी आहेत त्यांनीं नामधारण करूंच नये. नामरूप हीं नाशवंत आहेत. हरजीवननें आपल्या त्या श्यामवस्त्रधारी मित्राबद्दल आपल्याला सांगितलेंच असेल. हे लोक माझें नांव ऐकूनच माझ्या दर्शनाबद्दल इतके उत्सुक होतात, कीं, मला त्यामुळें नांवाचा त्याग करावा लागला! काय करणार? माया-जाळांत गुरफटून गेलेल्या जनसमूहांत राहणें भाग पडतें! शिवाची भक्ति करितों, ह्मणून ह्मणा पाहिजे तर मला शिवभक्त."

भुलेश्वराजवळ येतांच पहिल्या गल्लींत वळून एका लांबच्या लांब चाळीच्या समोर आह्मी उतरलों. शिवभक्त वर जाऊन कांहीं व्यवस्था करून आला. नंतर आह्मीं वर गेलों. तेथें हरजीवनची खोली होती. शेजारच्याच एका खोलींत दहापंधरा माणसें जेवावयास बसलीं होतीं. हरजीवन ह्मणाला "हे सर्व माझे आतिथि आहेत. काय करणार? नांव ऐकून लोक येतात, त्यांनां नाहीं तरी कसें ह्मणावें?"

हरजीवनच्या खोलींत बैठक किंवा दुसरें कोणतेंहि सामान नव्हतें. बाहेरून दोन खाटलीं आणून त्यानें आह्मांला बसावयास दिलीं. जेवणाला जरा अवकाश होता. जेवून नंतर शिवभक्ताच्या बंगल्यावर शिवाचें देवालय पहावयास जाण्याचें ठरलें; परंतु पहिल्या वेळीं तरी निदान रिक्तहस्तानें दर्शनास जाऊं नये, ह्मणून भद्रंभद्रानें मला बिऱ्हाडांतून पांच रुपये आणावयास पाठविलें. हरजीवननें फारच आग्रह केल्यामुळें आमचें सर्वच सामान तेथें आणण्याचें ठरलें. मी परत आलों, आणि नंतर सर्वांनीं मिष्टान्न भोजन केलें. हरजीवननें फार खर्च केलेला दिसला. बहुतेक पदार्थांनां जायफळाचा घमघमाट सुटला होता. जेवण सुरू होत आहे तोंच एकजण येऊन ह्मणाला "आमचे पैसे आधीं चुकते करा!"

हरजीवन भद्रंभद्राकडे बोट दाखवून ह्मणाला "यांनां ओळखित नाहींस काय? हे फार थोर गृहस्थ आहेत. फिकिर करण्याचें बिलकुल कारण नाहीं!"

दार बंद करून जेवतांजेवतां हरजीवन सांगू लागला " मुंबईस आलों ह्मणजे मी रोज शंभर रुपये दक्षणा वांटतों. आपण आलेले पाहून आणि आपल्यावर माझी विशेष श्रद्धा आहे हें पाहून माझे अतिथि घावरून गेले, कीं, आजचे शंभर रुपये मीं आपल्याला एकट्यालाच देईन ! त्यामुळें ते इतके अधीर झाले ! प्रथम प्रथम तर मीं रुपयांच्या ऐवजीं कांहीं वस्तु दान करित असें. एके दिवशीं तर शंभर रुपयांचे घासलेटचे रिकामे डबेच दान केले. परंतु बोहोरी लोकांनीं ओरड केली, कीं, असे फुकटचे डबे घाल तर आमची सर्व कमाई बुडेल. दुसऱ्या दिवशीं बाटलीचीं बुचेंच दिलीं, तेव्हां ब्राह्मण फार संतुष्ट होऊन मोठ्या आनंदानें तीं घेऊन गेले. पण मग बाजारांत बुचेंच मिळतनाशीं झालीं. "

भद्रंभद्र ह्मणाला "बुचें घेऊन ब्राह्मण त्यांचें काय करणार? "

शिवभक्त ह्मणाला " बेवडा नांवाचा एक शिवाचा गण आहे. तो हजर नसला तर योग्य रीतीनें शिवाचें पूजन होतच नाहीं.परंतु तो असा आहे, कीं, त्याच्या तोंडांत बूच नसलें तर तो एकदम उडी मारतो! भांग पिण्याबद्दल आपलें काय मत आहे? "

भद्रंभद्राला बेवडा, बूच, आणि भांग, यांचा कांहींच संबंध समजला नाहीं, परंतु भांग शब्द कानीं पडतांच मोठ्या उत्साहयुक्त वाणीनें तो ह्मणाला "भांगेसारखी दिव्य वस्तूच जगतांत नाहीं ! भांग सेवन करणें हें सर्व आर्यांचें कर्तव्य आहे. मद्यपान निषेधक सुधारक लोक पाश्चात्यलोकांचें अनुकरण करून भांग गांजा वगैरे पदार्थांचासुद्धां निषेध करतात; पण ते मूर्ख असें समजत नाहींत, कीं, या रीतीनें साहेबलोक आपलें आर्यत्व बुचाडून घेण्याचे विचारांत आहेत. सर्व अमली पदार्थांचा निषेध करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. फक्त परकी देशांत बनणाऱ्या कैफी वस्तूंवर बहिष्कार'घातला पाहिजे. कारण, त्यांत वाटेल त्यांचे हातचें पाणी असणार. नाहीं तर आपले ऋषी सोमरस कां पीत होते ? आपले साधुसंत गांजा कां ओढतात ? घोंटा कां पितात ? शाक्तपंथी मदिरा पिऊन तल्लीन कां होतात ? ब्राह्मणाचे हातचें पाणी वापरलेलें असेल, परदेशांत बनलेलें नसेल, निव्वळ स्वदेशी असेल, आणि त्याला परकीभाषेंतील नांव दिलेलें नसेल, तर मग कोणत्याहि अमली पदार्थांच्या सेवनाला हरकत नाहीं. कोणता आर्य सांगू शकेल, कीं, भांग ही आपल्या प्रजेपैकीं एकाला तरी ग्राह्य नाहीं ? ही विद्या आपण पाश्चात्यलोकांपासून शिकलों नाहीं, ही मोठी अभिमानाची व आनंदाची गोष्ट आहे. शाक्तपंथीसुद्धां हेंच सांगतात, कीं, आह्मीं तर पाश्चात्य लोक या

देशांत येण्याचे आधींपासूनच मदिरापान करित आहों.आमचेपाशीं याला श्लोकबद्ध प्रमाणें आहेत. तर मग आह्मांला अनार्यत्वाचें अगर सुधारकपणाचें लांछन कोठून लागणार? आमच्यांतून जे बाहेर पडले त्यांतलेच कांहीं युरोपियनांचे नादानें दारू पिऊं लागले; परंतु आह्मीं आपला पुरातन रूढीमार्ग सोडला नाहीं."

शिवभक्त ह्मणाला "आपण ह्मणतां तें सत्य आहे. मीं तरी त्याकरितांच भांग तयार केली आहे. चाखून तर पहा! वांटलेली पण छानदार आहे."

सर्वांनीं एक एक वाडगा झोंकल्यानंतर शिवभक्त ह्मणला "नास्तिक सुधारकांनां शिवाचें दर्शन कोठून होणार? त्यांनां काय माहीत, कीं, भांग ही प्रत्यक्ष शिवालाच फार प्रिय आहे! मला प्रत्यक्ष महादेवानें सांगितलें, कीं:--

**"भंग गंग दो बेहेन है रेहेती शिवके संग ।**
**लड्डु खानी भंग है तरन तारिनी गंग ॥ १ ॥**

आणखी एक एक वाडगा झोंकून मोठया जोरानें एका खाटल्यावरून दुसऱ्या खाटल्यावर उडी मारून भद्रंभद्र ह्मणाला:--

**भंग ऐशी पीजीये, जैसी रंगन रंग ।**
**घरके जाने मरगये, अपने मन आनंद ! ॥ १ ॥**

हरजीवन उभा राहून ह्मणाला "वाहवा! आनंद! आनंद!"

आह्मींहि सर्वांनीं "आनंद आनंद" ह्मणून ओरडत आणखी दोन दोन वाडगे झोंकले!

भांगेच्या तपेल्यांत वाडगा बुडवून तो बाहेर काढतांना खालीं पाहून भद्रंभद्र मला एक बोट दाखवून ह्मणाला "असें नको समजूं, कीं, तुला एकटयालाच जादू येत आहे! मनांत आणलें तर तुला या छपराच्या आड्याला लटकावून टाकीन!"

हरजीवन माझ्यातर्फेनें बोलला "झाडू! सुधारकांनां तर झाडूच! ते ह्मणतात शपत घ्या. कोणता लेकाचा शपत घेणार? रविवारीं तर देवीच्या नांवानें प्राशन केलीच पाहिजे! मात्र शपत घ्यायचीच तर भांगेचा उच्चार करून शपत घेतली तरी चालेल."

मला तर थोडथोडी झोंप येऊं लागली. इतक्यांत हरजीवननें अशी एक चापट मारली आणि कांहीं हुंगावयास दिलें,कीं,त्याच्या वासानें फार आनंद होऊन मी एकदम झोंपीं गेलों. नंतर काय झालें, मला कांहींच माहीत नाहीं. झोंपेंत मला असें स्वप्न पडलें,कीं,माझ्या सर्व शरीराला एका मोठया सर्पानें वेढून टाकिलें आहे, पण तेंसुद्धां बरोबर सगळें आठवत नाहीं."

कित्येक कलाकांनीं जागा होऊन उठूं लागलों, पण मला वसतांच येईना. खाटल्यावर पडल्यापडल्याच डोळे उघडून पाहण्याचा प्रयत्न करूं लागलों तों नजरेस पडलें,कीं,आपले हातपाय आणि सर्व शरीर खाटल्याला जखडून वांधलेलें आहे. सोडण्याचा प्रयत्न करूं लागलों, पण सुटेना. वाजूला पाहिलें, तों, शेजारच्या खाटल्यावर भद्रंभद्र त्याच स्थितींत होता. पण तो स्वस्थ घोरत पडला होता. खोलीचें दार वंद होतें. हरजीवन आणि शिवभक्त निघूंन गेलेले होते. मीं मोठमोठ्यानें ओरडून त्यांनां हांका मारूं लागलों पण वाहेर कोणीच नसल्यामुळें ओ कोण देणार? शेवटीं भद्रंभद्राला हांका मारल्या, पण तोहि जागा होईना!"

या लाचार स्थितींतून कशी सुटका होणार असे विचार मनांत घेऊन मी अगदीं घावरून गेलों. माझ्यापेक्षां भद्रंभद्राची स्थिति मला जास्त वरी वाटली. कारण, त्याला यांतलें कांहींच माहीत नसून तो स्वस्थ घोरत पडला होता. विचार करितां मला आठवण झाली, कीं, भांगेच्या अमलानें आणि हरजीवननें कांहीं हुंगावयास दिलें त्यामुळें मला निद्रेनें ग्रासलें. तेव्हां स्वप्नांत मला सर्पानें वेढलें असें जे वाटत होतें, तें मला दोरीनें बांधित होते त्यावेळचा तो भास! भद्रंभद्रालासुद्धां माझ्याचसारखें वाटलें असेल. आमचें सामानसुमान कोठें दिसत नव्हतें. तेव्हां तें घेऊन आह्मांला बांधून ठेवून हरजीवन आणि शिवभक्त पळून गेले असावे, असा माझा तर्क झाला.

असा विचार चालला आहे, तों कोणीं वाहेरून कडी काढून दार उघडलें व दोघे गृहस्थ आंत आले. आमची ही दशा पाहून प्रथम त्यांनां तर आश्चर्य वाटलें आणि ते एकमेकांकडे पाहून हंसले. नंतर मला एकानें दरडावून विचारिलें "लुच्चे वदमाष! तुमच्यावरोवर मगन आणि मोती होते ते कोणीकडे गेले?"

मी ह्मणालों "मगन आणि मोती कोण? ते आमच्या ओळखीचेसुद्धां नाहींत! आह्मी वाहेरगांवचे प्रवासी आहों. आधीं आमचे हे वंद सोडा."

"आतां वंद सोडा काय? अरे कितीक तुमचे वेत असतील! मगन आणि मोतीला ओळखितसुद्धां नाहीं अं? खाणावळीचे पैसे चुकवायची ही बतावणी आहे वाटतें?"

मीं मोठ्या दीन वाणीनें ह्मणालों "आह्मी कोणी भामटे नाहीं.आह्मांला कोणीं-तरी येथें बांधून ठेविलें.आमच्यावरोवर होते ते तर हरजीवन आणि शिवभक्त—"

"लुच्चांनीं नांवें वदललीं असतील. मला खालीं येऊन सांगून गेले, कीं,आमचें कांहीं जडजवाहीर खोलींत आहे, करितां आह्मी वाहेरून परत येईपर्यंत खोलीला जरा कुलूप घालून ठेवा."

मी फारच गयावया करूं लागलों तेव्हां मला त्यांनीं सोडून मोकळें केलें. मी भद्रंभद्राचे बंद सोडूं लागलों तों तोहि जागा झाला.त्याची अजून भांगेची धुंदी उतरली नव्हती. डोळे लाल झालेले होते. जेमतेम बसला राहिला, आणि एकदम मोठया जोरानें सांगू लागला "चांडाळानों! मला स्पर्श कराल तर तुमचा शिरच्छेद करीन! मी साक्षात् शंकर आहें, ब्रह्म आहें ! मला विष्णुपद प्राप्त झालें आहे."

मी त्याच्यासमोर वसून बंद सोडित होतों तें पाहून तो ह्मणाला "हा कोण! हा माझ्या नाभींतून उत्पन्न झालेल्या कमलांतून निघालेला ब्रह्मा काय? प्रलयकाळ होऊन गेला–हे दैत्य कशाकरितां पाताळांतून आले–माझें चक्र कोठें गेलें –खरेंच–मी तर तें मघांशींच उगाळून प्यालों !"

असें बोलत तो त्या खाणावळवाल्यांनां मारण्याकरितां जात होता; परंतु मीं त्याला धरून ठेविलें. कारण, त्याच्यावर बरीच झोड पडली असती, यांत संशयच नाहीं. खाणावळवाल्यांनां भांगेचा अंमल आहे असें खुणांनीं सुचवून मीं शांत केलें. आह्मांला त्यांनीं सोडलें तर खरें, पण सांगितलें, कीं, आजचे आणि मगन आणि मोतीचे मागचे पैसे चुकविल्याशिवाय तुह्मांला येथून जायला मिळणार नाहीं !"

"त्यांनां आधीं शुद्धीवर येऊंदेत" असें ह्मणून ते दोघेहि बाहेर निघून गेले.

भद्रंभद्र लागलाच पुन्हा झोंपीं गेला; परंतु पुन्हा शुद्धीवर येऊन जागा झाला तेव्हां मीं त्याला हरजीवन आणि शिवभक्त यांनीं केलेल्या कृतीची सर्व हकीगत सांगितली. पण भद्रंभद्र ह्मणाला "ते तशांतले माणूस नाहींत ! मग काय असेल तें शंकर जाणे! पण मला अशी शंका आहे, कीं, कोणींतरी इंद्रजाल पसरून आपल्यावर मंत्रसामर्थ्यांचा उपयोग केलेला दिसतो. जादूचे प्रयोग कोणींतरी सुरू केलेल्याची पण मला आठवण आहे. आह्मी कांहीं सुधारक नाहीं! आह्मांला कांहीं जादूबद्दल पूर्ण खुलासा करितां येणार नाहीं, पण जरा जास्त चौकशी केली पाहिजे खरी."

आमच्यापाशीं एक पै देखील उरली नव्हती. तेव्हां खाणावळवाल्याचे पैसे कसे चुकवावे, या विचारांत मी पडलों. आह्मीं खाणावळवाल्याजवळ गेलों. भद्रंभद्रानें त्याला सांगितलें, कीं, "आह्मी तर हरजीवनच्यावरोबर त्याचे पाहुणे ह्मणून आलेले होतों. शेजारच्याच खोलींत त्याचे इतके पाहुणे होते त्यांनां सोडून तुह्मी आह्मांलाच कां पकडतां?"

खाणावळवाला ह्मणाला "अरे लुच्चांनों! पाहुणे कोण होते? ते तर आमच्या खाणावळींत रोजचे जेवणारे लोक होते. जेवतांना तुमच्या तोंडावर पैशांबद्दल रुजवात झाली आहे. आतां कांहींहि गडबड चालणार नाहीं. तुह्मी पण असले मख्ख, कीं, तुह्मांला जातांना जखडून बांधून ठेवून गेले त्याची तुह्मांला शुद्धसुद्धां नाहीं कशी? पण आह्मांला काय त्याचें? तुमचा तसाच कांहीं बेत असेल! पैसे द्यायचे नसतील तर चला पोलिसाकडे."

बोलाचाली सुरू झाल्यामुळें रस्त्यावरून जाणारेयेणारे लोक उभे राहिले. पोलिसचा शिपाई पण आलेला होताच: इतक्यांत एका गाडींत वसून प्रसन्नमनशंकर आणि रामशंकर जात होते. आह्मांला पाहून रामशंकरनें गाडी उभी केली. सर्व हकीगत समजून घेऊन रामशंकरनें प्रसन्नमनशंकरचे कानांत कांहीं सांगितलें आणि त्यानें बाटवा काढून खाणावळवाल्याची आणि पोलिसची समजूत केली. आणि आह्मांला गाडींत बसवून आपल्या घरीं नेलें.

## प्रकरण नववें.

### प्रसन्नमनशंकर.

प्रसन्नमनशंकराला भद्रंभद्राबद्दल पूर्वीच सर्व हकीगत माहीत जाहलेली असावी, असें दिसतें. घरीं जाऊन आज घडलेल्या प्रकाराची सर्व हकीगत संपल्यानंतर तो भद्रंभद्राला ह्मणाला "आपलें आदरातिथ्य करण्याच्या हेतूनें आपल्या गृहीं मी शिवशंकरद्वारा आपणांस अन्वेषण करविलें होतें. आपणाकरितां अश्वद्वय सहित काष्टचतुश्चक्रकाय सगवाक्ष सपाटाच्छादनसमेत रथ प्रेषित केला होता; परंतु आपण संमिलित झालां नाहीं. आपलें चारित्र्य श्रवण करून मीं सानंदाश्चर्यभरित झालों आहें.आपलें मोहमयींत वास्तव्य असेपर्यंत गृह्यता मम आतिथ्यम्! एवंच, मला आपला समागमलाभ अधिगत होईल. मला आपल्या साहाय्याची व सान्निध्याची आवश्यकता आहे. सुधारक तर माझे शत्रु आहेत, व ते पंडित बनून मला दुर्विदग्ध ठरविण्याच्या खटपटींत आहेत. परंतु मीं पडलों सौराष्ट्रवासी ! मला माझ्या शत्रूंजवळसुद्धां मधुर वचनांची योजना करावी लागते. त्यांच्या तोंडावर त्यांची स्तुतीच करावी लागते. परंतु आपल्यासारख्यांच्या द्वारें त्यांच्यावर निंदावर्षण करण्यास हरकत नाहीं. यासाठीं वादविवादांत अगर लेखनशक्तींत माझा कधींच पराजय होऊं नये हें जरी अवश्य आहे, तरी मी त्या भानगडींतच पडत नाहीं. आपणास मी सर्वतोपरी संतुष्ट करीन. मीं स्वतः पुस्तक तर लिहून ठेविलेंच आहे, परंतु माझ्यासमक्ष पवित्र पुरुषाच्या पवित्र कृतीवर दुष्ट सुधारकांच्या अपवित्र टीकेचा स्पर्शसुद्धां होतां कामा नये. ह्मणून आपणासारख्या कोणा विद्वान पुरुषाच्या नांवानें तें प्रसिद्ध करण्याचा विचार आहे. नाहीं तर माझ्या इतर पुस्तक प्रसिद्धि सादृश्याप्रमाणें हेंहि पुस्तक एखाद्या कल्पित नांवानें प्रसिद्ध केलें असतें. आपण 'विद्या ढग' नांवाच्या ग्रन्थकाराचें पुस्तक वाचलेंच असाल. 'प्रौढ बोध' 'सुलभ कीर्ति मार्ग' वगैरे सर्व अस्मादिकांच्याच कृति आहेत !"

भद्रंभद्र आश्चर्यानें अगदीं चकित होऊन ह्मणाला "तर मग आपल्या पुस्तकांद्वारें मी आपल्याला उत्तमच ओळखतों! मीं आपल्या या सर्व ग्रंथांचा चांगलाच अभ्यास केलेला आहे. मी तर आपल्या ग्रंथांतील वचनांचा आपल्या भाषणांतून वारंवार उल्लेख करित असतों; परंतु माझ्या ऐकण्यांत असें आहे, कीं, पुस्तकावर 'विद्या ढग' नांव नसून 'विद्या ठग' असें नांव आहे, आणि ते आपणच असें मला आतांपर्यंत मुळींच माहीत नव्हतें. कदाचित् विनयवृत्तीनें या प्रकारचें

निरभिमानदर्शक नांव आपण धारण केलें असावें. आतां मात्र आपलें खरें उपनांव मला समजलें."

प्रसन्नमनशंकर ह्मणाला "मुद्रालयांतील अक्षर आसनें व्यापृत करणाऱ्या पुरुषांनीं दुष्ट सुधारकांच्या नादीं लागून 'ढ' काराच्या स्थानीं 'ठ' काराची योजना केली असावी, ह्मणून मीं 'ठक' शब्दाची व्युत्पत्ति तपासून पाहिली; परंतु यावनी भाषेचा त्याला किंचिदपि संपर्क नसून संस्कृतापासूनच त्याची पूर्ण उत्पत्ति झालेली आहे असें आढळून आलें, ह्मणून मला त्या फेरफाराबद्दल बिलकुल खेद वाटला नाहीं.

"मीं एक कवितांचें पुस्तक रचिलें आहे तें प्रथम आपणांस दाखवितों. आपणांसारख्यांच्या नांवानें तें प्रसिद्ध करून त्यांत फार प्रौढता मिळून जर प्रख्याती मिळाली असें दिसून आलें तर मग द्वितीयावृत्तींत आपलें स्वतःचें कर्तृत्व प्रकाशित करीन, नाहीं तर आपली कीर्ति आहेच ! मी कांहीं कीर्तिच्या मागें लागणारा लोभी नाहीं. मीं किती निस्पृह आहें हें रामशंकर आपल्याला सांगेल. वर्तमानपत्रकर्त्यांनां मोठमोठ्या रकमा भरून माझी स्तुति बिलकुल करूं नका ह्मणून सांगावें लागतें; परंतु ते इतके लोभी आहेत, कीं, कधीं काळीं सुधारकांची निंदा करण्याची वेळ आली, कीं, पुन्हा पुन्हा ते पैसे मागूं लागतात. संसारांत निर्लोभी लोकांनां लोभ्यांबरोबर व्यवहार करावे लागतात, त्याबद्दल फार फार दिलगिरी वाटते. माझ्या काव्याचा अंतर्गत विषय हाच आहे. त्यांत सुधारकांवर तर बरेच आक्षेप केलेले आहेत. धास्ती एवढीच आहे, कीं, ते गुप्त आक्षेप त्यांनां समजणार नाहींत. अर्थभाव लेशमात्र न समजणें यांतच काव्याचें सौंदर्य आहे. कारण, अर्थ समजेल अशी कविता सर्वच रचतात. कवितेवर जो आक्षेप ह्मणून घेतात तो तर माझ्या काव्याचा उद्देश आहे. करितां आपण तें एकदा पाहून ठेवावें. ही पहा एका बेडकावर अन्योक्ति आहे:—

**अरे बेडका ! सत्वरं उत्पतन्त,**
**करी अश्म वृष्टी युवा पारसीक;**
**न होई प्रहार स्तवयी एक मात्र,**
**सुधाकांहुनी ज्यास्त नैपुण्य अत्र. १**

"या ठिकाणचा प्रसंग असा आहे. वर्षाऋतूंत एके समयीं आमचे अश्वपाल व्याधिग्रस्त झाले असल्यामुळें चालतच कोटांत जाण्याचा योग आला. तेथील

विस्तीर्ण भूमितलाच्या ठायीं एक विस्तृत जलसंचय दृग्गोचर झाला. त्यांत एक बेडुक संचार करित होता. त्याला एक पारशाचा मुलगा दगड मारित होता; परंतु तो बेडुक इतक्या त्वरेनें उड्या मारित निघून गेला, कीं, त्याला एकहि दगड लागला नाहीं. अशा प्रकारच्या भावनायुक्त दर्शनानें माझ्या कवित्वपूर्ण हृदयांत उद्दीपन झालें, आणि सायंकाळीं गृहाप्रत आगमन करतांच प्रथमतः हा श्लोक लिहून काढला. आणि नंतर तसेंच पुढें 'दर्दुरशतक' रचलें. या श्लोकाच्या शेवटच्या पंक्तींत सर्व रहस्य समाविष्ट केलेलें आहे. त्याचा अभिहित अर्थ असा आहे, कीं, अरे बेडका ! सुधार्कांहुनी अर्थात् सुधारकांहून तुझें नैपुण्य या ठिकाणीं जास्त दृष्टीस पडतें. तात्पर्यार्थ असा आहे, कीं, सुधारकांनां तुझ्या इतकेंहि नैपुण्य नाहीं, आणि ह्मणूनच ते लोक निंदाप्रहारांतून आपला बचाव करूं शकत नाहींत. ही अन्योक्ति आहे. एक सुधारक अल्पवयी पार्शाच्या मुला-प्रमाणें प्रयत्नरूपी बेडकामागें फिरत आहे, आणि लोकांवर निंदारूपी अश्म फेंकित आहे; परंतु त्याला प्र--कर्ष नाम महत् हारः अर्थात् सुवर्णमौक्तिका-दिकांचे हार--अर्थात्--धन--लेशमात्रमपि प्राप्त होत नाहीं. यांतला मुख्य आक्षेप हा आहे, कीं, सुधारणा करणारांपेक्षां नैपुण्यानें वागून मीं धनसंचय करून विशेष लाभ पावलों आहें. दुसरा आक्षेप सुधारक स्पर्शास्पर्श भेद मानित नाहींत, आणि पारशांबरोबर पंक्तिव्यवहार करतात, त्यासंबंधाचा आहे. पारशीलोक खिचडीचा घांस करून तो हातांत धेऊन अधर तोंडांत सोडून देतात. त्यालाच या श्लोकांत अश्मवृष्टीची उपमा दिलेली आहे. करितां फारच मनोहर झाली आहे, हें आपणहि कबूल कराल. अशा प्रकारचे सुमार पन्नास आक्षेप या एकाच श्लोकांत आहेत. अर्थात्, संपूर्ण 'दर्दुरशतकां'त एकंदर पांच हजार आक्षेप सुधारकांवर केलेले आहेत, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. काव्यरसाचा आनंद अनुपम आहे ह्मणतात तें आपल्याला अनुभवानें गम्य होईल."

भद्रंभद्र ह्मणाला "इतकी मनोहर कविता मीं कधींच पाहिलेली नाहीं. वाहवा! आपली रसिकता खरोखरच फार अलौकिक आहे. आपल्या आर्यपक्षाच्या लोकांत कवींची फार वाण होती ती आपण भरून काढिलीत ! आपण केवळ तात्विक विषयांत निपुण आहां अशी माझी समजूत होती. आपली कविताशक्ति मला बिलकूल माहीत नव्हती. या देशांत सुधारकांची सर्व संख्या कांहीं पांच हजार नाहीं. आपल्या काव्यांतील एक एक आक्षेप जरी एक एक सुधारकावर फेंकून दिला, तरी त्यांची सर्व चमू अगदीं निरुत्तर होऊन खिन्न वदनानें खालीं मान

घालून बसेल, आणि अशा प्रकारें वाग्बाणांनींच शत्रुवर्गाचा समूळ नाश होईल, आणि या 'दर्दुरशतकानें' च देशाचा उद्धार होईल, आणि मग तर व्याकरणाचे गहन प्रश्न विचारून सर्व सुधारकांना निरुत्तर करण्याची आवश्यकताच उरणार नाहीं."

प्रसन्नमनशंकर ह्मणाला " आपण व्याकरणशास्त्रांत निपुण आहां, ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. माझ्या पुस्तकांत सुधारकांच्या या विषयाच्या अज्ञाना-बद्दल फारच आक्षेप दाखविलेले आहेत. उदाहरणांचें खरें स्वरूप न दाखवितां आल्यामुळें जागोजागीं अपूर्ण वाक्यें राहिलीं आहेत, तीं आपल्यापासून समजून घेऊन पूर्ण केलीं पाहिजेत. विद्वत्तेचा ' ढग ' अज्ञान लोक ' ढोंग ' ह्मणतात मीं आपल्यासारख्यांच्या मागें लागूनच मिळविलेला आहे, आणि त्यामुळेंच सुधारक मला 'विद्याठग' ह्मणतात; परंतु मी सुधारकांहून विद्वान् आहें असें आपण या काव्याच्या प्रस्तावनेंत लिहिलेंत तर तें कांहीं असत्य गणलें जाणार नाहीं, हें आपल्याला या वरील कृतीवरून समजलेंच असेल."

याप्रमाणें विद्वत्ताप्रचुर गोष्टी सांगण्यांत एकामागून एक असे दिवस जात होते. कित्येकवेळां कुशलवपुशंकर येऊन बसत असे. त्या वेळीं त्याचा काका-पुस्तकें प्रसिद्ध करणारा–हजर असला ह्मणजे सुधारकांवर दुसऱ्याच्या तोंडूनसुद्धां निंदाव्यंजक शब्दांचा भडिमार न होईल अशी तजवीज मी ठेवित असें. त्याच्या देखत इ० स० १५८०मध्यें इंग्लंडांत जान टेलर नांवाचा जो प्रसिद्ध कवि होऊन गेला, त्याच्याबद्दलच्या गोष्टी प्रसन्नमनशंकर सांगत असे. त्या कवीचीं ' जलकवि ' आणि ' हलेसा-प्रेरक 'या टोपण नांवांनीं प्रसिद्ध झालेलीं काव्यें त्याला फारच आवडत असत. मधून मधून तो त्याच्या ' पादप्रवास, ' ' भिक्षा आणि भिक्षावृत्तीची प्रशंसा, ' तसेंच ' फांशी देण्याचे निरनिराळे प्रकार आणि त्यांतील रहस्य व उपयुक्तता,' या ग्रंथांतील वचनांचा प्रमाणभूत आधार ह्मणून उपयोग करित असे. कुशलवपुशंकर तर या विद्वत्तेनें अगदीं दिपून जाऊन आणि या संभाषणानें अगदीं चकित होऊन ह्मणे " आह्मी इतके इंग्रजी शिकलों, परंतु 'जलकवि' हें नांवहि आपण एकिलेंऊ नाहीं. मग त्यांतलीं वचनें तोंडपाठ कोठून असणार ?" एके वेळीं कुशलवपुशंकर तर असें बोलून गेला, कीं, " तुह्मीं मला आपल्याला ' पंडित काका ' ह्मणण्यास सांगितलें तें अगदीं यथायोग्य आहे."

प्रसन्नमनशंकर ह्मणाला " मूर्खा ! मीं केव्हां तुला असें सांगितलें होतें ? तूं आपण होऊनच तसें ह्मणूं लागलास "

रामशंकर ह्मणाला "खरें आहे. कालच संध्याकाळीं कोणीतरी भेटावयास आलें होते त्या वेळीं कशावरून बोलणें निघालें होतें कोण जाणे, पण त्याच्याजवळ खुद्द तुह्मींच सांगत होतेत, कीं, माझा मेव्हणा कुशलवपुशंकर मला 'पंडित काका' ह्मणून हांक मारितो. माझ्या दुसऱ्या भावांनां तो नुसतें 'काका'च ह्मणतो. भेटायला आलेले गृहस्थ ह्मणाले 'लहान मुलें आणि मोठीं मुलें हीं सर्व व्यवहार फार बारकाईनें पहात असतात; परंतु वयानें मोठीं असलेलीं माणसें वयाच्या मानानें करावा तितका गुण ग्रहण करीत नाहींत. शिवाय कुशलवपु हे व्यवहारांत जरा कमीच आहेत."

कुशलवपुशंकर ह्मणाला "व्यवहार हा वेदांनां संमत नाहीं; परंतु सुधारकांचें खंडन करण्याला व्यवहारज्ञानाची आवश्यकता आहे. आणि आवश्यकतेच्या प्रतिवृत्तीला श्लोकबद्ध प्रमाणें आहेत, त्यामुळें सुटकाच नाहीं. सुधारकलोक प्रमाणांच्या अभावीं कसे व्यवहार करूं शकतात, त्याचेंच मोठें आश्चर्य वाटतें. या मूर्खांनां माहीत नाहीं, कीं आपले पूर्वज इतके विचारी होते, कीं, त्यांनीं खाणें, पिणें, निजणें, उठणें, वगैरे सर्व व्यवहार प्रमाणबद्ध करून ठेविलेले आहेत. कोणत्याहि वेळीं कोणीहि प्रमाणांच्या अभावामुळें संशयग्रस्त होण्याचें कारणच नाहीं, किंवा कोणालाहि किंकर्तव्यतामूढहि बनण्याचें कारण नाहीं."

प्रसन्नमनशंकर ह्मणाला "संशयग्रस्तता हें एक एवढें मोठें संकट आहे, कीं, द्रव्यसाहाय्याशिवाय त्यांतून सुटका होणेंच शक्य नाहीं. माझ्या श्रेष्ठपणाबद्दलच्या संशयाचा छेद तरी याच मार्गानें जाहलेला आहे; पण आमचे डचीमामाचा संशय पुढें आला ह्मणजे त्याच्यापुढें मात्र निरुपायच. रामशंकर, सांग पाहूं त्यांची गोष्ट."

रामशंकर सांगूं लागला "डची मामा हा भाऊसाहेबांचा मामा. तो फार वर्षांपासून येथेंच राहतो. बेटा पराकाष्ठेचा वहिमी! एकदा गाडींत बसून जात असतां त्याला संशय उत्पन्न झाला, कीं, बैलासकट सर्वच गाडी जर पालथी पडली तर आपलें काय होईल? बाहेर तर पडतांच येणार नाहीं, आणि जर का गाडीचा तळ वर आणि टप खालीं असें झालें, तर मग आपल्या फजितीला पारावारच नाहीं! त्या वेळेपासून त्याच्या डोक्यांत जो वहीम शिरला, तो त्यानें गाडींत बसावयाचेंच सोडून दिलें! नानातऱ्हांनीं त्याची समजूत घालावयाचा प्रयत्न केला, परंतु थोडासा वहीम अद्याप शिल्लक आहेच! एकदा जेवतां जेवतां त्याला अशी शंका आली, कीं, कदाचित खाल्लेलें अन्न जर अन्य मार्गानें बाहेर जाऊं लागलें तर पोटांत कांहींच शिल्लक राहणार नाहीं, आणि मग इकडे कितीही

खाल्लें तरी आपला उपाशीं तो उपाशींच ! वाटेल तितकें खा—पोटांत वणवा तो वणवाच ! तेव्हांपासून त्यानें अशी व्यवस्था चालू केली, कीं, खोंट घालून, जेवण संपेपर्यंत तिच्यावर दावून बसावयाचें, बिलकूल हलावयाचें नाहीं; ह्मणजे कोणत्याहि मार्गानें खाल्लेलें अन्न बाहेर जाण्याचा संभव उरणार नाहीं ! मीं मुद्दाम वैद्यबुवांनां बोलावून आणून वाटेल तितकी समजूत पाडण्याचा प्रयत्न केला, पण वहीम फिटला नाहीं ! कांहीं असो, पण ही वहिमी वृत्तीसुद्धां शेवटीं उपयोगीं पडणारीच आहे. सुधारकांत जाऊन मिळण्याला ती वृत्तीच कारण झाली. एकदा याचा सगळा गांव सुधारकांच्या नादीं लागला, आणि स्त्रीशिक्षणासंबंधाची सभा होती तिला सर्वांचें अनुमोदन मिळालें; पण इतक्यांत याला वहीम आला, कीं, बायकांनां शिकवून त्या शहाण्यां झाल्या ह्मणजे कदाचित ह्मणतील, कीं, या जंगली लांकडांवर आह्मी नाहीं जेवण शिजवणार—आह्मांला सफेद आगकाड्या पाहिजेत, त्यांच्यावरच आह्मी जेवण शिजवूं ! अबबब ! ! मग इतक्या आगकाड्या रोज रोज कोठून आणणार ? त्या आणण्याकरितां विलायतेस जावें, तर बहिष्कार पडणार ! अशा वहिमांत पडला आणि आपली मुलगी त्या दिवसापासून शाळेंत पाठविनासा झाला. इतकेंच नाहीं, पण शेजारच्या गांवांत शाळा होती त्या दिशेला याची गाय चरावयास जात असे तीहि त्यानें त्या दिवसापासून बंद केली ! न जाणो, कदाचित शिकलेला चारा खाऊन येईल ! भाऊसाहेबांनीं त्याच्या वहिमाबद्दल पुरावा देऊन खात्री केली, कीं, बायकांनां शिक्षण मिळाल्यास त्या पंडित होतील आणि मग पुरुषांनां पंडित कोण ह्मणणार ? पंडितांची संख्या तर ब्रह्मदेवानें नियमित केलेली आहे.”

स्त्रीशिक्षणाबद्दल गोष्ट निघाली ह्मणून भद्रंभद्र उभा राहून बोलूं लागला “ स्त्रीशिक्षणाबद्दल अद्याप संशयवृत्ति असणें हीच वहीमाची गोष्ट आहे. अनादिकालापासून सिद्ध जाहलें आहे. कीं, स्त्रियांनां शिक्षण देणें बिलकुल उचित नाहीं. स्त्रियांनां शिक्षण देणें योग्य असतें तर ‘ स्त्रियांनां शिक्षण द्यावें ’ असें खुद्द ईश्वरानेंच वेदांत सांगितलें नसतें काय ? उपनिषदांत कांहीं कांहीं ठिकाणीं शिकलेल्या स्त्रियांचा उल्लेख आहे, पण वास्तविकपणें तो उल्लेख शिकलेल्या पुरुषांबद्दलचाच आहे. किंवा कांहीं कांहीं विद्यांनांच मूर्तिमंत स्त्रिया मानलेल्या असाव्यात, असें व्याकरणादि शास्त्रांच्या आधारानें सिद्ध करतां येईल. तर मग आपण इतके मूर्ख आहों काय, कीं, गैरमाहीतपणामुळें भलत्याच अर्थाबद्दल आग्रह करित राहूं ? स्मृति, पुराणें हीं तर वेदांविरुद्ध असणें

शक्यच नाहीं. करितां त्यांत दिलेल्या प्रमाणांबद्दल संशय बाळगण्याचें कारणच नाहीं. आपण तर्कशास्त्राकडे वळलों, तरीहि हेंच अनुमान निघणार. आपले आर्य श्रेष्ठ होते, करितां त्यांच्यांत कांहींच असत्य असणें संभवनीय नाहीं. करितां आपल्या देशांत आज जे रीतिरिवाज चालू आहेत ते सर्व खरे आहेत. अर्थात्, आपल्या देशांत आज स्त्रीशिक्षण नाहीं, हेंहि योग्यच आहे. एक विद्वान् गृहस्थ असें ह्मणतात, कीं, फीजी बेटांत एगुटी नांवाच्या प्राण्यांची एक जात आहे. त्यांच्या मायांनां मेंदूच नाहीं. त्यावरून सिद्ध होतें, कीं, निसर्गतःच स्त्रीजातीला शिक्षण ग्रहण करण्याची योजना नाहीं. कारण, कीं, त्यांनां मेंदूच नाहीं."

प्रसन्नमनशंकर म्हणाला "हा दाखला आपण कोणापासून अभिगत केला?"

भद्रंभद्र ह्मणाला "अन्नाचे अत्यंत भोक्ते ह्मणून प्रसिद्ध असलेले शंभु पुराणीक यांचा भाचा वल्लभराम, केवळ एक खेडवळ असून मुंबईत राहिल्यामुळें चांगलें इंग्रजी शिकला आहे. तो आर्यपक्षाभिमानी आहे, आणि आपल्या देशांतलि सर्व कांहीं चांगलें आहे, आणि परकी तितकें सर्व वाईट आहे असें त्याचें अगदीं ठाम मत ठरलेलें आहे. तरी पण पाश्चात्य लेखकांचें मत जर आपल्या पक्षाला अनुकूल असेल तर तें पुढें करण्याला तो कधींहि चुकत नाहीं. मात्र प्रतिकूल असेल तर तें विदेशायांचें अनुकरण ह्मणून दाखल्याकरितां पुढें करून त्याची टर उडविल्याशिवाय राहात नाहीं. त्याच्या पुस्तकांतच मीं वरील दाखला वाचिला आहे. आपण त्या गृहस्थांनां ओळखितच असाल."

प्रसन्नमनशंकर ह्मणाला ' चांगला ओळखतों. तो तर माझा आश्रित आहे; परंतु जरा गर्विष्ठ असल्यामुळें तो माझा आश्रित असल्याची कोणाला ओळखच देत नाहीं, आणि याच गुणानें तो इतका मागें पडला. त्याला चांगल्या मोठ्या पगाराचा एक कारागृहपालाचा हुद्दा मिळवून देण्याच्या मी विचारांत आहें. तें जुळलें, ह्मणजे माझ्या सद्गुणांची याला किंमत कळेल, आणि मग तो त्याबद्दल ग्रंथांत कोठें तरी निर्देश करून प्रसिद्ध करील. पाश्चात्यांच्या पुस्तकांतून आधार ह्मणून उतारे घेण्याची वल्लभरामाची पद्धत मला बिलकुल पसंत नाहीं. आपल्या ऋषींच्या ग्रंथांतून असलीं प्रमाणें नाहींतच कीं काय? आणि कदाचित असल्या प्रकारचीं प्रमाणें नसलीं तरी पारमार्थिक ज्ञानानें दोन भिन्न प्रमाणांनां अभेद्य स्वरूप देतां येणार नाहीं कीं काय? जलकवीशिवाय दुसऱ्या कोणत्याहि पाश्चात्य ग्रंथकाराचें वचन मी प्रमाण अगर दाखला ह्मणून उपयोगांत आणित नाहीं. फक्त त्याच्या आणि माझ्या थोर विद्वत्तेची तुलना करण्याकरितां मला हा प्रकार

करावा लागतो. जलकवि, मी आणि कालिदास या त्रिपुटींचें प्रचंड तेज एकवटल्या-मुळें जगाला मोठा फायदा मिळाला आहे. स्त्रीशिक्षणाची अयोग्यता वरील प्रमाणाशिवाय सिद्ध करितां येईल. स्त्रिया मूर्ख असतात करितां त्यांनां शिक्षण देण्यांत अर्थ नाहीं. शिक्षणानें बुद्धीचें सामर्थ्य वाढतें हें खरें, परंतु स्त्रियांनां दौर्बल्य हेंच भूषण आहे. अवला ह्या बुद्धिवल प्राप्त करून घेतील हें प्रकृतीच्या शाश्वत नियमांच्या विरुद्ध आहे. स्त्रियांच्या कामकाजांत शिक्षणाची आवश्यकता भासत नाहीं. शिक्षणानें प्रत्येक काम चांगलें करितां येतें, हें पाश्चात्यांचें मत आहे. करितां तें आपणांस विलकुल मान्य नाहीं. स्त्रियांनां केवळ धर्मज्ञानाची आवश्यकता आहे, परंतु धर्मज्ञानाकरितां शिक्षणाची आवश्यकता नाहीं. पुरुष सुशिक्षित असले ह्मणजे त्यांनां धर्मशास्त्र चांगलें समजतें हें प्रमाण स्त्रियांनां लागू करतां येत नाहीं. कारण, स्त्रिया ह्मणजे पुरुष नव्हत. शिवाय स्त्रिया शिक्षणाचा दुरुपयोग करतील. करितां त्यांनां अशिक्षितच ठेविल्या पाहिजेत. पुरुष जेव्हां शिक्षणाचा दुरुपयोग करितात तेव्हां तो शिक्षणाचा दोष नसून व्यक्तिपरत्वें स्वभावाचा दोष होय. याचें कारण वर सांगितलें आहे. तेंच— ह्मणजे पुरुष आणि स्त्रिया भिन्नभिन्न आहेत. याप्रमाणें अनेक निरनिराळ्या कारणांनीं सुधारकांचा पक्ष लंगडा पडतो."

इतक्यांत डची मामा बाहेरून आला. त्याला पाहून प्रसन्नमनशंकर ह्मणाला "आमच्या डची मामाचा आणि आपला जसजसा परिचय वाढेल तसतशा आपल्या शंकाहि वाढतील व स्त्रीशिक्षणापासून होणाऱ्या प्रत्येक फायद्याचें आपल्याला उत्कृष्ट खंडणहि करितां येईल."

डची मामा ह्मणाला " जगतांतील अखिल विद्वानांत प्रसन्नमनशंकरभाई हा फार मोठा विद्वान आहे. या एका गोष्टीशिवाय इतर सर्व गोष्टींवद्दल मला संशयच आहे. स्त्रीशिक्षणाबद्दल तर मला संशय आहेच आहे. स्त्रीशिक्षणापासून आपणां पुरुषांनां कोणता लाभ मिळणार आहे हें सिद्ध झाल्याशिवाय आह्मीं स्त्रियांनां शिक्षण देऊं तरी काय म्हणून ? आणि दिल्याशिवाय तें त्यांनां मिळणार तरी कसें ? आणि याचा खुलासा झाला नाहीं तर स्त्रीशिक्षणाचा मार्ग खुंटलाच ! एकदा मीं समुद्राच्या तीरावर वसलों होतों आणि वसल्या वसल्या माझें पागोटें समुद्रांत पडलें. मला संशय आलाच, कीं, समुद्र हा देव आहे तेव्हां त्यानेंच आपलें पागोटें ओढून घेतलें असावें. अर्थात्, तो तें आतां परत देणार नाहीं. पण घेण्याचा प्रयत्न करून तें हातीं लागत नाहीं असें होईपर्यंत त्यानेंच घेतलें

असें तरी ठरणार कसें ? तें खास समजेपर्यंत पागोटें घ्यायला तरी जावें कसें ? अशी शंका मनांत येऊन मी उठलों आणि तसाच बोडका घरीं आलों. त्यांतलाच ह्या स्त्रीशिक्षणाचा प्रकार आहे ! "

डची मामाची ही गहन विचारशक्ति व देवावरील श्रद्धा पाहून भद्रंभद्र अगदीं थक्क झाला. भद्रंभद्राचा याच्याशीं जसजसा परिचय वाढत चालला तसतशी दररोज विचारण्याच्या शंकांचीं संख्याहि वाढत चालली; परंतु डची मामा त्या सर्व शंकांचें तावडतोब निरसन करी.

रामशंकरच्या सांगण्यावरून समजलें, कीं, भद्रंभद्राला बरेच दिवस पाहुणचाराकरितां राहून घेण्याचें मुख्य कारण हें होतें, कीं, सुधारकांच्या विरुद्ध एक पुस्तक लिहून काढण्याकरितां कोणा एखाद्या शास्त्र्यास पगार देऊन ठेवावा असें एका श्रीमंत गृहस्थाजवळ प्रसन्नमनशंकर यानें ठरविलें होतें. प्रसन्नमनशंकर याच्या विद्वत्तेवर खुष होऊन दरमहा मिळणाऱ्या पगारांतून अर्धा त्याला देण्याचें कबूल करून भद्रंभद्रानें थोडे दिवस ती शास्त्र्याची जागा पत्करली. प्रसन्नमनशंकर पसंत करील त्या विषयावर लिहावें, अशी आज्ञा असल्यामुळें ' रूढि–प्रशंसा ' हा विषय प्रथम हातीं घेतला. भद्रंभद्रानें सुचविलें, कीं, ज्या रूढींनां शास्त्राचा आधार नसेल त्यांनां आधार शोधून काढून दाखवितां यावे हाच हेतु पुढें ठेवून या ग्रंथाची रचना केली पाहिजे. कारण, केवळ तर्कानें रूढीची इष्टानिइष्टता सिद्ध करणें व्यर्थ आहे. व्यवहारांतल्या लाभालाभाप्रमाणेंच हेंहि अगदीं निरुपयोगी आहे. कारण, शास्त्रानुसरण यालाच लाभ ही संज्ञा आहे. व्यवहारांत जेथें लाभ दिसत नाहीं त्या ठिकाणीं मायेच्या योगानें भ्रम उत्पन्न होतो; परंतु ज्ञान हें त्या भ्रमाचा निरास करितें. करितां शास्त्राचे आधार दाखविणें हीच रूढीची खरी प्रशंसा आहे. "

प्रसन्नमनशंकर ह्मणाला " सत्य आहे. रूढि यांत मूळ धातु रुह आहे. रुह ह्मणजे चढणें. करितां प्रथम प्रकरणांत कोणी वयानें व ज्ञानानें रुढ झालेला पुरुष असेल तर त्याची प्रशंसा आली पाहिजे. "

भद्रंभद्र ह्मणाला "प्रशंसेला पात्र असा प्रशंसनीय पुरुष आपल्याबरोबरीचा दुसरा कोण मिळणार ? करितां आपलीच योजना ठीक होईल. "

प्रथम प्रकरणांत वाचणाराचा ' प्रशंसा ' या विषयांत प्रवेश होणार, करितां महापुरुष प्रसन्नमनशंकर यांचें जीवनचरित्र सर्व बाजूंनीं प्रशंसेनें सजवून लिहिण्यांत आलें.

जन्म दिवसाची तारीख आणि मुंबईंत प्रवेश केला त्या दिवसाची तारीख यांशिवाय सर्व आयुष्यक्रमांत प्रसन्नमनशंकर यांच्या मुद्दाम ध्यानांत धरण्यासारखा असा एकहि महत्त्वाचा दिवस नव्हता. त्यामुळें हे जर एखाद्या राजकुलांत जन्मास आले असते तर कसे प्रतापी निपजले असते, ऋषिकाळीं जन्म जाहला असता तर यांनीं बनविलेल्या किती स्मृति प्रमाणभूत मानल्या गेल्या असत्या, हे जर मुंबईस आले नसते तर जगांत निरनिराळ्या ठिकाणीं कसे अनर्थ ओढवले असते, ऐतिहासिक काळांतील महत्त्वाच्या अमदानींत हें असते तर निरनिराळ्या देशांच्या इतिहासांत केवढा फेरफार झालेला दृष्टीस पडला असता, वगैरे वगैरे भरपूर माहिती देऊन सर्व क्रियापदांचा संकतार्थदर्शक भूतकाळांत प्रयोग करून हें चरित्र प्रकरण खुलवून तयार करावें लागलें. प्रकरण दोन हें 'रूढि–स्वरूपा' विषयीं होतें. रूढीची लक्षणा काय द्यावी, यावद्दल मोठें संकट येऊन पडलें. लक्षणेमध्यें निषिद्ध मानण्यासारखा एकहि दोष दिसून येतां कामा नये, एवढेंच नाहीं, तर त्या लक्षणेंत रूढीचें प्राधान्य व तिच्यामुळें इष्टसिद्धी या दोन गोष्टी प्रमुख असल्या पाहिजेत. प्रसन्नमनशंकराची इच्छा अशी होती, कीं, लक्षणा अशी सर्वांगपरिपूर्ण असली पाहिजे, कीं, तिच्यावरून लक्षणा लिहिणाराची विद्वत्ता दिसून यावी, आणि अशी जर एखादी लक्षणा तयार झाली तर 'श्रीयुत प्रसन्नमनशंकर यांनीं कृपा करून ही लक्षणा आमच्या नजरेस आणिली,' असा उल्लेख पुस्तकाच्या प्रस्तावनेंत ग्रंथकारानें करावा. कुशलवपुशंकर आणि डची मामा हेहि यासंबंधानें विचार करितच होते.

कुशलवपुशंकर ह्मणाला, "अडचण तर हीच आहे, कीं, ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञानाचें शास्त्रस्वरूप हीं एक असूनहि रूढी स्वतंत्रपणें संचार करित आहे. मायेप्रमाणें ती जरी भ्रांतीचा प्रसार करित नाहीं, तरी पण रूढि ही दिवसेंदिवस मान्य आणि प्रमाणभूत बनत चालली आहे असें स्पष्टपणें त्या लक्षणेंत असलें पाहिजे उत्तम मार्ग ह्मटला ह्मणजे हा आहे, कीं, अद्वैत मत प्रमाण मानून आणि शास्त्र व रूढी यांत पारमार्थिक दृष्टीनें भेदभाव नाहीं असें ठरवून रूढी हें शास्त्राचेंच एक अंग आहे असें त्या लक्षणेंत सांगून द्यावें."

डची मामा ह्मणाला "आपल्या वृद्ध पूर्वजांनीं फार विचार करून जेव्हां ही रुढी प्रचारांत आणिली असेल तेव्हां त्याबद्दल कांहीं तरी लेख करून ठेविले असतील. करितां विहिरी, तलाव, मोठमोठ्या हवेल्या व देवालयें वगैरे सर्व खोदून त्यांच्या खालीं कांहीं सांपडतें कीं काय, याचा शोध केला पाहिजे. ह्मणजे

रूढीबद्दल कांहीं तरी विशेष माहिती मिळेल यांत संशय नाहीं, आणि हा शोध लाविल्याशिवाय रूढीबद्दल उगाच कांहीं तरी लिहिण्यांत अर्थ काय? कदाचित आपण लिहूं एक आणि त्या जुन्या काळचें मत कांहीं निराळेंच असेल! करितां सर्व भरतखंड खोदून काढून याचा तपास लाविल्याशिवाय लिहिणें ह्मणजे निवळ उतावीळपणाचें होणार आहे, असें मला वाटतें."

भद्रंभद्र यावर ह्मणाला "काल अमर्याद आहे. करितां हें सर्व भरतखंड खोदून काढण्याचें काम कधीं तरी तडीस जाईल, यांत संशय नाहीं. तथापि या ग्रंथरचनेंत धनप्रवृत्ति हा मूळ हेतु आहे, हें विसरतां कामा नये. कारण, असा विसर पडणें साधार नाहीं. अर्थात्, पूर्वजांनीं रूढि प्रचारांत आणिल्या त्या कोणत्या हेतूनें हें शोधित बसण्याचें कारणच उरलें नाहीं. आपल्याला जसें वरें वाटेल आणि ज्याच्या योगानें आपला पक्ष सबळ होईल, तोच त्यांचा हेतु होता, असें ठरविण्याला कांहीं तरी युक्ति लढविली पाहिजे. आणि तशी युक्ति लढविणें फारसें कठीणहि नाहीं. कारण, रूढी प्रचारांत आणण्याचीं कारणें आपल्या पूर्वजांना माहीत नव्हतीं, तशींच तीं आपल्यालाहि माहीत नाहींत. त्याचा शोध फक्त अमेरिकेंतील थियासफिस्ट लोकांनीं लाविला आहे, आणि तो शोध अगदीं अपूर्व आहे. करितां तो ग्रहण करण्यास आपल्याला मुळींच प्रत्यवाय नाहीं. आपल्या देशांत बनणारीं भांडीं आतां विलायतेंत बनूं लागलीं आहेत व तीं आतां इकडेहि येऊं लागलीं आहेत. तीं आपण वापरूं नये, असें सुधारक ह्मणत नाहींत. मग आपल्या रूढिमार्गाचें कारण अमेरिकेंतील थियासफिस्टांनीं बनवून इकडे पाठविलें आणि त्याचा आह्मीं स्वीकार केला तर नको कोण ह्मणणार? आणि तसें कांहीं नाहींच जुळलें तर प्राणवायू तर आहेच! त्यांतून वाटेल त्याचें कारण शोधून काढितां येईल. माझें तर मत असें आहे, कीं, हें कारण शोधित बसण्यापेक्षां शास्त्रांचे आधारच शोधून काढावे, हें वरें. श्लोक ह्मणून जेवढे आहेत ते सर्व शास्त्रप्रमाण आहेत, हें निर्विवाद आहे. ह्मणून ह्मणतों, कीं, हें आपल्याला फार सोपें जाईल. 'कारण,' 'आशय,' 'लाभालाभ' या प्रकरणाकडे लक्ष्य गेलें ह्मणजे शास्त्रावरचा विश्वास कमी होऊं लागतो, आणि कित्येक कर्तव्यांची विस्मृति होऊं लागते. अन्नदेवतेचा अनादर करूं नये, ही शास्त्राज्ञा पाळण्याकरितांच आपला ब्राह्मणवर्ग नित्य भोजन करितो. कारणें शोधित बसणारा, त्यापासून नफानुकसान काय आहे हें तपासणारा शूद्र अगर भिकारी वर्ग शास्त्राज्ञेची माहिती नसल्यामुळें वारंवार उपाशीं मरतो! लाभालाभाची परीक्षा

करित बसण्याचें कारण नाहीं. आणि याकरितांच डोळे मिटून रूढीच्या धोपट मार्गानें उड्या मारित जावें असें आपल्या पूर्वजांनीं सांगून ठेविलें आहे."

यावर प्रसन्नमनशंकर ह्मणाला "धनाहून इतर वस्तूंच्या लाभालाभाविषयीं विचार करणें शास्त्रेषु असंमतमिति. आणि धनव्यवहाराबद्दल आपण ह्मणतां तें अंधदृष्ट्या द्रष्टा—इति. करितां या प्रसंगीं रूढीची लक्षणा प्रसिद्ध करण्यास बिलकुल हरकत नाहीं. परंतु कोणीं अस्मादिकांची चूक काढून दोष देऊं नये ह्मणून एतत् युक्तिर्कुर्वताम्, 'कीं, एक व्याख्या वर्तमानपत्रेषु मुद्रित करावी, कीं, 'कश्चित् एकदां आज्ञान परंतु अधुना कित्येक सुबुद्धि सुधारक आर्यपक्षास येऊन मिळाले आहेत. ते रूढीची अशी अशी लक्षणा करितात. करितां त्यांतील अपूर्णता लिहून पाठविणारांस अमुक एक पारितोषिक देण्यांत येईल. शिवाय ज्याला जो भाग ग्राह्य वाटेल तेवढाच त्याला संमत असल्याबद्दल कळवावें.' याप्रमाणें सर्वेषां मत प्राप्ती झाल्यानें तिच्या साहाय्यानें अस्माकम् नूतन व्याख्या रचण्याला समर्थ होतील."

या युक्तीनें सर्वांनां आनंद झाला. व्याख्या बनवावयाची ती सुधारकांच्या नाहीं तर आर्यपक्षाच्या दृष्टिबिंदूंनीं बनवावयाची होती. त्यामुळें जास्त अडथळे आले नाहींत. पोक्त विचार करून शेवटीं पुढील लक्षणा वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करण्याचें ठरलें:—

"रूढि ह्मणजे आपल्या आर्यपूर्वजांनीं वेळोवेळीं आणि स्थळोस्थळीं दृष्टीस पडणाऱ्या भिन्नतेवर नजर देऊन व वेदधर्मानुयायी सनातनशास्त्रांची एकवाक्यता आहे असें जाणून सर्व देशकालाला लागू न पडणारी परंतु ध्रुवासारखी अचल असणारी, लोकांचे आचार विचार, भोजन, पान, इंगित, चेष्टा, नृत्य, गायन, वादन, लेखन, वाचन, जृंभण, शिंकाकरण, पर्यटण, उड्डाण, जनन, मरण, विवाहकरण, निराकरण, भजन, पूजन, दायस्यप्रापन, अपहरण, स्नान, मुंडन, परिधान, आच्छादन, वचन, दर्शन, वेपन, घर्घरायण, शयन, जागरण, बंधन, मोक्ष, भूतप्रसन, ध्यान, मार्जन, व्यवहरण, वैराग्य इत्यादि सर्व व्यवहारांत बुद्धीचा उपयोग न करितां, अगदीं डोळे मिटून, शास्त्राचीं पुस्तकें न उघडतां, कोणाजवळ त्याबद्दल वादविवाद न करतां, व कोणाचीहि मुर्वत न बाळगतां, आणि अपमानाबद्दल खेद न मानतां, सुखाची अपेक्षा न करितां, उन्नतीची इच्छा न बाळगतां, विरोधाची पर्वा न करतां, लाभाचें दर्शनहि अशक्य असलें तरी सारासार विचार न करितां, दृढभावनेनें, पूज्य-

बुद्धीनें व अकारण गर्वाचे जोरावर, आर्यांवर सत्ता चालविणारी, दिव्य, माननीय, शास्त्रविमुख असूनहि शास्त्ररहस्यभरित, भक्तजनांच्या हस्तपादादिकांकरितां लोहशृंखला व कंठाकरितां वधस्तंभ धारण करणाऱ्या, दिव्य स्वरूप धारण करणाऱ्या देवतेसमान दृग्गोचर होणारा प्रचलित संप्रदाय! ती संप्रदाय देवता लत्ताप्रहारांनीं प्रवृत्ति करविते; गालिप्रदानानें निवृत्ति करविते; मूर्खद्वारा सुविचारांचें हंसें करविते; अंधभक्तद्वारा सुमार्गांत आडवी येते; अनक्षर असतात त्यांनां वाचाल बनवित; आणि विद्वानांनां गप बसण्वयास लाविते! अशा प्रकारच्या अनेक चमत्कृतींनीं आर्यभूमीवर अपूर्व तमोमयदीप प्रज्वलित झाले असल्या-मुळें या रूढीनें सर्व जगाला विस्मयानें अगदीं चकीत करून सोडिलें आहे. तिचा प्रभाव असा विलक्षण आहे, कीं, तिचे सेवक स्वतःला सोसाव्या लागणाऱ्या दुःखापेक्षां तिचा कोप होऊं नये ह्मणून जास्त जपत असातात. सुख बाजूला राहिलें तरी चालेल, पण रूढीचा प्रसाद मिळावा अशी इच्छा करीत असतात. शहाणपण नसलें तरी चालेल परंतु रूढीमार्गानें जाणेंच चांगलें असें ते ह्मणत असतात. तिचे सेवक तिच्या सेवेंत अगदीं लीन होऊन रूढीचे शत्रु असतील त्यांच्या सुखसाधनांत आडवे येऊन त्यांची निंदा करून त्यांनां नानातऱ्हांनीं त्रास देऊन व त्यांजवर बहिष्कारयोगाचें अस्त्र सोडून करितां येईल तितका छळ करितात. तिचे भक्त अधोगतीलाच कल्याण मानणार! पातकाला पुण्य ह्मणणार! मलिनतेला स्वच्छता समजणार! मोडक्यातुटक्या स्थितीला पूर्णावस्था मानणार! अयुक्त असेल त्याचा विरक्ति दाखविण्याकरितांच अंगिकार करणार! अशा भक्तांच्या त्या आराध्य रूढिदेवतेचा महिमा खरोखरच अघरोतर आहे!"

मात्र अशा प्रकारचें जाळें पसरल्यावर त्यांत असंख्यात पक्षी सांपडतीलच असें मात्र नव्हतें कित्येक तर उच्च वातावरणांतून खालीं येऊन जाळें पसरणाराच्या डोक्यावर टोंच मारून पुन्हा अचानक पूर्वस्थळीं निघून जातील, अशी भीति होती. त्यामुळें धैर्यानें व सावधानचित्तानें पुढें कसें काय होतें त्याच्यावर नजर ठेवण्याची फार जरूरी होती.

या युक्तीची सर्व तयारी होईपर्यंत भद्रंभद्रानें रूढीच्या मदतीला शास्त्रांतील आधार शोधण्यास सुरुवात केली. बऱ्याच खऱ्या प्रमाणांत रूढीला आधार मिळावा ह्मणून फेरफार करावयाचा होता, आणि कित्येक आधार तर नवेच बनवावयाचे होते. भद्रंभद्रानें व्याकरणशास्त्रांत वादविवाद करण्याबद्दल बऱ्याच वेळ खटपट केली होती; परंतु त्यांत त्याचा फारसा प्रवेश झालेला नव्हता. करितां

कदाचित कोणी वादविवादास तयार झालेला दिसला तर म्लेंछ, यवन, शूद्र, चांडाळ वगैरे कोणी आजूबाजूला असल्यास आपण वादविवाद करित नाहीं, वादविवादाला दिनशुद्धि लागते, सुग्रास भोजनाची व्यवस्था असेल तर रित्या पोटीं शास्त्रवचनांचा आपण उच्चारच करित नाहीं, वगैरे वेळेस जुळेल तशी सबब सांगून व पुढें केव्हां तरी योग आणितां येईल अशी थाप मारून तो हिंमत खचूं न देतां टाळाटाळ करित असे. आणि आजपर्यंत त्या जटाधारी शंकरानें त्याची लाज राखली होती ! पण या शास्त्रप्रमाणांचे हातचलाखीस व्याकरणाची अवश्य मदत पाहिजे, असें दिसून येतांच मोठा पेंच पडला ! कुशलवपुशंकर ही उणीव पुरी पाडण्यास तयार होता. त्याला भद्रंभद्राला पाहिल्या पासूनच जो अर्धा पगार ठरविलेला होता त्याचे व्याजाची रकम त्याला देण्याचें ठरवून प्रसन्नमनशंकरानें त्याची मदत घेण्याला परवानगी दिली. प्रमाणांच्या फेरफारांत बरेच महत्त्वाचे विषय आले. भद्रंभद्राला नेहमीं एका गोष्टीचा फार खेद होत असे. ती गोष्ट हीच कीं, कित्येक आर्यपक्षवादी मूर्खपणानें सुधारकां-जवळ जाऊन वादविवाद करतांना बालविवाहाच्या विरुद्ध असलेल्या शास्त्रवचनांस मान्यता देत ! आणि त्यामुळें आर्यावर्ताच्या हल्लींच्या स्थितींत पूर्णावस्थेला कमीपणा आणीत. त्याकरितां असें करण्याचें ठरलें, कीं, प्रमाणग्रंथांत लग्नाच्या वया-संबंधानें जेथें 'षोडश' असेल त्या सर्व ठिकाणीं 'द्वादश' करावें, आणि 'वर्ष' असेल त्याठिकाणीं 'मास' असें करून टाकावें. आणि अशा रीतीनें 'अष्टमास भवेत् गौरी' इत्यादि पाठांनीं ते प्रसिद्ध श्लोक लिहून काढून कन्येचा विवाह अवश्यमेव दहा महिन्यांचे आंतच केला पाहिजे असें प्रमाणांनीं सिद्ध करावें."

कुशलवपुशंकरचें मत घेऊन नंतर असें करण्याचें ठरलें, कीं, 'मासा' चे ठिकाणीं 'वर्ष' हाच पाठ मूळचा असून खरा आहे असें आग्रहानें विरुद्धपक्षा-कडून पुढें आपल्यास 'वर्ष' ह्मणजे 'वर्षांग' अर्थात मासार्थीच तो शब्द आहे, अगर 'वर्ष' ह्मणजे वर्षाव—पाणि प्रोक्षण—सिंचन—असा अर्थ आहे, आणि हें सिंचन नूतन जन्म पावलेल्या बालकांवर प्रतिमासीं करावें असें विहित असल्यामुळें 'अष्टवर्षा' ह्मणजे आठ वेळां सिंचन केलेली, अर्थात्, आठ महिन्यांची मुलगी असेंच समजावें. याच धर्तीवर बरींच प्रमाणें मीठमसाला लावून तयार केलीं. ब्राह्मणांच्या निरानिराळ्या जातींतील अन्न-व्यवहार निषिद्ध मानण्यास प्रमाण नसल्यामुळें आर्यपक्षाला मोठें वैगुण्य वाटत आहे आणि सुधारकांवर बहिष्कार घालून त्रास देण्यास सुरुवात केली तरी ते शास्त्रार्था-

वर येऊन बसले ह्मणजे त्यांच्या बाजूचा निकाल होतो, करितां असें प्रसिद्ध करावयाचें ठरलें, कीं, नरनारायण स्मृतींत असा एक श्लोक आहेः—

**ब्राह्मणो ब्राह्मणं दृष्ट्वा श्वानवत् घुर्घुरायते ।**
**न कर्षति मुखात् खाद्यं तस्मात् च्छूनो द्विजोवरः ॥**

**अर्थ**–ब्राह्मण हे ब्राह्मणाला पाहून कुत्र्याप्रमाणें गुरगुरूं लागतात. ( भोजन-दक्षणादिकांच्या स्पर्धेनें ) पण ( कुत्र्याप्रमाणें, समोरच्याच्या तोंडांतलें ओढून घेऊन खात नाहींत. यावरून ब्राह्मण हे कुत्र्याहून श्रेष्ठ आहेत !

यांतलें तात्पर्य एवढेंच आहे, कीं, ब्राह्मणांतील निरनिराळ्या वर्गांची आपसांत कितिहि स्पर्धा असली तरी ते एकमेकांचें खात नाहींत, यांतच ब्राह्मणांचा श्रेष्ठपणा आहे. निरनिराळ्या जातींचे लोक एकमेकांकडे अन्नग्रहण करूं लागले तर ते कुत्र्यासमान जाणावे !

याप्रमाणें घडून तयार केलेले नवीन श्लोक नरनारायणस्मृतीच्या नांवावर प्रसिद्ध करावयाचे, आणि नरनारायणानें ह्मणजे श्रीकृष्णानें श्रीमद्भगवद्गीतेच्या ११ व्या अध्यायांत नराला ह्मणजे अर्जुनाला—ज्याला असंख्य हात आहेत, ज्याला असंख्य नेत्र आहेत व जें फार भेसुर आहे—असें आपलें विराट स्वरूप दाखविलें त्या वेळीं जांभया खातां खातां श्रीकृष्णाच्या मुखांतून ही नरनारायणस्मृति निघाली व ती उच्छ्वासाबरोबर उडून गेली होती; परंतु फार प्रयासांनीं ती हातीं लागली आहे, अशा प्रकारचें त्या स्मृतीचें अस्तित्व सिद्ध करावयाचें असें दोघांच्याहि विचारानें नक्की ठरलें.

## प्रकरण दहावें.

### वंदावध.

अशा प्रकारच्या देशसेवेच्या महत्कृत्यांत भद्रंभद्र अगदीं निमग्न असतां अमदावादेहून अगदीं घावरवून सोडणारी अशी हकीगत एकाएकीं समजली. आह्मी मुंबईत धर्मचर्चा आणि शास्त्रविवाद यांचे आनंदांत तल्लीन होऊन दिवस काढित असतां आमच्या कधीं स्वप्नांतहि आलें नाहीं, कीं, घराकडे असा कांहीं गोंधळ माजून राहिला असेल ! या सृष्टीची रचनाच अशी कांहीं विचित्र आहे, कीं, आपण मोठ्या गहन विषयांचीच चर्चा करित असावें, तों आपणांस माहीत नाहींत अशा नवीनच गोष्टी प्रत्यक्ष घडून येतात, आणि यामुळेंच विवर्तवादांत ज्ञान आणि अज्ञान यांत पारमार्थिक भेद सांगितलेला आहे. निदान आणखी एक वर्ष तरी मुंबईस रहावें, असा भद्रंभद्राचा विचार होता; आणि प्रसन्नमनशंकराकडील आदरातिथ्य दिवसेंदिवस मंदावत चालल्यामुळें तो निराळेंच बिऱ्हाड पाहण्याच्या विचारांत होता. कारण, मग त्या ठिकाणीं आपल्याला स्वयंतेजानेंच प्रकाशमान होतां येईल, व भक्तमंडळालाहि आपल्याबद्दलच पूर्ण पूज्यता वाटूं लागेल. परंतु कोण जाणे, हें तेज नष्ट व्हावयाचें असेल ! किंवा भक्ति शिथिल पडावयाची असेल ! किंवा आपली सर्वच योजना धुळीस मिळावयाची असेल ! आमचे सर्व विचार एकदम बदलावे लागले. घराहून अशी चित्ताला व्यग्र करून टाकणारी हकीगत कळल्यावर देखील परदेशांत रहावें, अशाला शास्त्रांत प्रमाण नाहीं. घराकडील मंडळी पण अशी खप्पी, कीं, हातचा डाव निघून गेला तरीसुद्धां आह्मांला कांहींएक खबर कळविली नाहीं ! परदेशांत उगाच कशाला असली गोष्ट कळवावी आणि आम्हांला काळजींत पाडावें, असा त्यांनीं विचार केला असेल; परंतु त्यामुळें आमची मात्र काळजी हजारपटीनें वाढली.

प्रसन्नमनशंकराचा वाढदिवस असल्यामुळें मिष्टान्न भोजन तयार केलेलें होतें; सर्वांची स्नानसंध्या आटोपली होती; मात्र कुशलवपुशंकराच्या दीड प्रहर चालणाऱ्या लांबलचक संध्येमुळें माझ्या पोटांत भुकेनें अगदीं धुमाकूळ मांडला होता; मोदकांच्या ताटाचा संकल्प सोडण्याची तयारी झाली, इतक्यांत टपालाच्या शिपायानें कांहीं पत्रें आणिलीं. भद्रंभद्राच्या नांवावर अमदावादेहून सुमारें पंचवीस पत्रें आलीं होतीं. पैकीं एकावरसुद्धां 'कुशल' 'खुशाली' असें कांहीं एक

लिहिलेलें नव्हतें. सर्वांवर बहुतकरून ' जरूर, जरूर ' ' जरूरीचें असे ' ' फार फार जरूर ' वगैरे अमंगल सूचक शब्द होते. म्लेंच्छादिकांच्या स्पर्शानें अपवित्र झाल्यामुळें तीं शुद्ध करून घेण्याकरितां एक स्वतंत्र मातीचें मडकें याच कामाकरितां पाण्यानें भरून व त्यांत थोडें गोमूत्र टाकून ठेवलेलें असे. त्यांत तीं सर्व पत्रें बुडवून काढून नंतर वैश्वदेवाचे कुंडावर शेकवून वाळविलीं. नंतर भद्रंभद्रानें एकएक उघडून वाचण्यास सुरुवात केली. प्रथमतः त्याच्या चेहऱ्यावर आतुरतेची छाया दिसूं लागली. नंतर तो जरा दचकल्यासारखा वाटला. गालाला चिरम्या पडल्या, तोंड अगदीं उतरून गेलें, डोळ्यांतून उष्णोदक वाहूं लागलें. हातांतलें पत्र खालीं जमिनीवर हापटलें, पुन्हा वर उचललें, पुन्हा खालीं टाकिलें. दुसरें पत्र वाचूं लागला तेव्हां पण हीच स्थिति. तिसरें उघडलें—मोठा उच्छ्वास सोडला. आम्ही सर्वजण अगदीं घाबरून गेलों. पक्वान्नें निवून जातील व मग त्यांस रुचि राहणार नाहीं, अशी धास्ती वाटूं लागली. कदाचित् कोणाला आंघोळी कराव्या लागतील आणि मग पाणी तापवून स्नानें होतपर्यंत किती वेळ जाईल याबद्दलहि मनांत काळजी उत्पन्न झाली. इतक्यांत भद्रंभद्र उठून उभा राहिला व जमिनीवर पाय आपटून आणि दांतओंठ खाऊन म्हणाला " याला काय उपाय करावा ? पक्षपात तर आपल्या हातून होणारच नाहीं ! मग तो माझा बाप कां असेना ! मी कांहीं आर्यपक्ष उगाच नाहीं उचलून धरला आहे. माझ्या अंगाचा अगदीं तिळपापड उडून गेला आहे. माझ्यानें आतां एक शब्द देखील बोलवत नाहीं. अंबाराम, घे तें पत्र आणि दाखीव सर्वांनां वाचून."

प्रसन्नमनशंकराची ती गंभीर मुद्रा या सुमारास मोदकांवरची आपली टक लावून बसलेली दृष्टी काढून घेऊन मजकडे वळली. खिरींत कोळसा पडावा, त्याप्रमाणें विस्मय आणि जिज्ञासा यांचा संयोग दिसूं लागला. पत्रें वाचून त्यांतला आशय मीं सर्वांनां सांगितला, कीं, " भद्रंभद्राचा भाचा मगन हा एकादशीचे दिवशीं रात्रीं दिव्याजवळ अभ्यास करित बसला होता इतक्यांत एक घाबरलेला वंदा ओटीवर येऊन दिव्याच्या आणि मगनच्या आजूबाजूस उड्या मारूं लागला. मगनच्या पुस्तकावर, डोक्यावर, दिव्यावर असा अनेक ठिकाणीं उडून वसूं लागला व त्याच्या पंखांचा फडफडाट सुरू झाला. त्याच्या लांब मिशांनां समईतील तेल लागलें होतें त्याचे डाग जेथें वसेल तेथें पडूं लागले. या ठिकाणीं मगन एकटाच होता. जगतांत सर्व कोणी एकएकटेच असतात हें तो विसरून गेला, भिऊं लागला. शिवोहं या शब्दानें आनंद मानणारा कधीं भीति नाहीं हें त्याच्या

ध्यानांतच आलें नाहीं. घाबरला आणि अगदीं गडबडून गेला. तत्वज्ञानाची इच्छा करणारांनां सर्वत्र समचित्त रहावें लागतें, हा उपदेश त्याला केलेला नसल्यामुळेंच हा पेंच येऊन पडला. अमंगल प्रकार घडून आला. दुर्भाग्य रात्रे नाशकर संयोगे, त्याची बुद्धि क्षीण होऊन मति भ्रष्ट झाली. त्याचा आत्मा विनष्ट झाला. रूढि काय म्हणते याचा त्यानें विचार केला नाहीं. बहिष्काराची कल्पनाहि मनांत आणिली नाहीं. वेदवाक्यांची आठवण केली नाहीं. कुळाला कलंक लावण्याकरितां दुर्बुद्धीनें त्या वंद्यावर फडकें टाकिलें, त्याला हातांत धरला, आणि खिडकींतून खालीं टाकून दिला. खालीं एक भाटी भुकेनें व्याकूळ होऊन अगदीं टक लावून बसली होती. वंदा पडल्याचा आवाज ऐकतांच तिनें त्याच्यावर झडप घालून पटदिशीं त्याला खाऊन टाकला. अब्रह्मण्यम्! अब्रह्मण्यम्! दुर्दैवी मगन पुढें काय झालें तें न पाहतां आपला पुन्हा वाचूं लागला. पण सोमेश्वर भटजी घरांत सांपडलेला साप चिमट्यानें पकडून शेजाऱ्याच्या ओटयावर गुपचिप सोडून देण्याकरितां आला होता. म्युनिसिपालिटीच्या दिव्याच्या उजेडानें त्याच्या नजरेस हा अनर्थ पडला. तो धावत येऊन मगनच्या घरांत शिरला. मगनच्या आईवर ओरडला. दोघांवर घसरा केला. धमकावलें. मागच्यापुढच्या उखाळयापाखाळ्या काढल्या, व ओरडाआरड चालविली. आळींतील लोक जमा झाले. मगनला सात स्नानें करावयास लाविलीं. जानवीं बदलावयास सांगितलें. उपाध्येबुवा आले. पण मगनचा भाऊ इंग्रजी शिकलला होता तो पुढें झाला. सोमेश्वरभट घरांत शिरला होता त्याला परवानगीवांचून तो आंत आल्याच्या गुन्ह्यावरून व शिवीगाळ केल्याबद्दल फिर्याद करितों ह्मणून त्यानें दम दिला व पोलीसच्या शिपायास बोलावून आणून सोमेश्वरभटाला घरांतून बाहेर काढिला. मगनला जानवींबिनवीं कांहीं बदलूं नको ह्मणून सांगितलें. बाजारांतसुद्धां याचीच चर्चा चालू झाली. एका वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालें, कीं, मगननें उंदीर शिजवून खाल्ला. दुसऱ्या एका पत्रांत प्रसिद्ध झालें, कीं, मांजराला अंगावर पिटाळून भोमाडांतील सापाचा खून करविला. कोणीं प्रसिद्ध केलें, कीं, मगननें बंदुकीची गोळी घालून साप मारिला. सर्व अमदाबादभर अगदीं हाहाःकार उडून गेला. जातवाल्यांचे मतें सर्व जगभर हाहाःकार माजून राहिला आहे! हिंदुस्थानची पुण्याई पुरी जाहली, असे उद्गार निघूं लागले. अमदाबादेंतील अन्नछत्रें बंद पडलीं. ज्ञातिभोजनें बंद राहिलीं. नदीच्या बाजूवर सकाळच्या प्रहरीं उपाशीं ब्राह्मणांची गर्दी वाढत चालली. शहरांत रात्रीच्या चोऱ्या होऊं लागल्या. भद्रंभद्राचे

जातवाले जिकडे तिकडे जमूं लागले. आतां पुढें काय करावयाचें, याचा विचार करण्यांत बरेच दिवस निघून गेले, पण निश्चित असें कांहींच ठरेना. सर्वांचें ह्मणणें हेंच कीं, मगनला वाळींत टाका. भद्रंभद्राला या सर्व भानगडींमुळें अमदावादला गेल्याशिवाय सुटकाच नव्हती.

ही सर्व हकीगत ऐकून प्रसन्नमनशंकरानेंसुद्धां आह्मांला हीच सल्ला दिली, कीं, विलंब न लावितां एकदम अमदाबादेस निघून जावें. रात्रीच्याच गाडीनें निघण्याचें ठरविलें. पोटांतली भूक बहुतेक मेलीच होती; पण प्रसन्नमनशंकराला वाईट वाटूं नये ह्मणून कसेंबसें करून सरासरी दहा दहा लाडू खाऊन उठलों. मुंबईत हातीं घेतलेलें काम तसेंच अर्धवट सोडून द्यावें लागलें. शिंगाडे आणि धूम्रपुराण यांच्याबद्दलचा निर्णय ठरविण्याचेंहि तसेंच राहिलें. अजूनसुद्धां मुंबईत निरनिराळ्या ठिकाणीं व्याख्यानें देऊन दुष्ट सुधारकांचा संपूर्ण पराभव करण्याची भद्रंभद्राची इच्छा होती; पण मनांत आणावें एक, आणि घडून येतें भलतेंच, तसें हें झालें! '**रूढिप्रशंसे**'चें प्रकरण तसेंच अपुरें ठेवावें लागलें. या कामांत भद्रंभद्र इतका गुंतून गेला होता, शास्त्रार्थांची चर्चा करण्यांत इतका निमग्न झाला होता, कीं, वर्तमानपत्रें वाचण्यास त्याला वेळच मिळत नसे. वाचता तर अमदावादची कांहीं बातमी मिळाली असती; पण हा कधीं घराच्या बाहेरसुद्धां पडत नसे. पण आतां दुसरेंच शुष्ककाष्ठ पाठीशीं लागलें. एकदा हरजीवनचा पत्ता काढावा आणि तो खरोखरच लुच्चा असेल तर त्याचें तें सर्व पाखंड बाहेर काढावें, अशी भद्रंभद्राची फार फार इच्छा होती; पण आतां वेळच उरला नाहीं. होता वेळ तेवढ्यांत एकदोन शास्त्र्यांची भेट घेऊन वाद-विषयक बाबीबद्दल शास्त्रवचनें विचारून तीं त्यानें लिहून घेतलीं.

रात्रीं अमदाबादच्या गाडींत बसून निघालों. गाडी चालू झाली तेव्हां भद्रंभद्र म्हणाला "अंबाराम, ही संसारयात्रा किती विचित्र आहे! कोणत्या उमेदीनें मी मुंबईस आलों होतों, आणि कोणत्या स्थितींत मी मुंबईहून आज परत जात आहें! सिद्धपुरुष आहेत ते संपत्तीच्या आणि विपत्तीच्या स्थितींत एकरूपच असतात, त्याप्रमाणें मीहि त्या स्थितीला अनुसरूनच वागत आहें, प्रवास करतों आहें, आणि इतर माणसांसारखाच दिसतों आहें! साधारण मनुष्याला विपत्ति आली तर कोण जाणे त्याची काय स्थिति होईल! पण खात्री असूंदे, कीं, मी आपल्या कर्तव्याला कधींहि पाठ दाखविणार नाहीं, अगदीं स्थिर राहीन. विपत्तीला कधींहि भिणार नाहीं. यजमान मरण पावला तरी ब्राह्मण ज्याप्रमाणें

मोदकादिकांची अगर दक्षणेची आशा सोडित नाहीं, मांजरानें झडप घातली तरी उंदीर जसा जिवाची आशा सोडित नाहीं, सूर्य अस्तास गेला तरी घुबड ज्याप्रमाणें आपल्या आनंदांत बिलकुल कमीपणा मानित नाहीं, त्याप्रमाणें मीसुद्धां आपल्या वृत्तींत स्थिर राहीन. आर्यधर्माचा पक्ष मी कधींहि सोडणार नाहीं. सनातन धर्माची सिद्धि करीन, वेदधर्म प्रतिपादन करीन, आणि त्यांत मी आपली उन्नति साधून घेईन. पहा तर खरा माझा पराक्रम ! ”

लोभांत गुंतल्यामुळें ब्राह्मणाचें ज्ञान जसें अदृश्य होतें, तसें गाडीच्या घडघड होणाऱ्या आवाजांत भद्रंभद्राचें वरील भाषण हळुहळू अस्पष्ट होऊं लागलें. चिंतातुर असल्यामुळें आम्हांला म्हणण्यासारखी झोंप येत नव्हती, आणि म्हणून स्वस्थ आडवे पडून नीज न काढतां बसल्याबसल्याच डुलक्या खात आम्हीं रात्र काढली.

जेवल्यामुळें जशी क्षुधा नाहींशी होते, त्याप्रमाणेंच गाडी चालू असल्यामुळें रात्र केव्हां गेली, हें आम्हांला समजलें नाहीं. जडवादी पाश्चात्यांचे भ्रष्टपणाप्रमाणें, कोंबडा आरवलेला ऐकिला नाहीं तरी व शौचमुखमार्जन झालें नव्हतें तरी दिवस उगवून वर आला. दिवसाचा ताप वाढल्यामुळें अमदाबाद आली,कीं, अमदाबाद आली म्हणून दिवसाचा ताप वाढला, त्याची बरोबर समजूत पडेना. पण एवढें खास, कीं, त्याच कारणानें आमचें शरीर तापलें,एंजिन तापलें आणि जनावरांच्या पाठी तापल्या. आर्यधर्माचा चमत्कारच असा कांहीं विलक्षण आहे, कीं, एकाचा ताप सर्वांनां संतप्त करितो. आणि याकरितांच या वेळीं स्नान करण्याचें लिहिलें आहे. स्टेशनावर सर्व लोक बेफिकीरपणें इकडेतिकडे फिरत होते. आमच्याकडे नुसतें कोणी ढुंकूनसुद्धां पाहिलें नाहीं. कोणाच्या दृष्टिसुखाची तर आम्हीं आशाच सोडली होती. आमच्याकडे कोणी पाहात नाहींत असें पाहून आम्ही एकदाचे स्टेशनाच्या बाहेर पडलों.

भद्रंभद्राला वाटत होतें, कीं, स्टेशनावरच आपल्याला आंघोळ घालून शुद्ध करून घेण्याकरितां कोणी पाणी घेऊन येईल; परंतु तसें कांहींच झालें नाहीं. कोणी आलेला नाहीं अशी खात्री झाल्यावर त्यानें तर्क केला, कीं, मृत्युसारख्या अमंगल प्रसंगीं आपण जे जिवंत असतों त्यांनां अशौच येतें व त्याकरितांच त्यांनां मृताच्या नांवानें स्नान करावें लागतें; परंतु सुधारणेच्या मोहानें घडून आलेल्या या विचित्र प्रसंगीं भ्रष्टाकाराबद्दल जे मेलेले असतील त्यांनांच अशौच येतें आणि त्याकरितां त्या मृतांनांच स्नान घातलें पाहिजे. जिवंत असतील त्यांनां

जरूर नाहीं. असा नक्की शास्त्रार्थ ठरला, तेव्हां आह्मी घराकडे जाण्यास निघालों. रस्त्यांत चालतांना भद्रंभद्राचें मन वंदामय झालें होतें. घोडा गाडी भरधाव जातांना नजरेस पडलीं ह्मणजे वंदागाडी ह्मणून तो ओरडत असे. मला तर दहावीस वेळां अंबारामाचे बदली वंदाराम ह्मणाला. मुंबईहून निघाल्यापासून अमदाबादेला तो वंदावादच म्हणत होता. रस्त्यांत जरा कोठें दगड दिसला, कीं, तो वंदाच आहे असें समजून, त्याच्यावर पाय पडून तो चिरडूं नये म्हणून पागोटें हातानें दाबून धरून पट्‌दिशीं दोन पावलें पलीकडे पाऊल टाकून तो मोठ्या सावधपणानें चालत होता. माशीपासून कावळ्यापर्यंत पंख असून उडणारा प्राणी दिसला, कीं, तो वंदाच आहे असें वाटून फार सावधपणानें बाजूला सरून तो चालत होता.

शहरच्या दरवाजाशीं मुनिसिपालिटीच्या नाकेदारास मीं बोचकीं सोडून दाखवित होतों, तों तेवढ्या वेळांत सवड साधून भद्रंभद्रानें नाकेदारास विचारिलें, कीं, "या शहरांत किती वंदे राहतात, रोज किती नवे जन्मास येतात, त्यांची रोजची मृत्युसंख्या किती आहे, आणि या दरवाज्यांतून रोज त्यांचीं किती प्रेतें वाहून नेतात?"

नाकेदाराला एकाहि प्रश्नाचा जबाब देतां आला नाहीं. त्यामुळें भद्रंभद्राला फारच राग आला. " तूं मोफतचा हरामाचा पगार खातोस—नोकरी करतां येत नाहीं! सर्व कारकूनसुद्धां नोकरीला नालायक आहेत," वगैरे बरीच ओरडा-आरड करून शेवटीं त्यानें असें अनुमान काढलें, कीं, या सुधारकांच्या दाबदपट-शाहीमुळें आर्यधर्माला योग्य साहाय्य मिळत नाहीं. दरवाजांत उभे असलेले, किंवा ओझ्यांच्या तपासाकरितां अडकून राहिलेले यांपैकीं कोणीहि वंदावधा-विषयीं एक अक्षरसुद्धां बोलत नाहींत, हें पाहून भद्रंभद्राला फार आश्चर्य वाटलें. रागानें संतप्त झाल्यामुळें, खेदानें मंद आल्यामुळें, कौतुकानें अधिर झाल्यामुळें, व आश्चर्यानें चकीत झाल्यामुळें त्याच्या चेहऱ्यावर जरा नरमपणा दिसूं लागला. दोन—हांसडण्याकरितां तयार झालेल्या नाकेदाराचा, व मूढाप्रमाणें तोंडाकडे पहात राहिलेल्या इतर लोकांचा वाग्बाणांनीं पराभव करण्याचा त्यानें निश्चय केला. दरवाजांतून शहरांत प्रवेश करणारांनां प्रवेश करण्यापूर्वी वंदाविग्रहाबद्दल खरी माहिती असणें जरूर होतें. नाहीं तर त्यांच्याकडून पक्षपात होण्याचा संभव होता. सर्वांचें चित्त लागेल व सर्वांस ऐकूं येईल अशा जागीं उभें राहून एक व्याख्यान देण्याचा त्याचा विचार होता. एक गाडीवाला नाकेदारापासून चिठी आणण्या-

करितां गेला होता. तेव्हां त्याच्या गाडीवर उभें राहण्यास हरकत होण्यासारखी नव्हती. श्रीरामचंद्राचा अनुचर हनुमान याच्या चंचलतेचें स्मरण करून व त्याचेंच अनुकरण करून एकदम उड्डाण मारून तो गाडीवर चढला व गाडींत भरलेल्या तांदुळांच्या गोणांवर उभा राहून त्यानें भाषणास सुरुवात केली. तो ह्मणाला "हे आर्य हो! सांप्रत काळीं अनार्य जाहलेल्या आर्यांनों! दुर्दशेंत निमग्न होऊन रहावें असाच आपला संकल्प आहे काय? आर्यभूमीची पवित्रता आपल्याला निर्मूळ करावयाची आहे काय? वेदधर्माचें श्रेष्ठत्व विच्छिन्न करण्याची आपली इच्छा आहे काय? पाश्चात्यांच्या जडवादाच्या मोहांत सांपडून तुह्मी आर्यांच्या चैतन्यवादाची अवज्ञाच करणार काय? शहरांत रस्ते किती आहेत त्यांची मोजदाद मुनिसिपालिटी करिते; शहरांत मशिदा किती आहेत त्यांची मोजदाद सरकार करतें; व शहरांत नाणें किती आहे त्याची मोजदाद व्यापारी करतात. हें सर्व जगत् भासमय आहे, व सर्व वस्तु जड आहेत, हें कोणालाच समजत नाहीं काय? या जडवस्तूंची तुह्मी मोजदाद करितां, परंतु वंद्यासारख्या सचेतन प्राण्यांची मोजदाद कोणीच करित नाहींत काय? या कामाकडे कोणाचीच नजर जात नाहीं काय? त्यांची हत्या होत आहे तरीहि त्यांची मोजदाद कोणी करित नाहीं काय? जडवादाच्या मोहांत सांपडून सुधारक जरा भुलून गेले आहेत तरी सर्व जग असेंच भुलून जाणार आहे काय? चैतन्यवादाची जर अशी अवगणना होईल तर मुनिसिपालिटयांतील स्वराज्य काय कामाचें? आर्यपक्षाचे मंडळीला आशा होती, कीं, स्वराज्य झाल्यानंतर मुनिसिपालिटी देवळें बांधील, ज्ञातिभोजनें घालील, आणि महायज्ञ करील. अरे 'मुनिसिपालिटी' हें म्लेंच्छ नांव टाकून देऊन तिनें जर एखादें आर्यनाम धारण केलें असतें तर या धार्मिक आर्यांनां या म्लेंच्छ नांवाचा उच्चार केल्यामुळें पतित होऊन नित्य प्रायश्चित्ताची जरूरच पडली नसती. स्वराज्य जाहल्यावर सर्व म्लेंच्छ, यवन, शूद्र, चांडाळ वगैरे नोकरांनां काढून टाकून सर्व ठिकाणीं ब्राह्मणांची योजना झाली असती, तर केवढा मोठा स्वदेशाभिमान जागृत झाला असता! आर्यधर्माचा कसा जयजयकार झाला असता! आपण स्वराज्याला किती लायक ठरलों असतों! परंतु या ठिकाणींसुद्धां सुधारकांनीं आपला कावा साधलेला दिसतो! पहा! मुनिसिपालिटीचे हे पतित नोकर चैतन्यवादाची कशी अवगणना करित आहेत! आर्यपक्षवाद्यांचा कसा अनादर करित आहेत! म्लेंच्छ, यवनादिकांच्या सामानाला शिवून मागाहून कसे धार्मिक लोकांच्या सामानाला स्पर्श करून

भ्रष्ट करित आहेत ? हे जर एकाच्या सामानाला शिवल्यावर स्नान करून दुसऱ्याच्या सामानाला स्पर्श करते, तर काय मेले असते ? ते नरकांत पडोत अगर तुह्मी जाऊन पडा, त्याची मला अपेक्षा नाहीं. तुह्मी सर्व मनुष्य आहां. परंतु बिचाऱ्या वंद्यांची काय वाट ? त्यांच्या मृत्यूबद्दल म्युनिसिपालिटी कांहीं उपाय करणार नाहीं, पण तिच्याबरोबरच तुह्मीहि निर्दय होऊन स्वस्थ बसून राहणार काय ? त्यांच्या रक्षणाची तुह्मांला काळजीच नाहीं काय ? ”

हें भाषण ऐकण्यास गाडीच्या आजुबाजूस कांहीं लोक उभे होते. म्युनिसिपलिटीचे नोकर कांहीं अज्ञानामुळें, कांहीं आश्चर्य वाटून, व कांहीं रागावून भद्रंभद्राला त्रास देऊं लागले व त्यांनीं चावटपणा सुरू केला. पोलिसचा शिपाई त्याला खालीं उतरण्यास सांगत होता. गाडीवाला चिठी घेऊन आल्यावर वर येण्याचा धाक दाखवित होता. यामुळें बैल मात्र विनाकारण भडकले आणि गाडी घेऊन पळूं लागले.

भद्रंभद्र धर्मभ्रष्टपणाची चिंता सोडून स्थानभ्रष्ट होण्याचे बेतांत होता, तो चिकटून राहण्याचीच तजवीज करूं लागला. गाडीवाला मागून धावत चालला. पोलिसच्या शिपायांनींहि धावण्याचा आविर्भाव दाखवून हळुहळू चालत येऊन 'खडा रखो' ची गाडीमागून ओरड सुरू केली. लोकांनींहि टाळ्या वाजवून आणि हो हो करित गाडीच्या मागून धावण्यास सुरुवात केली. त्यामुळें बैल उभे करण्यास जास्तच कठिण गेलें. मला सामान घेऊन धावतां येणार नाहीं म्हणून मीं ओरडून सांगितलें, भद्रंभद्राला गाडीवरून उडी टाक म्हणून वारंवार विनंति केली, परंतु भद्रंभद्र हातवारे करून भाषण करितच होता—पण वंद्याचें, का बैलांचें, का आपलें स्वतःचें रक्षण करा म्हणून उपदेश करित होता तें त्या गोंगाटांत ऐकूंच येईना ! गाडीच्या मागून रस्त्यांतून जाणाऱ्या लोकांचा तर्कहि झपाट्यानें धावूं लागला. कोणी म्हणूं लागले, कीं, नाक्यावरची फी बुडवून हा पळून जात आहे. कोणी म्हणाले, गाडी वेठीला पकडलेली होती, पण हा निसटून पळून जात आहे. कोणी म्हणाले याच्या गाडीचें चाक एकाच्या पायावरून गेलें आणि त्याला इजा होऊन तो पडला आहे, म्हणून हा आपली गाडी पळवित आहे. कोणी म्हणाले, हा भोरपी आहे. कोणी म्हणाले, नाटकवाला आहे. याप्रमाणें सर्वांचा तर्क, त्यांच्या शंका, गंमत, आणि आश्चर्य यांनां पात्र झालेली भद्रंभद्राची गति कोठें कुंठित होणार, याबद्दल सूर्यचंद्रादिकांचीं गणितें करणारांनांहि सांगतां येणें शक्य नव्हतें ! परंतु गाडी एका दगडावर चढली आणि भद्रंभद्राला उतरण्याचे व उडी मारण्याचे

बिलकुल श्रम न पडतां तो झटक्यासरसा एकदम खालीं आला. धरणीमातेच्या कानांत कांहीं सांगून तो लागलाच उभा राहिला. अंग बरेंच ठेंचलें, तरी बिलकुल लागलें नाहीं असा बहाणा करून मुद्दाम विचारणारांच्या आशेचा त्यानें हिरमोड केला. बरींच शेलकीं विशेषणें देऊन लाखोलीला सुरुवात केलेल्या गाडीवाल्याचें मीं येऊन सांत्वन केलें, आणि त्याची समजी करून आम्ही घरीं गेलों.

## प्रकरण अकरावें.

## गोत जमा झालें.

रात्रीं मगनसंबंधाच्या प्रकरणाचा अखेर निकाल ठरविण्याकरितां जातींतील पुढारी जमावयाचे आहेत, ही बातमी भद्रंभद्राला समजल्यापासून जाहल्य गोष्टीबद्दल वाईट वाटत होतें त्याची त्याला विस्मृति पडली, आणि त्याचा पूर्वीचा उत्साह जागृत झाला. संध्याकाळच्या वेळीं गुलबाशा जशा फुलांनीं प्रफुल्लित होतात, त्याप्रमाणें शास्त्रवचनांनीं हा तयार होऊन बाहेर पडला. मगनला शेवटीं प्रायश्चित्त देऊन शुद्ध करून घ्यावा, असा त्याचा विचार ठरला होता; परंतु विरुद्ध-पक्षाच्या मंडळीचा असा बेत होता, कीं, चांगला जबर दंड घेऊन सर्व जातीला एक चांगलें जेवण मागावयाचें, एरवीं त्याला जातींत घ्यावयाचाच नाहीं. देवीच्या देवळांत रात्रीं नऊ वाजतां गोत जमा होण्याचें ठरलें होतें; परंतु दहा वाजेपर्यंत कोणीच आलें नाहीं. नंतर अकांचे सुमारास कांहीं फुटकळ फुटकळ मंडळी आली, परंतु कोणी आलेलें नाहीं असें पाहून ते आले तसे परत गेले. लहान मुलगे जोरानें घंटा बडवित होते. आणि मधून मधून ' जय जय ' असें ओरडत होते. त्यावरून आज देवळांत कांहीं तरी विशेष आहे, असें दिसत होतें. शेवटीं मंडळी जमूं लागली. जमलेल्या मंडळीनें बाहेरच्या आवारांतील कोनांत आपले जोडे नीट जपून ठेवण्याची योजना केली. कांहीं आंत बसून इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगूं लागले. कोणी बाहेर उभे राहून भद्रंभद्राकडे बोट दाखवून आपापसांत कांहीं बोलूं लागले. कांहीं उशीर झाला ह्मणून स्वतःशिवाय इतरांनां नांवें ठेवित होते. केळीं कशीं मिळतात ? येथून सुरुवात झाली. त्यावरून काची लोकांचा धंदा कमाईचा आहे किंवा नाहीं, यावर आलें. नंतर काची लोक चतुर कीं कुंभार चतुर, याबद्दल वादविवाद झाला. नंतर परिळांत आंबट वरण चांगलें लागतें कीं वाटींत चांगलें लागतें, याबद्दल शहानिशा झाली. नंतर चिनी-मातींचीं भांडीं किती दिवस टिकतात याबद्दलचा प्रत्येकाचा अनुभव पुढें सरसावला, आणि त्यावरून असा प्रश्न निघाला, कीं, चिनीमातीच्या पेल्यांतून चहा पिणें हें शास्त्रसंमत आहे कीं नाहीं ? वादविवाद चालतां चालतां " सुधारणा अतिशय बोकाळली आहे आणि त्यामुळें सर्वत्र भ्रष्टाकार माजला आहे, " असें एकजण म्हणाला. यावर दुसरा एकजण म्हणाला "हत्येला सुरुवात झालीच आहे. मांजर उंदराची शिकार करितें तर ब्राह्मण दुसरी कसली तरी शिकार करतात."

फक्त बंदा मारल्याचाच प्रश्न पुढें येण्यापर्यंत मजल येऊन ठेपली, आणि तेथें सर्वांचा मुक्काम झाला. पुढें सुरुवात करावी किंवा नाहीं, याचा खुलासा व्हावा ह्मणून एकमेक एकमेकांच्या तोंडाकडे पाहूं लागले. बोलतां बोलतां अकस्मात प्रस्तुत विषय निघाला ह्मणून मंडळी जरा अचंब्यांत पडली. इतक्यांत सोमेश्वर-भट कांहीं मंडळी घेऊन लगबगीनें आला.त्यानें कित्येकांच्या पायांवर पाय दिला, कित्येकांचीं पागोटीं पाडलीं, जागा करण्याकरितां कित्येकांनां धक्क्या मारून बाजूला केलें. हो ह्यो करतां करतां जरा बोलाचाली झाली, व शेवटीं हातापिटीवर आलें.

ही सर्व हकीगत भद्रंभद्र दूर उभा राहून शांतपणानें पाहत होता.तो आतां उठून उभा राहिला आणि सिंहासारखी गर्जना करून ह्मणाला " अहो दुराचारी, दुष्ट, पतित लोक हो! तुह्मी हा या देवीचा उपमर्द करित आहां याचें मला फारसें वाईट वाटत नाहीं; परंतु ब्राह्मणाच्या नांवाला कलंक लावित आहां तेव्हां तुह्मांला काय ह्मणावें ? तुह्मांला कोणीं ब्राह्मण बनविलें ? तुह्मांला दुसरे ब्राह्मण आहेत किंवा नाहींत याचा निकाल ठरविण्याला कोणीं लायक ठरविलें ? आधीं स्वतःचें मूळ तर तपासा ! "

हें सर्व कोणत्याहि विवक्षित व्यक्तीचें नांव घेऊन तो बोलला नव्हता. पण हें बोलणाराकडे सर्वांचें लक्ष्य लागलेलें पाहून सोमेश्वरानें जबाब दिला,कीं,"ब्राह्मण हे कांहीं आजकालचे नव्हत. पण तुझा बाप चांभारवाड्यांत ठेंच लागून पडला आणि मेला आणि त्याच्या तेराव्याची धुळधाण झाली त्याच्या आधींचे हे ब्राह्मण आहेत ! परीक्षा घेऊनच ब्राह्मण ठरवावयाचे होते तर आज सर्वांची खुशामत करण्याला येथें कशाला आलेत ? "

भद्रंभद्राचे बाजूचा एकजण उठून म्हणाला " आम्ही येथें खुशामत करण्या-करितां आलेलों नाहीं, फक्त शास्त्रार्थ ठरविण्याकरितांच आलेलों आहों.एक मनुष्य म्हणजे कांहीं जात नव्हे, कीं, त्याची सत्ता सर्वांवर चालेल. अपघातानें कोण कोठें मेला, अगर कोणीं कोणाबरोबर तंटा केला, या कांहीं मोठ्या महत्त्वाच्या गोष्टी नव्हत. असें असेल तर कोणाचा काका दारू पिऊन छाकटा झाला आणि गटारांत पडून मेला, तर मग त्याचें काय करावयाचें ? देवीच्या नांवानें दारू प्याला असला तर तो काय पवित्र ? "

हें ऐकतांच सोमेश्वराचा एक भाऊबंद कांचा भिडवून दंड ठोकून उभा राहिला आणि मोठ्यानें ओरडून ह्मणाला "कुस्ती करावयाची असली तर चल ये पुढें ! "

हा प्रकार पाहून एक वृद्ध गृहस्थ ह्मणाले "कोणाचें कांहीं छिद्र असेल तर कोणाचें कांहीं असेल. हीं छिद्रें पुढें येऊन जर तक्रारीवर आलें तर कोणालाच जातींत थारा मिळणार नाहीं. करितां मारामारीचा विचार सोडून द्या. आज या ठिकाणीं जात कां जमली आहे तें अजून बरोबर बाहेर आलेलें नाहीं. तुळशीरामाचा मुलगा मगन यानें हत्त्या करविली त्याकरितां त्याला जातीबाहेर टाकावयाचा आहे. यांत शास्त्रार्थ तो कसला ? असें कोणाचें ह्मणणें आहे काय कीं, हत्त्या झालींच नाहीं ?"

यावर दुसऱ्या एका ब्राह्मणानें बसल्याबसल्याच उत्तर दिलें "शास्त्र शोधावयाचें तर मग जातीला कशाला विचारावयाला पाहिजे होतें ? आह्मांला वेदशास्त्र, पुराणें वाचतां येत नसलीं ह्मणून काय आमचा जातींत समावेश होत नाहीं कीं काय ? ज्यांनां शास्त्र समजतें तेच काय तेवढे डुढ्ढाचार्य ! मगनला तर जातीबाहेर टाकलेलेंच आहे. मग पाहून घेऊं तो कसा न्यातींत कोणाकडे जेवावयास जातो तो !"

भद्रंभद्र अगदीं संतापून म्हणाला " हें काय कलियुग आहे, कीं, कलियुगाचा बाप आहे ? ब्राह्मणांच्याच तोंडून शास्त्रांचा असा अनादर होऊं लागला, तर जानवीं घालण्यांत तरी काय विशेष, आणि मोदक खाण्यांत तरी काय तृप्ती ? असें नका समजूं, कीं, वेदधर्म आजच नष्ट झाला ! शास्त्राची जागा तर्कांनें कधींहि भरून निघणार नाहीं. शास्त्रार्थाची जर जरूरी नसती, तर वेद इंग्रजींत अगर उर्दूंत नसते का लिहून ठेवले ? शास्त्रार्थाची जरूर नसती, तर मनु, व्यास, इत्यादि ऋषींनीं श्रुतिस्मृतींच्या बदली अंकलिप्या नसत्या का लिहून काढल्या ? शास्त्रार्थाची जरूर नसती तर स्वर्गांतील वैतरणा नदी गाईचें शेंपूट धरून उतरून जावी लागते त्याच्या ऐवजीं तिच्यावर पूल बांधून आगगाडींतून नसते का बसून जातां आलें ? आणि मग नसती का सर्वांचीच सोय झाली ? मी साफ सांगतों, कीं, शास्त्र पाहण्याची जरूर नाहीं असें म्हणणारांनांच प्रथम प्रायश्चित्त दिलें पाहिजे. शास्त्रार्थ म्हणजे कांहीं वाटेवर पडला नाहीं ! फें फें उडेल ! शास्त्राच्या कामांत मी म्हणजे बाभळीचें झाड आहें. जवळ आलेत आणि कांटा रुपला म्हणजे जाल पळून ! मला चेतवाल तर माझा ताप कोणालाच सहन करवणार नाहीं. याचें कोणी उत्तर द्या, कीं, मगननें काय पातक केलें आहे ? हिंसा केली ! श्रीकृष्णपरमात्म्यानें श्रीमद्भगवद्गीतेमध्यें असें सांगितलें आहे, कीं, आत्मा कोणाला मारित नाहीं, आणि कोणाकडून मारलाहि

जात नाहीं. तो अलिप्त असून अवध्य आहे. तर मग कोणीं कोणाची हिंसा केली? या तत्वाप्रमाणें विचार करून ज्ञानी तर खून म्हणजे पातकच समजत नाहींत. मनुस्मृतींत स्पष्ट सांगितलें आहे, कीं, यज्ञाकरितां पशु मारलाच पाहिजे, न मारला तर पातक लागेल. कोणते कोणते पशू खावे आणि कोणते खाऊं नयेत, याबद्दल सविस्तर माहिती नवव्या अध्यायांत सांगितलेली आहे. त्याच्या शरीराचे कापून कापून जे भाग निघतात त्यांची त्यांत गणती केलेली आहे, आणि त्यांच्या उपयोगाचा विधीहि सांगितलेला आहे. मग काय तुमचा वेदांवर विश्वासच नाहीं? बुद्धानें अहिंसेचा उपदेश केला तो तरी हिंसा होत होती म्हणूनच;नाहीं तर तो काय उगाच शुष्क ओरडाआरड करता? रूढि त्याच्या विरुद्ध आहे आणि ती मला मान्यहि आहे. आणि सुधारक आणि पाश्चात्य लोक यांच्या बरोबर जर वादविवाद करण्याची पाळी आली तर मी वाटेल तसें सिद्ध करून देईन, कीं,वेद आणि शास्त्रें यांत हिंसेचें नांवसुद्धां नाहीं. पण खरेंच बोलण्याची वेळ आली म्हणजे बोलावें लागतें. ब्राह्मण ब्राह्मणाची हजामत करूं शकेल काय? पोरें आहेत, सहज चुकून कांहीं दोष घडला असेल तर जानवें बदललें म्हणजे झालें! पण ही धांदल काय?"

हें सर्व ऐकून सोमेश्वभटजी बोलावयास उठले. ते ह्मणाले "असें जानवीं बदलून भागावयाचें नाहीं. जानवें बदललें आणि भटाला दक्षणा दिली यांत जातीला काय लाभ! दोन जेवणें, आणि सर्व भूदेवांनां चांगली दक्षणा मिळण्याची व्यवस्था होणार नाहीं, तर या सर्व उठाठेवींचा उपयोग काय? लग्नसराई जरा मंद आहे तेव्हां तो तोटा भरून काढण्याचा योग आला आहे. त्याची आशा नसती तर कोण बेफायदा जागरण करणार होता? मगनला जातींत घ्यावयाचें तरी आमचें काय अडलें होतें? जोडा फाडफाडून जातवाल्यांच्या घरोघर हिंडावें तेव्हां कोठें विचार करण्याकरितां जात जमते. तसें करण्याचा प्रसंग न येतां आज सहज आपला चांभाराचा खर्च वांचला ह्मणून काय आमच्या पोटरूपी चांभाराला, मोदकरूपी जोडा, दांतरूपी आरीनें शिवण्यापुरताहि योग येऊं नये काय? ह्मणे मगननें पातकच केलें नाहीं! पण कोणीं पाप केलें किंवा नाहीं त्याची आह्मी पंचाईत करित बसत नाहीं. लोक पातक करूं लागले तर त्यांनां आडवें यावें हें जातीचें काम नाहीं. चोरी करून कैदेंत पडलेल्या ब्राह्मणांनां जाती-बाहेर टाकिलें असें कधीं ऐकिलें आहे काय? पण ब्राह्मण असून वाण्याच्या हातचें प्याला तर मात्र जात त्याला वाळींत टाकते. यांतच धर्म आहे, आणि धर्म

पाळणें हें जातीचें काम आहे, अर्थात् त्यांत शास्त्र पाहण्याचें कामच नाहीं. शास्त्र शास्त्र ह्मणून ओरडतो आहे, पण याचा बाप भडोचहून गोव्यास नावेंत वसून गेला त्या वेळेस शास्त्र काय झोंप घेत घोरत पडलें होतें? मोठा शास्त्री होता, पण दक्षणा बुडूं नये ह्मणून नौकागमन आणि समुद्रपर्यटण केलें! कोणीं बोललें नाहीं! कां, तर त्याच्या काकाची जमात त्या वेळीं फार मोठी होती. आणि रास्तच आहे— ज्याची जमात त्याची करामत--त्याचें शास्त्र--आणि त्याची रूढि! मगनला प्रायश्चित्त देऊन जातींत घ्यावयाचा असेल तर मग तो शंभर वेळां कां हत्या करीना? दंडादाखल पैसे देत नसला तरीसुद्धां जातींत घ्यावा असें कोणत्या शास्त्रांत लिहिलेलें आहे?"

मगनचा भाऊ या दोघांपैकीं कोणत्याहि पक्षांत सामील झाला नव्हता. भद्रंभद्राची सामदामाची युक्तीहि त्याला पसंत नव्हती. तो उभा राहून ह्मणाला "प्रेत फाडून खाण्याकरितां कोल्हीं जमलीं आहेत, पण जरा डोळे उघडून पाहतील तर दिसेल प्रेत आहे का जिवंत प्राणी आहे तें! पण डोळे उघडून पाहिलें तर खाण्याचा विचार बदलावा लागेल, ह्मणून आंधळ्याचें सोंग घेऊन खाण्याचीच सुरुवात करणार कीं काय नकळे! एक ह्मणतो, जातीच्या बाहेर टाका. दुसरा ह्मणतो, प्रायश्चित्त द्या. तिसरा ह्मणतो, जानवीं बदला. पण कोणीं पुढें येऊन असें तर सांगावें, कीं, अमुक एक पातक घडलें आहे म्हणून! मगननें स्वतः तर हत्या केलेलीच नाहीं. आणि कदाचित केली असली तरी मी ह्मणतों, हे जे सर्व लोक येथें बसले आहेत त्यांनीं जन्मास आल्यापासून आजपर्यंत केलेल्या हत्यांबद्दल विचार करण्याकरितां कधीं जात जमली होती काय? बकरे, पाडे, मारणारे देवीभक्त शुद्ध होऊन बसले आहेत त्यांनाच विचारा, कीं, कोणतें धर्मकृत्य केल्यामुळें तुह्मी जातींत राहिलां आहां? अरे, जनावरांचीच हत्या काय, पण बालहत्या, भ्रूणहत्या, करणारी मंडळीसुद्धां सर्वांनां माहीत आहे. त्यांनां कोणीच विचारित नाहीं, आणि मगनलाच काय ह्मणून विचारतां आहां? मगनचा काय अपराध आहे तो तर सांगा? का शास्त्राप्रमाणें अपराध घडला आहे, का रूढीप्रमाणें? शास्त्रहि कोणी जाणत नाहीं आणि रूढीहि कोणी पाळित नाहीं! भिक्षुकांनां लागली आहे गोड गोड खाण्याची चटक, मोफतचा हात मारण्याची झाली आहे इच्छा. मी हा मीच असलों तर खरोखर यांनां फुकटच्या भाकऱ्या खायला लावीन! चला, व्हा चालते! मगन प्रायश्चित्त तर घेणारच नाहीं, पण त्याच्यावर वाळीतहि नाहीं."

थोडेंसें शिकलेला, थोडाबहुत व्यापार करणारा, थोडीबहुत हांजी हांजी करणारा आणि बहुतेक परान्नावर पुष्ट बनलेला असा विरुद्धपक्षाकडील एक ब्राह्मण जबाब देण्याकरितां उभा राहिला. तो ह्मणाला "वाळींत आहे किंवा नाहीं तें वेळ येईल तेव्हां समजून येईल ! जातीनें तर जातीबाहेर टाकलाच आहे. पशुहत्त्या अगर बालहत्त्या करणारे कोणी असल्याचें आह्मांला माहीत नाहीं. तसे कोणी असते तर त्यांनां तेव्हांच जातीबाहेर टाकले असते. असल्या कृत्यांबद्दल आजपर्यंत कोणालाहि वाळींत टाकल्याचें माहीत नाहीं, यावरूनच असें ठरतें, कीं, आजपर्यंत असें कोणीं केलेंच नाहीं. हिंसा शास्त्रसंमत आहे असें ह्मणणारा अपवित्र आहे. हिंसेसारखें दुष्ट कृत्य वेदांत लिहिलेलें सांपडेल तर वेद मग ईश्वरप्रणीत कसले ? ते ईश्वरप्रणीत नाहींत असें कसें ह्मणतां येईल ? आणि तसें ह्मणतां आलें तर मग आर्यधर्माची उलथापालथच झाली ह्मणावयाची ! सनातनधर्माचें रक्षण तर बाजूलाच राहील, पण उलटी लोकांची अप्रीति मात्र वाढेल आणि अशा प्रकारची शोधक बुद्धि सुधारकांनां इष्टच होईल. करितां आपलें ठाम मत असेंच असलें पाहिजे, कीं, वेदांत हिंसा लिहिलेली नाहींच ! लिहिलेली आहे असें कोणी दाखवील तर त्याला सांगावें, कीं, वेदांत हिंसा आहे असें जे ह्मणतो त्याला वेद समजतच नाहींत ! सुधारक असें ह्मणतात कीं, तुपानें अन्नशुद्धि करावी असें वेदांत सांगितलेलें नाहीं. मग काय आह्मीं तूप खाण्याचें सोडून द्यावें? वेदांत लिहिलेलें नाहीं असें कधींच होणार नाहीं ! करितां असें कधींच ह्मणतां येणार नाहीं, कीं, वेद हे ईश्वरप्रणीत नाहींत. ज्याला अन्नशुद्धि समजत नाहीं त्याला वेद समजत नाहींत, असेंच खास. वेदशास्त्रें ह्मणजे कामधेनु आहे. त्यांतून जें पाहिजे तें काढून दाखवितां येतें. मग अन्नशुद्धि नाहीं का सांपडणार? कोणालाहि ब्राह्मणाची दयाच येणार नाहीं काय? पहा ! केवळ ब्राह्मणांवर दया करण्याकरितांच वेदांत लिहिलेलें आहे, कीं, विलायती यंत्रांना चरबीचा उपयोग करावा आणि त्याकरितां हिंसा बंद करूं नये. कारण, चरबीबद्दल जर ते तुपाचा उपयोग करूं लागले तर तूप फारच महाग होईल, आणि ब्राह्मणांला मग कोणीच पक्वान्नें वगैर तयार करून वाढणार नाहीं ! भक्ष्य आणि यज्ञ यांच्याकरितां पशुवध करणें यांत कांहीं द्रव्यप्राप्ति नाहीं. याकरितां त्या कामांत होत असलेली हिंसा मात्र बंदच केली पाहिजे."

शास्त्राचें एक अक्षरहि माहीत नसून 'शास्त्रीबुवा' ह्मणून डौल मिरवणारे एक गृहस्थ ह्मणाले "कांहीं एक माहिती नसतां कांहीं शहाणे सांगतात, कीं, यज्ञांत

पशुवध सांगितलेला आहे; परंतु वेदांत ज्या ठिकाणीं पशु, अज, छावा, अश्व, गौ, वत्स, नर, मांस, मेद, वपा हे शब्द आलेले आहेत, त्या त्या ठिकाणीं त्यांचा अर्थ अक्षता असाच करावयाचा आहे. फार फार तर नारळ अगर खोबऱ्याच्या करंज्या, इतकाच अर्थ होईल. माशी हांकली तर ह्मणे वाघ मारला ! त्यांतलाच हा प्रकार आहे. त्याचें प्रमाणच कोणाला पहावयाचें असलें तर तपासून पहावें ! मनोमन साक्ष ! आणि खरोखरच कधीं कोणी पशुवध करित असले तर ते असे महान तपस्वी असले पाहिजेत, कीं, त्यांनीं पशु वध करून भक्षण केल्यानंतर पुन्हा त्याला जिवंत करून सोडण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं असलें पाहिजे. बारीक बारीक झालेले तुकडे जिवंत करितांना पुन्हा योग्य ठिकाणीं एकत्र कसे होत, हें कलियुगांत समजणें फार कठिण आहे; परंतु पूर्वींच्या युगाची गोष्ट निराळी होती. आज प्रत्यक्ष ईश्वरालासुद्धां असले चमत्कार करून दाखवितां येणार नाहींत. ईश्वराला एकवार जो मेला तो मेलाच. पुन्हा जिवंत करितां येणें शक्यच नाहीं. मेलेल्याला जिवंत करून पुन्हा वसला करावयाचा ही शक्ति पूर्वयुगांतील पशुभक्षण केलेल्या ऋषिवर्गांतच दिसून येते. या युगांत तें शक्यच नाहीं. या युगांत शास्त्र ह्मणजे तोंडानें सांगण्यापुरतेंच. आचरण केवळ रूढीला धरूनच असलें पाहिजे.नाहीं तर जगाच्या उत्पत्तीपासून चालत आलेला धर्म तो सनातन धर्म कसला ? वास्तविक 'सनातनधर्म' ह्मणण्यापेक्षां 'सनातन रूढिधर्म ' ह्मणणेंच जास्त सोईचें आहे. ह्मणून रूढीच्या बाहेर जाणाराला प्रायश्चित्त पाहिजेच !"

यावर एक धष्टपुष्ट भटजी बसल्याबसल्याच ह्मणाले " जात जमलीच आहे. तेव्हां असा एक ठराव करून टाकावा, कीं, दूधपाकाचें जेवण असेल त्या ठिकाणीं द्रोण मोठेच असावेत.लहान द्रोण असले तर कांहीं दूधपाक कमी खपतो असें नाहीं. पण जेवणारांचा खोळंबा होतो आणि वारंवार मागावें लागतें—"

कपाळावर नाम ठोकलेले, कांसोटा मारलेले, शेंडी मोकळी टाकलेले, व उघडे बोडकेच आलेले एक भटजी मध्येंच ह्मणाले " दूधपाकाला असे लहान द्रोण ठेवणें हें कांहीं शास्त्रबाह्य नाहीं;परंतु अलीकडचे मुलगे साहेबलोकांप्रमाणें डोकें राखतात आणि शेंडी ठेवित नाहींत, हा अधर्म आहे खरा. वैतरणेंत बुडूं लागलें तर शेंडी नसल्यामुळें त्यांनां ओढून वर कसें काढतां येईल ? शेंडीला गांठ मारल्याशिवाय धर्मकृत्य अगर पुण्यकर्म,करतां येईल अशी कल्पना तरी शक्य आहे काय? आपल्या पूर्वजांनीं फार विचार करून शिखाबंधनविधि लिहून ठेविला आहे. जशी

शेंडीला गांठ मारावी तसा आंतड्यानां पीळ पडतो आणि त्यामुळें प्राणवायु खेंचला जातो व आगगाडीच्या इंजनाप्रमाणें आवाज निघूं लागतो व तो आवाज यमधर्माचे कचेरींत ऐकूं जातो आणि त्यामुळें त्या ठिकाणच्या विमानाच्या कारखान्यांतील कापड शिवलें जातें. आणि असें सर्व विमान शिवून तयार झालें ह्मणजे मरणकाळीं फक्त शेंडीला गांठ मारणारांनांच नेण्याकरितां तें अदृश्य रूपानें खालीं येतें आणि बाकीचे तसेच पडून राहतात. शेंडी न बांधणारांपैकीं स्वर्गांत गेल्याचें कोणीं कधीं ऐकिलें आहे काय? करितां, हा बंदोबस्त प्रथम झाला पाहिजे, कीं, ज्यांनीं डोकीं राखिलीं असतील त्यांनीं सवारुपाया दंड द्यावा, आणि क्षौर करावें. सुधारणा सुधारणा ह्मणजे कोठपर्यंत? आपले ऋषी दाढी राखीत, पण आतां मुसलमान, पार्शी, आणि इंग्रजलोक हे सर्वच दाढी राखतात. ह्मणून आपल्या लोकनां तो रिवाज सोडून द्यावा लागला. पण लांब शेंडी राखण्याचा आपल्या पूज्य ऋषिवर्यांचा मार्ग आपण सोडून द्यावा आणि परकी लोकांचा भ्रष्ट रिवाज सुरू करावा हें काय? आपल्यांत न्हाव्याचे घरीं जाणारे ब्राह्मण पुष्कळ आहेत. त्यांनींच न्हाव्यांनां ताकीद द्यावी आणि जो कोणी न्हावी ब्राह्मणाची शेंडी कातरील त्याच्या घरीं कोणत्याहि ब्राह्मणानें जाऊं नये."

भद्रंभद्रालाच उद्देशून हें बोलणें असल्यामुळें तो खाडकन उठला आणि म्हणाला "याकरितां आम्हीं आपली पिढ्यानपिढ्या चालत आलेली वृत्ती घालवावी आणि दक्षणा बुडवावी काय? खरा उपाय म्हटला म्हणजे हा आहे, कीं, ज्याला शेंडा नसेल त्याला जातींत जेवावयाला येऊं देऊं नये! या सगळ्या डोकें राखणारांनां तुम्ही राजरोसपणें जातींत जेवायाला घेतां, आणि मगनला घेणार नाहीं, याला का शास्त्र म्हणावयाचें, का रूढि म्हणावयाची, तें आतां कोणी तें पुढें येऊन सांगावें! पशुवधापेक्षां शिखाकर्तनांतच जास्त पातक आहे. कारण, शिखेमध्यें ब्रह्मतेज असतें, आणि शिखा कापली तर ब्रह्महत्त्येचें पातक लागतें. शास्त्र बाजूला ठेविलें तरी रूढिसुद्धां तशीच आहे. प्रथमतः शिखावध करणारांनां काय शिक्षा पाहिजे तें नक्की ठरवा आणि तीच शिक्षा मगनला करा. तें आपल्याला कबूल आहे. पण पहिल्यानें तें ठरल्या-शिवाय मगनचा निकाल नाहीं होणार!"

या निकालामुळें सर्वच गोंधळांत पडले. बऱ्याचजणांच्या नातलगाचे मुलांनीं डोकें राखलें होतें. मगनला हैराण करून सोडावें अशी सर्वांचीच इच्छा होती; परंतु आपलें संभाळून दुसऱ्याला हैराण करण्याचें काम फार कठीण होतें.

कोणी ह्मणाले " जात ज्या कामाकरितां जमलेली आहे त्याच कामाचा तिच्यापुढें विचार झाला पाहिज. दुसरे प्रश्न असतील तर त्याकरितां पुन्हा जात जमविली पाहिजे." कोणी ह्मणू लागले, "मगननें प्रायश्चित घेतलें ह्मणजे सर्व जात पावन झाली. मग कोणालाच प्रायश्चित्त घेण्याची जरूर नाहीं."

भद्रंभद्रानें हें सर्व ऐकून घेतलें आणि अशी शंका काढिली, कीं, " मगनला एकट्यालाच प्रायश्चित्त घेऊन शुद्ध होतां येणार नाहीं. त्याने वंद्याचा वध करविला त्यामुळें सर्व जात पतित झालेली आहे. करितां सर्व जातीनें प्रायश्चित्त घेतलें पाहिजे. मगननें एकट्यानेंच प्रायश्चित्त घेतल्यावर प्रायश्चित्त न घेतल्यामुळें जे शुद्ध झाले नसतील, त्यांच्या संसर्गानें मगन पुन्हा भ्रष्ट होईल. नंतर दुसरे लोक प्रायश्चित्त घेतील ते अशा प्रकारें पुन्हा भ्रष्ट झालेल्या मगनच्या संसर्गानें तेहि परत भ्रष्ट होतील, ह्मणून मगनला दुसऱ्यानें प्रायश्चित्त घ्यावें लागेल! असें हें रहाटगाडगें जगाच्या अंतापर्यंत चालू राहिल. चौऱ्यांशीं लक्ष योनी फिरून होतील पण प्रायश्चित्त संपणार नाहीं. करितां सर्वांनींच एकदम प्रायश्चित्त घ्यावें, हें उत्तम. शिवाय, शिखाकर्तन हें महान पातक आहे आणि वंद्यावध हें लहान पातक आहे. लहान पातकाबद्दल प्रायश्चित्त प्रथम घेतलें तर लहान आणि मोठें यांच्या अधिकारांत व्यतिक्रम केल्याप्रमाणें होईल, आणि तसें झालें ह्मणजे सुधारकांत आणि आपल्यांत फेर तो काय राहिला? पातकांतसुद्धां लहानमोठ्यांचा विचार केला पाहिजे. शिवाय, प्रायश्चित्त काय द्यावयाचें तेंहि ठरलें पाहिजे, आणि त्याकरितां शास्त्राचे आधार पाहिलेच पाहिजे. सर्व जातींत माझ्या तोडीचा शास्त्री कोणी नाहींच, तेव्हां ते आधार कोणते हें जात मलाच विचारणार. आणि मगनला जो दंड होईल त्याहून शास्त्रार्थ पाहण्याबद्दल मला दक्षणा जास्त द्यावी लागेल. करितां, मगनच्या दंडांतून इतरांचें प्रायश्चित्त होईल हें संभवतच नाहीं."

जातींत सर्वांहून आपण जाडे विद्वान् आहों असें मानणाऱ्या एका ब्राह्मणास हे शेवटले शब्द फारच झोंबले. तो ह्मणाला "कोणाच्या तोडीचा कोण आहे आणि कोण नाहीं, हें कांहीं स्वतःच्या अभिमानानें ठरत नाहीं. जातीकडून शास्त्रार्थ विचारण्याकरितां लोक नेहमीं मजकडेच येतात. माझी परीक्षा घेण्याचा कोणालाहि अधिकार पोंचत नाहीं. आणि 'आपण विद्वान आहों,' असेंहि ह्मणवून घेण्याचा कोणाला हक्क नाहीं. न्हाव्याच्या भटाला शास्त्र्याची दक्षणा मिळाली ह्मणजे कुडबुड्या जोशीसुद्धां उद्यां ब्राह्मणाच्या पंक्तीला बसेल!"

याच बाजूचा दुसरा एक ब्राह्मण भद्रंभद्राकडे बोट दाखवून ह्मणाला "हाच स्वतः कुडबुड्या जोशी आहे! वीत वीत जीभ बाहेर काढून पुष्कळसें वडबडलें, ह्मणजे कांहीं जात पालटत नाहीं. याच्या बापानें एका खेड्यांत जाऊन एक मुलगी आणिली, आणि ह्मणे ती आपल्या जातीचीच आहे आणि ती माझी बायको आहे. पण कोण पाहायला गेलें होतें, कीं, ती ब्राह्मणाची आहे का चांभारीण आहे!"

हें ऐकतांच भद्रंभद्राचें पित्त खवळलें. त्याचें भान सुटलें. दक्षयज्ञांत शंकरांनीं जशा उड्या मारल्या; तद्वतच वरील निंदावाक्य ऐकून भद्रंभद्र चवताळून उडी मारून एकदम त्या बोलणाराच्या अंगावर धुसला आणि त्याला जोरानें एक ठोंसा लगावला. त्यानेंहि उलट भद्रंभद्राच्या पोटावर एक ठोंसा ठेवून दिला. भद्रंभद्र "ओय-ओय" करित खालीं बसला. इतक्यांत सामनेवाल्यानें याच्या डोक्यावर एक लाथ मारली, आणि दोन्ही बाजूंचीं माणसें सरसावून धावून आलीं. ओरडाआरड आणि मारामारी सुरू झाली. सर्वत्र धामधूम उडाली. सोमेश्वरभटाच्या मंडळीला बरेच लाडू मोदक मिळाले! कोणत्या बाजूचा कोण याचा विचार न करितां वाटेल तशी मारामारी सुरू झाली. हातास लागेल तें फेंकण्यास सुरुवात झाली. काठ्या दांडकीं सुरू झालीं. देवळांतील सामानाची नासधूस झाली. कोणाचें डोकें फुटलें, कोणाचा पाय मोडला, कोणाची कंबर मोडली, कोणी बेशुद्ध होऊन पडला. लहान लहान मुलें टाळ्या वाजवूं लागलीं, व मधून मधून दगडहि फेंकूं लागलीं. मारामार इतक्यांतच बंद होण्याचा रंग दिसत नव्हता; पण पोलीसचा शिपाई येतो आहे असें ऐकतांच पळापळ सुरू झाली. सोमेश्वरभटजींनीं प्रथम पलायन केलें. ज्याला पळतां आलें तो पळून गेला. ज्यांनां पळतां येईना ते गुपचूप राहिले. परंतु ज्यांनां जखमा झाल्या होत्या त्यांनां पळतांहि येईना व गुपचूपहि राहतां येईना, ह्मणून ते मोठमोठ्यानें ओरडूं लागले.

भद्रंभद्राला बरेंच लागल्यामुळें तो विव्हळ होऊन पडला होता. त्याला शिपाई आल्याची खबर समजली तेव्हां त्याला पुनर्जन्म झाल्यासारखें वाटलें, आणि मार बसल्याची विस्मृति पडली. तो उभा राहिला आणि खिडकींतून हळूच बाहेर उडी मारून पळूं लागला. मागाहून माणसें येत आहेत असें पाहून तर तो जोरानें पळत सुटला आणि समोर दिसेल त्या गल्लीकुचींत शिरून दिसेनासा झाला. सकाळीं उजाडलें तरी घरीं आला नाहीं. सर्व दिवसभर त्याच्याकरितां सारखा शोध चालू होता. निरनिराळे तर्क चालू होते. पण त्याचा कांहीं पत्ता लागला नाहीं. शेवटीं अंधार पडल्यावर घरीं येत असतां त्याला पोलीसनें पकडलें.

## प्रकरण बारावें.

## पोलीस चौकींत.

मारामारींत पुष्कळांनां इजा झाली होती. आणि पुष्कळांनीं भद्रंभद्राचें नांव पोलीसला सांगितलें होतें. पोलीसनें पकडलें तेव्हांच भद्रंभद्रानें दंडेली करून सुटण्याचा प्रयत्न केला; पण तो व्यर्थ गेला. इतक्यांत मी तेथें गेलों व मींहि त्याला सोडविण्याचा प्रयत्न करूं लागलों. त्यामुळें आह्मां दोघांनांहि पकडून पोलीस चौकींत नेलें. रस्त्यानें चालत असतां जरा स्वस्थता झालेली पाहून भद्रंभद्र ह्मणाला "अंबाराम, सर्व दिवसभर मी लपून बसलों होतों असें सर्वांनां वाटलें असेल; पण मी नानाप्रकारचे चमत्कार पाहण्यांत गुंतलों होतों. त्याचें वर्णन—"

पोलीसच्या एका शिपायानें दंडा उचलून भद्रंभद्राची—

चौकीच्या पायऱ्या चढल्यावर भद्रंभद्र ह्मणाला "जिचे केंस सोन्यारुप्याचे आहेत अशा राणीच्या महालांत तिचा भावी धनी होणारा राजा जसा थाटानें प्रवेश करितो, तसाच आज मी या रक्षागृहांत प्रवेश करित आहें. यामुळें, अंबाराम ! लवकरच मोठमोठ्या उलथापालथी होतील, ही गांठ बांधून ठेव. सुधारणांचें हें औट घटकांचें राज्य आतां फार वेळ टिकाव धरणार नाहीं. माझा जयघोष करण्याकरितांच हें रणशिंग तयार ठेवलेलें आहे"

भद्रंभद्र कोठेंतरी भांगबींग पिऊन, नाहीं तर दुसरा कांहीं अमली पदार्थ खाऊन आलेला असावा, असें वाटत होतें. शिपाई मधून मधून फटके मारितच होता, पण त्याची त्याला बराच वेळपर्यंत दाद नव्हती. माझ्यापेक्षांहि त्याचें मन अधिक सुप्रसन्न दिसत होतें. या ठिकाणीं रात्र कशी जाईल, या फिकिरींत मी होतों. पण भद्रंभद्र ह्मणाला "पायठण्या वगैरे ठीक आहेत पण छप्पर फार ठेंगणें आहे, आणि खिडकी एकच आहे. पण सर्व व्यवस्था ठीक जुळेल. मात्र हा हुक्का येथून उचलून बाजूला ठेवावा लागेल गोणपाट बहुतकरून ब्राह्मणाकडचें नसावें. खाटलें तर आहेच हांतरूण घालतांना जरा झाडलें पाहिजे ह्मणजे झालें. ओहो ! दुसरेहि दोन गृहस्थ आलेले आहेत ! जरा अडचण होईल, पण गोष्टी बोलायला ठीक पडेल."

नंतर पोलीसच्या शिपायाकडे वळून तो ह्मणाला "सर्वांकरितांच दशम्या भाजावयाच्या असल्यास मलाहि दशमीच चालेल. दुधाची असली ह्मणजे स्नानसंध्येची फारशी पंचाईत नाहीं. पण दशम्या भाजणारानें आणि त्या खाणारांनीं पाण्याला स्पर्शसुद्धां करतां कामा नये कारण, या कामांत गंगाजलसुद्धां अपवित्रच मानलेलें आहे. दशमीच्या दुधालासुद्धां पाण्याचा स्पर्श होतां कामा नये. दुधांत

स्वाभाविकच पाण्याचा अंश असतो, असें सुधारक मानतात; पण माझा त्यांच्यावर बिलकुल विश्वास नाहीं. हें केवळ आर्यधर्म बुडविण्याकरितां रसायनशास्त्र्यांशीं संधान बांधून त्यांच्या मदतीनें या धर्मभ्रष्टांनीं तुफान उठविलेलें आहे. पाण्यानें शरीर आणि आत्मा शुद्ध होतो; परंतु अन्न अशुद्ध होतें. कारण, वनस्पतींच्या छिद्रांतून पाणी आंत गेलें म्हणजे त्याला राहूचें स्वरूप प्राप्त होतें आणि त्यामुळें वनस्पतींचा देव जो सोम त्याला ग्रहण लागतें."

चौकींत कधींहि नजरेस न पडणारा हा नवीनच मासला पाहून शिपायालाहि जरा आश्चर्य वाटलें, आणि तो एकसारखा भद्रंभद्राच्या तोंडाकडे पाहूं लागला. तें पाहून दुसरा शिपाई त्याला म्हणाला "हासम, लगाव एक फटका, म्हणजे आत्तां गप राहील."

हा वेडा असावा कीं काय, अशी शंका निघाली; म्हणून हासमनें भद्रंभद्राला एक फटका मारून जागृत केलें. तेव्हां जरा शुद्धीवर येऊन भद्रंभद्रानें आपली जीभ आंखडली. पोलीसचे एकदोन अंमलदार यऊन गेले. त्यांनीं आम्हांला कांहीं प्रश्न विचारिले. भद्रंभद्राचीं उत्तरें ऐकून "तुफान करील तर फटके मार," म्हणून शिपायाला सांगून ते निघून गेले. थोड्या वेळानें भद्रंभद्रानें "जेवण आणा!" म्हणून शिपायाला सांगितलें. दुसरा एक शिपाई आला; त्यानें थोडथोडे चणे दिले आणि एक लाथ मारली. संप्रदानाचा क्रम शास्त्राला अनुसरूनच भद्रंभद्रानें उलटा केला. म्हणजे प्रथम लाथ खाली आणि नंतर चणे खाण्यास सुरुवात केली. चणे खाऊन झाल्यावर थोड्या वेळानें शेजारच्या पडवींत शिपाईबुवा स्वस्थपणें बसले आहेत असें पाहून भद्रंभद्र म्हणाला "चणे खाल्ल्यापासून शास्त्रांत पुण्य सांगितलेलें आहे. म्हणून मीं आपण दिलेल्या चण्यांचा स्वीकार केला. चण्याच्या मध्यभागीं जो वायु असतो त्याच्या सेवनानें प्राणायाम करण्याची शक्ति वाढते, आणि त्याकरितांच लढाईच्या वेळीं शिपाई लोक चणे खात असतात. प्राणायाम केल्यानें इतकें मोठें शरीरसामर्थ्य उत्पन्न होतें, कीं, लढाईंत उभयपक्षांचीं दळें प्राणायाम करून समोरासमोर उभीं राहतात. ज्या दळाचा प्राणायाम जास्त वेळ टिकेल त्याचा जय होतो. लढाईंत दारूगोळा सोडून आणि संगिनीचा उपयोग करून एकमेकांस घायाळ करतात, ह्या गप्पा केवळ सुधारकांनीं आपल्याला चण्याच्या पिठाची भेज खायला मिळावी म्हणून उठविलेल्या आहेत."

यापुढें बोलत बसण्याची माझी इच्छा नव्हती हात बांधलेले होते, त्यामुळें नीज येईना. ज्या दोघांना आमच्या पूर्वींच चौकींत आणून ठेवलें होतें,

ते अजूनपर्यंत शांत बसून होते. पण जिकडे तिकडे सामसूम झालें असें पाहून थोड्या वेळानें एक दुसऱ्याला ह्मणाला "रमालनापा रराकपाना रीकपाना रणायपाना रेपाना."

दुसऱ्यानें उत्तर दिलें "रांपाना."

थोडा वेळ गप राहून पहिला ह्मणाला "रजवूंपाना रोऊंपाना रईपाना रशेपाना."

दुसऱ्यानें उत्तर दिलें "रीछपाना."

हा प्रश्न काय होता आणि त्याचें उत्तर म्हणून दुसऱ्यानें काय सांगितलें, तें कांहीं आम्हांला समजलें नाहीं. ते काय म्हणाले त्याचा अर्थ समजावा या हेतूनें भद्रंभद्र म्हणाला "सद्गृहस्थहो! आपण पाना पाना करित आहां, ती जर खाण्याच्या पानांची तजवीज असली, तर माझ्याकरितांसुद्धां एक पट्टी बनवा. चणे पचायला जरा कठीण आहेत आणि पान पाचक आहे. शास्त्रांत कोणाच्याहि हातची पट्टी खाण्याला मनाई सांगितलेली नाहीं."

यावर कोणींच उत्तर दिलें नाहीं. त्यामुळें पुन्हा सर्वत्र सामसूम झालें.

चित्ताच्या उद्वेगाची तीव्रता कमी करण्याकरितां आणि भद्रंभद्र गप्प रहावा म्हणून मीं डोळे मिटून भिंतीला टेंकून जरा पडून रहाण्याचा विचार केला. भद्रंभद्राच्या सहवासानें कीर्तीपेक्षां अपकीर्तीच जास्त होत आहे; सुख कमी उलट दुःख मात्र जास्त होत आहे; आशा उत्पन्न करणारा एकटा भद्रंभद्र आहे, परंतु निराशा करणारें सर्व जग आहे; असले विचार माझ्या मनांत घोळूं लागले. कदाचित् तुरुंगांत जाण्याचा प्रसंग आला तर कष्ट आणि अपमान कसा सहन होईल, ही कल्पना मनांत येऊन मी अगदीं भांबावून गेलों. पुन्हा भद्रंभद्राच्या आर्यधर्माभिमानाचा विचार मनांत आला, आणि असें पण वाटलें, कीं, माझ्या ठिकाणीं तो अभिमान कमी असल्यामुळेंच मी कैदेंत जाण्याला नाखूष आहें. भद्रंभद्राबद्दल पुन्हा पूज्यबुद्धि जागृत झाली आणि त्यामुळें मला थोडी हिंमत आली. भद्रंभद्राच्या संगतींत शरीरपीडा सोसण्यांतसुद्धां उत्साहामुळें किती आनंद होत आहे, तसेंच मार खाण्यांतसुद्धां तपश्चर्येचें पुण्य लागतें हें भद्रंभद्राचें म्हणणें किती सत्य आहे, वगैरे विचार मनांत जागृत झाले आणि त्यामुळें स्मृति नष्ट होऊं लागली व डोळे आपोआप मिटूं लागले. इतक्यांत भद्रंभद्र "अरे चावलें, अरे चावलें" म्हणून ओरडत उठला. त्यासरसा मी दचकून जागा झालों. भद्रंभद्राच्या पायाच्या आंगठ्याला कोणी तरी चावलें होतें. पण अंधारामुळें कोण चावलें, तें समजेना. त्यामुळें तर आम्ही जास्तच घाबरलों. मी आणि

भद्रंभद्र शिपायाला हांका मारूं लागलों. शिपाई आला आणि सगळ्यांनाच काठीनें मारूं लागला. "हा बामण केव्हांपासून नीज येऊं देत नाहीं!" असें म्हणून त्यानें इतरांपेक्षां भद्रंभद्राला बऱ्याच वेळां काठीचा-पण तो चामड्याच्या वादीचा-जरा जोरानें स्पर्श केला. याप्रमाणें समाचार घेतल्यावर शिपायानें ओरडण्याचें कारण विचारिलें. कारण समजल्यावर त्याला दया आली आणि तो दिवा आणावयाला गेला. तो गेला असें पाहून भद्रंभद्र म्हणाला "दुःख झालें म्हणजे ओरडावें हें काय शास्त्रसंमत नाहीं? कदाचित हा सर्पदंश असेल, आणि त्यामुळें जर मी विदेही झालों, तर मग जगाचें काय होणार? आर्यमंडलाचें काय होणार? करितां याचा उपाय ताबडतोब झाला पाहिजे."

मी म्हणालों "जिज्ञासेला शासन करून नाहींशी करणें आणि अपृच्छा वाढविणें हा केवळ मूर्खपणा आहे. दंश करणारा प्राणी कोणीहि असो, पण त्याच्या गुन्ह्यामुळें पाहारेवाल्यांची आणि इतरांची नीज मोडली, त्याबद्दल त्या प्राण्याला मार देणें उचित होतें."

भद्रंभद्र म्हणाला "उचित आणि अनुचित याचा विचार आतां नको. मला दंश झाला आहे त्याचा प्रतीकार करण्याची तजवीज कर. मी मरून गेलों तर औचित्य निर्णय करण्याला मार्ग कोण आहे?"

शिपायानें दिवा आणिला, आणि सर्व ठिकाण तपासलें, पण कोण चावलें असावें तें समजेना. आंगठ्याला दांत लागले होते, पण ते फार तीक्ष्ण नव्हते. रक्त आलें नव्हतें. भद्रंभद्राच्या आरडाओरडीपेक्षां त्याच्या चेहऱ्यावरूनच दिसत होतें, कीं, त्याला फारशी इजा झालेली नव्हती. पाण्याची पट्टी बांधावयास देऊन शिपाई परत स्वस्थ पडण्याकरितां निघून गेला.

भद्रंभद्र ह्मणाला "सुधारक जोरावल्यामुळें मंत्र जाणणारे पुरुष दिवसेंदिवस कमी कमी होत आहेत. सर्प जसा मंत्र ऐकतांच नरम पडतो, तसेंच दंश केल्यामुळें शरीरांत शिरलेलें त्याचें विष मंत्रश्रवणानें अगदीं स्तब्ध होतें. मंत्र टाकणाराच्या हस्तस्पर्शामुळें प्राणवायु उत्पन्न होतो, आणि तो वाय्वाकर्षणानें हाताच्या चलनाबरोबर खालीं उतरतो. त्याच्याबरोबरच दंशद्वारा विष बाहेर पडूं लागतें. विष हें रक्तांत कधींच मिसळून जात नाहीं. परंतु सुधारकांचा यावर विश्वास नाहीं. ते हें सर्व खोटेंच मानतात, आणि त्यामुळें जगांतल्या सत्पुरुषांचा सर्पदंशानें नाश करितात."

ज्या दुसऱ्या दोघांनां चौकींत आणून ठेविलें होतें, त्यांतला एकजण ह्मणाला "अरे उल्लु! साप तर कोठें नाहींच, पण मी हा तुझा बाप तुला चावलों. तुझा खिसा तपासला पण त्यांत काहींच हाताला लागलें नाहीं. ह्मणून राग आला आणि त्याकरितां तुझ्या आंगठ्याला डांस मारला. आणखी मार खावासा वाटत असला तर सांग शिपायाला. कारण, माझे हात बांधलेले आहेत, तेव्हां तुझें सांगणें ऐकणार कोण?"

मी विचारलें "अरे, मग खिसा तपासला ह्मणतोस तो कसा?"

तो ह्मणाला "ही काठी तोंडांत धरून. जारे, वाटेल तसा तपासला. काठी तर नाहींशी केलीच."

शिपायाला निजेंतून पुन्हा उठविणें आह्मांला बरें वाटलें नाहीं. त्यामुळें जागत राहून आम्ही उजाडण्याची वाट पहात बसलों. उजाडल्यावर एकदोन पोलीस अंमलदार येऊन त्यांनीं आमच्यापासून जबाब घेतला आणि मोबदला दोन शिव्या देऊन ते निघून गेले.

थोड्या वेळानें आह्मां दोघांनां एका माजिस्त्रेटपुढें घेऊन गेले. पण तो शिकारीला गेला असल्यामुळें तेथून आह्मांला दुसऱ्या माजिस्त्रेटकडे नेलें. पण त्याला बिलकूल फुरसत नसल्यामुळें तिसऱ्याकडे घेऊन गेले. थोडक्याच वेळानें त्या ठिकाणीं सोमेश्वरभटाला आणि त्या रात्रीं जातींतले दुसरे जे लोक आले होते त्यांपैकीं कित्येकांनां पोलीसचे लोक घेऊन आले. भद्रंभद्र त्यांनां सामोरा जाण्याच्या विचारांत होता; पण दंडुक्याच्या धास्तीनें मौन धारण करणेंच योग्य, असें त्यानें ठरविलें. जास्त तपास करण्याकरितां मुदत मागून कैदी आपल्या ताब्यांतच असूं द्यावे ह्मणून पोलीसनें परवानगी मागितली. तेव्हां भद्रंभद्र ह्मणाला "न्यायाध्यक्ष! नरकवास जरी एकत्र भोगावयाचा असला तरीसुद्धां मी या ब्राह्मण–चांडाळांपासून दूरच्या गांवीं जाऊन राहीन. यांच्या-बरोबर मी असलों तर ते मारतील ही धास्ती मला नाहीं, पण यांचा स्पर्श मला दूषित करील. यांच्या सहवासानें मी भ्रष्ट होईन."

"गप बस" असा हुकूम झाल्यामुळें थोडा वेळ गप बसून भद्रंभद्र पुन्हा ह्मणाला "माझें ह्मणणें ऐकून घ्यावें. गेल्या रात्रीं मला फार त्रास सोसावा लागला आहे."

माजिस्त्रेटनें परवानगी दिल्यावरून भद्रंभद्रानें रात्रीची थोडीबहुत हकीगत सांगण्यास सुरुवात केली. पण पोलीस अंमलदारानें सांगितलें, कीं, "या माणसानें

फारच धांदल माजविली होती, ह्मणून त्याला सक्त पाहाऱ्यांत ठेवणें भाग पडलें. बाकीची याची बडबड निव्वळ खोटी आहे." तव्हां "याशिवाय कांहीं हकीगत असल्यास सांग," अशी परवानगी मिळाली. भद्रंभद्र ह्मणाला "ज्या खोटें बोलणारानें मी अपराधी आहें असें सांगितलें असेल, तो माझ्या ब्रह्मतेजाविषयीं पूर्ण अज्ञान असला पाहिजे. देव, दानव आणि गंधर्व हे ब्राह्मणापुढें मान वांकवतात. मग मनुष्याचा काय पाड ? मी आपल्या तेजानें अदृश्य राहूं शकेन; पण तसें करीन तर हे पाहारेवाले शिक्षेस पात्र होतील. त्याकरितां यांची दया येऊनच मी तुमच्या ताब्यांत राहिलों आहें. मी आपल्या तेजाच्या बळानें सर्व अधिकारी वर्गाला जाळून भस्म करूं शकेन, पण तसें करीन तर हे दुष्ट चांडाळ शिक्षा न होतां सुटून जातील. ह्मणूनच त्यांनां योग्यस्थळीं पोंचविण्याकरितां मीं आपला क्रोध शांत केला आहे. अशा प्रकारच्या या तेजस्वी पुरुषाला अटकेंत ठेवण्यापासून काय फायदा आहे? जगाचें कल्याण करित रहाणाऱ्या माझ्यासारख्या महापुरुषाचा तो क्रम जर बंद पाडाल, आणि मला बंदिवासांत ठेवाल, आणि त्यामुळें रक्षकांचा आणि माझा संसर्ग घडून येईल, तर तुमचें असें नुकसान होईल, कीं, मी या सर्व रक्षकांनां उपदेश करून सुधारकांच्या गोटांतून बाहेर काढीन, आणि नंतर ते तुमची नोकरी सोडून संन्याशी बनतील. हे काळे कपडे फेंकून देऊन भगवे धारण करतील, आणि घुबडाप्रमाणें तोंड उघडें ठेवून रात्रंदिवस माझें कीर्तन श्रवण करतील. याकरितां मला सोडून दिल्यास तुमचाच फायदा आहे, हें ध्यानांत ठेवा."

भद्रंभद्रानें अशीं मुद्देसूद प्रमाणें पुढें मांडतांच माजिस्त्रेट आणि रक्षक वर्ग निरुत्तर होऊन लज्जेनें खालीं माना घालून बसतील, आणि आह्मांला सोडून देण्याचा एकदम हुकूम होईल—मात्र अंगांत हिंमत नसल्यामुळें हुकूम हळूच सांगितला जाईल—असें वाटल्यामुळें तो ऐकण्याकरितां मीं आपल्या कानांनां तयार केलें, परंतु माजिस्त्रेटनें भद्रंभद्राला एवढेंच सांगितलें, कीं," जास्त बडबड करशील तर कोर्टाची बेअदबी केल्याचा आरोप ठेवून शिक्षा देईन."

पोलीसनें दुसऱ्या दिवशीं पुन्हा सर्वांनां हजर करावें ह्मणून हुकूम झाला. पुन्हा हजर केलें तेव्हां आह्मांला जामिनावर खुलें करावें असा भद्रंभद्राच्या एका स्नेह्यानें अर्ज केला. भद्रंभद्राची वृत्ति आज बरीच शांत झाली होती. त्यामुळें फारशी हरकत न येतां आमची जामिनावर सुटका झाली.

## प्रकरण तेरावें.

### विधवाविवाह.

कोर्टांतून बाहेर पडल्यावर थोडें दूर जाऊन, भद्रंभद्रानें बरोबर आलेल्या आपल्या स्नेह्यांस उद्देशून भाषण करण्यास सुरुवात केली. कज्जाचा निकाल ऐकण्याकरितां आलेले लोकहि जमा झाले. त्या सर्वांकडे एकवार नजर फेंकून भद्रंभद्र ह्मणाला "आर्यहो! मी आपणां सर्वांनांच ओळखित नाहीं;पण आपण सर्वजण मात्र मला ओळखितां, यांत संशय नाहीं. कारण, मी धर्मवीर बनलों आहें, हें जगप्रसिद्धच आहे. प्रलयकाळचा वेळ आला ह्मणजे माशीचे रंग जसे पालटतात, त्याप्रमाणें सुधारकांच्या उत्पातकाळीं माझे गुण निरनिराळ्या ठिकाणीं प्रगट होत आहेत. माझ्या धर्मवीर्याचा प्रकाश पाहून सुधारक स्वतःच्या प्रयत्नांचीच निंदा करूं लागले आहेत, आणि त्या सुधारकांनींच मला या आपत्तींत आणण्याचा प्रयत्न केला आहे. "

बाघरी, भंगी, मुसलमान वगैरे आजूबाजूची मंडळी जास्त जास्त जमूं लागली, व ते जसजसे जमत चालले, तसतसा भद्रंभद्राच्या वक्तृत्वशक्तीसही जोर चढूं लागला. बावळे उडवून आणि हातवारे करून तो उच्चस्वरानें बोलूं लागला. तो ह्मणाला " सुधारकांनीं काहूर उठवुन माझ्यावर हें जें संकट आणिलें आहे, त्याचें मूळ शोधून काढणें फारसें कठीण नाहीं. सर्वांनां माहीत आहेच, कीं, सुधारक हे हल्लीं जिवंत असलेल्या व यापूर्वी मरण पावलेल्या अशा सर्व विधवांचे पुनर्विवाह करण्याच्या खटपटींत आहेत. प्रत्येक विधवेला जबरदस्तीनें विवाह करण्यास भाग पाडण्याबद्दल कायदा करण्याकरितां त्यांनीं सरकारांत लिहिलें आहे. आणि त्याकरितां वस्तीपत्रकें तयार होत आहेत व मरणाची नोंद ठेवण्याचीहि सुरुवात झाली आहे. व त्यावरून जिवंत व मेलेल्या किती विधवांकरितां वर पाहिजे आहेत हें नक्की ठरवावयाचें आहे. या देशाच्या दैवयोगानें आजपर्यंत एवढें आर्यत्व जिवंत राहिलें आहे, कीं, त्या विधवांकरितां पाहिजे आहेत तितक्या वरांची भरती होणें शक्य नाहीं. पाश्चात्य लोकांची वृत्ती कितीहि अनार्य अगर विपरीत असो, परंतु आर्यावर्तांत तरी मेलेल्या विधवांबरोबर लग्न लावण्यास कोणीहि तयार होणार नाहीं. यामुळेंच लांबवर नजर देऊन आपल्या सुज्ञ पूर्वजांनीं असा सक्त हुकूम केला आहे,कीं,विधवांच्या केशांचें मुंडन करावें;विधवांनां मूर्तिमंत अपशकून

मानाव्या; त्यांनां शाप आहे असें समजावें; त्यांचा तिरस्कार करावा; विरक्तेचीं सर्व कामें त्यांच्याकडून करवावीं; व अशा वागवण्यानें अशक्तता येऊन त्यांनां लवकरच मरण यावें आणि मग सुधारकांनां अनार्य विचारांचा प्रसार करण्यास अवधीच मिळूं नये. मी नेहमीं सुधारकांच्या विधवाविवाहाच्या प्रयत्नांस आडवा येतों, व थोड्या वेळांतच माझ्या वाणीच्या प्रभावानें त्यांच्या प्रयत्नांचा समूळ अंत होईल अशी त्यांनां भीति पडली आहे, आणि त्यामुळेंच ते मला घटकोघटकीं त्रास देण्याचा प्रयत्न करित आहेत; परंतु ज्याप्रमाणें क्षात्रिय हे यज्ञ करणाऱ्या ब्राह्मणांनां राक्षसादिकांच्या त्रासापासून मुक्त कारितात, त्याप्रमाणें आर्यधर्माकरितां प्रयास करणाऱ्या माझ्या शरीरास माझे उत्साहपूर्ण विचार, मला मार बसतो अगर बंधन होतें त्या वेळीं त्रास होऊं लागला म्हणजे तत्परतेनें शांति देतात.सुधारक माझा द्वेष करून असलीं संकटें माझ्यावर विनाकारण आणितात, यांत तिळमात्र संशय नाहीं. विचार करा, विधवांच्या देहाला कष्ट प्राप्त व्हावे म्हणून मी नेहमीं उपदेश करित असतों, कीं, विधवांनीं नित्य व्रतस्थ राहून उपास करावा व थोडा फलाहार करून त्यावर दिवस काढावे. या व्रताच्या पुण्यांशाचा नाश करण्याच्या इरादानें सुधारकांनीं बिडालद्वादशीचे दिवशीं दुधाची परीक्षा करण्याच्या निमित्तानें विलायती कांचेच्य नळ्या बुडवून गांवांतील सर्व दूध अपवित्र करून टाकिलें, आणि धार्मिक बुद्धीनें जरी त्यापैकीं थोडें थोडें दूध सर्व बिडालांस—मांजरांस मिळालें, तरी तें अपवित्र दूध पोटांत गेल्यामुळ सर्व मांजरांस सुधारकांची गोडी लागून तीं प्राण्यांची हिंसा करूं लागलीं.आणि अशा प्रकारें सुधारणांची प्रेरणा झाल्यामुळें एका मांजरानें वंदा भक्षण केला,आणि त्यामुळें उत्पन्न झालेला तंटा आणि त्याचा परिणाम, याचें मूळ कारण सुधारक आहेत, हें आपल्या ध्यानांत येईलच ! पण शेवटीं जेव्हां माझें क्रोधाविष्ट धर्मवीर्य प्रगट झालें आहे असें त्यांनां समजेल, आणि सुधारणांचा समूळ नाश होईल, त्या वेळीं सुधारकांनां पश्चात्ताप होऊन व ते अगदीं फिक्के पडून आपल्या प्रयत्नांची ते आपणच उघडपणें निंदा करूं लागतील,हें मी तुम्हांला खात्रीपूर्वक सांगतों. विधवाविवाहाचा उच्छेद करणें हें माझ्यासारख्या शास्त्रज्ञाला जरासुद्धां कठीण जाणार नाहीं. सुधारकांनीं कितीहि शास्त्रप्रमाणें पुढें मांडिलीं, तरी माझ्यासारख्या आर्यानें जोंपर्यंत त्यांचा स्वीकार केला नाहीं, तोंपर्यंत त्यांचे ते सर्व प्रयत्न व्यर्थ आहेत ! कारण, शास्त्रांत शब्द हे प्रमाणभूत आहेत,. आणि शब्दज्ञान हा श्रोत्रेंद्रियांचा विषय आहे. करितां दृष्टि नष्ट झालेल्यापुढें सौंदर्य

हें जसें निरुपयोगी आहे, तद्वतच कान मिटून धरणारापुढें शब्द हे निरर्थक आहेत. आह्मां आर्यांनां इतकीसुद्धां अक्कल नाहीं काय, कीं, समजूनउमजून आह्मी असलीं शब्दप्रमाणें ऐकण्याकरितां आपले कान उघडे ठेवूं ? याप्रमाणें सुधारकांच्या आवडत्या तर्कशास्त्रांच्या नियमांप्रमाणेंच सिद्ध होत आहे, कीं, सुधारकांचीं शास्त्रीय प्रमाणें अगदा निरर्थक आहेत ! शिवाय, आर्यांच्या रीतीभातीवरून परीक्षा केली, तरीसुद्धां हाच निर्णय ठरतो. सुधारक ह्मणतात, कीं, कलियुगांत पाराशरस्मृति प्रमाण आहे; पण तें कलियुग कोणतें ? आपल्याला चालू कलियुगाचा विचार केला पाहिजे. पाश्चात्यांच्या मायायुगांतील सुधारणा पाहिल्यावर आर्यांचें कलियुग पार निघून गेलें आहे असें दिसून येईल, व त्याबरोबरच त्यांच्या वेळचे सर्व आधारविधार नाहींतसे होतील. सुधारकांकडून पाराशरस्मृतींतील एक श्लोक नेहमीं पुढे येत असतो त्याचा खरा पदविग्रह याप्रमाणें आहे:—

**नष्टे अमृते अप्रव्रजिते अक्लीबे च पतिते अपतौ ।**
**पंचसु आपत्सु नारीणां पतिः अन्यः अविधीयते ॥**

सुधारकांचें असें म्हणणें आहे, कीं, या श्लोकाच्या आधारावरून ज्या स्त्रीचा पति मरण पावेल, त्या स्त्रीला पुनः पतीबरोबर लग्न करितां येतें. पण या श्लोकांत 'मृत' शब्द नाहीं, 'अमृत' आहे. यावरून विधवांचा कांहींच संबंध येत नाहीं. 'नष्ट' शब्दाच्या पूर्वी 'अ' नाहीं, त्यावरून ते कदाचित असें म्हणतील, कीं, पति नष्ट झाला असला तर दुसरा करितां येतो; परंतु सुधारकांनीं मान्य केलेल्या पाश्चात्यांच्या पदार्थविज्ञानशास्त्राप्रमाणें नाश हा कशाचाच होत नाहीं. करितां त्यांच्याच मताप्रमाणें 'नष्ट' पति असंभवनीय ठरतो. अर्थात्, दुसरें लग्न करण्याचा प्रश्नच शक्य नाहीं. तसेंच ' पतित ' शब्दाच्या मागेंहि ' अ ' कार नाहीं. त्याकरितां पति पतित होईल त्या वेळेस दुसरा पति होणें शक्य नाहीं. कारण, पुढील क्रियापद 'अविधीयते' असें आहे. आतां अशी शंका पुढें येईल, कीं, पति कदाचित् अमृत झाला तर त्यांत स्त्रीला आपत्ति ती कसली? पण प्रथमार्धाचा शेवटला शब्द तर 'अपतौ' असा आहे. अपती याचा अर्थ 'वाचादत्त पति' असा होतो, असें गप्पाष्टक कोशांत स्पष्ट म्हटलेलें आहे. आतां वाग्दानानें झालेला पति ' अमृत' झाला, तर का स्त्रीला मोठी आपत्ति होईल? विधात्रीनें दिलेलें आयुष्य वाग्दानानें खात्रीनेंच वाढतें आणि मृत्यु अजीबात टळतो. तशांतून वाग्दत्त स्त्री जर निमित्तभूत झाली, तर विधात्रीचा त्या स्त्रीवर कोप होतो, आणि स्वतःचा लेख ती जरी कधींहि फिरवित नाहीं, तरीसुद्धां अशा वेळीं ती तो फिरविते आणि स्त्रीला शाप देऊन विधवा

करिते. नारदस्मृतीमध्ये 'अष्टौ वर्षाण्युपेक्षेत' इत्यादि श्लोक आहेत. तेसुद्धां पति नाहांसा असला तर त्याबद्दलचे आहेत. आाण अशा रीतीनें 'नष्ट' पतीचा असंभव सिद्ध केलेला आहे. 'उदीर्ष्वनार्य' इत्यादि श्रुतिवचनांचीं प्रमाणें सुधारक पुढें आणितात, आाण ह्मणतात, कीं, श्रुति आणि स्मृति यांच्या वचनांत जेथें विरोध येईल, तेथें श्रुति प्रमाण हेंच जास्त महत्त्वाचें समजावें; परंतु हें अनादि काळापासूनच सिद्ध झालेलें आहे,—स्मृति जन्मास येण्याच्या आधींच सिद्ध झालेलें आहे,--कीं श्रुतींच्या अर्थाला अनुसरून स्मृति आहेत. करितां श्रुतींत असेल तेंच स्मृतींत असणार. करितां ज्या ठिकाणीं विरोध असेल त्या ठिकाणीं श्रुति खोटी ठरून स्मृतीलाच खरी मानावी लागेल. शिवाय, सुधारक लोक युक्तिप्रमाण लढवून आणि सुखदुःख, लाभालाभ यांची तुलना करून असें दाखवितात, कीं, 'जबरदस्तीनें जर तुह्मीं विधवाविवाहाचा निषेध कराल, तर फारच अनर्थ उद्भवून राहील. परंतु ज्या ठिकाणीं शास्त्र अगर रूढि पहावयाची असेल, त्या ठिकाणीं सुखदुःख अगर लाभालाभ यांचा विचारच करावयाचा नाहीं. सुख आणि लाभ यांची निरर्थकता तर आपल्या पूर्वजांनीं प्रथमपासूनच तपासून ठेविलेली आहे. करितां, अलाभ अगर दुःख झालें तरी देखील चालत आलें असेल तेंच चालविलें, तरच आपण कर्तव्यपरायण आहों, असें होईल. याकरितां आपल्याला युक्ति अगर तर्क यांचें महत्त्वच मानतां कामा नये! शास्त्रांत सांगितलें असेल त्याप्रमाणेंच वर्तन करणें अवश्य आहे. मग त्या आचरणाचा विषमपणा दाखवित बसण्यांत काय अर्थ आहे? दुराचार झाले, हत्त्या झाल्या, अपकीर्ति झाली, संताप झाला, ह्मणून आर्य हे आपल्या शास्त्रांचें उल्लंघन करतील काय? रूढि फिरवून विधवांचे पुनर्विवाह करूं देतील काय? सुधारकांनां माहीत नाहीं, कीं, आर्यांची दृढता अनन्य आहे. सुखाच्या साधनांनां तर सर्व जग मोठ्या उत्सुकतेनें अगदीं बिलगून राहतें; परंतु दुःखांच्या साधनांनां बिलगून राहून अश्रुतपूर्व मोठेपणा फक्त आर्यांनींच मिळविलेला आहे. पारमार्थिक दृष्टीनें विचार केला तर अनर्थ तो काय आहे? बालहत्या होतात त्या तर बालकांचें आयुष्य संपतें ह्मणूनच होतात. पुनर्विवाहानें का अशा मुलांचें नेमलेल्या आयुष्यापेक्षां आयुष्य वाढेल? त्यांचें काय प्रारब्ध बदलेल? दुराचाराबद्दलसुद्धां हाच विचार मनांत आणिला पाहिजे. आणखी सुधारक असें विचारतात, कीं, विधुर पुरुष जर पुन्हा लग्न करतात, तर विधवा स्त्रियांना पुन्हा लग्न करण्यास काय हरकत आहे? स्वाभाविक सृष्टिनियमाबद्दल कोण हें अज्ञान! स्वाभाविक सृष्टिनियम असा आहे, कीं, एका गुरूचे दोन शिष्य असूं शकतील,

पण एका शिष्याचे दोन गुरू असूं शकणार नाहींत. साधारण सृष्टिनियम असा आहे, कीं, एक दाता आणि दोन याचक असूं शकतील, पण एका याचकाचे दोन दाते असूंच शकणार नाहींत! सृष्टिनियम असा आहे, कीं, एक चांभार दोन वहाणांचा धनी असेल, पण एका वाहाणेचे दोन चांभार धनी असूं शकणार नाहींत. त्याप्रमाणेंच एका पुरुषाच्या दोन बायका असूं शकतील, पण एका बायकोला दोन नवरे असूं शकणार नाहींत; आणि त्यामुळेंच एक बायको मेली तर पुरुष पुन्हा लग्न करूं शकेल, परंतु नवरा मेला तर स्त्री पुन्हा लग्न करूं शकणार नाहीं. कारण कीं, तें स्वाभाविक सृष्टिनियमांच्या विरुद्ध आहे. स्वाभाविक सृष्टिनियमांच्या अनुरोधानें नेहमीं वागणें इष्ट आहे, हें तर सिद्धच आहे. कारण, पाश्चात्यांमध्येंसुद्धां मनुष्याच्या इच्छेस येईल त्याप्रमाणें प्रयत्न करण्यापेक्षां मनुष्याची प्रवृत्ति असेल त्या दिशेनें प्रयत्न करणें, व सृष्टिनियमांनां अनुसरून प्रयत्नांची दिशा ठेवणें याला मान देणारे लोक पुष्कळ आहेत. या निरनिराळ्या आधारांवरूनच आपलें मत सिद्ध होत आहे, कीं, सृष्टिनियमांचा जो हेतु असेल, त्याप्रमाणें अनुसरण करणें ह्मणजेच सृष्टिनियमानुसरण होय. आतां सृष्टिनियमांचा हेतु ठरविणें हें आपल्या हातीं आहे. कारण, आपल्याला अनुकूल वाटेल तोच हेतु आहे हें सहज सिद्ध करितां येईल. विधवाविवाह आपणांस कबूल नाहीं. करितां तो सृष्टिनियमांच्या हेतूंच्या विरुद्धच असला पाहिजे इति सिद्धम्!"

थोडी विश्रांति घेऊन भद्रंभद्र पुढें म्हणाला " शिवाय, स्त्री आणि पुरुष यांत प्रकृतिभिन्नत्व आहे. तसें असतां पुरुषाप्रमाणेंच स्त्रीसुद्धां पुनर्लग्न करूं लागली, तर मग दोघांत भिन्नत्व तें काय? आणि स्त्रीचें स्त्रीत्व नाहींसें होऊन तिला पुरुषत्व नाहीं का येणार? पुरुषांसारखें बनण्याची इच्छा करणें हें त्यांचें धाष्टर्य योग्य आहे काय? पुरुषांनीं कृपा करून बायकांनां एकवार लग्न करण्याची परवानगी दिली, ह्मणून त्यांनीं पुरुषांप्रमाणें पुन्हा लग्न करण्याची परवानगी मागावी काय? पुरुष हे बलवान आहेत, आणि पुरुषांच्या कृपेमुळेंच स्त्रियांनां संसारसुख मिळालें आहे. पुरुषांची कृपा नसती तर त्यांनां संतिणी, जोगिणी होऊन रहावें लागलें असतें, हें त्या अगदींच विसरतील काय? करितां विधवा होऊन, पुरुषांनी दिलेल्या संसारसुखाला त्या जर मुकल्या, तर त्यांनीं त्यासुखाची पुन्हा इच्छा करूं नये. संसार मिथ्या आहे, आणि दुःखमय आहे, अशा

प्रकारचा धार्मिक उपदेश तरी अशाच वेळीं त्यांचें सांत्वन करण्याकरितां उपयोगी पडावा ह्मणून पुरुषांनीं मुद्दाम तयार करून ठेविलेला आहे. तो उपदेश विधवांनीं ग्रहण करावा आणि पुरुषांचे उपकार मानावे, हेंच त्यांचें कर्तव्य होय. विधवा झाल्यामुळेंच त्यांनां धर्मलाभ होतो याहून जास्त सुख तें कोणतें ! संसारांत असतां हें सुख मिळणें शक्यच नाहीं. वैराग्याच्या सर्व पुण्याचा अधिकार विधवांनांच दिलेला आहे. प्रेमाची उच्चभावना हीच आहे, कीं बुद्धिवान प्राणी एकच वेळे लग्न करितात. पुरुषांनीं पुन्हा लग्नें करून खालच्या प्रतीची भावना आपण ग्रहण केली, आणि स्त्रियांकडून त्यांच्याकरितां राखून ठेविलेली उच्च भावना पाळण्याचें व्रत ते सक्तीनें वजावून घेतात, हें पुरुषांचें औदार्य कमी महत्त्वाचें आहे काय ? अशा प्रकारचा स्वार्थत्याग दुसऱ्या कोणत्याहि देशांत नजरेस पडेल काय? समजून घेतल्याशिवायच सुधारक आपल्याला स्वार्थपरायण म्हणवितात. शिवाय, हीहि गोष्ट विसरतां कामा नये, कीं, स्त्रियांनां पुनर्विवाह करण्याची जर परवानगी मिळाली, तर पुनर्विवाहाच्या आशेनें त्या आपल्या पहिल्या नवऱ्यांनां मारून टाकतील, आणि देशांतील सर्व पुरुषांनां जिवंत राहावयाचें असेल तर विधवांशींच लग्न लावावें असें वाटूं लागेल, आणि कुमारिका अविवाहित राहूं लागतील. ही सुधारकांची युक्ति आह्मांला समजत नाहींशी नाहीं ! असला अनाचार न होऊं देण्याकरितां आह्मी आर्य अगदीं तयारी करून बसलेलों आहों. पुरुषांनां पुनर्लग्नाची परवानगी असूनहि ते पहिल्या लग्नाच्या बायकांनां मारून टाकित नाहींत, या प्रश्नामुळें आह्मांला घोटाळ्यांत पडण्याचें कारण नाहीं. कारण, पुरुष आणि स्त्रिया यांच्यांत नैसर्गीकच भेद आहे. आपल्या देशांतील स्त्रियांनां उच्चभावनादर्शक विशेषणेंच लाविलीं पाहिजेत. त्यांनां सुशील, नम्र, पतिभक्तिपरायण मानिल्या पाहिजेत. पण त्यामुळें त्या पतीच्या मरणाची इच्छा करणार नाहींत, असें मानण्याइतके मूर्ख मात्र आह्मीं खास नाहीं ! या देशांतील स्त्रिया पुनर्विवाह करित नाहींत, यामुळेंच त्यांच्या उच्च मनोभावना कायम राहिलेल्या आहेत. स्वतःची बायको जिवंत असतां, व ती मेल्यावर पुन्हा लग्न केलें तरी, स्त्रियांबद्दलची उच्च भावना पुरुष स्वतःच्या ठिकाणीं जागृत ठेवूं शकतात. हा चमत्कार याच देशांतील पुरुषांच्या अंगीं शक्य आहे, आणि यामुळेंच आमच्या पूर्वजांनीं विधवांचा पुनर्विवाह कधींहि होऊं दिला नाहीं. चाऱ्ही वेदांतून वाटेल तो मंत्र काढा, त्यांतून मी असा अर्थ काढून दाखवीन, कीं विधवांनीं पुनर्विवाह करतांच कामा नये ! अर्थ करण्याचें असलें अद्भुत चातुर्य असूनहि कधीं कोठें एखादें वचन दुराग्रही दिसेल, तर त्यावरून एवढेंच समजावयाचें, कीं, असला

अप्रसिद्ध, अनिष्ट आचार निषिद्ध असूनहि पुरातन काळीं केव्हां तरी प्रचारांत असेल. तो तसला आचार त्या वेळींहि अप्रसिद्ध, आणि निषिद्धच होता हें सिद्धच आहे. कारण, तो त्या वेळीं प्रचारांत होताच, अगर त्याचा विधि अशा प्रकारचा होता, या गोष्टी आह्मीं बिलकूल कबूल करित नाहीं.

"या रीतीनें निरनिराळ्या प्रमाणांनीं विधवाविवाहाचें खंडण होत आहे. सुधारक स्वतःच विधवांबरोबर लग्न लावित नाहींत! यावरून काय दिसून येतें? हेंच कीं, मनांतून ते आमचींच प्रमाणें खरीं मानतात! स्वतःला प्रत्यक्ष अनुभव नसून, तसेंच लोकांची अप्रीति संपादन करून हे लोक कशाकरितां विधवा-विवाहाचा पक्ष घेतात, त्याचें कारण शोधित बसण्याचें काम आमचें नव्हे. तसेंच जर कोणी सुधारक कधीं एखाद्या विधवेशीं लग्न लावील तर त्याला त्या दोषांतून मुक्त करणें अगर त्याचें तें करणें योग्य आहे असें ठरविणें हेंहि आमचें काम नव्हे. परंतु जे विधवांबरोबर लग्न लावणार नाहींत त्या सुधारकांची निंदा करणें हें आपलें कर्तव्य आहे. सुधारक ह्मणतात 'विधवांवर जो जुलूम होत आहे, त्याचा प्रतीकार करण्याकरितां आह्मी झटत आहों, ह्मणून आमच्यावरच जुलूम व्हावा काय?' याचें उत्तर हेंच कीं, 'स्वाभाविक सृष्टिनियमच असा आहे, कीं, अग्नीचा प्रतीकार अग्नीनेंच होतो.' सुधारक ह्मणतात 'आह्मी या कामांत दुर्बळ आहों हें आह्मी कबूल करतों; परंतु तुह्मी अन्याय करितां याबद्दल तुह्मांला लाजहि वाटत नाहीं, व दुसरे कोणी तो अन्याय दूर करण्याकरितां प्रयत्न करित असतील तर त्यांना तुह्मी साहाय्यहि करित नाहीं. एवढेंच नव्हे, तर उलट विघ्नें आणतां' याचें उत्तर एवढेंच, कीं, 'हा अनादि सिद्धांतच असा आहे. विधवा होण्यांत दुःख अगर जुलूम आहे असें आमचे पूर्वज मानितच नव्हते! शिवाय, स्वतंत्र विचार करण्याचा अधिकार त्यांनीं आह्माला दिलेला नाहीं.' सुधारक ह्मणतात 'दुराचार आणि हत्या होतात त्यांना प्रतिबंध करण्याची जरूरच नाहीं असें तुह्मी ह्मणतां काय?' यावर उत्तर हेंच कीं 'होय.' आणि त्यांतच आमचें आर्यत्व आहे. शास्त्राला अनुसरून वागल्यानें अनाचार अगर हत्या होईल, असें आर्य मानतच नाहींत. 'जरूर' व असलेच यावनी शब्द तुह्मी वापरतां, याकरितां यापुढें आह्मीं तुमच्या-जवळ वादविवादच करणार नाहीं.'

याप्रमाणें मीं त्यांना अगदीं निरुत्तर करून सोडल्यामुळें सुधारक माझ्यावर फारच रागावले आहेत. माझ्या वाग्बाणांच्या वृष्टीनें ते अगदीं चीत झाले आहेत. त्यांच्या पक्षाचा पराभव झाला त्यानंतर

ब्राह्मणभोजन होण्याचेंच कायतें बाकी राहिलें आहे. त्यांची माझ्यावर अगदीं वक्रदृष्टि आहे. कोणी समजूनदार विद्वान त्यांनां साहाय्य करित नाहीं, असें पाहून भांबावून जाऊन त्यांनीं बिडालांनां आपल्या पक्षांत घेतलें आहे, आणि त्यांच्याकडून हिंसा करण्याचें काम सुरू केलें आहे. त्याचाच परिणाम मला घडलेला दोन रात्रींचा कारागृहवास ! परंतु संसाररूपी मायेंत मनुष्याची बुद्धि जशी विकास पावते, आणि मायेपासून मुक्त होण्याचा प्रयत्न करूं शकते, अंधारांत जशी कांहीं प्राण्यांची नजर दूरवर पाहूं शकते, दंडप्रहारानें अश्वादिकांची गति जशी जास्त प्रखर होते, त्याप्रमाणेंच कारागृहवासांत माझें धर्मवीर्य जास्त प्रगट झालें आहे. कारागृहांतून सुटण्याला मी आतां जास्त समर्थ झालों आहें. मला कारागृहांत जास्त दिवस काढावे लागले तरी शेवटीं त्यापासूनहि आर्यपक्षाला लाभच आहे. सुधारकांचे सर्व प्रयत्न निर्फळच होणार."

वाटोळे जमा झालेले सर्व लोक सुधारकांचे जासूद असावेत असें आह्मांला वाटलें. कारण, कोणींहि टाळ्या वाजविल्या नाहींत, आणि कित्येक तर त्या गर्दीतून पुढें येऊन आमच्या तोंडाकडे नीट न्याहाळून पाहून नंतर बाहेर पडून सुधारकांनां बातमी देण्याकरितां निघून जात होते. बाकी, त्याबद्दल आह्मांला बिलकूल काळजी वाटत नव्हती परंतु भद्रंभद्राला अशी भीति वाटूं लागली, कीं, जमलेले लोक कदाचित् जवळ जवळ येऊं लागतील. ह्मणून मला जवळ बोलावून तो ह्मणाला " मला हे लोक मारतील याची भीति नाहीं. पण हे अस्पर्श्य लोक जवळ जवळ येतील, आह्मांला त्यांचा स्पर्श होईल, आणि त्यामुळें इतकी अशुद्धता प्राप्त होईल, कीं, स्नानानेंच काय, पण माशाचा जन्म घेऊनसुद्धां त्या पातकापासून मुक्त होतां येणें शक्य नाहीं ! अस्पर्श्य चांडाळांचा स्पर्श होण्याचा संबंध येईल त्या ठिकाणीं जाणें अगर जाऊन रहाणें, शास्त्रांनीं स्पष्टपणें निषिद्ध मानलेलें आहे. देशाची धुळधाण होत असली तरी सुद्धां स्पर्शास्पर्शाच्या नियमांचें उल्लंघन होतांच कामा नये. त्यामुळेंच तर आपल्या देशावर चढाई करून येणाऱ्या यवनम्लेंच्छादिकांबरोबर लढाया करण्याचा आपल्या पूज्य पूर्वजांनीं फारसा नेट धरला नाहीं कारण, देशाच्या रक्षणाचे हेतु, युद्धांत अस्पर्श्य लोकांचा स्पर्श झाल्यामुळें आर्यांनां येणाऱ्या भ्रष्टतेहून फारच गौण आहेत. या धर्महानीच्या भीतीनेंच आपले पूर्वज इतर देशांवर चाल करून गेले नाहीत."

अशा प्रकारचीं जोरदार कारणें सांगून भद्रंभद्रानें आपलें भाषण समाप्त केलें, आणि जमलेली मंडळी निरनिराळ्या मार्गांना निघून गेली.

## प्रकरण चवदावें.

### भूतचेष्टा.

हवा पालट झाल्यामुळेंच कीं काय, कोण जाणे कारागृहांत दोन दिवस घालविल्या-मुळें—भूक सणसणीत लागली होती. त्यामुळें घरीं लौकर जाऊंया म्हणून मीं सुचविलें;परंतु भद्रंभद्र म्हणाला '**परान्नं दुर्लभं लोके**' शास्त्रानुसारी ब्राह्मणानें बनतां बनेल तों दुसऱ्याकडेच जेवण्याची व्यवस्था करावी. करितां भोजनाची तजवीज करून आतिथ्य करणारा कोणी असेल तर प्रथम त्याचा तपास कर. कोणी नाहींच मिळाला तर मग घरीं जाऊन पोट भरून काढावयाचें हें तर आहेच."

थोडेसे पुढें गेलों, तों सुदैवानें एका मोठ्या हवेलींत माडीवर ब्राह्मणभोजन असावें त्याप्रमाणें ओरडाओरड आणि गोंगाट चाललेला ऐकूं येत होता. वर जाण्याचा जिना ओटीवरच होता; पण तेथें बसलेल्या एका चाकरानें आम्हांला अडविलें आणि म्हटलें "आतां कोणालाहि वर जाऊं देण्याचा हुकूम नाहीं. कारण, मोठमोठे शेटसावकार आणि सरकारी नोकर जमलेले आहेत."

गोंगाट चालला होता त्यावरून तो सांगत होता तें खरें असावें, असें वाटलें नाहीं. जरा वाट पाहूं, असें म्हणून आम्हीं त्या नोकराजवळच बसून गोष्टी सांगूं लागलों. भद्रंभद्रानें त्याला जेवणाचा बेत काय आहे, पक्कान्नें काय काय आहेत, वगैरे निरनिराळे प्रश्न विचारले; परंतु त्या नोकरानें कांहीं समाधानकारक जबाब दिले नाहींत. तो म्हणाला "आचाऱ्याचें आणि माझें बरें नाहीं, त्याकरितां मला त्यांतलें कांहींच दाद लागत नाहीं." चिलमींत घालण्याकरितां तो जवळच्या शेगडींतला विस्तव फुंकित होता.विस्तव आहे असें पाहून त्यानें चिलीम साफ केली, आणि तंबाकू शोधूं लागला. ही संधि पाहून भद्रंभद्रानें लागलाच एक पैसा पुढें करून तंबाकू आणण्यास सांगितलें. पैसा घेऊन तो दुकानावर गेला, आणि ही संधि साधून आम्ही माडीवर गेलों.

जिन्यावरून चढत असतांच समोर 'सिरफ सनातन आर्य धर्मीऑंकू प्रवेशकी अनुज्ञा है' असें वाक्य लिहिलेली पाटी नजरेस पडली. भद्रंभद्र संतुष्ट झाला. पण माडी-वर ब्राह्मण पाहण्याची त्याची आशा सफळ झाली नाहीं. कदाचित सर्वांचीं जेवणें होऊन खाल्लेलें पचावें म्हणून कांहीं तरी व्यायाम करित असतील, किंवा कदाचित महाभारतांतील एखाद्या दारुण युद्धाची हकीगत ऐकिली असेल, आणि त्यावरून कौरवपांडवांच्या युद्धाचा एखादा प्रयोग करून दाखविण्याची तालीम चालू असेल!

परंतु सर्वजण दारुण युद्धांत निमग्न होते. कित्येकजण हातांत तक्ये घेऊन दंडावर जोरानें प्रहार करित होते; कित्येक स्वतःच्या शालजोडींत अगर एखाद्या गोणपाटांत जोडे, वहाणा वगैरे भरून गदेप्रमाणें फिरवित होते; कांहींनीं जोडे हाताच्या पंजांत अडकवून वाघाप्रमाणें पवित्रे करून सामनेवाल्यावर झडप घालून त्याला चीत करण्याचा प्रयत्न चालविला होता; कित्येकांनीं खुर्च्या उचलून ढालींप्रमाणें धरल्या होत्या; कित्येकांनीं काठीवर पागोटीं धरून तीं ध्वजेप्रमाणें फिरविण्याचें काम चालविलें होतें; कित्येकांच्या हातांत कांहींहि नसून ते मुष्टिप्रहार व लत्ताप्रहार करून आपलें युद्धनैपुण्य दाखवित होते. अगदींच थोडे बाजूला उभे राहिले होते ते मोठमोठ्यानें फारच बीभत्स शिव्या देऊन जशी काय लढणारांना एक प्रकारची हुरूपच आणित होते! हें सर्व पहाण्याला मोठी गंमत होती, परंतु भूक फारच लागल्यामुळें मीं भद्रंभद्राला सुचविलें, कीं, "आपण येथून उतरून निघून जावें, हें बरें." पण भद्रंभद्र म्हणाला, कीं, "हे सर्व आर्यपक्षवादी आहेत, करितां यांचा समागम व परिचय करून घेतल्याशिवाय येथून जावयाचें नाहीं. शंकराची कृपा असेल तर येथेंच जेवणाची व्यवस्था जुळून येईल."

इतक्यांत शेजारच्या खोलींतून एक गृहस्थ सतरंजी डोक्यावरून पांघरून धावत व उड्या मारित बाहेर आला, आणि मोठ्यानें ओरडून ह्मणाला "हे भूतगणहो! शांत व्हा, आणि शंकर आले आहेत त्यांना नमस्कार करा."

सर्वांनीं कोल्ह्यासारखा लांब आवाज काढला, आपल्या हातांतील शस्त्रें फेंकून दिलीं, आणि एका मागून एक येऊन शंकराला प्रणिपात करूं लागले. प्रणिपात करतांना मध्येंच एकजण जमिनीवर साष्टांग घालतांना जरा कचरला आणि अर्धवट दंडवत करून उठला. सतरंजीच्या भोंकांतून शंकरानें ही अवज्ञा पाहिली, आणि एकदम आज्ञा केली, कीं, "हा द्रोही आहे, सुधारक आहे, याला सर्वांनीं एक एक थप्पड मारावी!"

त्या बिचाऱ्यानें पुष्कळ सांगितलें "मी सुधारक नाहीं, आर्य आहें; पुराणप्रिय आहें; भूत आहें." पण तें सर्व व्यर्थ गेलं. सर्व भूतांनीं येऊन त्याला एक एक थप्पड मारली. कित्येकांनीं थप्पड मारून त्याच्या डोक्यावरून उडी मारली; परंतु तो अगदीं निश्चल बसला होता. सर्वांनीं थप्पडा मारल्यावर शंकराला साष्टांग दंडवत घालण्याची पुन्हा सुरुवात झाली. द्रोही ठरून शिक्षा होईल या भीतीनें आह्मीं देखील वळून पुढें होऊन सर्वांप्रमाणें साष्टांग दंडवत केला.

दंडवत संपल्यावर सतरंजी पांघरलेले शंकर बुरखा बाजूला न सारतां आंतूनच लांब आवाज काढून ह्मणाले " नंदी असतील त्यांनीं पुढें यावें. "

तत्काळ सर्व भूतांनीं हातपाय टेंकून चार पायांवर चालत धावत शंकराकडे जाण्यास सुरुवात केली. शंकराकडे जात असतां आपसांत ढकलाढकली सुरू झाली. आपलें वाहन होण्याबद्दलची ही त्यांची स्पर्धा पाहून शंकर ह्मणाले " आज नंदी होण्याची ज्याची पाळी असेल त्यानेंच पुढें यावें. ".

हें ऐकतांच सर्व भूतें मागें वळलीं व स्वस्थानीं जाऊन बसलीं. फक्त एकच भाग्यवान भूत मोठ्या आनंदानें डोलत शंकराकडे गेलें. शंकर त्यावर आरूढ झाले, आणि नंदीला सर्वत्र फिरवूं लागले. ज्या भूताजवळ नंदी जाई तें भूत डोकें खालीं वांकवून नंदीला टक्कर मारी, आणि नंदीहि ऐटीनें टक्कर देई. नंतर भूताचें डोकें हुंगून नंदी दुसऱ्या भूतापुढें जाई. सर्वांशीं टक्कर झाल्यावर शंकर नंदीसह स्वस्थानीं गेले व सर्व भूतगण हात जोडून उभा राहिला.

थोडा वेळ गेल्यावर शंकर ह्मणाले " भूतगणहो! तुमच्यापैकीं कोणाच्याहि डोक्यांत सुधारकांचें वेड शिरलेलें नाहीं, हें पाहून मला फार फार आनंद होत आहे; परंतु नंदीच्या सांगण्यावरून असें दिसतें, कीं, अजून कांहींच्या डोक्यांतून सुधारणांची घाण येत आहे, हें ऐकून फार वाईट वाटतें. कदाचित अजाणतेपणानें एखाद्या सुधारकाची सहज संगती जुळल्यामुळें, अगर पूर्वीचा संस्कार साफ धुतला गेला नसल्यामुळें ही घाण शिल्लक राहिली असावी."

इतक्यांत एक भूत पुढें येऊन ह्मणालें "भूतेश्वर! एवढी खात्री असूं द्या, कीं, आमच्यापैकीं कोणाचाहि सुधारकांकडे ओढा नाहीं. सुधारणांचें नांव ऐकतांच आमच्या अंगाचा तिळपापड होतो. सुधारणेचें नांव निघतांच आह्मी तेथून पळून अगदीं दूर निघून जातों. जे आचारविचार सुधारकांनीं पसंत केले असतील, किंवा ज्या सुधारणांबद्दल सुधारकांनीं आपला अनुकूल अभिप्राय दिला आहे असें ऐकूं येईल, त्या सर्वांवर आह्मीं बहिष्कार घातलेला आहे. त्यांच्या-पासून नफा आहे कीं नुकसान आहे, हें पाहण्याचासुद्धां आह्मीं प्रयत्न करित नाहीं. असें असूनहि जर कांहीं भूतांत सुधारकपणाचा संस्कार शिल्लक राहिला असेल तर तो पूर्वकर्माचा परिणाम—ह्मणजे सुधारकांच्या पाठीस लागलें ह्मणजे लोक आपल्याला मान देतात हा अनुभव येण्याच्या पूर्वीच्या कर्माचा परिणाम—असला पाहिजे, आणि सुधारकांच्या संगतीबद्दल जो आपल्याला संशय येत आहे तो केवळ युरोपियनांच्या हाताखालीं नोकरी मिळविण्याची खटपट करित

असतां त्यांनां आपली लायकी व हुषारी दिसून यावी ह्मणून कांहीं सुधारकां-बरोबर हेलपाटे घालतांना संगतीचा योग आला तेवढाच. दिखाऊ वर्तनासंबंधाचे आमच्या मंडळींचे विचार अजून कोणींहि बाहेर फोडलेले नाहींत. ”

भूतेश्वर ह्मणाला “ धन्य आहे ! तलवार ही नेहमीं दुधारीच ठेवावी. कोणता विचार बरा, आणि कोणत्या आचाराचा परिणाम चांगला, या विवंचनेंत जीव नेहमीं जळत ठेवून इहलोकींचें सुख जो गमावतो, तो मूर्खच असला पाहिजे. ”

दुसरें एक भूत पुढें येऊन ह्मणालें “ महादेव ! ज्याला हें रहस्य समजत नाहीं, तोच सुधारकांच्या जाळ्यांत सांपडतो. आपला उपदेश सत्य आहे. या नंदीच्या बोलण्यावर बिलकूल विश्वास ठेवतां कामा नये. याला आमच्या टाळूतून सुधारणांची घाण येते; पण याच्या तोंडाला निराळीच घाण येत आहे. करितां याचा झाडा घ्यावा. आणि झाडयांत जें कांहीं सांपडेल तें सर्वांनां थोडथोडें वांटून द्यावें. ”

हें ऐकून धिक्कार करून सर्व भूतें त्या भूतावर घसरलीं. आणि ‘ भ्रष्ट, ’ ‘पापी,’ ‘सुधारक,’ अशा शेलक्या शिव्यांचा त्याच्यावर भडिमार करून त्याला शिक्षा झाली पाहिजे असें ओरडूं लागलीं. नंदी एकदम दोन पायांवर उभा राहिला आणि त्या भूतांचे अंगावर धावून गेला दोघांपैकीं कोणाला भ्रष्ट ठरवून शिक्षा करावयाची याचें कोणासच भान उरलें नाहीं. सर्व भूतांनीं एकजुटीनें दोघांच्याहि तंगडया ओढून दोघांनांहि फरफटत ओढित नेऊन शेजारच्या खोलींत टाकून दिलें. नंदी उभा राहिला तेव्हां शंकर जोरानें जमिनीवर पडले, हें त्या गोंधळांत कोणाच्याहि लक्ष्यांत आलें नाहीं. शंकरांनींहि सतरंजी फेंकून देऊन तंगडया धरून ओढण्याच्या कामांत इतर भूतांस हातभार लाविला. शंकरजींचा चेहरा नजरेस पडतांच मीं त्यांनां ओळखलें आणि आश्चर्यानें भद्रंभद्राकडे पाहिलें. भद्रंभद्र ह्मणाला “ मोठीं माणसें मोठीं ह्मणून जर रमतगमत कांहींच करणार नाहींत, तर शरीराला जडत्व येईल. तो नंदी बाहेर आला ह्मणजे त्यालाहि धरून तो कोण आहे तें पहा. मोठ्या माणसांचा साधे-पणा ह्मणतात तो हाच ! ”

थोड्याच वेळानें खोलींत गेलेले सर्वजण बाहेर आले. भूतपणा टाकून देऊन सर्वजण मनुष्य बनले होते. सर्वांनीं पागोटीं घातलीं होतीं. तोंडाचे पट्टे वगैरे सोडून टाकिले होते. त्यामुळें बहुतकजणांनां आह्मीं ओळखलें. पूर्वींच्या वेशांनला तो शंकर, नंदी आणि दुसरे कांहीं गादीवर बसले. बाकीचे आजूबाजूला कोंडाळीं करून बसले. आह्मी पण त्यांतच बसलों. “ त्रवाडी अजून कां

आला नाहीं" ह्मणून बोलणें निघालें. तेव्हां एकजण ह्मणाला "त्याचें थोडेंबहुत सुधारकांकडे जाणें येणें आहे. तेव्हां राहिला असेल कोणाकडे अडकून."

नंदी झालेला गृहस्थ ह्मणाला "जाणें येणें कसलें? त्यांच्याकडे काय असल्या सभा भरतात, का गमती होतात ? त्र्यवाडीला तूर्त नोकरी मिळेपर्यंत बाहेरून त्यांच्याशीं सलगी ठेवावी लागणारच. एरवीं, सुधारणांकडे त्याचें मन बिलकूल नाहीं. ज्याला अक्कल नसेल तो सुधारक होईल. मी कॉलेजांत शिकत होतों, तेव्हां स्त्रीशिक्षणाबद्दल फार अभिमान दाखवीं, व 'स्त्रीशिक्षणापासून फायदे' वगैरे विषयांवर लेखहि लिहित असें; पण जेव्हां मला पक्कें समजलें, कीं, सुधारकांचे हे विचार प्रत्यक्ष कृतींत उतरणार आहेत, आणि त्याबद्दल सर्व मोठेपणाहि सुधारकांनांच मिळणार आहे, तेव्हांपासून मी स्त्रीशिक्षणाची थट्टा व तिरस्कार येण्यासारखी टवाळीच करित असतों. साहेबांच्या हाताखालीं नोकरी असल्यामुळें बोलण्याचा अगर लिहिण्याचा प्रसंग आला तर गोष्ट निराळी. पण आंतून तर मी स्त्रीशिक्षणाच्या अगदींच विरुद्ध आहें. कधीं कधीं तर हल्लींची स्त्रीशिक्षणाची पद्धतच वाईट आहे, ती आपल्याला पसंत नाहीं, असें सांगून मी वेळ मारून नेतों; परंतु कोणती पद्धत चांगली ह्मणून कधीं कोठें सांगण्याचा प्रसंग आलाच, तर आरंभापासून अखेरपर्यंत, चालू पद्धत तपासित जाऊन तिला निरनिराळ्या प्रकारांनीं नांवें ठेवण्यांत वेळ मारून नेतों. कधीं कधीं तर असेंहि सांगून वेळ मारून नेतों, कीं, स्त्रियांनां धर्मशिक्षण दिलें पाहिजे. कारण पुरुषांनां धर्माची जरूर नाहीं. तो बायकांनींच पाळला पाहिजे! खरोखर स्त्रिया शिकोत वा न शिकोत, त्याची आपल्याला कांहीं पंचाईत नाहीं. पण बनेल तें करून सुधारक जें कांहीं करतील त्यांत माती कालवावयाची! अडाणी लोकांनां नेहमीं असें सांगावयाचें, कीं, आम्हांला तुमच्या जुन्या रीतीभातीच पसंत वाटतात. शिकले सवरलेले कोणी भेटले, तर त्यांनां सांगावयाचें, कीं, आपले लोक अजून अज्ञान आहेत, तेव्हां त्यांनां या तुमच्या सुधारणा तूर्त कांहीं कामाच्या नाहींत."

## प्रकरण पंधरावें.

## भूतमंडळांत प्रवेश.

इतक्यांत एकदम उभा राहून भद्रंभद्र ह्मणाला " या समयीं मला जो आनंद झाला आहे, त्यामुळें सर्व वस्तू जरी अपार आहेत तरी त्या सपार दिसत आहेत. आपण सर्व सुधारणाचे शत्रु आहां, तसेच सुधारकांचेहि शत्रु आहां, हें पाहून मला जो आनंद होत आहे त्याला पारावार नाहीं. आपल्या सर्वांचें आर्यत्व, आर्यपक्षत्व, आर्यपक्षवादत्व, आर्यपक्षवादलीनत्व, आर्यपक्षवादलीनाभिमानत्व, आर्यपक्षवादलीनाभिमानैकवृत्तित्व, आर्यपक्षवादलीनाभिमानैकवृत्तिनिर्भयत्व, वगैरे वगैरे पाहून माझ्या हृदयांतून जो उल्हासाचा प्रवाह वाहूं लागला आहे तो एखाद्या पणतीपासून तों तहत दावानलापर्यंत कोणत्याहि अग्नीचें शमन करण्यास समर्थ आहे. जठराग्नीला शांत करण्यास मात्र तो असमर्थ आहे. त्याचें कारण मी थोडक्यांतच आपणांस निवेदन करितों. कारण, आपणांला व मला काळाची किंमत कळत आहे, व मलाहि दुसरीं महत्त्वाचीं कामें करावयाचीं आहेत. शिवाय कोणतीहि गोष्ट थोडक्यांत सांगण्यापासून फार फायदे आहेत, आणि त्याबद्दल प्रथमच सविस्तर विवेचन करणें जरूर आहे. हे फायदे एकंदर गणती करतां ८७ आहेत. त्यांत पहिल्याचें नांव शीघ्र प्रसिद्धी असें आहे. त्याचे एकंदर पोटभेद २१३ आहेत. या पैकीं प्रथमच्या पोटभेदाचा संबंध वेळ आणि आयुष्य यांच्याशीं संघटित झालेला आहे. आणि त्याचें विवेचन करितां त्याचे एकंदर ३५३ प्रतिपोटभेद पडूं शकतात. सर्वांच्या व्याख्या एकामागून एक तपास—"

नंदीवर प्रथम ज्यानें आरोप आणिला होता तो उभा राहून ह्मणाला " महाराज, क्षमा करा. आपण कोणी पूज्य पुरुष आहां असें वाटतें; परंतु ज्या अर्थीं थोडक्यांत कोणतीहि गोष्ट सांगणें इष्ट आहे असें आपण ह्मणतां त्या अर्थीं तिचें कारण आपण इतक्या लांबलचक रीतानें सांगत आहां, तेव्हां आपल्या पहिल्या सांगण्याला विरोध येतो व तें अयुक्तिक दिसतें. "

भद्रंभद्र जरा रागावून ह्मणाला " विरोध आणि अयुक्तिक, हें जगतांत जर कोणाला उत्तम रीतीनें समजत असेल, तर तें मलाच! तेव्हां त्याबद्दल आपण मला शिकविण्याची जरूरी नाहीं. भल्या भल्या सुधारकांनां, त्यांची भलत्याच प्रकारची विचारसरणी आणि युक्तीचा अभाव, यांचें भरपूर माप पदरांत घालून

वाग्युद्धांत मीं अगदीं चीत करून सोडलेले आहेत. 'कीड आणि कबूतर' या धडयांत केवढा भयंकर विरोध आहे, आर्य दृष्टीनें तें किती अयुक्तिक आहे, त्यासंबंधानें दोनशें पानांचा ग्रंथ लिहून खुद्द सुधारकांकडून त्यांच्या स्वतःच्या फजितीचा मीं स्वीकार करविला आहे. करितां माझ्यासारख्या पूज्य पुरुषाच्या भाषणांत कोणीहि अवरोध करणें उचित नाहीं. मी आपणां सर्वांहून जास्त ज्ञानी आहें, यावद्दल माझी स्वतःची तर बालंबाल खात्री आहे. शिवाय, एखादा लांकूडफोड्या जसा सतृष्णदृष्टीनें लांकडांच्या गाड्यामागून जात असतो, त्याप्रमाणें हा माझ्यामागून रात्रंदिवस फिरणारा माझा अनुयायी जेव्हां माझें नांव गांव आपणांला निवेदन करील, त्या वेळीं आपल्यालाहि त्याची सहज प्रतीति येईल. कोणी याला आत्मप्रशंसा ह्मणतील, पण ती त्यांची निव्वळ भ्रांति होय. सत्यकथनांत प्रशंसेचा दोष नाहीं. आणि मी सत्य तेंच सांगतों आहें यांत बिलकूल संदेह नाहीं. माझ्यासारख्या विद्वान ब्राह्मणाचा आदरसत्कार करण्याचें सोडून—"

भूतेश्वर एकदम उठून बोलूं लागला "भूदेव! आपला आदरसत्कार करण्यांत आह्मीं मागें पडूं असा संभव देखील नाहीं. आह्मी सुधारक नाहीं, आर्य आहों. आपण सुधारकांचे शत्रु आहां एवढ्यावरूनच आपण सन्मान करण्यास योग्य आहां; पण आपण जठराग्नीबद्दल बोललां त्यावरून आह्मांला शंका आली आहे, कीं, आपण अद्याप जेवलां नाहीं. आणि असें असेल तर आपल्या लांबलचक भाषणानें आपल्यालाच भोजनाला विलंब होईल. करितां आपण आपलें भाषण थोडक्यांत आटपावें अशी आपल्यापाशीं विनंति आहे."

भद्रंभद्र सस्मित मुद्रेनें ह्मणाला "जेवणाची तयारी असेल तर आतां मला फारसें बोलावयाचें नाहीं. माझ्या भाषणाचा तरी उद्देश हाच होता. माझें नांव आपणांला कळविण्याबद्दलची माझी सूचना माझ्या अनुयायास बरोबर समजली नाहीं आणि आपणहि कोणीं त्याबद्दल कांहींच विचारिलें नाहीं. तेव्हां आतां माझें नांव सांगणें मलाच भाग आहे. माझें नांव भद्रंभद्र."

भूतेश्वर आणि नंदी बनलेल्या इसमांनीं पुढें येऊन भद्रंभद्रापुढें प्रणाम केला. नंदी झाला होता तो ह्मणाला "मी आपल्याला नांवावरूनच चांगलें ओळखितों. पण कधीं भेटीचा योगायोग आलेला नव्हता, त्यामुळें प्रत्यक्ष आळख पटली नाहीं, त्याबद्दल क्षमा करावी"

भूतेश्वरानें "आपण येथें वर कसे आलांत?" ह्मणून विचारिलें.

भद्रंभद्र ह्मणाला "प्रापंचिक दृष्टीनें, ज्ञातिविग्रहाबद्दल सुधारकांची जी सहज रीतीनें भलतीच समजूत झाली होती, तिच्याकरितां मला दोन दिवस कारा-

गृहांत काढावे असें वाटलें, आणि त्यामुळें क्षुधार्त होऊन गृहाकडे जात असतां येथें भोजन सिद्ध असेल आणि सहज एखाद्या यजमानाला पावन करितां येईल असा विचार मनांत येऊन मी येथें आलों. आपण दुसऱ्याच कामांत गुंतलां होतां म्हणून मी हा वेळपर्यंत बोललों नाहीं."

भूतेश्वरानें जेवणाचा हुकूम करण्याकरित चाकराला एकदम हांक मारिली.

मी हिम्मत धरून एकदम उभा राहून भद्रंभद्राला म्हणालों "महाराज! आपल्या बोलण्याची सूचना मला समजली नाहीं, त्याबद्दल क्षमा असावी. पण आपल्याला माझ्या पोटाची खरीखरी हकीगत पूर्णपणें माहीत असूनहि आपण त्याबद्दल एक शब्दहि बोललां नाहीं. आपल्याप्रमाणेंच मीहि क्षुधार्त आहें हें कोणालाहि माहित नसेल. क्षुधेनें आपल्याहि मनांतून ह्या गोष्टीला गचांडी मारून हांकून दिली असेल. तेव्हां माझी समजूत अशी आहे, कीं, माझ्याबद्दल जी ही आपल्याला विस्मृति झाली, त्यालाहि कारण आपली क्षुधाच."

भूतेश्वर म्हणाला "मी दोघांच्याहि जेवणाची व्यवस्था करतों." तेव्हां आतां तक्रारींचें कारणच उरलें नाहीं.

मीं दाखविलेल्या हिंमतीबद्दल भद्रंभद्र कांहीं बोलून आपली प्रसन्नता दाखवित नाहीं, तसेंच त्याच्या चेहऱ्यावरून त्याला वाईट वाटलें असावें असेंहि दिसत नाहीं, त्यामुळें मी आश्चर्यानें त्याच्याकडे पाहूं लागलों, तों तो दिसण्यांत उंच परंतु अंगानें सडपातळ असल्यामुळें एखाद्या ताडाप्रमाणें मला दिसूं लागला. ही उपमा माझ्या मनांत घोळत आहे, इतक्यांत मंडळींतून एकानें जरा गोंधळल्यासारखें होऊन विचारिलें "कोणते भद्रंभद्र? खटपटाबादेस गेले होते आणि तेथें एक ताड पाडावयाचा होता. पण त्याच्यावर कावळा बसला होता त्याला उडवून लावण्याकरतां वर चढत असतां अर्ध्यावरून एकदम जमिनीवर आले तेच का?"

ताडाचें नांव निघतांच मीं चुकून उतावीळपणानें "हो, तेच" असें म्हटलें. परंतु लागलाच विचार मनांत येऊन दचकलों आणि "काय म्हणालेत?" म्हणून विचारणार इतक्यांत अगदीं क्रुद्ध होऊन भद्रंभद्र म्हणाला "लोक अज्ञान असल्या मुळेंच त्यांच्याकडून ब्राह्मणांला मान मिळेल असें शास्त्रांत स्पष्ट सांगितलेलें असूनहि, हे लोक आपल्या अज्ञानामुळेंच माझा अपमान करित आहेत. आणि हा माझा मतिभ्रष्ट झालेला अनुयायी तो अपमान मान्य करित आहे! सुधार-कांचे प्रयत्न निष्फळ करण्याकरितांच मलिन, गलिच्छ, अज्ञानी ब्राह्मणांनासुद्धां

भूदेव मानून त्यांची पूजा करावी, हा आर्यपक्षाचा अभिमान नष्ट होऊन, देवांहून श्रेष्ठ अशा द्विजांचा उलटा तिरस्कार होण्याचे दिवस यावे ना ? ”

भूतेश्वर अपमान करणाराला रागावून भद्रंभद्राकडे वळून ह्मणाला “ प्रसिद्ध कारभारी तंद्राचंद्र आणि आपण यांच्या नामसादृश्यामुळें त्याची ही चूक झाली तंद्राचंद्राबद्दल ही ताडाची आख्यायिका प्रसिद्ध आहे. तेव्हां आपण कोण हें न ओळखून चुकून तो असें बोलला. बाकी, आपल्या हें नजरेस आलेंच असेल, कीं, ही मंडळी इतकी माझ्या ताब्यांत आहे, कीं, माझ्या हुकुमाशिवाय कोणी जांभईसुद्धां देणार नाहीं. आणि याप्रमाणेंच सर्व जग जर माझ्या ताब्यांत आलें, तर मी सुधारणेचें नुसतें नांवसुद्धां कोणाला तोंडाबाहेर काढूं देणार नाहीं. तंद्राचंद्राचा बाप शंभू पुराणीक मथुरेस गेला होता, तेथें जेवणाच्या कामांत त्यानें भाताला हातटेंकीस आणिलें. त्याचें नांव आपण ऐकिलेंच असेल. त्याच मेहुणा वल्लभराम, हा सुधारकांचा कट्टा शत्रु, ह्मणून प्रसिद्धीस आलेला आहे. आणि तो इतक्यांतच या मंडळींत येणार आहे. त्यामुळें तंद्राचंद्राबद्दल आतांच या मंडळींत बऱ्याचशा गोष्टी निघाल्या होत्या. हे पहा, त्रवाडी आणि वल्लभराम, दोघेहि आलेच. ”

सर्वांनीं उभें राहून सहज बोलतां बोलतां, दहापांच शिव्या हांसडून, परस्परांचा आदरसत्कार झाल्यावर, वल्लभराम आणि भद्रंभद्र भूतेश्वराच्या शेजारीं गादीवर बसले, आणि त्रवाडी इतर मंडळीबरोबर आमच्यांत बसला.

आह्मीं वल्लभरामाला ओळखित होतों ह्मणून मीं त्यांनां नमस्कार केला. त्याच्याबदला त्यानें मूठ मिटून मला इशारा केला, व स्वतःच्या नाकावर बोट ठेवून चूप राहण्याविषयीं रागानें ओंठ आंवळून सुचविलें. एके वेळीं वल्लभराम जुगार खेळत असतां पोलीसानें त्याला पकडलें होतें; परंतु पकडणाऱ्या पोलीस शिपायाला लांच देऊन तो त्यावेळीं सुटला. त्याप्रसंगी सहज मी तेथें होतों, आणि नंतर दोनतीन वेळ जुगार खेळत असतांनां मीं त्याला वजावलें होतें व एकदा बाजारांत भेटला तेव्हांसुद्धां जरा बाजूला काढून मी त्याला विचारिलें होतें. तेव्हां तसलाच प्रश्न कदाचित या वेळींहि मी विचारीन, तो न विचारावा, व मी आपलें मन ताब्यांत ठेवावें, याकरितांच हा इशारा त्यानें केला, असें समजून मीं डोळे मिचकावून न बोलण्याबद्दल कबुली दिली. मला वाटलें, आमच्या ह्या खुणा कोणीं पाहिल्या नाहींत, परंतु चाऱ्ही बाजूंकडे डोळे फिरवून पाहिलें तों, खात्री झाली, कीं, सर्वांची नजर आमच्याकडे होती. सर्वजण हंसूं लागले, आणि

हंसण्यावरून तंद्राचंद्राच्या दुर्वर्तनाबद्दल आडपडदा न ठेवतां उघड उघडच प्रश्न विचारण्यावर मजल आली, व त्यांचीं उत्तरेंहि उघड उघडच मिळूं लागलीं. प्रश्नोत्तरें संपल्यावर वल्लभरामानें विचारिलें "तंद्राचंद्राची मस्करी करित आहां; परंतु या मंडळींत साधू होण्याचा कोणता विचार आहे हें कोणी सांगेल काय? किंवा—"

नंदी बनलेला इसम वल्लभरामाचें वाक्य पुरें होण्यापूर्वींच बोलला "एखादीला पळवून आणून साध्वी बनविण्याचा विचार असेल!"

भूनेश्वरानें टाळी दिली आणि ह्मटलें "खरा खरा शब्द 'साधवी' असा आहे. साधु लोकांनां 'साध्वी' शब्द ऐकूनसुद्धां माहीत नाहीं! वल्लभराम! तूं तर भाषाशास्त्रांत निपुण आहेस. मग सांग तर पाहूं, कीं, यांतला बरोबर शब्द कोणता? तूं तें सांगतां सांगतांच सुधारकांनां एखादी थप्पड मारशील!"

वल्लभराम ह्मणाला "दोन्हीहि शब्द खरे असून ते आर्यदेशाची उत्तमताच सिद्ध करतात. साध्वी शब्दानें आर्यभूमी सद्गुणभावना सिद्ध होते; परंतु पाश्चात्य विचारांच्या मोहानें सुधारकांची अशी एक तक्रार आहे, कीं, स्त्रियांनांसुद्धां पुरुषांप्रमाणेंच सर्व गोष्टींत सारखाच हक्क आहे. ही तक्रार पुढें येतांच त्यानां असें सांगता येईल, कीं, पुरुष साधु बनला आणि मग त्यानें हें तसें वर्तन केलें तरी त्याला साधूच ह्मणतील; परंतु एखाद्या स्त्रीनें जर साधु होण्याचें धारिष्ट केलें आणि पुरुषाप्रमाणें तीहि आपले सर्व हक्क बजावूं लागली, तर लोक तिला 'साध्वी' न ह्मणतां 'साधवी' ह्मणतील! आणि त्या विशेषणानें तिच्याबद्दल तिरस्कार प्रदर्शीत करतील. तें विशेषण, आणि त्या विशेषणाचे धर्म, हीं दोन्हीहि अपकर्षदर्शक आहेत. यावरूनच असें सिद्ध होतें, कीं, आपल्या पूर्वजांनीं भाषा रचतांना एवढ्या तेवढ्या लहान बाबींसंबंधानेंसुद्धां फारच अक्कल खर्च केला आहे. तेव्हां त्यांनीं तारायंत्रांचा आणि विमानाचा शोध लावला नसेल, हें संभवतच नाहीं, असें स्पष्ट सिद्ध होत आहे."

## प्रकरण सोळावें.

### स्वयंपाकघर.

भोजन तयार आहे अशी वर्दी आल्यामुळें मी आणि भद्रंभद्र यजमानाला कृतार्थ करण्याकरितां माजघरांत गेलों. थोडें होय नाहीं ह्मणावयास पाहिजे होतें; पण सूर्याच्या तेजांत जसा चंद्र अदृश्य होतो, त्याप्रमाणेंच क्षुधेपुढे विचार नष्ट होतात. भोजन आणि दक्षणा यांच्यासंबंधांत ब्राह्मणवर्गाला शास्त्रानें नित्यकर्मांपासूनसुद्धां सोडवून ठेविलेलें आहे!

भूतेश्वर वगैरे आमच्यावरोबर कोणीहि आलेले नव्हते. त्यामुळें जेवतांना नोकरांशींच आमचा संबंध पडून त्यांचा थोड्याच वेळांत आह्मांला चांगला परिचय झाला. आंघोळ घालित असता भद्रंभद्राच्या डोक्यावर उंच हात करून पाणी ओतित असतां एका नोकरानें जेवण्याला हांक मारून सांगितलें "महाराज! तोटा येईल, तोटा! सगळें तपेलेंच्या तपेलें पालथें केले तरी दाद लागणार नाहीं."

चाकराचा एक डोळा भद्रंभद्राकडे होता, आणि भद्रंभद्र खालीं मान करून बसला होता, त्यामुळें भद्रंभद्राला तें कांहीं समजलें नाहीं. त्यानें वर मान करून विचारिलें 'तपेलें पालथें करणार, आणि मग आम्हांला काय वाढणार? आम्ही जेवल्यानंतर पालथें करावयाचें असेल! कोठेंसें पालथें करणार बुवा?"

चाकर ह्मणाला " एक वाटोळी लहानशी बरणी बाहेरगांवाहून आणली आहे, तिच्यांत किती मावेल, त्याबद्दल आमचें बोलणे होतें."

भद्रंभद्र ह्मणाला " मग तर ती बरणी पाहण्यासारखी असेल. नाहीं तंर बाहेरगांवाहून आणण्याचें काय कारण? येथंसुद्धां बरण्या मिळतात."

नोकर एकदम हंसूं लागला पण मग एकदम हंसें बंद करण्याचाहि प्रयत्न करूं लागला. दुसरा नोकरहि तसेंच करूं लागला.

आपल्या त्या जाड चामडीनें मढवलेल्या व ठोक्याच्या तपेली सारख्या घडवलेल्या तोंडाचे गाल जरा फुगवून व रागावल्यासारखें करून· जेवण्या ह्मणाला " ए गाढवानों! हंसतां काय? सर्वच कोठें इतके श्रीमंत आहेत, कीं, येथल्या बरण्या न वापरतां बाहेरूनच आणतील!"

भद्रंभद्राकडे पाहून तो ह्मणाला " महाराज! बरणी खरोखरच पाहण्यालायक आहे. आपण जेवल्यावर माडीवर जाल तेव्हां जिन्यासमोरच आरसा आहे. त्याच्या समोर जाऊन उभे राहा ह्मणजे बरणी तुमच्या नजरेस पडेल."

त्याच्या तोंडाचा आकार हा वेळपर्यंत गोल होता तो आतां लांबट झाला पण तो खालीं वांकून चुलीला फुंकर घालूं लागला त्यामुळें तो हंसत होता किंवा नाहीं, तें दिसलें नाहीं.

स्नानसंध्या आटोपल्यावर आम्हीं अन्न ग्रहण करण्याकरितां गेलों. धाकट्या पाटावर मला बसावयास सांगून भद्रंभद्र मोठ्या पाटावर बसला. बसतांक्षणींच पाट घसरला, आणि पाटाखालच्या दगडी गोट्या बाहेर आल्या. मी जर भद्रंभद्राला सांवरून धरला नसता, तर अन्नाचा मुखाला स्पर्श होण्याच्या पूर्वीच उदराला स्पर्श झाला असता. भद्रंभद्र जरा शांत झाल्यावर जेवण्या म्हणाला "या घरची अशी रीत आहे, कीं, कोणी थोर गृहस्थ जेवायला आले, तर त्यांनां दगडी चौरंग ठेवावयाचे. पण हल्लीं बहुतेक चौरंग फुटल्यामुळें त्यांच्या बदली लांकडी पाट ठेवतों पण त्यांच्या खालीं आपली जुनी चाल राखण्याकरितां दगड ठेवित असतों."

भद्रंभद्र ह्मणाला "माझ्यासारख्या थोर पुरुषाचा सन्मान करणें योग्यच आहे. शिला ही बुद्धि, ज्ञान आणि शील यांची दर्शक आहे, हें आर्यांनां माहीतच आहे. आणि त्याकरितांच देवतांची प्रतिष्ठा किंवा स्थापना करण्याचे कामीं शिलांचाच उपयोग करतात. याकरितां महापुरुष आणि शिला यांचा संयोग जुळवून आणणें हें थोर पुरुषांचा सन्मान करण्यास सर्वत्र अनुकूल असें साधन आहे; परंतु दगडाच्या वाटोळ्या गोट्यांच्या ऐवजीं चौकोनी तुकडे वापरल्यास चंचलवृत्ति नष्ट होऊन त्यांनां स्थैर्य मिळेल."

जेवण्यानें चाकरांकडे नजर फेंकून व एक डोळा जरा मिटून नंतर भद्रंभद्राकडे वळून म्हटलें "महाराज! गोल आकाराशिवाय सन्मान शक्यच नाहीं. कारण, ब्रह्मांड गोल आहे, सूर्य गोल आहे, चंद्र गोल आहे आणि महापुरुष सुद्धां गोलाकारच असतात."

भद्रंभद्र कांहीं तरी चांगलेसें उत्तर तयार करून बोलण्याच्या विचारांत होता; पण शेवटीं एवढेच ह्मणाला "हेंहि आपलें ह्मणणें विचार करण्यासारखें आहे. लाडूसुद्धां गोलच असतात"

जेवित असतां आमचा वेळ आनंदांत जावा ह्मणून नोकर चाकर वाटोळे येऊन बसले. एक नोकर ह्मणाला "लाडवांकडे पाहिलें ह्मणजे तोंडाला पाणी सुटतें बुवा!"

यावर दुसरा ह्मणाला "पाणी सुटून तें बाहेर येऊं लागलें तर तोंडाला लाडवाचा बोळा मारावा ह्मणजे झालें."

तिसरा ह्मणाला "पण जेवण्याची मेहरबानी झाली तर! लाडू शिल्लक राहिले तर ते परवांसारखे जमिनीवर पसरून त्यांवर गोधडी टाकून तो निजून राहाल, आणि यजमान पाहावयाला आले तर सांगेल 'लाडू मुळींच उरले नाहींत. मला ताप भरला आहे, तेव्हां माझ्यानें उठवत नाहीं, आणि कांहीं खाववतहि नाहीं.' असें केल्याशिवाय नोकरांच्या वांटणीस लाडू कसे येणार? "

जेवण्या ह्मणाला " तुझी जीभ कुठें स्वाधीन आहे ? हे महाराज जाऊन यजमानांजवळ बोलले तर त्यानां हें सगळें खरेंच वाटेल. मी काय असा लुच्चा आहें कीं काय ? "

दुसरा चाकर हंसत ह्मणाला "अरे, या लाडवांत मीठ मुळींच नाहीं ! आह्मीं सगळे तुझी थट्टा करित आहों. तुझ्या मतें एवढ्या मोठया माणसांनां मस्करी ह्मणजे काय तें का समजत नाहीं ? ते काय हें सगळें खरेंच समजतील ? "

भद्रंभद्राकडे पाहून हात जोडून तो ह्मणाला " यांतलें जर कांहीं वर जाऊन बोललेत तर पहा तुह्माला या जेवण्याच्या डोळ्यांचीच शपथ. "

जेवण्यानें एका वाटींत उन्ह उन्ह वरण ओतून तें त्या चाकराच्या अंगावर टाकण्याकरितां तो उठला. पण तो चाकर दुसऱ्या चाकराचे मागें जाऊन बसला, आणि मान खालीं करून व दोन बाजूंनीं हात लांब करून नाचूं लागला. जेवण्या परत जाग्यावर बसला. तेव्हां भद्रंभद्र ह्मणाला " लाडवांवर मनुष्य हांतरूण पसरून निजेल हें असंभवनीय आहे. निदान, मला तरी तें खरें वाटत नाहीं. शिवाय, कोणीहि ब्राह्मण अन्नदेवतेचा असा अपमान करणार नाहीं. "

अर्धा लाडू तोंडांत टाकून भद्रंभद्र ह्मणाला "लाडू चावून चावून घशाखालीं कोंबले, तरी त्यांतील दैवत्य नाहींसें होत नाहीं. इतर देवतांनां चावून गिळणें शास्त्रानें निषिद्ध मानलेलें आहे. पण अन्नदेवतेला चावण्याविषयीं शास्त्राची आज्ञा आहे कारण, उदरांत जाऊन वास करणें हें एकट्या अन्नदेवतेलाच प्रिय आहे. इतर देवता फक्त पूजेनेंच तृप्त होतात; परंतु अन्नदेवता मनुष्याच्या चर्वणानंतर उदरस्थ झाली ह्मणजेच प्रसन्न होते. तसेंच लाडवांत मीठ नाहीं असें सांगण्यांत आलें, तेंसुद्धां नीट ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. सागरांत मीठ आहे ह्मणूनच सागरदेवता आहे. आणि त्या करितांच श्रीविष्णु त्या ठिकाणीं शयन करूं शकतात. मीठ हें जात्या खारट असूनहि लोकांनां भ्रांतिरूप दाखवून अदृश्य

रूपानें मिष्ट ह्मणून मिरवतें, व त्यामुळें लोकहि मिठाला ' मिष्ट ' ह्मणतात. त्यावरून असें सिद्ध होतें, कीं, त्यामुळेंच विष्णूला आणि सागराला अज्ञानांत ठेवून एकमेकांची एकमेकांनां कधींहि दाद लागू देत नाहीं, व दोघांची ताटातूटहि होऊं देत नाहीं. लाडूदेवतेंत मीठ नसल्यामुळें तिच्यांत मायेला जागाच नाहीं; आणि त्यामुळें लाडवावर हांतरूण घालून जर कोणी वर निजला, तर त्या देवतेला तत्काळ समजून येईल, व ती त्या निजणाराला एकदम वर उचलून फेंकून देईल. त्यामुळेंच असलें पापाचरण करण्याची मनुष्याला बुद्धीच व्हावयाची नाहीं. वर निजल्यामुळें लाडवांचा चक्काचूर होईल या धास्तीनें मनुष्य त्यांच्यावर निजूं शकणार नाहीं, या ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. ही कल्पना लाडवांतील दैवतांच्या विरुद्ध आहे व त्यामुळेंच भ्रामक आणि हास्यास्पद आहे. अशा दुष्ट कल्पना सुधारकच करूं शकतात. माझी खात्री आहे, कीं, आपण कोणीहि सुधारक नाहीं."

जमिनीवर लाडू पसरण्याची गोष्ट सांगणारा नोकर ह्मणाला "आमच्यांत सुधारक ते कसले असणार ? पण आमच्या या जेवण्याचे जातींत अशी चाल आहे, कीं, लग्न केलें ह्मणजे उघडपणें त्या पुरुषानें जेवण्याच्या धंदा करतां कामा नये. त्याकरितां तो ह्मणतो, कीं, मी आतां जेवण करण्याचें एक यंत्रच आणणार आहें. त्यांत जोखून तोलून पाहिजे तें सर्व सामान टाकलें आणि विस्तव पेटवून एकदा कळ फिरविली, ह्मणजे आंतल्याआंत सगळें जेवण तयार होतें; आणि मग असे सांगतां येईल, कीं, मी जेवणाचा धंदा करित नाहीं. मी सांच्यावर मास्तर आहें. पण महाराज! असें एखादें यंत्र असेल कां हो ?"

भद्रंभद्र दीर्घ श्वास टाकून ह्मणाला "पाश्चात्यांची यांत्रिकशक्ति चांगल्या चांगल्या रूढ प्रवृत्तींच्या आड येत आहे. स्त्रियांनां कर्तव्यभ्रष्ट आणि ब्राह्मणांनां व्यवसायपराङ्मुख करण्याचा विचार आपल्या दुर्दैवाचे मनांत आला असला तर असलें दुष्ट यंत्रहि जन्मास आलें असेल. जलाच्या उत्पत्तिस्थानाचा नायनाट करणारें, ऋतुभेद निरर्थक ठरविणारें, आणि पर्वतराज हिमालयाचें नांव अयथार्थ ठरविणारें वर्फ बनविण्याचें यंत्र जर तयार झालें आहे, तर तसेंच स्त्रियांच्या जीवनास व जेवण्या ब्राह्मणाच्या धंद्यास निरुपयोगी ठरविणारें व त्या उभयतांच्या सूपशास्त्रनैपुण्याचा नायनाट करून त्यांच्या बुद्धिसामर्थ्याला तटस्थवृत्ती देणारें यंत्रहि तयार झालें असेल."

जेवण्या म्हणाला "तयार झालें असेल काय ? तयार झालेंच आहे ! मी वर्तमानपत्रांत त्याबद्दल वाचलें आहे. यजमान पैसे खर्च करण्यास तयार झाले

म्हणजे खरोखरच एक यंत्र विकत आणण्याचा माझा विचार आहे. ”

चाकराकडे वळून तो म्हणाला “यंत्र आलें आणि सगळें तोलून घालायचें झालें म्हणजे पाहीन कसा शिधा घरास जाईल तो ! ”

चाकर जरा ताठ मान करून म्हणाला “स्वत: तूप पिऊन पिऊन लठ्ठ झाला आहे, आणि बायकोलाहि तशीच लठ्ठ बनविण्याकरतां रोज तूप घरीं पाठवित असतो. तें बंद होईल त्याची लेकाला आठवणच नाहीं ! ”

हें ऐकतांच चुलींतील जळकें लांकूड हातांत घेऊन जेवण्या त्या चाकराच्या अंगावर धावला. पण इतक्यात दुसरा नोकर मध्यें येऊन “जरा थांब, अरे जरा थांब” असें ह्मणून त्याला अडवूं लागला. पण जेवण्याचा राग लौकर शांत होण्यासारखा नव्हता. “मला ‘ लेकाच्या ’ ह्मणणारा हा कोण ? आणि माझ्या बायकोचें नांव कशाकरितां काढलें. ” हेंच वाक्य त्याच्या तोंडांतून वारंवार निघत होतें. आणि कोणी कांहीं उत्तर दिलें तरी त्याचा पुन्हां पुन्हां तो एकच प्रश्न चालू होता. त्या चाकराला चांगला डाग दिल्याशिवाय राहाणार नाहीं असेंहि मधून मधून तो ह्मणत होता. कितीहि समजून सांगितलें तरी तो ऐकत नाहीं, असें पाहून एका चाकरानें त्या जेवण्याला धरून त्याच्या हातांतलें जळकें लांकून काढून घेतलें. भद्रंभद्रानें सुधारकांचें नांव काढल्यामुळें शेवटीं नुकसान आमचेंच झालें, जेवण्या ओंवळा झाल्यामुळें वाढप अडकून राहिलें. आह्मांला अजून बरेंच वाढावयाचें होतें. कारण, जेवायला बसून कायतो पाऊण कलाकच झाला होता. एक चाकर त्या जेवण्याला पुन्हा आंघोळ कर ह्मणून विनवण्या करून सांगत होता; पण तो ह्मणे मला आंघोळच करावयाची नाहीं. जेवण पाहिजे तर सगळें फुकट जाईल, फेंकून देईन, पण शीत तुमच्या हातीं लागूं देणार नाहीं. मी आणि भद्रंभद्र, जसें काय, काय झालें तें माहीतच नाहीं असें दाखवून खालीं माना घालून जेवणाचें काम सुरू ठेवलें; परंतु माया जशी एखाद्याला अज्ञानांत ढकलून देऊन नंतर शिवस्वरूपांत मिळून आत्म्याला प्रेरणा करिते, त्याप्रमाणें चिंतेनें आह्मांला खालीं बघावयास लावून नंतर वांकड्या नजरेनें जेवण्याचेंहि नाटक पाहावयास लाविलें.

भद्रंभद्र माझ्या कानांत ह्मणाला “स्नान केलेल्या सोंवळ्या माणसाला जर कोणी शिवला, आणि तो ओंवळा झाला, तर त्याला फिरून आंघोळ केलाच पाहिजे. नाहीं तर शास्त्रांत त्याबद्दल फार दोष सांगितलेला आहे, असें आपण जेवण्याला सांगितलें तर बरें जमेल—”

पण मी ह्मणालों " कदाचित तुझा त्यानें अपमान केला तरी त्याबद्दल फारशी फिकीर नाहीं. पण जर तो येथून चालताच झाला, तर मात्र अजीबात उपाशीं मरण्याची पाळी येईल. करितां चाकरांनांच त्याची समजूत करूं दे. "

भद्रंभद्र ह्मणाला " उपाशीं तर नाहींच राहणार. मी आपल्या ब्रह्मतेजाचा उपयोग केला तर सर्वच अन्न आपोआप येऊन माझ्या तोंडांत पडेल. पण तसें केलें तर तूं तसाच राहशील ! शिवाय, कलियुगांत परिणामांबद्दल विचार केल्याशिवाय ब्रह्मतेजाचा उपयोग करणे शास्त्रानें निषिद्ध मानलेलें आहे. पुन्हा सर्व परिणामांचा विचार करावयाचा ह्मणजे ज्योतिषावरून गणित करावें लागेल. अशा हजार अडचणी आहेत. ह्मणून तूर्त मी आपलें ब्रह्मतेज प्रगट करित नाहीं."

कांहीं तरी गोष्टी सांगत रिकाम्या ताटांकडे पाहत राहण्याचा प्रसंग आल्यामुळें कंटाळून साहजिकच आमची नजर वर झाली व आह्मींहि जेवण्याचा राग कमी व्हावा ह्मणून बोलण्याला सुरुवात केली. मध्येंच त्याला ' माफ कर ' ह्मटलें, त्याची थोडी उठावणी केली, गांजाची लालुच दाखविली, पाहुण्यांनां तिष्ठत पानांवर बसविलें असें यजमानाला कळवूं ह्मणून दम दिला, निरनिराळ्या तऱ्हांनीं त्याची मनधरणी केली, शिवाय चाकरहि मधून मधून समजूत करितच होता. तेव्हां पुन्हा आंघोळ करण्याला तो कबूल झाला. पण "ऊन्ह पाण्याशिवाय नाहीं मी आंघोळ करणार " हेंच घेऊन बसला ! आह्मांला उशीर होत होता, त्याची त्याला पर्वाच नव्हती. चाकर पुन्हा पाणी तापविण्याच्या तजविजीस लागला,

भद्रंभद्र मला ह्मणाला "चल, आपण त्याला विस्तव पेटवून देऊं. माझ्यासारख्या ब्राह्मणाकडून होणाऱ्या सेवेची लाज वाटून अग्नि एकदम प्रदीप्त होईल व प्रचंड होईल. "

मी ह्मणालों " दुसरी कांहीं हरकत नाहीं; पण जेवायला बसल्यानंतर जागा सोडून उठणं अशास्त्र आहे. आपणच सांगत होतां, कीं, प्राणवायू शरीरांतून बाहेर पडून पाटाला इतका चिकटून बसतो, कीं, उठायचा प्रयत्न केला तरी उठतांच येणार नाहीं. "

भद्रंभद्र म्हणाला " याची मला आठवणच नव्हती. जेवणासारखें पवित्र कार्य करत असतां सुधारकांचें नांव घेतलें, त्यामुळेंच शास्त्राज्ञेचाहि विसर पडला. "

शेवटीं अग्निनारायणानें आणि पाण्यानें कृपा केल्यामुळें जेवणेबुवांनीं आंघोळ केली, आणि अन्नामृतस्वादाला आह्मीं पुन्हा सुरुवात केली. आतां मात्र न बोलतां

सर्व कारभार चालला होता. चाकरांनींसुद्धां आपली जीभ जरा ओढून धरली. भद्रंभद्रानें आपलें शास्त्रकथनहि जरा खेंचून धरलें. जेवण्यानेंहि हिकडे तिकडे नजर फिरविली नाहीं. जेवण्याची समजूत पडे तों सुमार एक कलाक गेला, त्यामुळें पूर्वी खाल्लेलें अन्न पचून खाक झाल्यामुळें आह्मांला पुन्हा पहिल्यापासून जेवण सुरू करावें लागलें. त्यामुळें या नवीन जेवणाला पुन्हा एक कलाक लागला. स्वयंपाकघरांत पाऊल टाकल्यापासून जेवण उरकेपर्यंत एकंदर तीन तास मोडले. सर्वच वेळ कांहीं जेवणांत गेला नाहीं. बहुतेक अर्धा वेळ उगाच फुकट गेला. त्याबद्दल खेद करण्याकरितां, पोटांत गेलेल्या अन्नाच्या भारामुळें धांपा व ढेंकरा देत भद्रंभद्र वर मान करून जिना चढूं लागला. त्यामुळें जिन्याजवळच्या आरशाकडे त्याची नजर गेली नाहीं. पण त्या आरशांत मला त्याचें प्रतिबिंब दिसूं लागलें; तेव्हां जेवण्यानें सांगितलेली वरणी केवढी व कोठें आहे तें मला समजलें; परंतु कोणता जिना किती वजन सांवरून धरील याचें गणीत कसें काय करीत असतील हा विचार माझ्या मनांत घोळूं लागला आणि त्यामुळें मी फार सावधपणानें भद्रंभद्राच्या मागून हळुहळू एक एक पायरी चढून जात असतां दोघेहि सुरक्षीतपणें माडीवर गेलों. वरची बहुतेक मंडळी जिकडे तिकडे निघून गेलेली दिसली. कांहीं राहिले होते ते बहुतेक निजले होते. त्रवाडी मात्र बसल्या बसल्या कित्येकांच्या जोड्यांतून कागदांचे बुचे व दगड भरून ठेवित होता. आह्मीं वर जातांच तो उभा राहिला, आणि भूतेश्वराकडे बोट दाखवून म्हणाला " संयोगिराज निजले आहेत. "

भद्रंभद्र ह्मणाला " यांनां ' संयोगिराज ' कां ह्मणतात ? "

त्रवाडी ह्मणाला " तो ज्ञानानें योगी आहे, कर्मानें भोगी आहे, आणि या सर्व मंडळीचा राजा आहे. ह्मणून सर्वगुणवाचक 'संयोगिराज' असें नांव त्यानें धारण केलें आहे. "

भद्रंभद्र ह्मणाला "याच्यासारखा महा पुरुष विरळाच असेल ! आतां मंडळ पुन्हा केव्हां भरणार ? "

त्रवाडी ह्मणाला " रोज सकाळीं, त्याचप्रमाणें संध्याकाळीं दिवे लागल्यावर मंडळ भरत असतें. "

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं येण्याचें कबूल करून, भद्रंभद्र आणि मी बाहेरच्या जिन्यानें उतरून घरीं गेलों.

## प्रकरण सतरावें.

### वकील.

घरीं आल्यावर मित्रमंडळीला भेटलों, शत्रूंवर यथेच्छ तोंड सोडलें, कारागृहांत कोणत्या प्रकारचें सुख असतें तें नातेवाईक मंडळीला नीट समजावून सांगितलें, आणि पोलीसच्या लोकांनां आमच्यावर खटला केल्याबद्दल आतां वाईट वाटत आहे अशी शेजाऱ्यापाजाऱ्यांची खात्री केली. नंतर मी आपल्या घरीं जावयास निघालों, व पुन्हा भद्रंभद्राबरोबर निदान इतक्यांत तरी पुन्हा फिरावयास जाऊं नये असा माझा विचार चालला होता; पण भद्रंभद्राच्या आग्रहापुढें माझें कांहीं चाललें नाहीं. त्यानें आग्रहानें बोलावल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं मी भद्रंभद्राच्या घरीं गेलों. त्या वेळीं तो सकाळचें जेवून जो निजला होता तो उठलाच नव्हता! त्याच्या त्या विशाल देहाचें सूक्ष्म रीतीनें निरीक्षण करण्याकरितां मी त्याच्या हांतरुणाजवळ बसलों.

मानेच्या उंचीपेक्षां तिचा घेर फारच मोठा होता, तरी ती व तिच्यावरचें तें गोल डोकें मिळून शरीराच्या मानानें पाहतां फारच लहान दिसत होतीं. ताळवेच्या मागची छोटी शेंडी, वाढलेल्या हजामतीमुळें व वळकट्या पडलेल्या डोक्याच्या जाड कातडीमुळें काळ्या मांजराच्या तोंडांत सांपडलेल्या लहानशा उंदराप्रमाणें दिसत होती. तो उताणा निजला असल्यामुळें दोन्ही कानांतून बाहेर पडलेले लांब लांब केंस हिमालयांतून निघालेल्या ज्ञानगंगेप्रमाणें भासत होते. त्याच्या त्या उंच व विशाल उदराच्या आड येण्यानें, पदकमलांचें दर्शन करण्यास उत्सुक झालेल्या डोळ्यांची निराशा होऊन, जणूं काय पाठीकडच्या बाजूनें दर्शन घ्यावें असा विचार करून ते उलटे फिरले होते, व वरील जाड पापण्या जरी अर्धवट उघड्या होत्या तरी त्या आंत आहेत किंवा नाहींत हें स्पष्ट दिसत नव्हतें.

नाक साफ ठेवण्याकरितां वारंवार हाताचें घर्षण होत असल्यामुळें जरी त्याला तकाकी आली नव्हती, तरी त्याच्या शेंड्याला बराच चपटेपणा आला होता. तथापि तें मधून मधून मोठ्या ऐटीनें उंच होऊन व बाजूच्या लठ्ठ व विशाल नाकपुड्यांनां फुगवून, जणूं काय हातपायांनां न हालण्याविषयीं ताकीद देत आहे, असें दर्शवित होतें. वयाच्या मानानें शरीराची उंची वाढलेली नव्हती हें खरें; पण ती उणीव रुंदीनें पूर्णपणें भरून काढली होती. एकंदर शरीराची ठेवण दुकानांत फळीवर ठेवलेल्या मातीच्या चित्राप्रमाणें दिसत होती. हात पाय तर

पोटाकडे पाहून चकीत झाल्यामुळें अस्ताव्यस्त होऊन चार चोहोंकडे पडून राहिले होते !

अशी ही गोजिरवाणी लहानशी आकृति मी लक्ष्य लावून पहात होतों, इतक्यांत माजिस्ट्रेटपुढें चालू असलेल्या खटल्यांत आमच्या तर्फे काम चालवित असलेला वकील तेथें आला, व मला पाहून तो एकदम मोठ्यानें ह्मणाला "मुदतीवर पडली."

भद्रंभद्र एकदम दचकून जागा होऊन उठून बसला आणि विचारूं लागला "कोठेंशी पडली ?"

वकील ह्मणाला "त्यांत कोठेंशी काय ?"

भद्रंभद्र ह्मणाला "माझें स्वप्न पुरें झालें ह्मणजे नेहमीं मी त्याचा पडताळा पाहात असतों, व मला त्याचा साक्षात्कारहि दिसून येतो. तुह्मीं बोललेत त्यामुळें मी जागा झालों; त्या वेळीं मला स्वप्नसुद्धां असेंच पडत होतं, कीं, एक सारखे लड्डू पसरून ठेवलेली जमीन वरवर जाऊं लागली व एकदम उलटी होऊन आकाशासारखी दिसूं लागली! त्या लाडवांचे ढग बनले व हलुहळू ते मोठे होऊन काळे दिसूं लागले. विजा चमकूं लागल्या, व एकाएकीं मोठा गडगडाट होऊन वीज पडली! त्याबरोबर मी जागा झालों आणि तुह्मांलाहि 'पडली' ह्मणतांना ऐकिलें."

वकील चकीत होऊन थोडा वेळ स्तब्ध राहिला. हंसावें कीं, हंसूं नये, बोलावें कीं, बोलूं नये, याबद्दल थोडा वेळ विचार करून तो ह्मणाला "वीज पडली त्याबद्दल मला कांहींच माहीत नाहीं. मी फक्त 'मुदतीवर पडली' असें ह्मणालों."

भद्रंभद्र ह्मणाला "तुम्हीसुद्धां सुधारकांप्रमाणेंच हातबीत हालवून चमत्कार खोटे ठरविण्याच्या विचारांत आहां काय? कोणतीहि गोष्ट प्रत्यक्ष घडून येण्याच्या पूर्वी एक क्षणभर त्याबद्दल स्वप्न पडावें, हा चमत्कारच नव्हे काय? आणि तें स्वप्न मला पडले त्यावरून मी महाज्ञानी आहें असें सिद्ध होत नाहीं काय ? माझी पक्की खात्री आहे, कीं, मीं तुह्माला 'वीज पडली' असेंच बोलतांना ऐकिलें. 'मुदत' हा शब्द यावनी आहे. तुम्हीं आतां उच्चारलेला तो शब्द माझ्या कानीं पडला, याकरितां मला प्रायश्चित्त घ्यावें लागणार. पण मीं आधीं असें ह्मणतों, कीं, 'मुदत' हा कालवाचक शब्द आहे, आणि त्याच्या पुढें 'पडणें' या क्रियापदाचा प्रयोग शक्यच नाहीं. 'काल' हा कधीं तरी 'पडतो' ह्मणून कोणीं ऐकिलें आहे काय ? कालाची गति अबाधित आहे. त्या गतीला कधींहि स्खलन नाहीं. मग 'काल आणि पडणें' यांचा संयोग कसा होणार ?"

वकील ह्मणाला " मी 'मुदतीवर पडली' असेंच ह्मणालों खास. आपल्याला तें खरें वाटत नाहीं याबद्दल मी फार दिलगीर आहें.माझ्याजवळ मी काय बोललों त्याबद्दल वाटेल तेवढा पुरावा आहे, आणि पुराव्याच्या कायद्याप्रमाणें तो कोणत्याहि न्यायाधिशाला दाखल करून घ्यावा लागेल. "

भद्रंभद्र ह्मणाला " धर्मशील आर्यांनां शास्त्र हेंच प्रमाण आहे. आणि शास्त्रांत लिहिलेलें आहे, कीं, चमत्कार होतात व स्वप्नेंहि पडतात. मी शास्त्रांचें अनुसरण करणारा आहें, तसाच तर्काचा तिरस्कार करणारा आहें. माझ्या मनांत शंकेला जागाच नाहीं, मग पुराव्याची गोष्ट कशाला ? "

वकील जरा रागावून ह्मणाला " आपल्याला कायद्याचें बिलकुल ज्ञान नाहीं, असें दिसतें. धर्मशास्त्रानें,जें असेल तें आहे असें ठरतें एवढेंच; परंतु तें तसें आहे असें ठरविण्याला पुराव्याची जरूर पडणारच ! ज्या लोकांनीं कायद्याचा अभ्यास केलेला नाहीं, त्यांनीं या बाबतींत अभिमान बाळगण्यांत अर्थ नाहीं. "

भद्रंभद्र रागावून जरा जोरानें ह्मणाला " अरे मूर्खा, मूढा, वकिला ! शास्त्रज्ञ ब्राह्मणाला तूं मूर्ख, अज्ञान, अभिमानी असें त्याच्या तोंडावर ह्मणण्याचें धार्ष्ट्य करतोस, आणि पुन्हा या पृथ्वीच्या पाठीवर जिवंत नजरेस पडतोस, हा केवळ कलियुगाचा प्रभाव आहे ! खोट्यावर पोट भरणाऱ्या, दुष्टा, दुराचाऱ्या—"

आणखी विशेषणें ऐकण्याची वाट न पाहतां वकिलानें एका हातानें भद्रंभद्राची मानगोटी धरली आणि दुसऱ्या हातानें नाकावर एक ठोसा ठेवून दिला. भद्रंभद्र घाबरून खालीं पडला, आणि त्याच्या पायांच्या धक्क्यानें वकीलहि अनायासें जमिनीवर आला. भद्रंभद्रानें धांपा टाकतां टाकतांच हात जरा लांब केला आणि वकिलाचा एक कान पकडला व लाथा मारण्याकरितां तो पाय झाडूं लागला. दुसरे लोक जमा झाले, तेव्हां मी जरा हिंमत धरून दोघांनां दूर करण्याकरितां गेलों. तेव्हां भद्रंभद्राच्या कित्येक लाथा, आणि वकिलाच्या कित्येक बुक्क्या माझ्या वांटणीस आल्या. शेवटीं जमलेल्या लोकांनीं त्या दोघांनां अलग केलें, व दोघांनांहि ते ह्मणूं लागले " असल्या क्षुल्लक कामांत तंट्यावर काय आलेत ? "

भद्रंभद्र ह्मणाला " मी असल्या गोष्टींनां क्षुल्लक नाहीं समजत, या फार महत्त्वाच्या बाबी आहेत. शिवाय, वादविवादांत मी कोणाला हार जाईन असें वाटत असलें तर ती भ्रांतिसुद्धां निर्मूल करून टाकिली पाहिजे. कारण, त्याच्यावरच आर्यभूचें श्रेष्ठत्व सांवरून राहिलेलें आहे. "

कित्येक लोकांनीं भद्रंभद्राला एका बाजूस काढून समजावून सांगितलें, कीं, " हा तुमचा वकील आहे, आणि त्याची तुह्मांला फार गरज आहे. तुह्मीं असें कराल तर तो तुमचें काम बिघडून टाकील. यासाठीं वाटेल तें करून त्याची समजूत करा."

दुसरे लोक वकीलाची समजूत करूं लागले, कीं, " हा फार मोठा माणूस आहे, आणि त्यानें तुह्माला वकील नेमिलें आहे यांत तुमचा मोठेपणा प्रसिद्ध होत आहे. शिवाय, यांचें कामहि बरेंच दिवस चालेल."

इतक्यांत वकिलाचा गुमास्ता भाड्याची गाडी भरधाव उडवीत त्या ठिकाणीं आला, आणि एकदम खालीं उतरून वकिलाच्या कानांत कांहीं चारपांच वाक्यें पुटपुटला. तीं ऐकून वकीलसाहेब खूष झाल्यासारखे दिसले. ते भद्रंभद्राजवळ येऊन, हंसून, हातांत हात घालून, जरा हात हालवून " मग भेटेन," असें सांगून, गुमास्त्याबरोबर गाडींत बसून झपाट्यानें निघून गेले.

वकिलानें भद्रंभद्राच्या हातांत हात घालून हात हालविला, ही गोष्ट गडबडींत होऊन गेली; परंतु भद्रंभद्राला त्याबद्दल अगदीं चुकल्या चुकल्यासारखें वाटूं लागलें. वकिलाची गाडी दिसेनाशी झाल्यावर स्वतःची विद्वता व पराक्रम यांचें जमलेल्या मंडळींत प्रदर्शन करण्याकरितां भद्रंभद्र ह्मणाला " हातांत हात घालून होत हालविण्याची ही अभिनंदनाची रीत केवळ अयोग्य आहे, वेदधर्माच्या विरुद्ध आहे, व सनातनधर्माच्या रहस्याच्या अज्ञानांत तिचा स्वीकार मजकडून केवळ चुकून झालेला आहे. आर्य रीतीप्रमाणें नमस्कार करतांना हस्तसंपुट आपल्या व ज्याला नमस्कार करावयाचा त्याच्या नासिकेच्या मध्यें वारंवार हालविल्यानें दोघांचेंहि अद्वितीयत्व सिद्ध होतें. तसेंच ब्रह्मांडांतून उत्पन्न झालेल जगत् हें स्वतःच ब्रह्मांड आहे असेंहि सिद्ध होतें. कारण, नमस्कार करतांना सर्वांचा हेतु हाच असतो, कीं,—' ज्याप्रमाणें माझ्या नासिकेंतून जो उच्छ्वास निघतो, तो कार्यकारणाच्या अनादिसिद्ध ऐक्यामुळें नासिकाच असतो. त्याप्रमाणेंच मीरूपी ब्रह्मांतून निघालेला तूं तोहि ब्रह्मच आहेस ! आणि पुन्हा तुझ्या नासिकेंतून निघालेला उच्छ्वास जसा तुझी नासिकाच आहे, त्याप्रमाणें तूंरूपी ब्रह्मांडांतून निघालेला मीहि ब्रह्मच आहें. याप्रमाणें नासिकोच्छ्वासादि, 'यूयं यूयं वयं वयं' रीत्या ब्रह्मत्व प्रगट होतें, व त्यांतच नमस्कारहि ब्रह्मच आहे असेंहि सिद्ध होतें. शिवाय, नमस्कार सशास्त्र होण्याकरितां नमस्कार करणाराला जसें नमावें लागतें, तसेंच जगताची उत्पत्ति करण्याकरितां तें उत्पन्न

करणाराला स्वतः जगत् बनावें लागतें. या रीतीनें ' नमस्कार ' हा शब्द वदान्त ज्ञान दाखविण्याकरितांच उत्पन्न झालेला आहे. तो शब्द स्वतः ब्रह्म असल्यामुळें त्याला उत्पन्न करणारा कोणीच नाहीं. पाश्चात्यांच्या हस्तमेलनांदोलनात हें रहस्य सांठविलेलें नाहीं, करितां आर्यांनीं त्याचा कधींहि अंगिकार करूं नये."

एका श्रोत्यानें विचारिलें " महाराज! नमस्कार हा शब्द जर आपल्या वाडवडिलांनीं उत्पन्न केला असता तर त्यांनां विचारतां आलें असतें, कीं, हा शब्द तयार करण्यांत तुमचा हेतु कार्य होता ? पण तो शब्द ज्याअर्थी स्वयंभू आहे. 'त्या अर्थी तूं कां उत्पन्न झालास ? ' ह्मणून त्यालाच विचारिलें पाहिजे, ह्मणजे संशय राहणार नाहीं."

भद्रंभद्र ह्मणाला "आर्यांनीं संशय प्रदर्शित करणें बरें नव्हे. संशय ह्मटला ह्मणजे तो तर्कशास्त्राचा विषय आहे, आणि धर्मशास्त्रांत तर्काला जागाच नाहीं. विरुद्ध पक्षावर तर्कविरुद्धतेचा आक्षेप करावयाचा असेल त्या वेळेपुरताच 'तर्क' हा शब्द वापरावयचा. स्वमताची सिद्धि करण्याला शास्त्राधारच पुढें करावे, आणि शब्दप्रमाणांत तर्क घुसडण्याचा अधिकारच नाहीं ह्मणून साफ सांगावें. नमस्कार ब्रह्म आहे, आणि आपणहि ब्रह्म आहों. करितां, आपला आशय तोच त्याचा. वाटेल त्या आर्यसिद्धांतावर सुधारक तर्कशास्त्राच्या आधारानें आक्षेप आणोत– त्याला उत्तर एकच--आमचे सिद्धांत आणि आह्मी स्वतः, दोघेहि ब्रह्मच आहोंत. करितां स्वानुभूतीनें आह्मांला त्याची प्रचीति आलेली आहे. ज्ञान आणि ज्ञाता— दोन्ही एकच आहेत, दोघेंहि ब्रह्मच आहेत, आणि त्यांच्या जोडीचें तिसरें ज्ञेय —तेंहि ब्रह्मच आहे. अपवाद एवढाच, कीं, जेव्हां मायेबद्दल विचार कर्तव्य असेल, त्या वेळीं माया हा ज्ञानाचा विषय असतो, आणि त्या वेळीं मात्र ज्ञान, ज्ञाता आणि ज्ञेय यांचें ऐक्य नसतें. कारण माया ब्रह्म नव्हे, अर्थात् तिचें ज्ञानहि ब्रह्म नव्हे. शेवटीं सर्वांचें सार एवढेंच, कीं, तो वकील अज्ञानी आहे आणि माझ्यावर प्रहार केला ह्मणजे ब्रह्मावर प्रहार होतो, हें समजण्याइतकेंहि त्याला ज्ञान नाहीं."

" तो वकील आणि त्याचा गुमास्ता हे ब्रह्म नाहींत काय ?" म्हणून विचारण्याचा माझा विचार होता; परंतु ' प्रहार ' शब्द स्वतःच्या तोंडांतून निघतांच भद्रंभद्राचें—कोण जाणे कां—तोंड उतरलें, म्हणून मीं त्या वकिलाची गोष्टच सोडून दिली.

## प्रकरण अठरावें.

### साहसप्रसंग.

मोटेचा बैल शेंपटीकडूनच मोटेच्या मागून जसा विहिरीकडे जात असतो तसाच घरीं जाण्याकडे मनाचा ओढा असतांहि, मी भद्रंभद्राबरोबर संयोगीराजाच्या घराकडे जाण्यास निघालों. भद्रंभद्र ह्मणाला "उशीर झाला आहे, करितां धावत गेलों तरच लौकर जाऊन पोहोंचूं; पण असेंच धावूं लागलों तर मूर्ख लोक हंसूं लागतील, करितां तूं पुढें धावूं लाग आणि मागाहून चोर, चोर असें ओरडत मी धावूं लागतों."

मी ह्मणालों "दुसरी कांहीं हरकत नाहीं; पण चोर समजून मला कोणीं पकडलें, आणि चोराला बडविण्याची रीत आहे तसें मला बडवूं लागले–तर–तर त्यांत तुह्माला कांहीं विशेष नाहींना वाटणार? बाकी, मी आपली आज्ञा होईल त्याप्रमाणें करण्यास तयार आहें."

भद्रंभद्र ह्मणाला "मलाहि दुसरी कांहीं हरकत दिसत नाहीं; पण तुला पकडलें तर जास्त उशीर मात्र होईल, यांत संशय नाहीं. पण चल, आपण एकदमच धावावयास लागूं.कोणीं विचारिलेंच तर सांगूं,कीं, आमचा घोडा पळाला आहे ह्मणून! तूं मोठ्यानें ओरड 'तो गेला तो गेला' ह्मणून."

बोलतां बोलतां आह्मी बाजारांत आलों, हें आमच्या लक्ष्यांतच आलें नाहीं. भद्रंभद्रानें आपला एक हात पागोट्यावर ठेवून ठरल्याप्रमाणें धावण्यास सुरुवात केली, आणि मीहि त्याच्यामागून धावूं लागलों. पण घोड्याबद्दल खोटीच ओरड करण्याची माझी छाती झाली नाहीं. कित्येक दुकानदार उभे राहून आमच्याकडे पाहूं लागले. कित्येक ओरडून हांका मारूं लागले. कित्येक 'रंग आहे' 'शाबास' 'छान शर्यत आहे,' 'जाडा जिंकणार!' असें ओरडूं लागले. त्यामुळें त्यांच्या दृष्टीआड होण्याकरितां भद्रंभद्रानें आणखी जोरानें धाव ठोकली. कित्येक पोरें पाठीस लागलीं, व टाळ्या वाजवूं लागलीं व दगडहि फेंकूं लागलीं. त्यामुळें भद्रंभद्राला भय वाटून मधून मधून मागें नजर टाकण्याचा प्रसंग येऊं लागला. शेवटीं एकदा मागें वळून पाहात असतां, एक चिखल पडून घसरडी जागा झाली होती तिच्याकडे नजर न गेल्यामुळें भद्रंभद्राचा एक पाय बराच पुढें घसरला, व त्यामुळें ती चिखलाची घसरडी जागा नीट बारकाईनें तपासून पाहण्याकरितां डोक्याला एकदम जमिनीवर यावें लागलें. कपडे खराब झाले

व थोडेंसें खरचटलें, त्याची फारशी फिकीर नव्हती; पण लोक 'हो,' करित वाटोळे जमले आणि हजारों प्रश्न विचारून आपआपल्या तर्काप्रमाणें आपापसांतच एकमेकांनां उत्तरें देऊं लागले, तें मला बरें वाटलें नाहीं. भद्रभद्राला मीं उठवून उभा केला, तेव्हां त्यानें मला प्रश्न केला "घोडा कोणत्या बाजूनें गेला ?"

जमलेल्या टोळींतला एकजण ह्मणाला "घोड्यांची शर्यतच नव्हती. एक पाडा आणि एक बैल असे धावत होते, त्यांतल्या पाड्यानें गोलांटी खाल्ली!"

भद्रंभद्रांला बरीच इजा झाली होती, तरी पण त्याला राग आला होता तो आंवरेना. दुसरा एकजण मध्यें पडला नसता, तर भद्रंभद्राच्या घागरीसारख्या वाटोळ्या शरीरावर विनाकारण शेणमार झाली असती. "तळ्यावर जाऊन कपडे धुवून टाका, व लागलें आहे त्याच्यावर बोहोऱ्याकडचें मलम घेऊन लावा," असा एकजणानें मध्येंच उपदेश केला; पण इतर लोकांच्यां थट्टेपुढें तो उपदेश अगदींच फिका पडला. बरेंच लागल्यामुळें भद्रंभद्र अगदीं तिडल्यासारखा उभा राहिला. इतक्यांत पोलीसचा शिपाई आला, आणि त्यानें जमलेल्या लोकांस पैस केलें. त्यामुळें रागाच्या आवेशांत भाषण करण्याचा मनांत आलेला विचार बाजूस ठेवून भद्रंभद्रानें निमूटपणें निघून जाण्याचा निश्चय केला.

भद्रंभद्र ह्मणाला "आपल्या दर्शनाचा लाभ व्हावा अशाबद्दल लोकांची इच्छा फार प्रदीप्त झालेली दिसते; परंतु आग विझविणाराप्रमाणेंच त्यांच्या कौतुकाचा भंग करण्याचें कर्तव्य आपल्याला या वेळीं बजाविलें पाहिजे. श्रीकृष्णाचे भक्त जसे अनीतीच्या मार्गानें संसारबंधनांतून मुक्त होतात, त्याप्रमाणें आपणांहि समोरचा सरळमार्ग सोडून आडमार्गानें अदृश्य झालें पाहिजे. आडमार्गानें गेल्यास फेरा पडून उशीर होईल व अंधार पडेल हें खरें पण त्याची फ़ारशी पर्वा नाहीं. प्रत्यक्ष श्रीसूर्यनारायणसुद्धां पूर्वेकडून पश्चिमेकडे जातांना पृथ्वीवरील सरळ व जवळच्या मार्गानें न जातां आमच्यासारखाच वर्तुळाकार वांकड्या व उंच मार्गानें निघून जातो, त्यामुळें त्यालाहि फेरा पडून उशीर होतो, व नंतर अंधारहि पडतो !

संयोगीराजाचें घर आह्मीं काय तें एकदाच पाहिलें होतें. त्यामुळें अंधार पडल्यावर तें शोधून काढणें जरा कठीणच होतें. भद्रंभद्र ह्मणाला "घर कोठें आहे हें ध्यानांत येत नाहीं, त्यावरून ह्मणजे माझी स्मरणशक्ति कमी झाली आहे असा भाग नाहीं. ब्रह्म हें मायेंत गुरफटून हेलकावे खातें, पण त्यामुळें

अज्ञानापासून अलिप्त राहण्याची त्याची शक्ति कमी झाली असें ह्मणतां येत नाहीं, तसेंच तें आपण होऊन अज्ञानांत पडतें असेंहि ह्मणतां येत नाहीं. कारण, अज्ञान हें त्याला प्रिय नाहीं. माझेंहि अलिप्त शरीर अखंडित रहावें ह्मणून तूंच या घरांत जा. हें संयोगीराजाचेंच घर आहे, यांत संशय नाहीं, परंतु कदाचित तें नसलें, तर अज्ञानाचा आरोप आणि हस्तलगुडादिकांचा स्पर्श माझ्या वांटणीस येणें उचित नाहीं. तुला त्यांची कांहीं हरकत नाहीं. पारमार्थिक दृष्टीनें लिप्त अलिप्त यांत भेदाभेद नाहीं हें मनांत आण, ह्मणजे झालें."

संयोगीराजाच्या घराची बाहेरची रचना आह्मांला जशी आठवत होती, तशीच या घराची होती. जिना ओटीवरूनच होता. खिडक्या आणि सज्जा यांत जरासा फरक दिसत होता, पण आम्हांला त्या वेळची बरोबर आठवण नसेल आणि आम्हीं चुकत असूं—बाकी घर तेंच—असें आम्हीं ठरविलें. लिप्त अलिप्त यांत भेदाभेद नाहीं असें भद्रंभद्रानें जरी सांगितलें होतें, तरी आंत शिरतांना मला धास्ती वाटत होती. इतक्यांत भद्रंभद्रानें मला एक धक्का मारून पुढें ढकललें, मी जिन्यावर चढलों, तों माझा संशय दूर करण्याकरितां माझ्या मागोमाग भद्रंभद्रहि आला. समोरच्या दिवाणखान्यांत कोणी नव्हतें. पण खाणाखुणा तपासून पाहातां हें संयोगीराजाचें घर आहे असें आह्मांला वाटेना.

मीं ह्मटलें "मला तर संशय वाटतो. तेव्हां उतरून जावें हेंच बरें."

भद्रंभद्र ह्मणाला "पण मला बिलकूल संशय वाटत नाहीं. शिवाय, आतां आह्मांला उतरतांना कोणीं पाहिलें तर त्याला मात्र आमच्याबद्दल संशय येईल. कदाचित आपली चूक असेल, आणि घरवालाच भेटला तर त्याची तशी समजूतहि घालतां येईल; पण परभारें कोणाच्या नजरेस न पडतां उतरून जाणें बरें नव्हे."

मीं खिडकींतून बाहेर नजर टाकून ह्मटलें "हें पहा, या घराच्या समोरच्या बाजूस घर आहे, आणि संयोगिराजाच्या घरासमोर खुली जागा होती, अशी माझी खात्री आहे. ओटीवर कोणीतरी आलेंसें वाटतें. आतां उतरून कसें जातां येईल-?"

भद्रंभद्र ह्मणाला "जरा हळू बोल. कोणीं ऐकिलें तर त्यांत आपलें नुकसान आहे. आपले पवित्र शब्द दुसऱ्याच्या अपवित्र कानीं जाऊं नयेत. हें कोणा सुधारकाचें कपट दिसतें. नाहीं तर आर्य असे फसतील कसे? पण घाबरूं नको."

इतक्यांत "पहा रे कोणी तरी जाऊन वर, कोण फिरत आहे तें," असें कोणी तरी स्त्री बोलल्याचें ऐकूं आलें, व बाहेरच्या जिन्यावरून कोणीतरी येत आहे

असें पाहून आह्मीं पाय न वाजवितां पायांच्या पुढच्या बोटांवर चालून हळूच आंतल्या दिवाणखान्यांत गेलों. आंतील रचना पाहून माझी खात्री झाली, कीं, हें संयोगीराजाचें घर खास नव्हे. पण आतां उपायच नव्हता.

अनुचित दृष्टीच्या आड होण्याकरितां आह्मीं दोघेहि दोन रांजणांच्या मागें जाऊन लपून बसलों. गुन्हा करण्याचा इरादा असल्याशिवाय कोणीहि गुन्हेगार ठरत नाहीं, ही वकिलांची नेहमींची ठराविक तक्रार फार महत्त्वाची आहे, असें मला वाटूं लागलें. कारण चोरी करण्याचा आमचा बिलकूल इरादा नव्हता, व आह्मी या ठिकाणीं लपून बसलों ते कांहीं चोर ह्मणून बसलों नव्हतों, याबद्दल आमचें मन आह्मांला बालंबाल साक्ष देत होतें. वर पाहण्याकरितां आलेल्या माणसानें बाहेरच्या दिवाणखान्यांत तपासून पाहून "येथें कोणी नाहीं" असें मोठ्यानें सांगून तो जिना उतरून परत खालीं गेला, तेव्हां आह्मी जरा निश्चिंत झालों; पण इतक्यांत बाहेरच्या दिवाणखान्यांतून कोणी दिवा घेऊन आंत येत आहे असें दिसलें, आणि नेहमीं काळोखाच्या बरोबर असणारें भयहि दिव्या-बरोबरच आंत येणार असें वाटूं लागलें. भद्रंभद्रानें माझ्या पाठीवर एक टिचकी मारली, व अंग चोरून बसण्याबद्दल मला इशारत दिली. त्याला स्वतःला त्याचें अंग चोरतां येण्यासारखें नव्हतें, तरीसुद्धां त्यानें शक्य तितका प्रयत्न केला. रांजण्यामागें बसलेले सूर्यचंद्र नजरेस न पडतां दिवा घेऊन आलेला मनुष्य आला तसाच परत बाहेरच्या दिवाणखान्यांत गेला. तेथें तो जातो आहे तोंच त्याचा दिवा वाऱ्याची झुळुक लागून गेला. भद्रंभद्र माझ्या कानाशीं लागून ह्मणाला 'वायवे नमः' वायुदेव आपणांस मदत करण्याकरितां साक्षात् येथें हजर आहे, तेव्हां आतां भिण्याचें मुळींच कारण नाहीं. वायुदेवानें दिवा मालवून टाकिला त्याबरोबरच मलाहि एक युक्ति सुचली. दिवा आंत आणला होता त्या वेळीं मीं पाहिलें, कीं, आपल्या डोक्यावरच आंत जाऊन बसण्यासारखा एक माळा आहे. तो माळा ह्मणजे या वेळीं खुद्द वैकुंठाचें महाद्वारच आहे. तेथें गेलों, कीं, आपला वरचा मार्ग सुरू झाला. तेथून वायुदेव आपल्याला अलग उचलून नेईल. तूं या बरणीवर चढून प्रथम वर जा, आणि नंतर मीं येईन. राजसभेंत राजाच्या आधीं प्रवेश करण्याचा अधिकार भालदाराला असतो. तो तुझा अधिकार मीं काढून घेतला तर अन्याय होईल."

हा अधिकार इष्ट आहे कीं अनिष्ट आहे, शिवाय वर कितपत काळोख अडगळ असेल, त्याबद्दल आपल्याशींच तर्क करित मी बरणीवर चढून उडी

मारून माळ्यावर गेलों. नंतर भद्रंभद्र बरणीवर चढून उभा राहिला, आणि मला ह्मणाला "महापुरुष कधीं उड्या मारित नाहींत, तूं मला वर ओढून घे."

आज्ञा उल्लंघन करणें बरें नाहीं, ह्मणून मी खालीं वांकलों, आणि भद्रंभद्राला दोन हातांनीं वर ओढला. आपल्या शरीराला वर जाण्याची गति देण्याचा भद्रंभद्रानें प्रयत्न केला, त्यामुळेंच जणूं काय हंसूं येऊन पायाखालची बरणी वांकली, व पुन्हां भद्रंभद्राचा पाय तिच्यावर पडतांच तिला हंसें आंवरेना ह्मणून ती जमिनीवर आडवी झाली. संचित हें जसें ऋषींनांसुद्धां स्वर्गांतून खालीं ओढतें, त्याप्रमाणें भद्रंभद्रानें मला माळ्यावरून खालीं ओढलें आणि आह्मी दोघेहि बरणीवर पडलों. पहिल्यानें कोण पडला त्याचें मला भान राहिलें नाहीं; परंतु बरणी फुटल्यामुळें तिचीं लहान लहान छकलें माझ्यापेक्षां भद्रंभद्राच्या अंगाला जास्त लागलीं होतीं त्यावरून तोच प्रथम पडला असावा, असें वाटतें. आवाज फार मोठा झाला, आणि खालीं 'कोण आहे' 'काय आहे' अशी ओरड झालेली ऐकूं आली. तेव्हां फुटलेल्या बरणीची वास्तपुस्त न पाहतां दुसरी बरणी नीट बसवून तिच्यावर चढून पुन्हां उडी मारून मी माळ्यावर जाऊन बसलों. भद्रंभद्रानेंहि या वेळीं आपलें महापुरुषत्व जरा बाजूला ठेविलें, आणि माझ्यासारखीच उडी मारून तोहि वर आला, आणि आह्मी दोघेहि माळ्याच्या वांकणांतलि एका कोनांत जाऊन बसलों. कित्येकजण जमून पुढच्या जिन्याच्या वरच्या बाजूस आले असावे असें पावलांच्या आवाजावरून वाटलें. बरोबर दिवा असूनहि बाहेरच्या, अगर बरण्या होत्या त्या दिवाणखान्यांत पाय टाकण्याची कोणाची छाती होईना. हें पाहून आह्मांला धीर आला. आह्मी स्वतः पेंचांत होतों, तरीसुद्धां त्याचें बोलणें ऐकून गंमत वाटूं लागली.

एकजण ह्मणाला "अरे जाना आंत! पहा तर खरें कोण आहे तें? असा भितोस काय?"

दुसरा ह्मणाला "भय नाहीं तर मग तुह्मीच जाना आंत!"

"तुझें नोकराचेंच तें काम आहे, तूंच आंत गेलें पाहिजे!"

"चाकरानें कांहीं गुन्हेगारी केली आहे वाटतें? कोणाला ठाऊक, आंत कोण आहे, आणि काय आहे?"

"मला भय नाहीं वाटत, आणि तूंच का भितोस! चोर असला तर पकड! पड बाहेर! कोण आहेरे?"

एक लहान मुलगा रडूं लागला आणि ह्मणाला "बाबा, तूं आंत जाऊं नकोस. दुसऱ्या कोणाला जाऊं दे."

शेट ह्मणाला "मी आंत जायला का वेडा आहें ? बोलवा पोलिसाला."

कोणी वर आले आणि आम्हांला हुडकून काढलें तर आमचें कसें काय आदरातिथ्य होईल, आणि आम्हांला कांहीं एक न विचारितां व आम्हीं बोलूं तें ऐकून न घेतां आमच्या अंगाला स्पर्श करण्याला सर्व लोक कसे आतुर होतील, वगैरे विचार पोलीसचें नांव ऐकतांच माझ्या मनांत वरचेवर येऊं लागले, आणि त्यामुळें मला कंप भरला. भद्रंभद्रालासुद्धां कांपरें सुटलें होतें किंवा नाहीं तें माहीत नाहीं; आणि एवढ्या मोठ्या थोर पुरुषाच्या अंगाला स्पर्श करून तपासून पाहाणेंहि मला बरें वाटलें नाहीं. पण त्याची स्थिति काय आहे हें समजावें ह्मणून मीं त्याला हळूच विचारिलें, कीं, "येथून बाहेर छपरावर जातां नाहीं का येणार ?"

हळूच काय, पण मोठ्यानें बोलण्यालासुद्धां त्याची जीभ त्याच्या स्वाधीन नव्हती. त्याचे ओंठ फडफडूं लागले, दांतखिळी वाजूं लागली; बोलण्याला ह्मणून तो प्रयत्न करूं लागला तेव्हां तर बोबडीच वळली. त्यावरून मला मात्र समाधान वाटून आनंद झाला, कीं, मी एकटाच घाबरलों नव्हतों!

"पळून जाण्याची तर आतां आशाच नको!" भद्रंभद्र मोठ्या कष्टानें व अडखळत ह्मणाला.

थोडा विसांवा घेऊन व धीर धरून तो पुढें ह्मणाला "वायुदेवाच्या कृपेनें या घराचेंछप्परच जर उडालें, तर त्या धांदलींत आपल्याला अदृश्य होतां येईल."

पुन्हा त्याची जीभ गार पडून हालेनाशी झाली! पण पुन्हा जरा हालूं लागली, तेव्हां आणखी एकदा म्हणाला "किंवा या वेळीं इकडे येण्याचेंच कोणाला सुचलें नाहीं, तर सकाळीं निमूटपणें खालीं उतरावें, यजमानाजवळ माफी मागावी, आणि सरळ निघून घरीं जावें."

वायुदेवाची पूर्ण कृपा होऊन त्या लहरींतच हा बरळतो आहे, किंवा विचार करतांनाच अडखळतो आहे, याबद्दल मीं विचार करून ठरविण्याचे पूर्वीच तो पुन्हा ह्मणाला "पण खालीं काय चाललें आहे, तें ऐकूं तर खरें."

खालच्या लोकांनां आमच्यासारखीच भीति वाटत होती. आमच्यांत आणि त्यांच्यांत फरक एवढाच होता, कीं, त्यांच्या भीतीचें कारण आह्मांला माहीत होतें,

व त्यांनां त्यांच्या भीतीचें कारण माहीत नव्हतें. एकजण ह्मणाला "पण चोर आहेच असें तूं कशावरून ह्मणतोस ? घडघडलें तें कदाचित मांजरानें कांहीं पाडलें असेल ?"

यावर शेट ह्मणाला "मलाहि असेंच वाटतें. पण या सर्वांच्या मनांतून मला घाबरावण्याचें आहे ह्मणून ते चोर चोर ह्मणतात"

चाकर म्हणाला "खरें आहे. चोर मध्यरात्रीच्या आंत कधींच चोरीकरितां बाहेर पडत नाहींत. तें मांजरच असेल."

एक बाई चाकराला म्हणाली "तूं बऱ्याच चोऱ्या केलेल्या दिसतोस, आणि त्यामुळचं तुला चोरीच्या वेळाविळा माहीत आहेत. मांजर असलं तर जाना हांकून ये ! आणि कदाचित चोर असला तर तो तुझाच कोणी तरी भाईबंद असेल, तेव्हां तो तुला मारणारबिरणार नाहींच !"

चाकर शेटकडे पाहून म्हणाला "भाईबंद असेल त्यांचा ! मला आजपर्यंत कधीं कोणी जुगारी भामटे लोकांबरोबर फिरतांना किंवा बोलतांना पाहिलें आहे ? सर्वांच्या देखत तुम्ही मला चोर ठरवूं पाहातां आहां, पण शेटनांच विचारून पहा कोण ठरेल तो !"

शेट म्हणाला "बायकांबरोबर काय तक्रार करित बसला आहेस. मगा, तुझें तें हरामखोर पोट फाटलें आहे वाटतें ? तूंच म्हणाला होतासना पोट फाडल्याशिवाय माझ्या पोटांतली गोष्ट कधींच कोणाला कळणार नाहीं म्हणून ?"

नंतर दाराकडे पाहून शेट म्हणाला "अरे कायरे, पोलीस येतो आहे का ?"

घाईनें आलेला मनुष्य म्हणाला "पोलीस म्हणतो, कीं, चोर असला तर तुम्ही शोधून काढा आणि आमच्या स्वाधीन करा म्हणजे मग आम्ही त्याला कैद करूं."

मला जरा हंसूं आलें, पण भद्रंभद्रानें मला दटावून म्हटलें "तुझें हंसणें जर खालीं ऐकूं गेलें तर मारच बसेल आणि आपण मांजरांचे मनुष्य बनूं ! सुधारक म्हणतात मांजरें हंसत नाहींत. वेदांतदृष्ट्या पशु आणि मनुष्य हे एकच आहेत, हें मी आतांचें आपलें उदाहरण देऊन वाटेल तेव्हां सिद्ध करून दाखवीन, व त्यांची भ्रांति दूर करीन. पण हे खालचे लोक त्याच्या आधींच आमच्या हंसण्यावरून आम्हां मनुष्यच असल्याबद्दल खोटेंच अनुमान काढतील !"

पोलीसची मदत आल्यामुळें शेटला निरनिराळे लोक निरनिराळ्या सूचना करूं लागले. एकजण ह्मणाला "चोर तर कधींच पळून गेला असेल. शाहण्यासारखे आतां घरांत जाऊन स्वस्थ निजाना ?"

दुसरा ह्मणाला " चोहोंकडून लोक जमले आहेत. त्यांतून चोर कसा पळून जाईल? आतां बाहेरूनच सगळयाखिडक्या आणि दारें बंद करा, आणि पहारा ठेवून निजून जा. सकाळीं निर्भयपणें त्याचा खुलासा होईलच! "

ही सूचना आह्मांलाहि पसंत पडली; परंतु ह्मण आहेना, कीं, 'सुखामागून दुःख' त्याप्रमाणें एकाला बुद्धि सुचली आणि तो म्हणाला "इतकेजण जमले आहां ते सोंटे घेऊन घरांत शिरा आणि मारून सगळे कोनेकोंपरे शोधून काढा. हाडकें चुरून चांगलीं नरम झालीं, म्हणजे चोर असला तरीसुद्धां पळून जाण्याचा विचार करणार नाहीं. "

जसा कोणी मार खाण्याची तयारी करतो, त्याप्रमाणें माझें अंग ताठ होऊन सर्व गात्र आंतल्याआंत आंवळत चाललीं. भद्रंभद्र मोठ्यानें म्हणाला " शंकरा! त्राहि माम्! त्राहि माम्! "

जिन्याच्या वरच्या बाजूस उभा असलेला एक गृहस्थ म्हणाला "वरच्या माळयावर कोणीतरी बोललें. सर्वजण वर या. वाटोळे जमलों ह्मणजे जातो कोठें?"

## प्रकरण एकोणिसावें.

### संकटनिरसन.

आमचें दुर्दैव ओढवल्यामुळें त्या माणसानें जोर धरला आणि तो माळ्याच्या तोंडाशीं आला. मृत्यु आला ह्मणजे त्याच्यामागून जशीं मासिकें श्राद्धें वगैरे येतात, त्याप्रमाणें त्या माणसाच्या मागून दुसरेहि लोक आले व माळ्याच्या तोंडाशीं सगळे जमा झाले. देवाच्यादेवळांत दार उघडतांच पूजा करण्याकरितां पुढें जाण्याबद्दल जशी चढाओढ होते त्याप्रमाणेंच आमच्या पूजेच्या मंदिरांत न शिरण्याबद्दल चढाओढ सुरू झाली. माळ्यावर कोणाला तरी चढवावा असें सर्वांच्या मनांत होतें; परंतु स्वतः चढण्याची मात्र कोणाचीहि तयारी नव्हती. वर चढून येण्याला इतकी मोठी धास्ती, इतकी मोठी हरकत, इतकी मोठी अडचण वाटत होती, कीं, एकानें माळ्यावर धोंडे मारावे ह्मणून सुचविलें; कोणी कावेरूं लावलेली बांबूची लांब काठी माळ्यावर फिरवावी ह्मणून सुचविलें; कोणी गोंवऱ्यांचा धुमी सगळ्या माळ्याभर करावी ह्मणून सुचविलें. या निरनिराळ्या युक्तयांपासून काय निष्पन्न होईल तें वादविवाद करून ठरविण्याकरितां शेटहि मधून मधून बोलत होता. शेटचें बोलणें कानावर येतांच भद्रंभद्र माझ्या कानाशीं लागून ह्मणाला "शेटचा आवाज तर ओळखीचा दिसतो,पण तो कोण हें बरोबरसें ध्यानांत येत नाहीं!"

थोडा वेळ थांबून भद्रंभद्र पुन्हा म्हणाला "गंगास्नानाच्या वेळीं स्वतःची शुद्धता जशी उपयोगी पडत नाहीं, घरीं स्नान करून जावें लागतें, त्याप्रमाणेंच अंधारांत ओळखीचा उपयोग होत नाहीं. तेव्हां सर्वांत उत्तम युक्ति ही आहे, कीं, खालीं जर कोणी बाजलें ठेविलें तर धडपड न करितां एकदम उडी मारून आपण खालीं जावें."

इतक्यांत एकानें सूचना केली, कीं, आग विझवण्याचा बंब आणून त्याच्या तोटानें सर्व माळ्यावर पाण्याचा भडिमार सुरू करावा, ह्मणजे जो कोणी असेल तो एकदम बाहेर येईल."

भद्रंभद्र ह्मणाला "आतां स्तब्ध बसून राहण्यांत आर्यत्व नाहीं. चल माझ्या बरोबर."

माळ्याच्या तोंडाशीं आह्मी आलों तेव्हां भद्रंभद्र मोठ्यानें ह्मणाला "सद्गृहस्थ हो! आह्मी चोर नाहीं, आर्य आहों. कांहीं चूक होऊन,

अकस्मात् कांहीं अडचणी येऊन आह्मी या स्थितींत येऊन पडलों आहों. त्याची सविस्तर हकीगत मागाहून निरूपण करण्यांत येईल. तूर्त आह्मी निर्विघ्नपणें खालीं उतरून तुह्मां सर्वांनां भेटावें अशी योजना झाली पाहिजे. आमच्या-सारख्या महापुरुषांनां याप्रमाणें घेरून, आणि धास्ती दाखवून तुह्मीं केवढा मोठा अपराध केला आहे, याचें तुह्मांला भानसुद्धां नाहीं असें दिसतें. ज्या आमची वेदधर्मनिष्ठा भूकंपाच्या वेळींहि हालली नाहीं, ज्या आमचा जात्यभिमान ब्राह्मणांनां दारोदार भिक्षांदेहि करितांना पाहूनहि स्खलन पावला नाहीं, ज्या आमची शुद्धता मलिन दुर्गंधीयुक्त जाग्यांत जेवूनहि दूषित झाली नाहीं, त्यांनां म्लेंच्छांनीं बनविलेल्या बंबांतल्या पाण्यानें भिजवून भ्रष्ट करण्याचा तुमचा विचार होता काय ? तुह्मांला काय सुधारकांनां मदत करावयाची आहे ? वेदधर्म सनातन नाहीं असें ठरवून पाश्चात्यांच्या बंबाचा उपयोग करावयाचा आहे ? वेदांत कोठें बंबाचा उल्लेख आहे ? बंबाच्या उपयुक्ततेचा स्वीकार करणें ह्मणजे वेदांची सर्वज्ञता नाकबूल करण्यासारखें नाहीं काय ? आपल्या त्रिकालज्ञानी ऋषिमुनींनां बंबाबद्दल माहिती नव्हती असें ह्मणणें ह्मणजे स्वदेशाभिमानी आर्यांनां खालीं पाहण्यास लावणेंच नव्हे काय? करितां बंब हा पाश्चात्यांच्या मोहाचा परिणाम आहे, निव्वळ भ्रम आहे, असें ह्मणणें हेंच आर्यांनां उचित आहे. बेहत्तर घर जळून गेलें तरी, बेहत्तर सर्व शहर जळून गेलें तरी बंबाचा उपयोग करतांच कामा नये ! प्राण जाईपर्यंत--प्राण गेला तरीसुद्धां धर्माप्रमाणेंच आचरण केलें पाहिजे ! करितां, याप्रमाणें धर्महीन क्रिया करणारे, आर्यांवर बंबांतील पाण्याचा प्रयोग करावयास सांगणारे, व तें ऐकून घेणारे निव्वळ शाप--पात्र आहेत ! याच रीतीनें सिद्ध करून दाखवितां येईल, कीं, आमच्यावर काठ्या, धोंडे, बांबू, धुरी, इत्यादिकांचा प्रयोग करण्यास सुचविणारे सर्व धर्मभ्रष्ट आहेत. ”

भद्रंभद्राचें हें सर्व बोलणें ऐकून घेऊन जमलेल्या मंडळीनें आम्हांला व्यवस्थितपणें खालीं उतरून घेतलें. अंधारांतून आम्हीं एकदम प्रकाशांत आलों. लाडवांचा आणि जिभेचा समागम झाला म्हणजे जीभ जशी लाडवांनां तेव्हांच ओळखते, व लाडूहि जिभेला ओळखतात, त्याप्रमाणें घरधन्यानें आम्हांला व आम्हीं घरधन्याला ओळखलें. ज्याचें अद्यापपर्यंत आम्ही भय बाळगित होतों, ज्याच्या भाषेवरून तो वैश्य--शेट असावा असें आम्हीं समजत होतों, तो शंभु पुराणिकाचा मेहुणा वल्लभराम आहे, असें समजतांच आम्हांला जो आनंद झाला, त्याचें कारण मित्रलाभ किंवा ताडनाच्या भीतीचा नाश हें ठरविण्याची

ही वेळ नव्हती. कारण, जमलेल्या लोकांनीं आमचें कमनशीब, आमचा मूर्खपणा, आमचा भित्रेपणा, यांबद्दल इतकी लांबलचक टीका सुरू केली, कीं, त्या सर्वांचें निराकरण करण्याकरितां भद्रंभद्रानें उभें राहून भाषण करण्यास सुरुवात केली, आणि आमच्या कीर्तिस बट्टा न लागेल, व आमचा कर्मीपणा नजरेस न पडेल अशा रीतीनें सर्व गोष्टींचा खुलासा केला, व सर्वांची जिज्ञासा तृप्त केली. वारंवार आमच्या चेहऱ्यांकडे न्याहाळून पाहून व थोड्यावरच सर्व घोंटाळा आटपला म्हणून निराश होऊन सर्व लोक हळुहळू निघून गेले. प्रथम मारण्याकरितां तयार झालेले व नंतर चर्चा व थट्टा करण्यांत गुंग झालेले सर्वलोक निघून गेल्यामुळें आम्हांला फार आनंद झाला व योग्यांनां एकांत कां आवडतो त्याचेंहि रहस्य समजलें.

वल्लभराम म्हणाला "संकटांत असतांहि आपण आर्यवृत्ति, सुधारकांचा तिरस्कार आणि सिद्धांत स्थापित करण्याची अचाट युक्ति, हीं बिलकूल ढळूं दिलीं नाहींत, हें पाहून फारफार आनंद झाला. माझीसुद्धां एकदा एका सुधारकाबरोबर पाण्याच्या बंबाबद्दल तक्रार झाली होती. रस्त्यांत पाण्याचा बंब होता तो पाहून तो मला म्हणाला पहा, 'तुमच्या ब्राह्मणांनीं वेदमंत्रांचें पठण केलें, पर्जन्यसूत्र पाठ केलें, पण पिण्याला मनमुराद पाणी मिळावें ह्मणून बंब वगैरे केले काय?' मीं म्हणालों 'वेद हे अनादि आहेत आणि बंब हे सादि आहेत!' ह्या एका शहानेंच अगदीं मात झाला. सादि अनादि, यांमध्यें फरक काय? वेद अनादि असतील, पण त्यांतले मंत्र उच्चारून फायदा काय! असले प्रश्न अप्रस्तुत ठरून त्याची फजिती झाली तरी पुन्हा पुन्हा तेच तेच प्रश्न तो विचारी! शेवटीं मीं उत्तरादाखल हाच सिद्धांत सांगितला, कीं, 'वेदांच्या पूर्वींचीं पुस्तकें अगर इतिहास उपलब्ध नाहींत एवढ्यावरून वेद अनादि आहेत हें सिद्धच आहे. त्याप्रमाणेंच शब्द नित्य आहे, आणि त्याचें फलहि नित्य आहे, त्यामुळें वेदरूप ब्रम्हाच्या उच्चारानें ब्रह्मत्वाची नित्य प्राप्ति होते—हें तर दोन आणि दोन चार—इतकें स्पष्ट आहे. आर्य शब्द पाश्चात्य शब्दाप्रमाणें नाहींत, कीं, त्यांचा अर्थ समजल्यानंतर आणि मनांत हेतु उतरल्यानंतर त्याच्याबद्दल समजूत पडते. पाश्चात्यांनां तर सत्य शब्दाचा उच्चार केल्यानंतर त्याचा अर्थ समजावा लागतो, त्याचें महत्व मनांत आणावें लागतें, आणि मग त्याप्रमाणें आचारविचार करावा लागतो, तेव्हां त्यांनां त्याचें फळ मिळतें. कोयनेल शब्दाचा उच्चार केल्यावर मग तें पोटांत घ्यावयाचें, आणि नंतर त्याचा उपयोग व्हावयाचा! परंतु आर्यांनीं

ओम् असा उच्चार केला, कीं, तत्काळ त्यांनां मोक्ष मिळतो. अर्थ समजण्याची जरूर नाहीं. आणि अर्थ समजण्याचा प्रयत्न करण्याचेंहि कारण नाहीं ! माझा हा आणि असलेच दुसरे अढळ सिद्धान्त सूत्रांच्या रूपानें एकत्र करून त्यांच्या प्रती दिग्विजय करण्याकरितां देशोदेशीं पाठविल्या आहेत. त्यावरून सुधारक तर यावरून अगदीं चकीत होऊन गेले आहेत. ''

## प्रकरण विसावें.

### रहस्यावतार.

केवळ लोकहिताकारितां झालेल्या आजच्या मेहनतीनें भद्रंभद्र अगदीं थकून गेला होता, व अंधकाराबद्दल त्याच्या मनांत कांहीं तरी संशययुक्त भावना उत्पन्न झालेली दिसत होती. शिवाय अपघातानें, नशिबाच्या साहाय्यानें, भररस्त्यावर जरी प्रत्यक्ष कपाळाशीं संबंध जुळवून आणिला होता, तरी तेवढयानें संतुष्ट न होऊन आणखी एक योग जुळवून आणून भद्रंभद्राच्या पायांशीं व पाठीशीं बरीच लगट करून चांगला न विसरण्यासारखा संबंध जोडला, व विधात्रीच्या कायमच्या लेखासारख्या ठळक रेषा सर्व शरीरावर उत्पन्न केल्या आणि भविष्यावर अवलंबून वाट पहात बसण्यास न लावितां तत्काळ प्रत्यय देणाऱ्या वेदनाहि सुरू केल्या! या अननुभूत योगामुळें भद्रंभद्रांचा घरीं जाण्याचा विचार जरा मंदावल्यासारखा दिसत होता; परंतु वल्लभरामाजवळ जरी आमची चांगली ओळख होती, तरी "तुह्मी आज जेवायला येथेंच रहा," असें ह्मणण्यासारखा त्याचा आमचा स्नेह नव्हता. "जेवाखायचें नाहींच," असें किंवा अशाच अर्थाचें भद्रंभद्र माझ्याजवळ एकदोनदा बोलला; परंतु वल्लभराम जेवणाबद्दल तर कांहीं बोलला नाहींच, पण 'रहा,' 'नको राहूं,' असेंहि ह्मणाला नाहीं. वल्लभराम आर्यपंथाचा असल्यामुळें भद्रंभद्राच्या मनांत त्याच्याबद्दल पूज्यबुद्धि वाटत होती; परंतु ती ढांसळूं लागली होती. नक्षत्रांच्या भारानें ओथंबून गेल्यामुळें रात्रीच्या प्रहरीं सर्व आकाश जसें पृथ्वीवर कोसळून पडण्याच्या बेतांत यावें, परंतु इतक्यांत सूर्यानें प्रगट होऊन आकाशाला सांवरून धरावें, त्याप्रमाणें भद्रंभद्राच्या पूज्यबुद्धीचा अधःपात होण्यापूर्वीच त्रवाडी येऊन दाखल झाला व त्यानें त्या पूज्यबुद्धीला सांवरून धरिली. "क्यंव खुशालचंद वल्लभराम! काय विचार चालला आहे?" असें बोलत बोलत तो आंत आला. परंतु आह्मांला पाहून तो जरा कचरला. आह्मांला नमस्कार करून तो आमच्याजवळ येऊन बसला, व त्यानें थोड्यांत आमची सर्व हकीगत विचारून घेतली. नंतर दुसऱ्या खोलींत जाऊन वल्लभराम व त्रवाडी एकमेकांच्या कानांशीं लागून दोघेंहि परत बाहेर आले व जेवण्याबद्दल व रात्रीं तेथेंच राहाण्याबद्दल ते आह्मांला आग्रह करूं लागले. आह्मींहि आढेवेढे न घेतां होय ह्मटलें.

भोजन वगैरे करून एकमेकांनां संतुष्ट केल्यानंतर आह्मी चौघेजण आर्य पक्षाच्या विजयाबद्दल गोष्टी बोलत बसलों. त्रवाडी ह्मणाला "वल्लभराम, आजकाल गुजराथेंत आर्यपक्ष केवळ तुमच्यामुळेंच चालतो आहे. बोलणारे, लिहिणारे, दुसरे पुष्कळ असतील; परंतु विद्वत्ताप्रचुर व्याख्यानें देऊन आर्यपक्षाचें योग्य समर्थन तुह्मीच करित आहां."

वल्लभरामानें 'होय' किंवा 'नाहीं' ह्मणून उत्तर देण्यासारखा हा प्रश्न नव्हता. त्यामुळें ऐतिहासिक वृत्ति धारण करून तो ह्मणाला "अशी एक वेळ होती, कीं, त्या वेळीं बरेच इंग्रजी शिकलेले जेवढे ह्मणून होते, त्यांनां इतर लोक सुधारक समजत, आणि हे सुधारकच त्या वेळीं बहुतेक बाबतींत पुढारी असत. यामुळें जुन्या पद्धतीच्या लोकांनां फार पंचाईत पडत असे. सुधारकांजवळ वादविवाद सुरू झाले ह्मणजे जुन्या मंडळीला त्यांच्यापुढें आपली बाजू व्यवस्थित रीतीनें मांडतां येत नसे. इंग्रजी शिकलेला, परंतु आपल्या मतांचा अभिमानी व तीं मतें योग्य रीतीनें सुधारकांपुढें मांडणारा असा कोणी तरी मनुष्य त्यांनां पाहिजे होता. त्याप्रमाणेंच इंग्रजी शिक्षण मिळालेल्या मंडळीला जुन्या पक्षांत शिरून शास्त्रीलोकांनां शरण जाण्यांत कमीपणा वाटत होता, व त्यांच्याशीं संबंध ठेवण्यासहि संकोच वाटत होता. जुन्या मतांचा अभिमानी, परंतु आपल्याप्रमाणेंच चांगला इंग्रजी शिकलेला असा कोणी असल्यास त्याला आपला पुढारी अगर गुरु करण्याचा त्यांचा विचार होता."

याच्या पुढचें वाक्य बोलतांना वल्लभरामाचा जरा घोंटाळा होईल असें वाटून जणूं काय आपल्या लक्ष्यांत आलें असें दाखवून त्रवाडी एकदम ह्मणाला "तशा प्रकारचे त्या वेळचे अभिमानी व पुढारी गुरु ते बहुधा आपणच!"

भद्रंभद्राच्या चेहऱ्यावरची अभिमानवृत्ति एकदम थोडी उतरल्यासारखी दिसूं लागली, व त्याच्या कपाळाला आंठ्या पडल्या; परंतु स्वतःच्या मोठेपणाची प्रशंसा न करितां तो एवढेंच ह्मणाला "शास्त्रीवर्गाची अवगणना करण्यापासून परिणाम चांगला होणें शक्य नाहीं. तसेंच पाश्चात्य विद्येच्या साहाय्यानें आर्यपक्षाचा उत्कर्ष होईल हें ह्मणणेंहि असंभवनीय आहे."

वल्लभराम ह्मणाला "आर्यधर्माचें सनातन स्वरूप आपण ह्मणतां तसेंच आहे; परंतु आर्यधर्माच्या पुष्टीकरितां त्यांतलींच वचनें दाखविलीं तर मतांधतेचा आरोप येण्याची भीति असते. ह्मणून मी बोलायची वेळ आली

ह्मणजे तेवढ्यापुरतें असेंच ह्मणतों, कीं, 'सत्य हें जेथें असेल तेथून तें घेण्याची आपली तयारी असली पाहिजे—जुनें किंवा नवें, या देशांतलें किंवा परदेशांतलें—सत्य ह्मणून जेवढें असेल, तेवढें ग्रहण करण्याला आमची बिलकूल हरकत नाहीं! या रामबाण कोटीनें सत्य शोधून काढणाऱ्या घमेंडखोरांच्या माना खालीं होतात, व त्यांची शेंडी आमच्या हातांत येते! कदाचित् एखादी नवीनच पाश्चात्य गोष्ट सत्य ह्मणून ग्रहण करण्याची वेळ आलीच, तर 'ती आपल्या सनातनधर्माच्या विरुद्ध आहे' ह्मणून सणसणीत जबाब देण्यास कोणती हरकत? 'वेद हे ईश्वरप्रणीत आहेत, व त्यांच्या आधारानें झालेल्या श्रुतिस्मृति शब्दप्रमाण आहेत. करितां त्यांचें आह्मांला उल्लंघन करतां येणार नाहीं. वेदव्यासादि ऋषींहून आह्मी जास्त शहाणे आहों असें आह्मांला वाटत नाहीं.' असें सांगून दुसराच एखादा प्रश्न उपस्थित करावा, ह्मणजे सत्याच्या रंगरूपाच्या अवगणनेचा प्रश्न प्रतिपक्षाच्या मनांतून नाहींसा होतो. या देशांतील जें जुनें ह्मणून आहे तें जुनेंच आहे, व त्यामुळेंच तें सत्य आहे, असें एका निबंधांत मीं दर्शवून शेवटीं असेंच लिहिलें आहे, कीं, आह्मांला जुनें आणि नवें दोन्ही सारखींच. जें सत्य असेल तें ग्रहण करावयाचें! त्यामुळें सुधारक अगदीं गडबडून गेले आहेत, व त्यांनां कांहींएक उत्तर देतां येत नाहीं. कारण, जुन्याबद्दलचा आग्रह सत्यशोधक वृत्तिच्यां उलट आहे असें ते ह्मणाले तर वरचे शेवटचें वाक्य मी त्यांनां दाखवून देईन! या देशांतलें जें जें असत्य ठरेल तें तें त्याज्य आहे, असें कधींहि ह्मणावयाचें नाहीं, एवढी खबरदारी ठेविली ह्मणजे झालें."

भद्रंभद्र ह्मणाला "ही युक्ति ठीक आहे; परंतु कित्येक आर्यांचें ह्मणणें असें आहे, कीं, शास्त्र आणि तर्क यांची सांगड घातली तर शास्त्राची हानि होते, आणि शास्त्रवचनांनां तर्काची जरूरी आहे असें वाटूं लागल, कीं, शास्त्राचा अपमान होतो."

वल्लभराम ह्मणाला "हें मलाहि माहीत आहे; परंतु हें जर उघडपणें कबूल केलें, तर सुधारकांचेंच ह्मणणें कबूल केलें असें ह्मणतील. सत्याचा आह्मांला निःपक्षपातीपणानें निर्णय करावयाचा आहे असें सांगितल्याशिवाय चालावयाचेंच नाहीं; परंतु त्यामुळें प्राचीन आर्यधर्मापैकीं कांहीं टाकून द्यावें लागेल असा संशय घेण्याचें कारणच नाहीं. 'अनादिसिद्ध व्यवस्था' नामक ग्रंथांत मीं सिद्ध

केलें आहे, कीं, या देशांत आणि यूरोप–अमेरिकेंत हल्लीं जे कित्येक विद्वान हिंदुस्थानांतील प्राचीन ग्रंथांतून आजपर्यंत अज्ञात राहिलेलें रहस्य बाहेर काढून दाखवित आहेत त्यांचें मत असें आहे, कीं, ऋषींनीं कोट्यवधी वर्षांपासून सांठवून ठेवलेल्या शास्त्रांतूनच धर्माचा अमूर्त रूपानें प्रथम अवतार झाला. प्राचीनकाळींसुद्धां कित्येक धर्मोपदेशकांनीं आपल्या ऋषींप्रमाणेंच कित्येक मतें प्रसिद्ध केलीं आहेत, त्यांवरूनहि हेंच सिद्ध होतें, कीं, आपला सनातन धर्म—अधर्म नाहींसा करण्याकरितां पुन्हा पुन्हा अवतरतो. कोणत्याहि लोकांचा इतिहास घ्या,—त्याच्या आरंभीं धर्म दृष्टीस पडतो यावरून सर्वांचें मूळ आर्यधर्म हा अनादि असला पाहिजे, असाच सिद्धान्त ठरतो. याप्रमाणें हल्लींच्या पाश्चात्य पद्धतीला अनुसरून केलेला तर्क ह्मणजे आपल्याला शास्त्राचाच अवतार आहे. तर मग शास्त्रांबरोबर त्याचा संयोग झाल्यास हरकत कोणती? या अवताराला मीं ' रहस्यावतार ' असें नांव दिलें आहे. "

आनंद मानण्यासारखें कांहीं कारण सांपडलें असावें अशा प्रकारच्या उत्साहवृत्तीने भद्रंभद्र ह्मणाला " धर्म मूर्तरूपानें नसून अमूर्त रूपानें अवतरला असेल तर कोणा एका विशिष्ट व्यक्तीला धर्मोद्धारक कसें ह्मणतां येईल? अवतार झटला ह्मणजे त्याचा नायक कोणीहि मनुष्य असणें शक्यच नाहीं."

हा आक्षेप सहन झाला नसावा ह्मणून कावराबावरा होऊन व नाकपुड्या चढवून त्रवाडी ह्मणाला " वल्लभरामानें आपला सिद्धांत अजून पूर्णपणें तुमच्या पुढें मांडलेला नाहीं.इतर राष्ट्रांतून जेव्हां श्रीविष्णूंनीं अवतार घेतला, तेव्हां सर्वात्म्या श्रीविष्णूला म्लेंच्छांपासून दूर रहावें लागलें, तेव्हां त्या ठिकाणीं स्वतां प्रगट न होतां धर्मप्रसार करणारे आपले अंशभूत पैगंबर पैदा केले. त्याप्रमाणेंच या रहस्यावतारांतसुद्धां श्रीकृष्ण परमात्म्यानें स्वतः अवतार धारण न करितां धर्माला अमूर्त अवतार बनवून त्याचें प्रकाशन व प्रसरण करण्याकरितां पैगंबर या नात्यानें वल्लभरामाला जन्म दिला आहे. विनयशीलपणामुळें वल्लभराम हा परमसिद्धान्त स्पष्टपणें कोणालाहि सांगत नाहीं, त्यामुळें अनेक वेळां गैरसमज मात्र होतो; परंतु अवतारी पुरुषांनां 'आत्मप्रशंसा' हा दोष लावतां येणार नाहीं तर श्रीमद्भगवद्गीतेंत श्रीकृष्ण स्वतःच सांगतात, कीं, ' मी असा आहें आणि मीं असें केलें–' त्याला 'आत्मप्रशंसा' नाहीं का ह्मणावी लागणार? असले दोष मनुष्यांनां लागू आहे, ईश्वराला नाहीं. "

भद्रंभद्र रागावून म्हणाला "माझें आर्यत्व इतकें जाज्वल्य आहे, कीं, 'पैगंबर' या म्लेंच्छ शब्दाचा नुसता कोणीं उच्चार केला, किंवा कोणीं तो शब्द ऐकिला, तर तो भ्रष्ट होतो, असें माझें ठाम मत आहे. मग तुमची ही असली अनार्य कल्पना मला कशी सहन होईल? आपण बोलतां याला कांहीं शास्त्राधार आहे काय?"

या वेळीं त्रगाडीबद्दलचें उत्तर वल्लभरामानें दिलें. तो म्हणाला "स्वीत्झर्लंडांतील डाक्तर नोबॉडी यानें प्रत्येक देशांत प्रवास करून व बारकाईनें तपास करून 'धि राइझिंग प्रॉफेट' नांवाचा ग्रंथ नुकताच प्रसिद्ध केला आहे, त्यांत–"

भद्रंभद्र अधीर होऊन जोरानें म्हणाला "मी शास्त्राधारांबद्दल बोलतों आहें! आणि शिवाय हेंहि विसरतां कामा नये, कीं, प्रसन्नमनशंकरासारखा आर्यश्रेष्ठ आपली पाश्चात्य प्रमाणें देण्याची पद्धती पसंत करित नाहीं. आपल्या पुस्तकांवरून तर असें दिसून येतें, कीं, आपली त्यांच्याबद्दल फार पूज्यबुद्धि आहे."

थोडा संकोच वाटून वल्लभराम म्हणाला "पारमार्थिक साधनाला विकारवश मनोवृत्ति अगदींच निरुपयोगी असून ती अखेर त्याज्य आहे. करितां अशी वृत्ति होऊन त्यामुळें चूक होणें बरोबर नाहीं. प्रसन्नमनशंकरभाई खचित असून फार उत्तम मनुष्य आहेत; परंतु स्वतःच्या विद्वत्तेची परीक्षा कशी करावी, याबद्दल त्यांची व माझी विचारसरणी अगदीं भिन्न भिन्न आहे. त्यांचे विचार मला माहीत आहेत; परंतु सुशिक्षितवर्ग हा शास्त्रप्रमाणानींच संतुष्ट होणार. करितां पाश्चात्य विद्वान्सुद्धां आमच्या शास्त्रांत सांगितलेलें आहे तसेंच सांगतात, असें प्रमाण पुढें मांडलें ह्मणजे तर ते जास्तच संतुष्ट होतील असें नाहीं का आपल्याला वाटत? इतका मोह तर पाश्चात्य शिक्षणामुळें राहणारच; परंतु शास्त्रें पूज्य आहेत, असें सांगून पाश्चात्य विद्वानांचीं प्रमाणें दिल्यानें 'रहस्यावतार' जास्त चांगल्या रीतीनें सिद्ध होईल, असें आपल्याला नाहीं का वाटत?"

भद्रंभद्र कांहींच बोलत नाहीं असें पाहून त्याची नीट समजूत पाडून देण्या, करितां वल्लभराम ह्मणाला "केवळ सत्यशोधक वृत्तीचें प्रदर्शन करण्याकारितांच इतर देशांच्या शास्त्रांचें नांव घ्यावें लागतें. सर्व देशांतील निरनिराळ्या धर्मांचें रहस्य तपासावयाचें व सत्य असेल तें ग्रहण करावयाचें, हा जरी बाहेरून दाखविण्याचा उद्देश असला, तरी अंतर्यामींचा उद्देश हाच आहे, कीं, आपल्या

देशांतील आर्यधर्माला जुळतें असून जें निरनिराळ्या रीतीनें तपासलें तरी टिकूं शकेल तेवढेंच काय तें त्या धर्मातील रहस्य असें ठरवावयाचें. त्यामुळ आपल्या शास्त्रांबद्दल भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. म्लेच्छ आणि यवन यांच्याबद्दल आपल्या शास्त्रकारांनीं सांगितलेलें अक्षरशः खरें आहे. आणि ते त्रिकालज्ञानी होते, हें अनादिकालापासून सिद्ध झालेलें आहे. कारण, अनादिकालानंतर इतका काळ लोटला असूनहि त्यांचीं कांहीं वचनें खरीं ठरतात. त्यामुळें परधर्मातील आधारांबद्दल त्यांनीं केलेला निषेध निरुपयोगी किंवा खोटा म्हणतां येणार नाहीं; परंतु आपल्या शास्त्राचें महत्त्व वाढविण्याकरितां पाश्चात्य विद्वान् जर मदत करित असले तर त्यांच्या त्या मदतीचा स्वीकार करणें हें शास्त्राला प्रतिकूळ कसें म्हणतां येईल? बालापासूनहि सुभाषित ग्रहण करावें, असें वचन आपल्या शास्त्रांत आहेच."

भद्रंभद्र एवढा वेळ जरा घोटाळ्यांत पडला होता तो एकदम म्हणाला "बाल म्हणून जें तेथें म्हटलेलें आहे तें आपल्या आर्यबालांबद्दल आहे. स्त्री आणि बालक हींसुद्धां गुणवान असलीं तर पूज्य आहेत हें ज्या ठिकाणीं सांगितलेलें आहे, त्या ठिकाणीं आर्यस्त्री आणि आर्यबालक यांच्याचबद्दल सांगितलेलें आहे, असें मानणें हेंच वेदधर्मानुसाऱ्याचें कर्तव्य आहे."

त्रवाडीनें मध्येंच प्रश्न केला "असें मानण्याला आधार आहेत काय?"

क्रोधाविष्करणानें, किंवा शब्दाचा उच्चार करण्यास लागणाऱ्या दीर्घ प्रयासानें, किंवा स्वाभाविक संवयीमुळेंच त्रवाडीच्या नाकपुडया फुगतात, तें बरोबर ठरविण्याकरितां तो पुन्हा केव्हां बोलेल याची त्याच्या तोंडाकडे टक लावून मी एकसारखी वाट पाहत होतों; परंतु त्रवाडी न बोलतां वल्लभरामच बोलूं लागला. तो म्हणाला "वेदवेदांगादि सर्व शास्त्रांचें मीं अध्ययन केलेलें आहे; पण आपण ह्मणतां याला एकहि आधार माझ्या आढळण्यांत नाहीं. पण मी सांगतों याला मात्र वाटतील तितकीं प्रमाणें सहज मिळतील. प्रथमतः रहस्यावतारांत प्रमाणांनो तोटाच नाहीं. कारण, त्यांतील प्रत्येक वाक्य शास्त्रतुल्य असून कोणत्या तरी मताच्या प्रमाणांनीं सिद्ध केलेलें आहे. शिवाय, या विषयासंबंधानें योग्य अधिकाऱ्यानें स्पष्ट निकाल केलेला आहे. तो असा आहे, कीं, स्त्री आणि बालक यांत आकर्षण करणारा जो मोह तो मायेचेंच स्वरूप आहे, आणि ब्रह्ममय विश्वांत भ्रम उत्पन्न करणारी माया जी मोहिनी वगैरे स्त्रीचें किंवा अशींच दुसरीं रूपें धारण करिते

त्या मायेच्या ठिकाणीं आर्य–अनार्य, ब्राह्मण–म्लेंच्छ, इत्यादि भेद राहतच नाहींत. तिच्या येथें सर्व सारख्याच आदराला योग्य ठरतात. आणि हें अभेद ज्ञानच ब्रह्मानंद प्राप्त करून देण्याला साहाय्यभूत होतें. त्यावरूनच शास्त्रवचनांत आर्यस्त्री आणि आर्य बालक यांच्याच गुणांनां पूज्य मानावें असें आहे; ह्मणून जें आपण ह्मणतां तें रहस्याला विरुद्ध आहे. गुणांचें ज्ञान हेंच भेदभावाचें आणि अज्ञानाचें मूळ आहे, त्यामुळें स्त्रियांत जो पूज्य मानण्यासारखा कांहीं अंश नजरेस पडतो, तो अखेर मायाच असतो, हें पारमार्थिक दृष्टीनें जाणावयाचें आहेच; परंतु त्यावरून ती माया सेव्य नाहीं असें मात्र नाहीं; कारण ब्रह्म आणि माया यांच्यांत भेद नाहीं, आणि ब्रह्माची ओळख पटल्यावर मायेची सेवा करित राहिल्यानेंच त्यांच्यामध्यें भेद नाहीं हें मनांत चांगलें ठसतें. मात्र हें आपल आणि तें दुसऱ्याचें ही भावना दूर झाली पाहिजे."

वल्लभरामानें त्रवाडीकडे पाहून जरा डोळे मिचकावले व कांहीं खूण केली. त्यामुळें भद्रंभद्र जास्तच घोटाळ्यांत पडला; परंतु उत्तर देण्याचा त्याचा जोर कमी झाला नाहीं. एक क्षणभर वल्लभरामाकडे नीट न्याहाळून पाहून भद्रंभद्र ह्मणाला "आपल्या ह्मणण्याप्रमाणें स्त्रिया आणि मुलें, उत्तम आणि मध्यम, पूज्य आणि अपूज्य, ज्ञानी आणि अज्ञानी, अशीं गुणावगुणांनीं युक्त असलीं पाहिजेत असें ठरतें. आपण हंसत नाहीं ह्मणून विचारितों, कीं, यांतला कोणता गुण अगर अवगुण सिद्ध करण्याचा आपला इरादा आहे? तुह्मींहि खरे आणि मीहि खरा, असें असलें ह्मणजे मग वाद कसला? आणि अशा विषयांत माझें आणि तुझें याचा जर भेदभाव मानावयाचा नसला, तर मग आपलें आर्यत्व तें काय राहिलें? या देशांतील आणि परदेशांतील आर्य व पाश्चात्य यांच्यांत भेद-भाव मानतां कामा नये, असें सुधारकांचें ह्मणणें आहे; आमचें आर्यांचें नाहीं"

हें ऐकून त्रवाडीच्या नाकपुड्या उंच होऊन फुरफुरूं लागल्या, आणि त्याचे डोळेहि चमकूं लागले. जणूं काय, मायेचेंच हें स्वरूप आपल्यापुढें आहे असें समजून वल्लभरामानें चंचल दृष्टीनें त्याच्या त्या चेहऱ्याकडे पाहून भद्रंभद्राला उत्तर दिलें "निज आणि पर हीं अभेद आहेत, हें ज्ञान अधिकारी असेल त्यालाच होईल. सुधारक तर भेद–भ्रमांत गटांगळ्या खात आहेत. आणि चांगलें–वाईट, पाप–पुण्य, अनीति–सुनीति यांचे अर्थ व्यावहारिक दृष्टीनें ठरवित आहेत; परतु ते अर्थ वेदान्तशास्त्राला कवूल नाहींत. ज्या विरोधा-

बद्दल आपल्याला विस्मय वाटतो आहे, त्यांतहि आश्चर्यकारक असें कांहीं एक नाहीं. आपण दोघेहि आर्यपक्षवादीच आहों. ही आपली सहज आपल्याला रहस्यलीला दाखविली."

योग्य रीतीनें आकृतीची विकृति करून त्रवाडी ह्मणाला "वल्लभरामाचें 'रहस्यलीला' नांवाचें काव्य आपण वाचलें नसावें,असें दिसतें. त्यांत उजेडाची अंधकाराच्या नांवानें स्तुति केलेली आहे, आणि अंधकाराची उजेडाच्या नांवानें निंदा केलेली आहे. नंतर अंधकाराची उजेडाच्या नांवानें स्तुति केलेली आहे, आणि उजेडाची अंधकाराच्या नांवानें निंदा केलेली आहे; आणि शेवटीं दोन्हीहि अभेद आहेत असें वर्णिलेलें आहे."

भद्रंभद्राची रसिकता जागृत झाली आणि पूर्वीचा वाईट ग्रह विसरून जाऊन तो ह्मणाला "धन्य आहे! तें तर अनुपम काव्य असलें पाहिजे!"

त्रवाडीनें वल्लभरामाची स्तुति केली, परंतु भद्रंभद्राला परीक्षाच करितां येत नाहीं असें ठरविल्यावर जसा आनंद व्हावा तशा रीतीनें तो बोलला "अहो, हें तर मीं तुह्मांला नुसतें त्या काव्याचें रहस्य सांगितलें! लीला ती निराळीच आहे! 'लीला' आणि 'रहस्य' असे काव्याचे दोन भाग आहेत. 'लीला' कवितेच्या रूपानें आहे, व 'रहस्य' हें त्या कवितेवरच्या टीका रूपानें आहे! जे कोणी कवितेचें रहस्य जाणणारे अधिकारी असतील, त्यांनां 'रहस्य' हें आनंदस्थान आहे! आणि वल्लभरामाला स्वतःची'लीला' हें आनंदस्थान आहे! आणि वल्लभरामाची कृपा असेल तर माझें दोन्हीं ठिकाणीं आहे!"

वल्लभरामानें रागावून गमतीनें त्रवाडीला एक तडाका लगावला. त्रवाडीनें तो प्रसाद निमूटपणें ग्रहण केला, व भद्रंभद्राला ह्मटलें "लीलेची खुबी कांहीं निराळीच आहे! ती देवता आहे देवता!"

कांहीं विचार करून,आठवण करतो आहे असें दाखवून,कपाळाला मोठी आंठी पाडून, भद्रंभद्र ह्मणाला "आपण लीलेचें काव्यदेवतेचें रूपक मानित आहां, पण मीं तर 'लीला' देवीचें खरें खरें मंदिर पाहिलें आहे.कालिकेचें लीला हें नांव कधीं ऐकिलेलें नाहीं खरें,पण त्या ठिकाणीं मीं जे अद्भुत चमत्कार पाहिले, त्यांच्यापुढें नांवाच्या अपूर्वतेचें कांहींच नाहीं. आपली इच्छा असेल तर त्या सर्व चमत्कारांचें वर्णन सांगतों, ह्मणजे तुह्मी अगदीं थक्क होऊन जाल. माझ्यावर कांहीं अजून निद्रेचें साम्राज्य सुरू झालेलें नाहीं."

त्रवाडीनें खूण करून वल्लभरामाची सम्मती मिळविली आणि ह्मटलें " जर सामाज्य सुरु झालें असलें तरी तें आह्मांला काढून टाकतां येईल. आप गोष्ट सांगण्याला सुरुवात तर करा."

भद्रंभद्र ह्मणाला "घोडा आणि पोंडा यांत जितका भेद आहे, तितका गोष्ट आणि वर्णन यांत भेद आहे; परंतु त्या चमत्कारांचें वर्णन कोणाजवळ सांगण्याचा अद्यापपर्यंत मला योग आलेला नाहीं, त्यामुळें आज योग संधि मिळाली असूनहि त्या भेदाचें कारणें व त्याचे परिणाम यांच्याबद्द शास्त्रानुसार विचार करण्याचें मागें टाकणें हें मला तरी योग्य वाटा नाहीं. आणि निद्रेच्या साम्राज्यानें माझ्यावर आपला अंमल सुरू केल्याव आपण काय पण प्रत्यक्ष ब्रह्मदेव आला तरी त्यालासुद्धां तें साम्राज बाजूला सारतां येणार नाहीं ! ज्यांना निद्रा येत नाहीं, अथवा लगुडा प्रहारानें ज्यांच्या निद्रेचा भंग होतो, त्यांना महारोगी समजावें, अ धन्वंतरीनें सांगून ठेविलें आहे. त्यामुळें माझ्यावरचें साम्राज्य काढून टाकण्याच्य कामीं आपल्याला यश येणें शक्य नाहीं. निद्रा आली ह्मणजे माझी एकदा गठडी वळते, आणि त्या सपाट्यांत जर का निद्रा निघून गेली तर मी एकदा उठून उभा राहतों. करितां हांतरुणावर बसून वर्णन सांगावें, हें निर्भय आहे."

भद्रंभद्राचें हांतरूण घालून होईपर्यंत श्रोत्यांनां नीज लागली, व श्रोते जा होईपर्यंत आपणहि नीज काढावी असा भद्रंभद्रानें विचार केला. ही सारी मंडळ झोपेंतून जागी होईपर्यंत वाचकांस उगीच तिष्ठत न ठेवितां सध्या येथेंच पडद पाडतों. भद्रंभद्राचा हा इतिहास वाचकांस पसंत पडल्यास त्याच्या पुढील लील पुढील भागांत निवेदन करण्यांत येतील. नाहीं तर येथेंच

**समाप्त !**

६२
निरंकोळ